॥ श्रीगुरुदेवदत्तप्रसन्न. ॥

# अकबर.

ही ऐतिहासिक कादंबरी

कै० अनंत केशव चितळे

यांनीं लिहिली.

ती

प्रकाशक

गोविंद विनायक आपटे

ह्यांनीं

" मोदवृत्त " छा० छा.

शके १८३०.

( सर्व हक्क प्रकाशकानें राखून ठेविले आहेत. )

किंमत १॥ रुपाया.

# प्रस्तावना.

पुढील ऐतिहासिक अकबर कादंबरी यद्यपि एका हिंदी पुस्तकाच्या आधारानें लिहिली आहे. तथापि तिचें मूळ फारच लांब आहे. ही कादंबरी मूळ डॉक्टर वॉनलिम्बर्ग ब्राउअर नामक ग्रंथकारानें डच भाषेंत लिहून ती हॉलंड देशांतील हेगनामक शहरीं इ. स. १८७२ या वर्षी प्रसिद्ध केली. पुढें इ. स. १८७७ यावर्षी तिचें जर्मन भाषेंत भाषांतर होऊन तें लिपझिक् येथें छापून प्रसिद्ध झालें. नंतर थोडक्याच काळांत तिचें इंग्रजी भाषांतर होऊन तें हिंदुस्थानांत आलें. हें इंग्रजी पुस्तक सांप्रत दुर्मिळ झालें आहे. श्रीक्षेत्र काशी येथील "भारतजीवन" वर्तमानपत्राचे संपादक बाबू रामकृष्णवर्मा यांनीं सदर कादंबरीचें हिंदी भाषेंत भाषांतर केलें. लेखक चितळे यांनीं सदर कादंबरीचें मराठी भाषांतर करण्याची परवानगी मागितली. त्यावेळी बाबूमहाशयांनीं आपल्या सर्वच पुस्तकांचें मराठी भाषेंत भाषांतर करण्याची लेखकाला मोठ्या प्रेमादरानें परवानगी दिली. त्यावेळीं चितळे यांनीं एकंदर १७ खंडापैकीं ७ च खंडे छापून प्रसिद्ध केली. बाकींचीं खंडें प्रसिद्ध करण्यापूर्वींच लेखकाचा अंत झाला. असो, सदरहु अपूर्ण कादंबरी मी पूर्ण छापून प्रसिद्ध केली. ह्याचें सर्वश्रेय आश्रयदात्यांकडे आहे. मोदवृत्त छापखान्याचे मालक रा. रा. दामोदर लक्ष्मण लेले यांनीं काळजीपूर्वक काम लवकर छापून दिल्याबद्दल मी फार आभारी आहें. आतां ज्या जगच्चालकानें आह्मांस ही मातृभाषेची सेवा करण्याचें बुद्धिसामर्थ्य दिलें, त्याची अनन्यभावानें प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

श्रीक्षेत्र वाई
मा. व. २ शके १८३०

प्रकाशक.
गो. वि. आपटे.



Shrimant Sayajirao Cayakwad. श्रीमंत सयाजीराव गायकवाड.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

# अर्पण पत्रिका.

श्रीमंत सरकार.

महाराज सयाजीराव गायकवाड. जी. सी.

एस्. आय्.

सेनाखासखेल समशेर बहादर.

संस्थान बडोदें.

यांचे.

स्वधर्माभिमान, औदार्य, दयालुत्व

व ईश्वरभक्तिपरायणता इत्यादि

गुणांवर लुब्ध होऊन

हें पुस्तक

अर्पण केलें आहे.

प्रकाशक.

गो. वि. आपटे.

॥ श्रीगुरुदेवदत्तप्रसन्न ॥

# अकबर.

## खंड १ लें.

### योगिराज.

अस्ताचलासमीप येऊन पोहोंचलेल्या भगवान् भास्कराचें रक्तवर्ण किरण श्रीबद्रिनाथ आणि हिमवान् पर्वताचीं बर्फाच्छादित उत्तुंग शिखरें यांना प्रकाशित करीत आहे. त्याप्रमाणेंच त्या हिमगिरीच्या अधोभागीं असलेल्या पुष्पयुक्त वृक्षलतांवरून वहात येणारा मंदसुगंध दाक्षिणसमीर आपल्या बरोबर आणिलेल्या परागधूलीनें पर्वतशिखरांस सौरभमय करीत आहे. हजारों वर्षांपासून, छे ! युगानुयुगांपासून ही सृष्टीची अपूर्व शोभा अशीच चालत आली असून तिच्यांत कोणत्याही प्रकारचें विघ्न आलें नाहीं. एकीकडे तर सृष्टीनें असें अलौकिक शांत स्वरूप धारण केलें आहे आणि दुसरीकडे देशदेशांतरांचे कलह आणि घोर भयंकर महायुद्धें चाललीं आहेत; कोठें कोणा राज्याचा नाश तर कोणाची उत्पत्ती होत आहे; आणि कोठें परमात्म्याचा शोध करणारे विद्वान् उगीच पडल्या पडल्या विचार करीत आहेत कीं, परमेश्वरानें कोणत्या हेतूच्या सिद्धीस्तव या अपूर्व आणि विस्तृत संसृतीची रचना केली ! अस्तु.

इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत जेव्हां प्रसिद्ध शाहनशाह बादशहा अकबर याचें अखंड राज्य या भरतखंडांत व्यापून राहिलें होतें, त्या काळाकडे आतां आह्मी आपल्या प्रिय वाचकांचें लक्ष्य आकर्षित करीत आहोंत. वाचकहो, त्याकाळींही तीं हिमवान् पर्वताचीं उत्तुंग शिखरें साधारण मनुष्यांना दुष्प्राप्य होतीं. खरोखर देवभूमीच त्या ! ज्याठिकाणीं मनुष्यमात्राचें पाऊल क्वचित्च पडलें असेल, अथवा ज्याठिकाणीं शिकारी पक्ष्यानेंही क्वचित्च भरारी मारली असेल, किंवा कोणा जंतूचा शब्द कानीं पडला असेल; अशा प्रकारचा तो प्रदेश आहे. तेथें सदांसर्वदां अखंड शांतता वास करीत असते.

तथापि, आमच्या वाचकांनीं असें मात्र समजूं नये कीं, त्या निर्जन आणि शून्य वनांत कधीं कोणी गेलेंच नाहीं ! छे ! त्या उंच उंच वाढलेल्या तृणसमूहाच्या खालचे बाजूस एका लहानशा मोकळ्या जागीं आपलें प्रचंड शरीर निश्चिंतपणें पसरून एक अत्यंत भयंकर असा सिंह स्वस्थ पडला आहे ! आह्मी ज्या वेळची हकीकत लिहीत आहोंत, त्यावेळीं तो आपले मोठे मोठे डोळें उघडून समोरच्या श्वेत आणि हिममय अशा पर्वतशिखरांकडे दृष्टिक्षेप करीत होता. तो कधीं मंदकिरणांच्या ईषत्प्रकाशाकडे आपल्या अर्धोन्मीलित नेत्रांनीं अवलोकन करी आणि कधीं खालचे बाजूस पर्वततटीपर्यंत पसरलेल्या हिरव्यागार तराईकडे आणि दूरस्थ शोभायमान् पर्वतशिखरांकडे पाहून पुन्हां आपले डोळे मिटी. त्यावेळीं तो आपलें मनांत कसला विचार करीत असावा बरें ? मधून मधून आपले वन्हिज्वालेसमान रक्तवर्ण नेत्र वांसून वर खालीं पाहणारा तो सिंह कदाचित् आपल्या काश्मीरच्या जंगलांतील स्वतंत्र राज्याचें आणि स्वैर परिभ्रमणाचें स्मरण करीत असेल. आतां तरी तो प्रबल सिंहराज अगदीं गरीब मांजर होऊन, त्याचा समग्र विपिनावरील एकछत्री आधिकार नाहींसा झाला आहे कीं काय ? छे, तसें मुळींच नाहीं. सांप्रत देखील तो यथार्थत: काननस्वामी असून त्याच्या अधिकारांत ढवळाढवळ करणारा तेथें कोणीही नाहीं. त्याच्या रक्तवर्ण आणि आयत नेत्रांवरूनच दिसून येत आहे कीं, त्याला आपल्या अकंटक राज्याचें पूर्ण ज्ञान आहे. वाचकहो, अशाप्रकारें निश्चिंतपणें पसरलेला तो सिंह एकाएकी चमकून उठला

आणि एकीकडे कान देऊन कांहीं कानवसा घेऊं लागला, तों कोणा मनुष्यांचा शब्द आणि पावलांची चाहूल त्याच्या कानीं आली.

इकडे तो सिंह कान देऊन पावलांची चाहूल लक्षपूर्वक ऐकत होता. आणि तिकडे कांहीं अंतरावर थोडेसे प्रवासी त्या गिरिप्रदेशावरून खालीं तराईकडे आपला मार्ग क्रमीत चालले होते. त्यांच्यापैकीं एक नवयौवनसंपन्न तरुण कुमार होता. त्याचें सौंदर्य आणि मनोहर अंगकांति हीं अत्यंत रमणीय होती. त्याचे अंगावरील बहुमूल्य वस्त्रांवरून तो उच्च कुळांत जन्मलेला असावा असा तर्क करण्यास जागा होती. त्याचेबरोबर दुसरा एक पुरुष होता. हा दुसरा पुरुष कुमारापेक्षां वयानें बराच मोठा असून त्याच्या वस्त्राभरणांवरून त्याची हृदयस्थ गंभीरता बाहेर झळकत आहेसें वाटत होतें. या दोघांच्या बरोबर दोन सेवक होते. याप्रकारचे ते चार प्रवासी त्या अनन्य आणि शून्य मार्गानें हळूं हळूं खालीं उतरत होते. कुमार एका शुभ्रवर्ण आरबी घोड्यावर बसला असून तो घोडा दिसण्यांत लहान परंतु अत्यंत बलिष्ट आणि वेगवान् होता. दुसरा पुरुष एका मोठ्या काळ्या रंगाच्या घोड्यावर आरूढ झाला होता. आणि दोघे सेवक दोन प्रबळ आणि पुष्ट अशा पहाडी तट्टांवर बसून त्यांच्या मागें मागें चालत येत होते. कुमाराचें अंगांत एक नीलवर्ण रेशमी अंगरखा असून त्यावर जरीचा कशीदा काढलेला होता. व त्याला मानेजवळ रत्नजडित बुदाम लाविले होते. त्याचा पायजमाही तशाच तऱ्हेचा होता. त्याचें पायांत लाल रंगाचा व जरीचें काम केलेला जोडा होता. त्याचे डोक्यावर हलकीशीं टोपी असून तिजवर तुऱ्याप्रमाणें सुंदर रंगाचा पक्षिविशेषाचा पंख हिऱ्याच्या कणीनें जडविलेला होता. त्याच्या एका बाजूस सोन्याच्या म्यानांत रत्नजडित तरवार लटकत होती आणि कमरेस सोनेरी कब्जाची कट्यार खोंचलेली होती. तशीच त्यानें आपल्या उजव्या हातांत एक लांब सडक अशी बर्ची घेतली होती. त्याचें शरीर जरा लांबट असून तें अत्यंत डौलदार होतें. त्याचा वर्ण गोरा आणि कांति दीप्तिमान् होती. त्याचें डोक्याचे केश आणि नेत्र काळेभोर होते. तशाच त्याच्या मिशा किंचित् भोऱ्या होत्या. या त्याच्या लक्षणांवरून निःसंदेह तो कोणी उच्चकुलोत्पन्न पुरुष असावा असें वाटत होतें.

त्याचे बरोबर असलेल्या दुसऱ्या गृहस्थाच्या मुखाचा वर्ण कांहींसा गव्हाळा होता. त्याचे खांदे प्रशस्त होते. त्याचें शरीर अतिशय बलिष्ट आणि पुष्ट असून त्याचे चेहऱ्यावर आर्यता स्पष्टपणें व्यक्त होत होती. त्याची कुरळ्या केसांची दाढी त्याच्या उरोभागावर रुळत होती. त्यानें आपलें मस्तकास पांढरा शुभ्र आणि भारी किमतीचा पंजाबी फेटा बांधला होता. त्याचें अंगावर एक काळ्यारंगाचा पायघोळ रेशमी जामा असून त्यावर सोनेरी कमरबंद कसला होता. त्याच्या कमरेसही तरवार लटकत असून हातांत भाला आणि पाठीवर लहानशीं गोलाकार ढाल होती. सेवकांच्या अंगावर फक्त एकेक खाकी रंगाचा जामा असून हातांत रुप्याचीं सलकडीं छन्छन् वाजत होतीं. शस्त्रांपैकीं त्यांचे जवळ एकेक भाला आणि पाठीवर ढाल होती.

या प्रवाशांच्या संभाषणावरून हे कोण, कोठील आणि कोठें जात आहेत, हें सहज कळून येण्यासारखें होतें. तरुण कुमाराचें नांव सिद्धराम असून तो काश्मीरच्या मुख्य प्रधानाचा पुत्र होता. त्याच्या पित्यानें कांहीं अत्यंत अवश्यक पत्रांसह त्याला आग्ऱ्यास अकबराचे दरबारीं पाठविलें होतें. व तेथें गेल्यावर तो बादशाही सेनेच्या सेनापतीचें पद धारण करणार होता. त्याचे बरोबरचा दुसरा पुरुष त्याचा गुरु कुल्लुक होय. कुल्लुकगुरु हा जातीचा ब्राम्हण असून तो जसा शास्त्रविद्येंत तसा शस्त्रविद्येंतही प्रवीण होता. त्यानें सिद्धराम यांजकडूनही या दोन्ही विद्यांचें उत्कृष्ट अध्ययन करविलें होतें.

आग्रा येथें जाण्यापूर्वी त्यांना मार्गांत त्या पर्वतप्रदेशांत एका योगिराजाची भेट घ्यावयाची असून पुढें तीर्थराज प्रयाग येथें जावयाचें होतें. गंगायमुनांचे संगमावर प्रयाग येथें जो बादशाही किल्ला आहे त्यावर सिद्धरामाचा कोणी दूरचा संबंधी बादशहाचे आज्ञेनें किल्लेदाराचें काम पहात होता. त्याची सुंदर आणि सुकुमार कन्या इरावती ही सिद्धरामाशीं वचनदत्ता झाली असून ती या प्रसंगीं प्रेमपरायणा होत्साती मोठ्या उत्सुकतेनें आपल्या भावी पतीच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत होती.

वाट चालतां चालतां सिद्धराम ह्मणाला " काहो पूज्यवर, आपणाला या मार्गाची पूर्ण माहिती आहे; आणि तुह्मी म्हणाला कीं,

आपण गुरुपदाच्या आश्रमापाशीं येऊन पोहोंचलों. कदाचित् आपलें ह्मणणें बरोबर असेल; परंतु मला तपोवनाचें कांहींच चिन्ह येथें दिसत नाहीं, हें कसें ? कदाचित् ते येथून दुसऱ्या स्थानीं निघून गेले असल्यास असंभवनीय नाहीं. ”

कुल्लुक—थोडा धीर धर. येथून वळणाचे जागीं पोंचल्यावर, जेथें गुरुपदानें आपलें एकांतस्थान बनविलें आहे तें उपवन तुझ्या दृष्टीस पडेल. परंतु, अशा पूज्यपाद पुरुषाचें नांव तूं जरा अधिक आदराच्या शब्दांनीं उच्चारतास तर चांगलें झालें असतें. तुला-त्यांचा साक्षांत् परिचय झाल्यावर सर्व गोष्टी विदित होतील.

त्यावर सिद्धराम ह्मणाला “ मी कांहीं मुद्दाम त्यांचा अपमान करावा म्हणून तसें बोललों नाहीं. ” असें भाषण चाललें असतां एकाएकीं वायु निश्चल असतांही हळूं हळूं हालत असलेल्या तृणसमूहाकडे सिद्धरामाची दृष्टी गेली व तिकडे बोट करून तो ह्मणाला “ इकडे पहा हें काय आहे ? ”

इतकें भाषण करून सिद्धरामानें जिकडे गवतांत कांहीं हालतेंसें दिसत होतें, तिकडे आपला घोडा इतक्या स्फूर्तीनें फेंकला कीं, गंभीर कुल्लुकास त्याचें निवारण करण्यास अवसर मिळाला नाहीं. अगर सेवकांस किंवा खुद्द त्यास त्याचा पाठलाग करितां आला नाहीं. त्यांनीं आपल्या जागेवरूनच अवलोकन केलें, तों कुमार आपल्या घोड्याचा लगाम खेंचून निश्चल भावानें समोर पहात आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

आतां तर गवताचें हालणें बिलकुल बंद झालें. आणि कोणत्याही प्रकारचा ध्वनि कानीं पडेनासा झाला. जिकडे तिकडे सामसूम झाल्यासारखें झालें. इतक्यांत पुन्हां कांहीं अंतरावर गवताचें झुकणें आणि हालणें सुरूं झालें. व एक मोठा प्रचंड सिंह उड्या मारीत चाललेला त्यांच्या स्पष्टपणें दृष्टीस पडला. सिद्धरामाची नजर सिंहाकडे जातांच त्यानें अशा शिताफीनें घोड्यास टांच दिली कीं, तेणेंकरून तो केवळ वायुवेगानें भरधांव पळूं लागला. पळत असतां गवताच्या आड असलेल्या एका खळग्यांत पाय जाऊन तो कुमारासह खालीं पडला ! तथापि, पुन्हां ते दोघे तत्क्षणीं संभाळून उठले आणि कुमार पुन्हां त्यास

टांच देणार इतक्यांत एक सेवक आपल्या तट्टावरून उडी मारून त्याचे सन्निध गेला. त्यास पाहून कुमार ह्मणाला " वत्स, मला कांहीं विशेष लागलें नाहीं आणि घोड्यासही फारशी इजा झाली नाहीं. आह्मी फारसे जोरानें कांहीं पडलों नाहीं, सहज जरा घोड्याचा पाय घसरला. "

वस्तुतः तो जरी मोठ्या जोरानें जमिनीवर पडला होता, तरी खरोखरच त्यास फारशी इजा झाली नव्हती. परंतु, तितक्या अवसरांत सिंह कोणीकडे निघून गेला किंवा गुप्त झाला याचा कांहींच कोणास ठिकाण लागेना; मग काय करणार ? बिचारा कुमार मुकाट्यानें हळूं हळूं कुल्लुकगुरूजवळ आला. त्याला आपलें साहस आणि मूर्खपणा यांबद्दल फारच लाज वाटली. कुमार जवळ आलेला पाहून कुल्लुक ह्मणाला " पुत्र, हा तुझ्या बालस्वभावाचा दोष आहे. " सिद्धराम ओशाळा होऊन ह्मणाला " होय. यांत कांहीं संशय नाहीं. " अशारीतीनें मीं पडावें, याची माझी मलाच लाज वाटली.

कुल्लुक—परंतु त्यांत तुझ्या काय हातचें होतें ?

सिद्धराम—यथार्थ आहे. गवताच्या आड एखादा खळगा असेल असें कोणाला माहीत होतें ?

कुल्लुक—माझा अभिप्राय कांहीं वेगळाच आहे.

सिद्धराम—तो कसा काय ?

कुल्लुक मंदस्मितपूर्वक म्हणाला. " जर माझा तर्क खरा असला, तर तुला लौकरच काय तें कळेल. "

कुल्लुकगुरूचे मंदस्मितपूर्वक हंसणें अवलोकन करून कुमार अधिकच सकौतुक विस्मयाकुल होऊन कांहीं विचारण्याच्या बेतांत होता, इतक्यांत ते सर्व खळगाजवळ येऊन पोहोंचले आणि तेथून त्यांना समोर सूर्यकिरणांच्या प्रकाशांत शोभायमान दिसणारा उपवनांतरगत अत्यंत रमणीय असा आश्रम दिसूं लागला.

कुल्लुकगुरूनें आपल्या उजव्या हातांतील भाला उचलून ज्याच्या संन्निध एक रजतधारेसारखी लहानशी नदी वहात होती अशा दूरस्थ वृक्षसमूहाकडे दाखवून म्हटलें " तो पहा, तो, समोर दिसतो आहे तोच गुरुपदांचा आश्रम आहे. " असें भाषण झाल्यावर पुढें आलेली उतरण उतरून ते चारी प्रवासी समोर दिसणाऱ्या रमणीय उपवनाकडे वळले.

कांहीं अंतरावर जातांच सिद्धरामानें पाहिलें तों गगनचुंबीत वृक्षांच्या घनदाट छायेंत एक लहानशी पर्णकुटिका वेळूं आणि बोरू यांनीं आच्छादिलेली परम स्वच्छ आणि सुंदर अशी त्यांच्या दृष्टीस पडली. त्या कुटीच्या चारी बाजूंवर सुगंधपुष्पांनीं युक्त अशा वेली चढविल्या होत्या. त्यामुळें त्या स्थळास उपवनापेक्षां विहारस्थळाचेंच जास्त स्वरूप आलें होतें. कुटीच्या पाठीमागल्या बाजूस दाट जंगल आणि पुढल्याबाजूला परमसुंदर आणि प्रशस्त असें सरोवर होतें. त्या सरोवराचें कांठीं नानाप्रकारचे पक्षीं क्रीडा करीत होते. जलाशयांत कमलिनी फुलल्या होत्या आणि भ्रमरसमूदाय पुष्पांतील मकरंद प्राशन करून मदालस होत्साते इतस्ततः भ्रमण करीत होते. अनेक जातींचीं कमलें स्वच्छ जलांत प्रतिबिंबीत झाल्यामुळें तें सरोवर स्वतः आपले नेत्र उघडून स्वतःची शोभा पहात आहे आणि अत्यंत आनंदित झालें आहेसें दिसत होतें. ती रमणीय निर्झरिणी एकीकडून सरोवरास मिळून पुन्हां दुसरी कडून बाहेर वहात होती. समीपस्थ पर्वत शिखरें इतकीं उत्तुंग होतीं कीं, तीं जणो आकाशस्थ गंधर्वगणांशीं सभांषणच करीत आहेत, असें वाटत होतें.

ती अत्यंत मनोहर आणि रमणीय शोभा अवलोकन करीत असतां आमचे प्रवासी कांहीं काळपर्यंत थिजल्यासारखे होऊन गेले. परंतु, थोडक्याच वेळांत आपण आपल्या इच्छित जागीं आलों असें पाहून ते घोड्यांवरून खालीं उतरले आणि सेवकांच्या हातीं घोडे सोंपवून आश्रमाकडील मार्ग पायांनींच क्रमूं लागले. कुल्लुकाचे मनांत आपण पुढें होऊन गुरुपदांस आपल्या आगमनाची वर्दी द्यावी असें होतें. परंतु, कुल्लुक आश्रमाच्या द्वारापर्यंत पोंचला नाहीं तोंच आंतून योगिराज-गुरुपद बाहेर आले. त्यांच्या पाठोपाठ एक सेवक बाहेर आला व त्यानें आपल्या स्वामींच्या इंगितानुसार पुढें जाऊन प्रवासी सेवकांच्या हातांतील घोड्यांच्या काढण्या धरून त्यांस मोकळें केलें.

या अलौकिक एकांतवासी योगी पुरुषास अवलोकन करितांच सिद्धरामाच्या हृत्पटावर जो चमत्कारिक भाव दृढ झाला, तो खरोखर अवर्णनीय होता. त्यानें पूर्वीं आपल्या देशांत असे अनेक योगी पाहिलें

होते कीं, जे अरण्यांत अथवा गिरिकंदररांत वास करून अहोरात्र तीव्र तपश्चर्येंत काळकंठन करीत असत. अथवा जे सर्व प्रकारचीं संसारिकबंधनें आणि मोहविषय यांचा परित्याग करून तीर्थयात्रा करीत फिरत असत. त्यानें पाहिलेले सर्व साधू आणि योगी कौपीनधारी, हस्ताचे ठायीं दंडकमंडलु घेणारे, मुंडी, मालाधारी, दिगंबर, भस्मधारी, वलकल परिधान केलेले आणि सदां सर्वकाळ त्या अनंत निराकार परब्रह्माच्या ध्यानीं मग्न असलेले असे असत. कुमारानें आपल्या उच्च मनोवृत्तीस अनुसरून योगिराजास अश्रद्धेच्या दृष्टीनें अवलोकन केलें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं आणि कुल्लुकगुरूनें जरी या बद्रिकाश्रमवासी योगिराजांची अत्यंत प्रशंसा केली होती, तरी ते स्वतः कुटिद्वारा बाहेर येऊन आपलें स्वागत करण्यास तयार असलेले पाहून त्यांचेविषयीं सिद्धरामाचें मनांत पूर्ण अश्रद्धा उत्पन्न झाली. आणि तशांतही त्यानें जेव्हां पाहिलें कीं, एक भव्याकृती पुरुष ज्याचें अंगावर राजपुरुषाचें तेज झळकतें आहे आणि जो मित्रभावानें आपली भेट घेण्याकरितां पुढें येत आहे तोच हा कुल्लुकानें वर्णिलेला योगिराज होय. तेव्हां तर त्याचें मनांतील उरली सुरली श्रद्धाभक्ति वायुरूप होऊन गेली.

कुल्लुक ज्याला योगिराज म्हणून म्हणत होता; तो एक मध्यम वयाचा पुरुष असून त्यानें देदीप्यमान असें शुभ्र वस्त्र परिधान केलें आहे व त्याचें मस्तकावरील केश जरी सफेत होत चालले आहेत तरी त्याचें वयोमान त्याच्या शरिरावर व्यक्त होत नाहीं, किंवा त्याच्या अंगावर सुरकुती अगर निर्बलता यत्किंचित् देखील गोचर होत नाहीं, असें सिध्दरामाच्या ध्यानांत आलें. तसेंच त्याचा मित्रभाव आणि त्याचें गांभीर्य सांमिलित मुख यांवरून तो पूर्वीं कोणी तरी मोठा राजकारणी पुरुष असून त्याचे हाताखालीं अनेक लोक राहिले असावे असा भाव होता. असो.

योगिराज पुढें येतांच आपल्या गुरुशिष्यानीं संमानपूर्वक लवून त्यांस प्रणाम केला. आणि त्यांनीं प्रेमपूर्वक आशिर्वाद देऊन त्यांचा हात धरून म्हटलें " या, या पर्ण कुटिकेंत आपलें स्वागत आहे. " पुन्हां किंचित् मंद परंतु दृढ स्वरानें ते म्हणाले " निःसंशय ही मोठ्या आनं-

दाची गोष्ट आहे कीं, मला पुन्हां आपल्या मुखानें आतां आपला देश आणि प्रजा यांचा वृत्तांत ऐकावयास सांपडेल. ”

कुल्लुक आणि कुमार हे योगिराजांच्या भाषणास उत्तर न देतां त्यांचे मागोमाग कुटीपर्यंत गेले. इतक्यांत जवळच एका बाजूकडून वन-राजाची भयंकर आणि गंभीर गर्जना त्यांचे कानीं पडली आणि लागलींच एक प्रतापी सिंह आकाशांत आपलें प्रचंड पुच्छ उभारून हळूं हळूं डुलत डुलत त्यांच्या जवळ येऊन पोहोंचला. त्याला पहातांच सिद्धरामानें आपलें पाऊल मागें घेऊन, तत्क्षणीं आपला उजवा हात कमरेस लटकत असलेल्या तरवारीकडे नेला.

सिद्धरामाचें तें कृत्य पाहून गुरुपदांनीं हंसून ह्मटलें “ राहूं दे, कां उगीच या क्रीडावस्तूवर हात टाकण्याचा प्रयत्न करितोस ? त्यानें हराचें काय व्हावयाचे आहे ! ” मग त्यांनीं सिंहाकडे पाहून किंचित् धुडकावून त्यास आज्ञा केली “ चल इकडे ये हर ! ” गुरुपदांची आज्ञा ऐकतांच तो तेजस्वी सिंह त्यांच्या समीप येऊन पायांपाशीं गुरगुरत बसला.

तेव्हां कुल्लुक सिद्धरामास ह्मणाला “ मीं जें मघां तुला ह्मटलें कीं, हा तुझ्या बालस्वभावाचा दोष आहे, तें आतां आलें तुझ्या लक्ष्यांत ! ”

तो सर्व प्रकार सिद्धरामाच्या लक्षांत आल्यामुळें त्यानें गुरुपदांस हात जोडून विनंती केली “ स्वामिन् या लेंकरावर क्षमा केली पाहिजे. मला काय माहित कीं, तो सिंह श्रीमंतांचा असेल ? मीं तर त्याला— ”

गुरुपद ह्मणाले “ मी समजलों. मला वाटतें तूंही हरा-वर शिकार खेळण्याचा प्रयत्न केला होतास. पूर्वीही कित्येकांनीं त्याची शिकार करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, माझा हा चतुष्पाद नेहमीं त्या द्विपादांवर जयच पावत आला आहे. त्याला जर कोणी त्रास दिला नाहीं तर हा कोणासही इजा करीत नाहीं, परंतु जर कोणी विनाकारण त्याच्या वाटेस जाऊं लागलें, तर मग काय ? तो जातीचा मृगराजच मुळीं ! त्याचा त्वेष काय विचारावयाचा आहे ! कुल्लुकास माहीत आहेच कीं, हा मजजवळ लहान बच्चा होता तेव्हांपासून आहे. आणि आतां तर तो चांगलाच माणसाळला आहे. कां हर खरें आहेना ? ” आपल्या स्वामींचें तें भाषण

ऐकून सिंहानें आपले पुढील पायांचे गुडघे जमिनीवर टेकले आणि आपलें प्रशस्त मस्तक गुरुपदांच्या हातांवर घांसून आपला लडिवाळपणा प्रकट केला. नंतर पुन्हां गुरुपद ह्मणाले " आणि जे माझे मित्र आहेत, त्यांचेवर हा मोठा हेतू ठेवितो. तूं पाहिजे तर खुशाल याचे पाठीवर हात फिरवून पहा. " सिद्धरामानें पुढें सरून हळूंच आपला हात त्याचे खांद्यावर ठेविला. त्यावर सिंहानें एकदां आपल्या स्वामीकडे पाहिलें आणि मग कुमाराच्या पायापाशीं जाऊन त्यानें पूर्ववत् त्याच्याही हातावर आपलें मस्तक घांशिलें. तेव्हां कुमारही न भितां त्याला चुचकारून त्याच्याशीं खेळूं लागला. कांहीं वेळानें सिंहानें सहज आपलें भयानक मुख वांसून मोठी थोरली जांभई दिली ! तेणेंकरून त्याच्या तीव्र दंष्ट्रा समग्रपणें दृष्टीस पडल्या. परंतु, कुमारास त्याचा परिचय झाला असल्यामुळें विशेषसें भय वाटलें नाहीं. नाहींतर त्या त्याच्या कालदाढा पाहून मनुष्य गर्भगळीतच व्हावयाचा !

यानंतर सिंह कुमाराजवळून उठून गुरुपदाकडे जाऊन बसला. तेव्हां गुरुपद बोलले " ठीक आहे, तुझ्यापेक्षांही जास्त वयाचे कित्येक पुरुष या सिंहास पाहून गडबडलेले मीं पाहिलें आहेत. परंतु, तूं चांगलाच स्थिर चित्त राहिलास. असो. आतां दुसऱ्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. आपण फार लांबचा प्रवास करून आलां आहांत आणि विशेषतः आपण अशा प्रदेशांतून आलां आहांत कीं, जेथें कांहींच मिळण्याचा संभव नाहीं. कारितां कांहीं थोडीशीं कंदमूलफळें भक्षण करून जलपान करा. ह्मणजे वाटेचा शीणभार नाहींसा होईल. चला मजबरोबर आंत चला. " असें ह्मणून योगिराजांनीं पुढें होऊन कुटींत प्रवेश केला आणि त्यांचे मागून ते गुरुशिष्यही आंत गेले.

कुटींत फक्त अवश्यक वस्तुंचाच संग्रह केलेला दिसला. तथापि प्रत्येक वस्तू जागच्याजागीं नीट रीतीनें आणि स्वच्छतेनें ठेविलेली होती.

कुटींत गेल्यावर योगिराजांसह ते अतिथी एक प्रशस्त अशा तृणासनावर बसले असतां मागें सांगितलेल्या सेवकानें एका परडींत नानाप्रकारची स्वादिष्ट पक्व फळें भरून आणिलीं. योगिराजांच्या इच्छेप्रमाणें अतिथीजनांनीं त्यांचें सेवन केल्यावर एकमेकांच्या कुशल प्रश्नास सुरुवात झाली.

योगिराजांच्या सरळ आणि मधुर भाषणावरून ते प्रापंचिक व्यवहारामध्येंही अत्यंत निपुण आहेत अशी मंत्रीपुत्र सिध्दरामाची खात्री झाली. गुरुपदांनीं सिद्धरामाच्या पित्याचें कुशल विचारून म्हटलें "तुम्ही तरी तेथें बऱ्या प्रकारें कालक्रमण करितांना ?" त्यावर कुमारानें अत्यंत नम्रतापूर्वक त्यांच्या प्रश्नाचें समर्पक उत्तर दिलें. परंतु, त्यांनीं जेव्हां इरावतीचें कुशलवृत्त विचारिलें, तेव्हां कुमार लाजेनें खालीं मान घालून मुकाट्यानें बसला. यावर कुल्लुकानें उत्तर दिलें "तिकडचीही सर्व मंडळी खुशाल आहेत. आपलें दर्शन घेतल्यानंतर प्रथम आमचा तिकडेच जाण्याचा विचार आहे."

काश्मीरच्या पूर्व स्थितिबद्दलची योगिराजांस इतकी पूर्ण माहिती असलेली पाहून कुमारास मोठें आश्चर्य वाटलें. शिवाय ज्या गोष्टी राजमहालांतील अंतःपुरचारी लोकांखेरीज इतरांस अगम्य असावयाच्या, त्या देखील योगिराजांस पूर्णपणें अवगत आहेत. असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां हे योगिराज पूर्वी कोणातरी राजपुत्राचे विश्वासपात्र उपदेशक अथवा मंत्री असावे, असा त्यानें तर्क केला. परंतु, योगिराजांच्या एकंदर संभाषणावरून ते सदां प्रसन्न आणि त्यांच्या प्रस्तुतच्या स्थितींतच अत्यंत संतुष्ट असल्याचें दिसून येत होतें. तथापि, काश्मीरविषयक संभाषण करीत असतां केव्हां केव्हां त्यांच्या मुखावर औदासिन्याची छाया येऊन दीर्घश्वासाबरोबर अंतःस्थ खेदाचीही थोडी झुळूक बाहेर पडे.

वर वर्णन केल्याप्रमाणें संभाषण चाललें असतां बराच वेळ अतिक्रांत होऊन संध्यासमय प्राप्त झाला. अंतरिक्षांत पूर्णचंद्राचा उदय झाला असल्यामुळें त्याच्या अमृतस्रावी किरणांनीं उपवनांची शोभा द्विगुणित करून टाकिली. अविरल वृक्षांच्या पर्णसमुदायांतून मार्ग काढून हिरव्या तृणावर क्रीडा करणारे सुधाकराचें समुदायकिरण फारच रमणीय दिसत होतें आणि इतर जागीं तें सर्व उपवन रौप्यरसानें सारविल्याप्रमाणें भासत होतें.

एवढावेळपर्यंत ते तिघे एकेजागीं बसून संभाषण करीत होतें. नंतर गुरुपद सिद्धरामास ह्मणाले "कुमार, आतां मी माझा मित्र जो तुझा

गुरु कुल्लुक त्याजबरोबर क्षणभर कांहीं एकांतांत भाषण करणार आहें. त्याबद्दल तूं कोणत्याही रीतीनें आपल्या मनांत विषम भाव येऊं देऊं नको. त्याचे बरोबर मला जें बोलावयाचें आहे, तें अत्यंत गुप्त असून तुझा त्याच्याशीं कांहीं संबंधही नाहीं. तुझी इच्छा असल्यास सरोवरावर जाऊन तेथील यावेळची शोभा अवलोकन कर. अथवा सध्या उष्णकाल आहेच; मनास वाटल्यास जलक्रीडा कर. तुला उत्तमप्रकारें पोहण्याचा अभ्यास असेलच. खरोखर संध्याकाळीं चंद्रप्रकाशांतील जलावगाहन फारच आनंददायक असतें. ”

गुरुपदांच्या मनांतील भाव जाणून कुमार म्हणाला ‘ जशी श्रीमंताची आज्ञा— ’

कुल्लुक आणि गुरुपद एकीकडे निघून गेले आणि कुमार मोठ्या कौतुकानें त्यावेळची अलौकिक सृष्टीशोभा अवलोकन करीत इकडे तिकडे फिरूं लागला. तिकडे कुल्लुक आणि गुरुपद यांचें एकाग्रतेनें संभाषण झाल्यावर ते उठून पूर्वस्थानीं आले आणि रात्र बरीच झाली असल्यामुळें सर्वांनीं निद्रासुखाची इच्छा प्रदर्शित केल्यावरून सेवकांनीं तयार केलेल्या शयनावर कुल्लुक आणि कुमार यांनीं शयन केलें. त्यावेळीं तेथल्या तृण-शय्येवरच त्यांना गाढ झोंप लागली. कारण वाटेच्या श्रमानें ते फारच थकून गेले होते. गुरुपदही आपल्या नित्याच्या स्थानीं जाऊन निद्रावश झाले.

प्रातःकाळ होतांच मोठ्या लगबगीनें उठून त्यांनीं संध्यावंदनादी सिद्धता केली. तिकडे सेवक घोडे कसून तयारी करीत असतां इकडे गुरुपदांनीं सिद्धरासाचा हात धरून हळूं हळूं त्यास एकांतस्थानीं नेलें. आणि पुढीलप्रमाणें अत्यंत कळकळीच्या शब्दांनीं त्यास उपदेश केला.

“ वत्स, तुझ्यासारखे तरुण लोक आह्मासारख्या योग्यांच्या अथवा मुनिजनांच्या दर्शनास आले असतां त्यांना थोडा तरी उपदेश केल्या-वाचून विन्मुख जाऊं देऊं नये अशी प्राचीन काळापासूनची रीत अथवा धर्मच आहे म्हटलें तरी चालेल. तसेंच, तुलाही मजपासून कांहीं उप-देशाचे शब्द ऐकण्याची इच्छा असेल. परंतु, तुझा गुरु कुल्लुक यानें जो कांहीं तुला उपदेश केला असेल त्याहून अधिक सांगण्यासारखें मजजवळ कांहीं एक नाहीं. कुल्लुकाची बुद्धिमत्ता आणि शिक्षणचातुर्य मला पूर्ण-

ग्रंथालय शा...

पणें अवगत आहे. जें काम करण्याकारितां तूं जात आहेस, त्या कामाशीं तुझा संबंध झाल्यावर तें कामच तुला त्यासंबंधाच्या अवशिष्ट गोष्टी शिकवील. तथापि, एक गोष्ट मी तुला सांगून ठेवितों, ती ही कीं, तूं जेव्हां आग्रा येथील राजकीय आणि वैभवयुक्त दरबारीं प्रवेश करशील, तेव्हां समयानुसार तुला उचित वाटणाऱ्या गोष्टींत मन घालण्यास भिऊं नको. त्यांत तुला सत्यासत्याचा निर्णय करण्यास अवसर मिळेल. तुझ्या गुरूनें ज्या कांहीं तुला उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या असतील, त्या सर्वदां ध्यानांत वागवून आपलें अंतःकरण सदां निर्मळ ठेव आणि तुझ्या कोणत्याही कृत्यापासून तुला अथवा दुसऱ्या कोणाला लज्जित व्हावे लागणार नाहीं अशा तऱ्हेनें वागण्याविषयीं विशेष सावध रहा. शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, आह्मां दोघांच्या उपदेशानुरूप सावधानपणानें वर्तन करीत असतांही जर तुजवर कांहीं संकट येऊन पडलें आणि त्यावेळीं कोणापाशीं आपलें हृदय उघडें करण्याची तुला अवश्यकता वाटली, तर तुझा पिता आणि गुरु कुल्लुक यांच्या या मित्राचें स्मरण करून येथवर येण्यास चुकूं नको— काय ? याबद्दल प्रतिज्ञा करतोस ना ? ”

योगिराजांच्या उपदेशानें प्रसन्नचित्त होऊन सिद्धरामानें अत्यंत विनयानें आणि गांभीर्यानें उत्तर दिलें ‘ पूज्यवर, आपली आज्ञा शिरोधार्य आहे. आपल्या सदुपदेशाप्रमाणें वागण्याविषयीं मी निरंतर दृढप्रतिज्ञ राहीन. ’

इतक्यांत सेवकांनींही घोडे कसून पुढें आणिले. तेव्हां कुल्लुक आणि सिध्दराम यांनीं गुरुपदांस प्रणाम करून त्यांचा आशीर्वाद घेतल्यावर ते आश्वारूढ होऊन मार्गस्थ झाले. दोघे सेवकही आपापल्या तट्टांवर बसून त्यांच्या मागोमाग निघाले. थोडक्याच वेळांत गुरुपदांच्या आश्रमाची हद्द सुटून ते पुन्हां अरण्यचारी बनले.

आश्रमांतून निघाल्यावर सिद्धरामानें पुनः पुनः मागें वळून पाहिलें तों गुरुपद कुटीच्या द्वारीं सिंहाच्या मस्तकावर हात ठेऊन आपल्याकडेच एकसारखें टक लावून पहात उभे आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. कांहींसें दूर गेल्यावर जेव्हां ती गुरुपदांची गंभीर छबी दिसेनाशी झाली,

तेव्हां सिद्धराम गुरुपदांच्या भाषणाचा विचार करीत मुकाट्यानें कुल्लुकाबरोबर घोडा चालवीत आपला मार्ग क्रमूं लागला.

कांहीं वेळानें आपल्या या मौनव्रतानें आणि योगिराजांच्याठायीं ध्यानावलिप्त झाल्यानें गुरुजी कदाचित् अप्रसन्न तर झाले नसतील ? अशी शंका येऊन सिद्धरामानें आपला घोडा मुद्दाम कुल्लुकांच्या जवळ वळवून आणिला आणि नंतर त्यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. तो म्हणाला " आर्य, गुरुपदांसारखा मनुष्य आजपर्यंत कधींच माझ्या पाहण्यांत आला नाहीं. "

सिद्धरामाची शंका व्यर्थ होती. गुरुपदांविषयीं सिद्धरामाचे वरील उद्गार श्रवण करून कुल्लुकांस अत्यंत आनंद झाला. व सिद्धरामाचें अंगीं परीक्षायुक्त गुणग्राहकता आलेली पाहून त्यास फारच समाधान वाटलें. मग तो सिद्धरामास म्हणाला " तुझें ह्मणणें यथार्थ आहे आणि गुरुपदांविषयीं तुझी अशी सद्भावना झालेली पाहून मला मोठा संतोष वाटला. यावरून तुझ्या मनाचा मोठेपणा उत्तमप्रकारें व्यक्त होत आहे."

कांहीं काळपर्यंत विचारमग्न होऊन सिद्धनें विचारिलें " परंतु, हें तर सांगा कीं, हे गुरुपद कोण आहेत ? "

कुल्लुकानें उत्तर दिलें " तूं प्रत्यक्ष पाहिलेंसच कीं, ते हिमाचलवासी योगिराज आहेत ! झाले आणखी काय ? "

सिद्धराम अधीरतेनें ह्मणाला " तें तर मीं उत्तमप्रकारें पाहिलें. परंतु, येथें येऊन राहण्याच्या आणि सिंह वश करण्यापूर्वी हे कोण होते, ते जाणण्याची माझी इच्छा आहे. "

कुल्लुक— त्यांनीं मनुष्यांनाहीं याचप्रमाणें वश करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, तो त्यांचा प्रयत्न अखेरपर्यंत टिकला नाहीं. तें असो. परंतु, हा प्रश्न तूं त्यांनाच कां विचारला नाहींस ?

सिद्धराम— तसें करणें उचित झालें असतें ? आणि आपण तरी ती गोष्ट शिष्टसंमत समजतां काय ?

कुल्लुक— कधीं नाहीं ! तूं फार योग्यप्रकारचें वर्तन केलेंस. तुझें कोणतेंही आचरण अतिथीपणास विरुद्ध असें झालें नाहीं, ही मोठी उत्तम गोष्ट झाली. त्यावेळीं तुझें मनांत उत्कंठापूर्वक जिज्ञासा

उत्पन्न झाली असेल यांत संशय नाहीं. परंतु, ती तूं दाबून धरलीस; यास्तव, मी आतां तुझ्या कुतूहलाचें निरसन करितों. आपलें नांव आणि पूर्ववृत्तांत तुजपाशीं गुप्त न ठेवितां तुला निवेदन करण्याविषयीं गुरुपदांचीही मला आज्ञा आहेच. हे गुरुपद पूर्वीं राजपदाचा उपभोग घेत होते आणि—

सिद्धरामानें किंचित् व्यग्र होऊन विचारिलें, ‘ * सोमदेवाची कथा तर नाहीं सांगत ? जशी आपण लहानपणीं मला सांगत असां ? ’

कुल्लुकानें शांतपणानें ह्मटलें, ‘ पहिल्यानें ऐकून तर घे. आपल्या काश्मीर देशांत पूर्वीं एक राजा होऊन गेला. तो नेहमीं आपल्या परम योग्य आणि दूरदर्शी मंत्रिजनांच्या संमतीनें उत्तमप्रकारें नीतिपूर्वक राज्यशासन करीत असे. त्याला संतति झाली नसून केवळ एक धाकटा भाऊ मात्र होता. तो भाऊही मोठा विद्वान् आणि चतुर होता. राजाची आपल्या भावावर अत्यंत प्रीति होती आणि त्यानें आपल्या मनाशीं संकल्प केला होता कीं, आपला अंतकाळ समीप आल्यावर अथवा कांहीं मर्यादित काळ लोटल्यावर आपल्या धाकट्या भावास राज्याचा अधिकारी बनवून आपण भगवत्प्राप्तीच्या उद्योगास लागावें. परंतु, त्याच्या धाकट्या बंधूची तृष्णा मर्यादे बाहेर होती. आणि जात्या इतर सर्व गुणांनीं युक्त असतां कोणत्याहीप्रकारें आपली तृष्णा दाबून वडील बंधूनें योजिलेल्या काळाची प्रतीक्षा तो करूं शकला नाहीं.

अशा प्रकारची त्याची वृत्ति असल्यामुळें त्यावेळच्या राजद्रोही मंडळींच्या नादीं लागून प्रथमतः त्यानें गुप्तपणें कपटप्रबंधांची योजना केली आणि नंतर उघडपणें आपल्या पितृतुल्य वडील बंधूंच्या विरुद्ध बंड उभें केलें. परंतु, राजानें आपल्या चातुर्यानें त्याला त्याच्या साथिदारांसह पकडून आणविलें आणि त्याला चांगल्या बंदोबस्तांत ठेवून राज्यशास-

---

* सोमदेवभट्ट हा काश्मीरच्या राजाचा मंत्री होता. त्यानें राजमहर्षींच्या प्रोत्साहनावरून “ कथासरित्सागर ” नांवाचा एक फार मोठा ग्रंथ लिहिला आहे. सांप्रत निर्णयसागर छापखान्यांत तो उत्तमप्रकारें छापून प्रसिद्ध झाला आहे.

नांत व्यत्यय येऊं दिला नाहीं. तथापि, बाकी राहिलेल्या विरुद्ध मंडळीचें उत्पात करणें सुरूंच होतें. त्यामुळें त्याला राज्यांत शांतता राखण्यासाठीं आपल्या असंतुष्ट आणि तापद परंतु, प्रिय अनुजास यमाच्या घराचा अतिथि बनवून त्याच्या सर्व अनुयायी मंडळीसही त्याच्याच प्रारब्धभोगाचे भागीदार बनविल्यावांचून दुसरा मार्गच राहिला नाहीं. परंतु, असें करण्यापासून एक तर राज्यांत अतिशय रुधिरस्राव झाला असतां दुसरें, अनेकप्रकारचे बखेडे उत्पन्न झाले असते आणि सर्वांत मोठी हानिही झाली असती कीं, राजाच्या पश्चात् कोणींही राजकुलोत्पन्न मनुष्य राज्याला अधिकारी राहिला नसता. राजाच्या मनांत इकडे अशाप्रकारचे उच्च विचार घोळत होते आणि तिकडे विरोधी लोकांचा असा समज होऊन चुकला होता कीं, राजा बंदिवान् केलेल्या लोकांस प्राणदंड केल्यावांचून रहावयाचा नाहीं. अशा प्रकारची स्थिति असतां एकेदिवशीं प्रात:काळीं महालांत कोलाहल सुरू झाला कीं, महाराज रात्रीचे वेळीं कोठें नाहींसें झाले. त्यांचा पत्ता नाहीं. आणि जरी त्यांच्या गुप्त होण्याच्या कारणाचा निर्णय झाला नव्हता तरी सर्वांनीं एकच अनुमान केलें होतें कीं, ते विरुद्धपक्षाच्या मंडळीकडून मारले गेले असावे. तेव्हांपासून पुन्हां त्यांचें काय झालें याविषयीं कांहीं पत्ता लागला नाहीं. शेवटीं बंदींत असलेल्या धाकट्या भावानें आपली सुटका करून घेऊन राज्यकारभार आपलें हातीं घेतला. कारण, त्याच्या शिवाय दुसरा कोणींही धर्मशास्त्रानुसार गादीला वारस नव्हता. अद्यापही तो धाकटा भाऊच गादीवर कायम असून राज्याचा भार वहात आहे. आणि त्यानें मोठ्या शहाणपणानें आपल्या वडील बंधूंच्या वेळच्या सर्व मंत्रिजनांस त्यांच्या त्यांच्या हुद्यांवर कायम ठेविलें आहे. कोणासही अधिकारावरून दूर केलें नाहीं. तेणेंकरून जरी त्याच्या अंगची बुद्धिमत्ता राज्यशासनास पुरेशी नाहीं तरी राज्यकारभार उत्तमप्रकारें चालला असून राज्यांत सर्वत्र शांतता वास करीत आहे. ”

इतका वृत्तांत सांगून कुल्लुक मुकाट्यानें आपल्या शिष्याच्या मुखाकडे पाहूं लागला. परंतु त्यानें त्याच्या मुखावर कोणत्याही प्रकारें आश्चर्य किंवा विशेष कौतुकाचें चिन्ह अवलोकन केलें नाहीं. तेव्हां सिद्ध

म्हणाला, " हा तर आपण आपल्या सांप्रत गादीवर असलेल्या राजाचा आणि त्याचे वडील बंधु नंदिगुप्त महाराज यांचा वृत्तांत वर्णन केलांत ? हा वृत्तांत मी काय पण काश्मीर देशांतील प्रत्येक व्यक्ति जाणत आहे. "

कुल्लुक— तुझें म्हणणें बरोबर आहे. मीं जो वृत्तांत तुला सांगितला तो सर्वांना माहीत आहे. परंतु, महाराज नंदिगुप्त विरुद्ध मंडळींच्या हातीं लागले नाहींत, अगर मारले गेले नाहींत. किंवा राज्यांतून हाकूनही दिले गेले नाहींत, ही गोष्ट मात्र जाणणारे विरळा. महाराजांनीं केवळ स्वेच्छेनें आपल्या बंधूस न समजूं देतां देशत्याग केला आणि दोघां विश्वासपात्र मित्रांना मात्र तें कोठें राहतात तें माहीत आहे. त्यांनीं दूर एकांतस्थानीं आपला आश्रम बनवून देशांत अफवा उडाविली कीं, ते मारले गेले. अशा रीतीनें त्यांनीं धाकट्या भावाचा प्राण वांचवून देशासही नष्ट होण्यापासून बचाविलें.

सिद्धरामानें आश्चर्ययुक्त होऊन विचारिलें, " तर काय महाराज नंदिगुप्त अद्याप जिवंत असून तेच—"

कुल्लुकनें मध्येंच झटलें, " बरोबर, तुझें अनुमान बरोबर आहे. आपण आतांच त्या योगिराजांस भेटून आलों. परंतु, हा भेद अत्यंत गुप्त ठेविला पाहिजे. आपला देश आणि आपले महाराज यांचें हें गुह्य केवळ तुझ्या विश्वासावर तुला श्रुत केलें आहे. याचा हेतू इतकांच कीं, तूं त्यांच्या विश्वासू सेवक मित्राचा पुत्र आहेस. तुला ही गोष्ट कळविणें अवश्यच होतें. झालें. तूं स्वतः बुद्धिमान आहेसच, जास्त सांगणें व्यर्थ आहे. "

सिद्धरामानें किंचित् नाखुष वृत्तीनें झटलें, " ही गोष्ट आपण मला तेथेंच कां बरें सांगितली नाहीं ? महाराजांनीं राज्यपदावर असतां माझ्या पित्यावर आणि आमच्या वंशावर जी कृपा केली, तिजबद्दल मला त्यांना धन्यवाद देण्याचा उत्तम अवसर मिळाला होता. अथवा केलें तें ठीकच केलें. कारण, खुद्द त्यांनींच ज्याअर्थीं त्यावेळीं ही गोष्ट प्रकाशित केली नाहीं, त्याअर्थीं आपणासही तसें करणें उचित झालें नसतें. असो. मला पुन्हांही अवसर मिळेल. कारण, योगिराज गुरुपदांनीं कृपा करून वचन दिलें आहे कीं, समयवशात् मजवर कांहीं बिकट प्रसंग येऊन कोणाच्या उपदेशाची अवश्य-

कता वाटल्यास मीं निर्भयपणें त्यांच्याच चरणकमलांचें दर्शन घ्यावें. ”

कुल्लुक— गुरुपदांस परत भेटण्याचें वचन देऊन तूं आलास ही फार चांगली गोष्ट केलीस. तें वचन मात्र तूं विसरूं नकोस. आमच्यापेक्षां श्रीगुरुपद महाराज अधिक बुद्धिमान् असून व्यवहारिक गोष्टींतही अत्यंत अभिज्ञ आहेत.

कुल्लुकाचें वरील भाषण सिद्धरामाच्या चांगलेंसें कानीं पडलें नाहीं. त्याचें हृदय गुरुपदचरणसरोजांचे ठायीं मिलिंदायमान झालेलें होतें. तसेंच त्याचें चित्त गुरुपद योगिराजांची भेट आणि त्यांच्या वास्तव्याची गुप्तता यासंबंधानें अत्यंत कुतुहल युक्त होत होतें. आणि प्रवासाच्या प्रारंभींच आपणाला अशा राजऋषींची भेट झाली कीं, ज्यांनीं केवळ आपला भ्राता आणि स्वदेश यांच्या प्रेमास्तव समस्त सुखसंपत्ति आणि राजलक्ष्मी तृणवत् समजून ऐश्वर्यमोहाचा त्याग केला आणि देशहितावर दृष्टि देऊन जे एकांत तपोवनवासांत प्रसंन्न अंतःकरणानें वास करीत आहेत आणि ज्यांनीं एका मृगराजाखेरीज दुसऱ्या कोणावरही मोहममता जडूं दिली नाहीं, याबद्दल त्यास फारच समाधान वाटत होतें. त्यावेळीं तो आपल्या मनाशीं म्हणाला, ‘ इकडे मला अशा-प्रकारचा शुभ शकुन झाला आणि तिकडे मी त्या परमभाग्यशाली महात्म्याच्या दरबारीं जात आहे कीं, जो केवळ खड्गबळानें नाहींतर बुद्धिबळानें एका विस्तीर्ण प्रदेशाच्या संम्राट्लक्ष्मीला धारण करीत आहे, ज्याचा आयव्यय अपरिमि आहे, दूरदूरचे प्रतापशाली राजे ज्याला वशीभूत झालेले आहेत आणि जो अखिल भूमंडलावरील धर्माचा पालनकर्ता म्हणून मानला जात आहे. ’

वाचकहो, आपला कुमार सिद्धराम स्वताहाचा सद्वंश आणि सद्गुण यांबद्दल मनांत अहंकार बाळगीत होता. परंतु, यावेळीं तो आपल्याशींच म्हणाला कीं, या दोघां महापुरुषांच्यापुढें मी “ कोण्या झाडाचा पाला ” आहे ! अकबर आणि योगिराज यांत श्रेष्ठ कोण हें ठरविणें अत्यंत कठिण होतें आणि शहानशहा अकबराचें प्रत्यक्ष दर्शन होऊन त्याच्या वृत्तीबद्दल थोडा तरी अनुभव आल्यावाचून आपण या दोघांच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा विचार करणें बरोबर नाहीं, असेंच त्यानें ठरविलें. असो.

कांहीं वेळानें वरील विचार कमी होत जाऊन कुमाराचें चित्त प्रयागा-कडे वळलें. त्याठिकाणीं त्याची वचनबद्धा सौंदर्यशीलसंपन्ना इरावती नामक भावी अर्धांगी त्याच्या आगमनाची रात्रंदिवस मार्गप्रतीक्षा करीत होती. तिचें स्मरण होतांच कुमाराचें मुखकमल पूर्वीपेक्षांही जास्त प्रफु-ल्लित झालें. मग सपाटसा भूप्रदेश लागतांच त्यानें आपल्या घोड्यास टांच दिली आणि बर्ची उचलून कुल्लुकास म्हटलें, " चला, घोड्यास जरा पट्टीवर घ्या, आपण कां उगीच रेंगाळत चाललों आहोंत. "

कुल्लुकानेंही आपला घोडा दामटून म्हटलें, " चला घोडा पुढें काढा. " असें म्हणून पुन्हां आपल्या मनाशीं तो विचार करूं लागला कीं, " कुमा-राचें वय अद्याप बरेंच लहान आहे. ईश्वर करो आणि त्याचे मार्गांत एखादा कंटक उपस्थित न हो. परंतु, जो मनुष्य संसारयात्रेस निघाला, त्याला तत्स-बंधीं नदी नाले, खांच खळगे हे लागावयाचेच, इतकेंच नव्हे तर प्रसंगोपात एखादी भयंकर गर्तही मार्गांत आड यावयाची. " पुन्हां आदल्या दिव-शींचा वृत्तांत मनांत येऊन किंचित् आनंदित होऊन ते ह्मणाले " परंतु, माझी ईश्वराजवळ एवढी प्रार्थना आहे कीं, तो याचा मार्ग सरळ आणि निष्कंटक राखो. "

# खंड २ रें.

## इरावती.

भारतखंडास केवळ भूषणभूत अशा तीर्थराज प्रयाग येथील किल्ल्यांत चहूंकडून पुष्पितलतांनीं वेष्टिल्यामुळें केवळ लतागृहाप्रमाणेंच भासणाऱ्या एका अत्यंत रमणीय अशा द्वारद्वारींत बसून एक उपवर कन्या कांहीं विचार करीत होती. त्यावेळीं ती पूर्णपणें विचारमग्न झाली असल्यामुळें आपल्या वामहस्तावर कपोलभाग ठेऊन अगदीं एकाग्रचित्तानें एकसारखी अंतरिक्षाकडे टक लावून पहात होती. तिच्या मुखाकडे पाहतांच हें कमल-दंडावर कमलपुष्पच उमललें आहे काय असें वाटत होतें. ती त्यास्थळीं एकटीच बसून प्रभातसूर्याच्या किरणांनीं रमणीय दिसणाऱ्या त्रिवेणी संगमाची शोभा अवलोकन करीत होती. तेथून एकीकडे कलिंदगिरीनं-दिनी यमुनेचा दीप्तिमान रेणुकामय तट दृष्टिगोचर होत होता. दुसरीकडे पतितजनांना पावन करणारी भागीरथी विमलक-ल्लोलयुक्त होऊन वहात असलेली दिसत होती. तेथूनच कांहीं दूर अंतरावर असलेल्या घनदाट रसाल वाटिकांच्या शीतल छायेंत बसून पक्षिसमुदाय कलरव करीत होता. कोठें कोकिलांचें कूजित चाललें होतें तर कोठें मयूरसमुदाय नृत्य करण्यांत गुंग झाले होते. कोठें सारिका मधुर मधुर शब्द उच्चारीत होत्या. अनेक जातींच्या पक्ष्यांचीं पिलें आपा-

पल्या घरट्यांतून डोकीं बाहेर काढून चीं, चीं, करीत होतीं. गंगाप्रवाहाच्या मध्यभागीं कोठें कोठें सूक्ष्म वालुकाकणांचे उंचवटे बनले होते, आणि कोठें सपाट मैदान झालेलें होतें. किनाऱ्यावर कराड्यांची शोभा फारच विलक्षण दिसत होती. असो. वर वर्णन केलेल्या उपवर कन्येनें एक साधारण वस्त्र परिधान केलें होतें. त्यावरून ही विहरिणी कांहीं कोणी राजकुलांत उत्पन्न झालेली नाहीं असें सहज अनुमान होत होतें. तिनें परिधान केलेलें वस्त्र केवळ एक स्वच्छ आणि शुभ्र अशी साडी असून तिला तांबडे जरतारी कांठ लाविले होते. तिनें आपल्या लांब सडक काळ्या कुरळ्या केसांचा आंबाडा बांधून त्यांत एक मालती पुष्पाची कळी खोंविली होती. तिचे चंचल नयनयुगुल मीन युग्मासही लज्जित करीत होते. खरोखर जिला कामदेवानें एवढ्या शोभेची देणगी दिली होती, तिला अन्य भूषणांची काय अवश्यकता आहे ? आह्मी इरावतीच्या कोणकोणत्या अंगाचें वर्णन करावें ? एकाहून दुसरें न्यून असेल तर सांगावयाचें ? तिचें तर प्रत्येक अंग सौंदर्यपूर्ण होतें. आणि त्यासही शील आणि लज्जा यांची जोड मिळाली असल्यामुळें तर सोनें आणि सुगंध यांचें ऐक्य झाल्यासारखें झालें होतें.

परंतु पूर्वीं जसें त्या सृष्टीशोभारूप सूर्याच्या दर्शनानें इरावतीचें हृदयकमल विकसित होत होतें, त्याप्रमाणें आज झालें नाहीं. आज तिचें हृदयकमल विरहतापानें कोमेजून जात होतें. ती प्रतिदिवशीं त्या बारद्वारींत बसून आपल्या भावी प्राणनाथाच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत असे. परंतु, अशा रीतीनें वाट पाहतां पाहतां कित्येक दिवस लोटले. तिच्या हृदयांत अनेक विचारतरंग उठत. “ नाथाला येण्यास कां बरें विलंब लागला ? कांहीं अवश्यक कामामुळें तर त्यांस अडथळा झाला नसेल ? त्यांजवर कांहीं संकट तर आलें नसेल ना ? माझा त्यांस विसर तर पडला नसेल ना ? प्राणनाथ कधीं माझें स्मरण करीत असतील काय ? ” अशा अनेक प्रकारच्या शंका काढून ती विचार करीत बसे.

ज्या दिवशींचा वृत्तांत आह्मी लिहीत आहों त्या दिवशी इरावती वर लिहिल्याप्रमाणें सचिंत बसली असतां तिची कमला नांवाची सखी मोठ्या प्रसन्नमुद्रेनें धांवत धांवत तिजकडे आली. तिला पाहतांच इरा-

वतीच्या मनांत एका क्षणांत अनेक भावना उत्पन्न झाल्या. ती ह्मणाली, " इतक्या प्रसन्न मुद्रेनें मजकडे धांवत आलीस ती अशी काय मोठी आनंदाची गोष्ट सांगणार आहेस ? " आनंदानें कमलेचा गळा भरून आला असल्यामुळें तिच्या मुखांतून पुरता शब्दहि बाहेर पडत नव्हता. तथापि, तशा स्थितींतच ती ह्मणाली, " सखी, ज्या तुझ्या प्राणनाथांच्या मुखचंद्राच्या उदयाची तूं चकोरी सारखी वाट पहात होतीस ते स्वतः किल्ल्याच्या द्वारांत उभे राहून तुझ्या पित्याशीं संभाषण करीत असलेले माझ्या दृष्टीस पडले. गुरु कुल्लुकही त्यांचे बरोबर आहेत. "

ही अत्यानंदकारक वार्ता ऐकून इरावतीचें हृदयसरोवर आनंदजलानें डुचमळूं लागलें. इतक्यांत तिला वाटलें कमला आपली थट्टा तर करीत नसेलना ? ती ह्मणाली " सखी, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे, खरेंच सांग काय तें ! "

कमलेनें मोठ्या प्रेमानें इरावतीचा हात धरून ह्मटलें, " सखी, सांप्रत असा कोणता विनोदाचा अवसर आहे ह्मणून मी खोटें बोलेन ? मी तुझ्या गळ्याची शपथ वाहून सांगतें कीं, आतांच ते येथें येऊन पोचले. तुझ्या हृदयांतील भाव मी समजलें. करितां मी आतां तिकडे जाऊन माताजींची आज्ञा घेऊन कोणत्या तरी युक्तीनें त्यांना इकडे तुझ्या भेटीस घेऊन येतें. "

इरावती किंचित् लज्जित होऊन ह्मणाली, " सखी, मी तुला काय सांगूं तूं स्वतः चतुरच आहेस. "

याप्रमाणें भाषण झाल्यावर कमला इरावतीचा निरोप घेऊन चालती झाली. आतां वाचकांनीं सिद्धरामाकडील वृत्तांत ऐकावा.

सिद्धराम आणि कुल्लुक हे दुर्गद्वारावर येऊन पोहोंचतांच तेथील द्वारपालानें लागलीच दुर्गाधिकारी सल्हाण याजकडे जाऊन त्यास सिद्धराम आणि कुल्लुक आल्याची वर्दी दिली. तें ऐकतांच सल्हाणानें स्वतः पुढें होऊन त्यांचें स्वागत केलें आणि त्यांस कुशलप्रश्न विचारून यथोचित रीतीनें त्यांचें आदरातिथ्य केलें. पुढें कुमार सिद्धराम सल्हाणानें दाखविलेल्या स्थानीं बसला असतां त्याची दृष्टि समोर असलेल्या उद्यानाकडे गेली, व तत्क्षणीं त्याच्या हृदयांत त्याच्या प्रियतम इरावतीनें प्रवेश केला. इरावतीचें स्मरण होऊन कुमाराचें चित्त तिजकडे वेधलें आणि इत-

वयांत एकीकडून कमलेनें त्याठिकाणीं प्रवेश केला. तिला पाहतांच सिद्ध-राम उठून उभा राहिला, आणि म्हणाला ‘ये सखी ये, तुझी प्रिय सखी प्रसन्न आहेना ? तिला आमचें कधीं स्मरण होतें काय ? ’

कमलेनें उत्तर केलें, ‘ हें काय विचारतां ? कमलिनीला सहस्रकरावां-चून दुसरी गति आहे काय ? ’

सिद्धराम—सखी कमले, तूं स्वभावतःच मधुरभाषणी आणि प्रज्ञावती अर्थात् मोठी गोडबोली आणि चतुर आहेस ! बरें तें असो, तुझी सखी कोठें आहे ?

कमला—ती यावेळीं यमुना-महालांत बसून आपलीच वाट पहात आहे. मी माताजींची आज्ञा घेऊन आलेंच आहे. आपण मजबरोबर यमुना-महालांत चलावें.

सिद्धराम—बरें तर चल.

सिद्धरामास बरोबर घेऊन कमला यमुनामहालाच्या द्वारावर येऊन पोहोंचली. तिनें आंत पाऊल टाकलें मात्र कीं, इरावतीचें हृदय हर्षातिश-यानें उचंबळू लागलें. परंतु, कुमार सिद्धरामाकडे दृष्टी जातांच तिनें आपले डोक्यावरील बुरखा पुढें ओढिला व लज्जानम्र होत्साती भूमीगत दृष्टी करून ती उभी राहिली.

कमला—सखी आतां कां बरें लाजतेस ? आतां कां नाहीं बोलत ? तूं कुमाराचें स्वागत कर. मी जाऊन तांबूलवाहिनीला बोलावून आणितें.

तांबूलवाहिनीला बोलावण्याचें मिष करून कमला बाहेर निघून गेल्या-वर सिद्धरामानें आपल्या हातानें इरावतीचा दक्षिणहस्त धरून म्हटलें, “ सुंदरी, फार दिवसपर्यंत तुजला वियोगदुःख दिल्याबद्दल मजवर रागा-वलीस वाटतें ? ”

सिद्धरामाचें भाषण ऐकतांच इरावतीच्या नेत्रांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. त्यावेळीं ती म्हणाली, “ नाथ, मी आपणांवर रागावलें तर नाहींच परंतु, इतके दिवसांत माझें आपणांस स्मरण देखील झालें नाहीं, याबद्दल दुःख मात्र होत आहे. किती दिवसांपासून तरी मी आपली वाट पहात होतें. माझी तर अशी अटकळ झाली होती कीं, कदाचित् आपण या दासीला विसरूनही गेला असाल. ”

हें तिचें भाषण ऐकून सिद्धराम प्रेमगद्गदस्वरानें ह्मणाला, " प्रिये, मला तिकडे जितका काळ घालविणें आवश्यक होतें त्याहून एक पळभरही आधिक मला तेथें राहून करमलें असतें असें कां तुला वाटतें ? इकडे येत असतां मार्गांत तुझ्या दर्शनाची माझी उत्कंठा इतकी प्रबळ झाली होती कीं, मला गरुडासारखे पंख कां नाहींत म्हणून खेद होत होता. ते जर असते तर वाटेंतील पर्वत, सरितांचें उल्लंघन करून एका क्षणांत तुला येऊन भेटलों असतों. " इरावतीनें मंदस्मितपूर्वक म्हटलें, " नाथ, आपलें म्हणणें यथार्थ आहे. परंतु, मला आणखी एका गोष्टीमुळें खेद होतो आहे! मी असें ऐकतें कीं, आपलें राहणें याठिकाणीं केवळ एक दोन दिवसच व्हावयाचें असून–"

सिद्धराम–– प्रिये–

इतक्यांत तांबूलवाहिनीसह कमला तेथें आली आणि ह्मणाली कीं, " पिताजी आपलें स्मरण करीत आहेत. कदाचित् त्यांना आपल्याशीं कांहीं विशेष गोष्टीसंबंधानें बोलावयाचें असेल " सिद्धरामाला हा निरोप जरी वज्रघातासारखा वाटला तरी त्याला तिकडे जाणें अवश्य होतें. तांबूलवाहिनीनें इरावतीचें हातांत तांबूल दिला. तेव्हां कमला ह्मणाली " सखें, त्यांना तांबूल दे. असा वृथा संकोच कां करीत आहेस ? " इरावतीनें डोक्यावरील व खांद्यावरील पदर ओढून शरीर संकुचित करून लज्जेनें खालीं पाहून आपला तांबूल धारण केलेला हात जरासा पुढें केला आणि सिद्धरामानें स्मितहास्यपूर्वक त्या तांबुलाचा स्वीकार केला. व कमलेसह तो तेथून बाहेर निघून आला. बाहेर येतांना इरावतीकडे पाहून तो ह्मणाला, " प्रिये, मी पुन्हां लवकरच येथें परत येईन तूं कांहीं चिंता करूं नकोस. "

तेथून निघाल्यावर सिद्धराम सल्हाणाकडे आला आणि नम्रतापूर्वक प्रणाम करून तेथें हंतरलेल्या एका गालिचावर बसला. त्यास सल्हाणानें ह्मटलें, " तर तूं आतां पादशहा सलामत यांच्या दरबारीं सेनानीपद मिळण्याच्या इच्छेनें जात आहेस ? खरोखर तुझा पिता मोठा बुद्धिमान आणि योग्य पुरुष असून अशा उत्तम समयीं त्यानें तुला तिकडे पाठविण्याचा विचार केला हें तुझें फारच मोठें भाग्य समजलें पाहिजे. मजकडून जें जें सहाय्य होण्यासारखें असेल तें तें देण्यास मी सर्वप्रकारें तयार आहे. "

सिद्धराम—माझी सर्वप्रकारें सहायता करण्याविषयीं आपण तयार आहांत हा आपला मजवर मोठाच अनुग्रह आहे. ज्याच्याविषयीं मी आपले देशीं असतां अनेक गोष्टी ऐकिल्या आहेत तो बादशहा सलामत व त्याचा राजकीय दरबार केव्हां पाहीन असें मला झालें आहे.

सल्हाण— निःसंदेह. परंतु, सांगतों या गोष्टीकडे अवश्य ध्यान दे. तेथें गेल्यावर बादशहाकडून अगर दरबारीलोकांकडून कोणत्याही दुर्लभ गोष्टीची आशा करूं नकोस. प्रथमतः कोणत्याही मोठ्या गोष्टीची आशा न धरणें हेंच तुला जास्त श्रेयस्कर होईल.

सिद्धरामानें साश्चर्य होऊन विचारिलें, ‘ काहो ! जशी बादशहा सलामत यांची कीर्ति मी आजपर्यंत ऐकत आलों त्याप्रमाणें वस्तुतः ते नाहींत काय ? माझे परमपूज्य वडील आणि माननीय गुरुजी हे तर त्यांची प्रशंसा करून ह्मणतात कीं, तो अत्यंत बुद्धिमान् आणि सुयोग्य सम्राट् आहे, ही गोष्ट यथार्थ नाहीं काय ? ’

सल्हाणानें उत्तर दिलें, ‘ माझें असें ह्मणणें नाहीं. माझ्या म्हणण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मोठ्या लोकांतही दोष म्हणून असताच आणि प्रायः ते दुसऱ्या लोकांना घातक होतात—’ त्यानें पुन्हां चहूंकडे पाहून व कोणी ऐकत नाहीं असें जाणून हळूं स्वरानें बोलण्यास आरंभ केला. ‘ ज्यावेळीं एखादा पुरुष अकबराप्रमाणें केवळ आपली बुद्धिमत्ता आणि बाहुबल यांचे जोरावर ऐश्वर्य प्राप्त करून घेतो, त्यावेळीं त्याची तृष्णा कधींहि शांत होत नसून ती उत्तरोत्तर वाढतच जात असते. ज्या बादशहानें इतके देश आणि इतके लोक यांना आपले स्वाधीन करून घेतलें आहे;त्याला तुह्मी आणि तुमची मातृभूमी पूर्णपणें स्वतंत्र राहिलेली कधींही सहन व्हावयाची नाहीं आणि तुला ठाऊक असेलच, (यद्यपि ही गोष्ट गुप्त आहे ) कीं, ज्याप्रमाणें पूर्वी नंदिगुप्त आणि त्यांचा भाऊ यांमध्यें वितुष्ट आलें होतें, त्याप्रमाणेंच आपलें प्रस्तुतचे काश्मीराधिपति आणि त्यांचे दोघे पुत्र यांमध्यें प्रायः अनेकवेळा वितुष्ट पडलेलें आहे.

सिद्धराम—नाहीं, मला हा वृत्तांत विदित नव्हता. ही गोष्ट मी प्रथमतः आपल्याच मुखानें ऐकत आहें.

सल्हाण—असो. वेळ आली ह्मणजे तूं या गोष्टीची चांगली विचारपूस

करून घे. यावेळीं त्यासंबंधानें मी जें कांहीं तुला सांगत आहे, त्याची तूं कुल्लुकगुरूजवळ चर्चा करूं नकोस. कारण, त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं अशी माझी समजूत आहे. हा पितापुत्रांचा विरोध कोणी उपस्थित केला आहे हें तुझ्या ध्यानांत आलें असेलच. एक वेळ उघड-पणें तंटा सुरू झाला आणि देशांतल्या देशांत एकमेकांविरुद्ध दोन तीन सैन्यें उभीं राहिलीं म्हणजे बादशहास आमच्या देशांवर आक्रमण करून येण्यास तेवढें मिष बस्स होईल आणि तो त्याचक्षणीं आपलें प्रचंड सैन्य घेऊन चढाई करील. भेदी लोकांना पर्वतांतील सर्व गुप्त मार्ग माहीतच झालें आहेत ! अखेर आपला स्वतंत्र देशही बादशहाच्या राज्यांत सामील होऊन जाईल. बादशहानें अन्य देशावर कितीही जय मिळविले तरी त्याचें सुखदुःख आम्हांस विशेषसें होणार नाहीं. परंतु, तीच त्याची राजतृष्णा आमच्या स्वतंत्रतेचा नाश करणारी होईल कीं काय याची मोठी भीति वाटत आहे.

सिद्धरामानें कांहीं वेळ विचार करून म्हटलें, ' असेंच जर असेल तर मग आपण त्याची सेवा कशी पतकरली ? ज्यानें आमच्या देशाची स्वतंत्रता नष्ट करण्याचें योजिलें आहे त्याच्या सेवेंत आपल्यासारख्यांनीं सदां तत्पर असणें हें कसें संभवतें ? '

सल्हाणानें आश्चर्यानें उत्तर दिलें, ' कां बरें ? यांत काय हानी आहे ? आपल्यापैकीं एखादा पुरुष नेहमीं बादशहाच्या समीप असणें आपणांस हितकारक नाहीं काय ? त्यानें बादशहाच्या समीप राहून आपल्या शरी-रास कोणत्याही प्रकारें धक्का न लागूं देतां बादशहास सहायता देऊन त्याच्या सर्वप्रकारच्या हालचालीवर दृष्टी ठेवावी. त्यांतही तुझ्यासारख्या पुरुषाची बादशहाच्या निकटवर्ती जनांमध्यें गणना व्हावयाची आहे. याहून आपणांस आणखी चांगली गोष्ट ती कोणती पाहिजे ? माझ्या-पेक्षां तुझ्यासंबंधानें लोकांस कांहीं कमी संशय येईल, किंबहुना मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. अशारीतीनें तुझ्या द्वारें आमचीं अनेक कार्यें साधतील. '

सिद्धरामानें कांहींवेळ विचार करून विचारलें, ' परंतु, असें करणें धर्म-संमत होईल काय ? '

सल्हाणानें धिःकारयुक्त स्वरानें उत्तर केलें, ' तूं अजून पोर आहेस. तुला माहित असलें पाहिजे कीं, ज्याचा सृष्टिविषयक गोष्टींविषयीं अनुभव जास्त आणि जो संसारिक गोष्टींशीं विशेष परिचित आहे असा माझ्या वयाचा पुरुष धर्म काय आणि अधर्म काय हें चांगलें जाणत असला पाहिजे. अजून तुझें बाळपण गेलें नसल्यामुळें असल्या विषयांत आह्मां-सारख्यांस सल्ला मसलत देण्यास तूं योग्य नाहींस. '

सिद्धराम—आर्य, मला क्षमा असावी. आपणांस ठाऊकच आहे कीं, मला राजकीय विषयांत फारच थोडें समजतें. अतएव त्या विषयांत मीं आपली अनुमती प्रकट करणें निःसंदेह चुकीचें होईल. परंतु, माझ्या गुरूनें शिक्षण देतांना मला सांगितलें आहे कीं, जो विषय सत्य आणि योग्य असेल त्याचाच प्रत्येक मनुष्यानें स्वीकार करावा आणि केव्हांही व कोठेंही असदाचरण करूं नये. आणि—

सल्हाणानें मध्येंच ह्मटलें " होय, ठीक आहे. तुझा गुरू कुल्लुक हा माझा परम मित्र आहे. मी त्याला अंतःकरणपूर्वक मान देतों. परंतु, तो केवळ शास्त्रज्ञाता आहे, व्यवहारज्ञ नव्हे. त्याला मानसिक कल्पनांचें उत्तम प्रकारचें ज्ञान आहे. परंतु व्यवहाराचें नाहीं. पहा, सांप्रत तुह्मांला अत्यंत प्रिय असलेल्या तुमच्या देशावर आणि देशवासीजनांवर एका विदेशी आणि विधर्मी राजाचें आक्रमण होण्याचा संभव आहे—तूं हरप्रकारें मनापासून त्याची सेवा कर. परंतु, या एका विषयासंबंधानें मात्र पक्की सावधगिरी ठेव. या संबंधांत बादशहाचे हेतु होईल तितकें करून निष्फळ करणें हेंच तुझें अत्यंत श्लाघ्य असें कर्तव्यकर्म आहे. आजच तसा प्रसंग आला आहे असें नाहीं, तथापि अंशतः तरी आला आहे हें खास. केवळ एका साधारण राजनैतिक मानमर्यादेच्या हेतुस्तव हातीं आलेली अशी अमूल्य संधी व्यर्थ जाऊं देणें हें तुजसारख्याला कदापि उचित व्हावयाचें नाहीं. तूंच पहा कीं, तुला अथवा आह्मांला आपल्या नौकरीस ठेऊन आमच्या-देशावर चाल करण्याचा विचार बादशहाचे मनांत घोळत आहे तो कितपत धर्माला अनुसरून आहे ? झालें तर, अशा स्थितींत त्यानें तरी आह्मांकडून न्यायपूर्वक राजभक्तीची आशा कां करावी ? एवंच जें आहे तें ठीक आहे. माझें ह्मणणें तुला खरें वाटत नसेल आणि तुझ्या आंगीं

तितकें धैर्य असेल तर जा आणि अकबरासमोर जाऊन उघडपणें त्याच्या नीतिमत्तेविषयीं आपली नाखुषी प्रदर्शित कर. म्हणजे पहा काय होतें तें ? तुझ्या सुदैवानें कदाचित् प्राणदंड जरी न झाला तरी कारागृहवास अथवा दक्षिण किंवा बंगाल या देशाची हवा खाणें नशिबीं लिहिलेंच आहे म्हणून समज. अर्थात् बादशहाशी अशाप्रकारें उघड उघड विरोध दाखविणें आपल्यास कधीं लाभप्रद होणार नाहीं. त्यापेक्षां धैर्यपूर्वक योग्य समयाची मार्गप्रतीक्षा करणेंच शहाणपणाचें होईल. या युक्तीनें बादशहाचीही कांहींएक हानि न होतां आपण आपल्या मातृभूमीचेंही संरक्षण करूं शकूं."

सल्हाणाचें हें भाषण सिद्धरामास जरी कोणत्याही प्रकारें न्यायसंमत वाटलें नाहीं तरी सल्हाणाच्या युक्तिवादावर त्याला चांगलासा कोटिक्रम करितां आला नाहीं; म्हणून तो सल्हाणाचें पुढील भाषण ऐकण्याचे इच्छेनें त्याचे मुखाकडे पहात स्तब्ध राहिला. इतक्यांत एकीकडून एक विलक्षण आकृतीचा पुरुष त्याठिकाणीं आला आणि जेथें सल्हाण व सिद्धराम बोलत बसले होते त्यांच्या समीप येऊन उभा राहिला. त्याला पहातांच सल्हाण आदरपूर्वक उठून उभा राहिला आणि त्याचें पाहून सिद्धरामानेंही त्यास उत्थापन दिलें. हा नवीन आलेला पुरुष उंच काठीचा आणि गव्हाळ्या रंगाचा होता. त्याचे मस्तकावर मध्यभागीं काळीभोर लांब शेंडी असून बाकीच्या भागाचें मुंडण केलेलें होतें. त्याच्या डाव्या खांद्यावरून कंबरेच्या उजव्या बाजूपर्यंत वेढून ग्रंथिबद्ध केलेलें असें एक शुभ्र स्वच्छ वस्त्र होतें. डावा हात आणि वक्षस्थल हीं उघडींच होतीं. गळ्यांत एक अत्यंत शुभ्र असें यज्ञोपवीत होतें. त्याचे गाल व डोळे खोल गेले असल्यामुळें त्याचें तपाचरण फार तीव्र असावे असें वाटत होतें. सिद्धरामाला जरी कित्येक भयंकर पशूंबरोबर सामना करण्याचा प्रसंग पडला होता आणि जरी त्याचे अंगीं उन्मत्त हत्तीच्या गंडस्थळाचें विदारण करण्याचें अथवा प्रत्यक्ष एखाद्या मृगराजासही त्याची आयाळ धरून वळविण्याचें सामर्थ्य आणि साहस होतें तरी देखील वर वर्णन केलेल्या व्यक्तीकडे पाहतांच एक वेळ त्याचें हृदय भीतीनें विकंपित झालें.

ते वेळीं सल्हाण म्हणाला, 'हे गोरख योगिराज आहेत. समोर जे

दुर्गेचें मंदीर आहे तेथील हे पुजारी आहेत. त्यांची अत्यंत सत्कारपूर्वक भेट घे. हे अत्यंत योग्य पुरुष असून त्यांचें ज्ञान केवळ कल्पनातींत आहे.'

वरील प्रकारचें संभाषण झाल्यावर सिद्धराम व सल्हाण या दोघांनीं गोरख योगिराजास मोठ्या नम्रभावानें लवून प्रणाम केला. तेव्हां त्यानें आकाशाकडे अंजली करून आशीर्वाद दिला कीं, 'श्रीजगत् कल्याणकारिणी दुर्गा युवाम् पातु.'

सल्हाण—जो काश्मिराहून येणार ह्मणून मीं ह्मटलें होतें तोंच हा प्रधानपुत्र सिद्धराम होय.

गोरख ह्मणाला 'तर्हि स्वागतमस्य, दुर्गा करो आणि हा अनैक्यापासून दूर राहून एकतेच्या दृढ पायावर आपलें अधिष्ठान ठेवो. कारण, त्यापासून अनंत सुखें प्राप्त होतात व सायुज्यतानामक मुक्तीचा तोच मार्ग आहे. सायुजता ह्मणजे काय हें तुला थोडें थोडें कळूं लागलेंच आहे.' पुढें किंचित् कालपर्यंत स्थब्ध राहून तो म्हणाला 'ज्याप्रमाणें तुला मुक्तिमार्गाचा बोध होत चालला आहे, त्याप्रमाणेंच यालाही एकदां संसारपरिचयाच्या वरचे पायरीवर नेल्यावर त्या विषयाचें यथार्थ ज्ञान होईल. किंचित् कालावधीची अवश्यकता आहे—मी याच्या अंत:करणाशीं चांगलाच परिचित झालों आहे आणि माझी खात्री आहे कीं, हा आमच्याच वर्गातला होईल. ( सिद्धरामाकडे मान करून ) "तुझी आणि माझी आतां नुकतीच भेट झाली होती."

सिद्ध— पूज्यवर, क्षमा करा, मला तर कांहीं आपण भेटल्याचें स्मरत नाहीं.

गोरख— बरोबर आहे. तुला कसें स्मरण असावें. कारण कीं, तेवेळीं मी मनुष्यदृष्टीला अगोचर होतों.

प्राय: योगी लोक योगविद्येच्या बळानें पाहिजे तेव्हां अदृश्य होतात व त्यावेळीं ते मात्र दुसऱ्या लोकांस पाहूं शकतात आणि ते स्वत: कांहीं दुसऱ्यांचे दृष्टीस पडत नाहींत. अशा प्रकारच्या गोष्टी सिद्धरामानें अनेक वेळ ऐकिलेल्या होत्या. त्यामुळें योगिराज गोरखाचें भाषण तो मोठ्या गंभीर भावानें आणि आश्चर्यमय मुद्रेनें ऐकूं लागला.

गोरख— ज्यादिवशीं सायंकाळीं तूं योगिराज गुरुपद यांच्या सिंहाचा पाठलाग केला होतास त्यावेळीं तुझी माझी भेट झाली होती. अस्तु. यासंबंधानें मग आणखी एकादे वेळीं बोलूं. आतां मला सल्हाण बरोबर कांहीं सल्लामसलत करावयाची आहे.

सिद्ध— तर मग मी प्रणाम करितों.

गोरख— दुर्गा त्वां पातु.

सिद्ध— ( सल्हाणास ) आर्य, मी आपणांसही प्रणाम करितों.

सल्हाण— चिरंजीव.

वर लिहिल्याप्रमाणें प्रणाम करून सिद्धराम तेथून चालता झाला. परंतु, गोरख याच्या शेवटच्या भाषणानें त्याचें चित्त फारच आश्चर्यमय होऊन गेलें होतें. तेव्हां तो आपल्या मनांत म्हणाला " गुरुपदाच्या आश्रमासमीप घडलेला वृत्तांत याना कसा कळला ! त्यावेळीं तर गुरुकुल्लुक शिवाय मजबरोबर दुसरें कोणीही नव्हतें. "

इतक्यांत समोरच्या वृक्षांमधून आपला एक सेवक येत आहेसें पाहून, कदाचित् याच्या द्वारें गोरखानें तो वृत्तांत समजून घेतला असेल असें सिद्धरामास वाटलें. तेव्हां त्यानें त्या सेवकास अंगुलि निर्देशानें आपले समीप बोलावून विचारिलें—" वत्स, तुला किंवा गुरुजींच्या सेवकाला येथें आल्यावर कोणी योगिराज भेटून त्याजबरोबर तुमचें कांहीं भाषण झालें होतें काय ? "

सेवक— स्वामिन्, नाहीं. मला तर या ठिकाणीं कोणी योगिराज भेटला नाहीं.

सिद्धराम पुन्हां आश्चर्यानें म्हणाला, " काय, तुझी येथें कोणा योगिराजा बरोबर भेट झाली नव्हती ? बरें तर तूं जा. "

इतकें भाषण झाल्यावर सिद्धरामही तेथून निघाला. त्याचें अंतःकरण अर्धभयभीत झालें होतें. " गुरुजीस विचारून या गोष्टीचा खुलासा करून घेतला पाहिजे. " असें मनांत म्हणत तो पावलें टाकीत होता. कांहीं दूर गेल्यावर तो एका निबिड कुंजाकडे फिरला आणि पहातों तों प्रिया इरावती तेथील वृक्षांच्या सघन छायेंत कमलपुष्पांनीं सुशोभित झालेल्या एका लहानशा सरोवराजवळ एकटीच बसून सृष्टीशोभा अवलो-

कन करीत होती. सिद्धरामानें आपलीं पावलें तिकडेच वळविलीं. त्याच्या पावलांची चाहुल होतांच इरावतीनें मागें वळून पाहिलें आणि सिद्धराम दृष्टीस पडतांच ती संकोचयुक्त अंतःकरणानें उठून उभी राहिली. तिनें आपल्या डोक्यावरील पदर पुढें ओढिला आणि खालीं मान घालून पायाच्या अंगठ्यानें जमीन उकरीत उभी असतां हस्तांतील अर्धवट गुंफलेल्या माळेकडे टक लावून पाहूं लागली.

सिद्धरामानें जवळ जाऊन मधुर शब्दांनीं तीस विचारलें "सुंदरी, तूं येथें एकटी बसून काय करीत आहेस ?"

इरावती—नाथ, मी कांहीं एकटी नाहीं, ती पहा सखी कमला पुष्पवाटिकेंत फुलें आणावयास गेली आहे. मी येथें बसून माळ गुंफीत असतां आपल्या येण्याची—

सिद्ध—प्रिये, ती अर्धीच माळ मला जास्त शोभा देईल. ती तशीच मला दे. कारण कीं, तूं आमची भावी अर्धांगी आहेस. पुरें कर. दे ती तशीच अर्धी.

सिद्धरामाचें भाषण ऐकून इरावतीनें किंचित् लाजून हात लांब करून ती अर्धीच गुंफिलेली माळ सिद्धरामाचे हातांत दिली.

सिद्धराम—पहावें ईश्वर कधीं या जयमाळेची सार्थकता करितो तें. परंतु, प्रिये, मघाशीं मी तुजबरोबर यथेच्छ संभाषण करूं शकलों नाहीं याचें मला फार वाईट वाटलें. तुझ्या परमपूज्य पित्याकडून बोलावणें आल्यामुळें मला तसेंच उठून जावें लागलें.

इरावती—नाथ, आपणांस एकमेकांशीं बोलण्यास मधून मधून बराच अवसर सांपडतों हें काय थोडें आहे ?

सिद्धराम— ही त्यांची आपणांवर मोठीच कृपा आहे ह्मणावयाची. परंतु, प्रिये, आज तूं किंचित् खिन्न दिसतेस याचें कारण काय ?

इतक्यांत कमला फुलें घेऊन तेथें आली आणि इरावतीचें पाठीमागें उभी राहिली.

तिला उद्देशून सिद्धराम ह्मणाला, 'सखी सांग, तुझ्या सखीचें मुख आज किंचित उदासीन कां झालें आहे ?'

कमला—चंद्रोदय झाल्यावर कुमुदिनी सदां प्रफुल्लितच रहावयाची.

परंतु, त्या चंद्राचे आड मेघ येतांच तिचें वदन म्लान होऊं लागतें. माझ्या सखीनें, आपण लवकरच येथून जाणार, असें ऐकिलें असल्यामुळ तिचें मन अधिर झालें आहे.

इरावती—नाथ, आपणांस उद्यां आग्रा येथील राजकीय दरबारांत जावयाचे आहे असें ऐकितें. तेथें गेल्यावर आपल्याला या गरीब दासीचें कसचें स्मरण होतें ?

सिद्ध:—प्रिये, तूं आपल्याला व्यर्थ कां बरें दुःख करून घेत आहेस? मी कधीं तरी तुला विसरेन काय ? तुला अगोदर असा संशय तरी कसा आला ? दोन तीन महिने फार कां आहेत ? तुला तें कवीवचन स्मरत नाहीं काय ? कीं, ‘ याताः किन्नुमिलन्ति सुन्दरी ’ याकरितां प्रिये, तूं कांहीं चिंता करूं नकोस, मी लवकरच येऊन तुला भेटेन.

इरावती–प्राणनाथ, आपलें म्हणणें यथार्थ आहे. परंतु, अशा कविवचनांनीं जर मन संतुष्ट राहतें तर काय पाहिजे होतें ? मला असें वाटतें कीं, या कवींना आम्हां अबलांच्या विरहपीडेचें मुळीं देखील ज्ञान नसतें.

सिद्ध—प्रिये, खरे म्हणतेंस. एके ठिकाणीं म्हटलें आहे ‘ ॥ वंध्येला न कधींही सुनीतिच्या प्रसववेदना कळती ॥ ’ तें असो. तूं जें म्हणतेस कीं मी तुला विसरेन तें कशावरून ? तुझी मूर्ति तर नेहमीं माझ्या हृदयांत वास्तव्य करितेच आहे आणि शिवाय नेत्रांच्या संतोषार्थ ही तुझी प्रतिमा मी नेहमीं आपल्याजवळ ठेवीत असतो.

असें म्हणून सिद्धनें आपल्या गळ्यांतील रत्नमाला काढून तिच्या मध्यभागीं असलेल्या लहानशा पेटींतून इरावतीची हस्तिदंतावरील काढिलेली रंगित तसबीर तिला दाखविली. ती पाहून इरावतीला अत्यंत हर्ष झाला. तेव्हां कमला झणाली, “ सखी, यावेळींच तूं मोठ्या परिश्रमानें बनाविलेली आपल्या प्रियतमाची मूर्ति कां बाहेर काढीत नाहींस ? ”

इरावती कांहींशी लज्जित होऊन तशीच मुकाट्यानें उभी राहिली. तेव्हां कमला झणाली, “ बरें, मीच जाऊन घेऊन येतें. ” असें झणून कमला निघून गेली. सिद्धरामानें मोठ्या प्रेमानें इरावतीचा हात धरून झटलें, “ प्रिये, कमला तुजबरोबर हळूंच भाषण करून काय आणावयास गेली आहे बरें ? सांगत कां नाहींस ? ”

इरावती खालीं मान घालून संकोचयुक्त वाणीनें ह्मणाली, "कमला आतां घेऊन येईलच. मग आपण खुशाल पहा काय आहे तें."

आमच्या वाचकांना त्यावेळचा मनोहर देखावा पाहण्याची अत्यंत अभिलाषा असेल. परंतु, ज्यांना भाग्यवशात् असल्या प्रेमबंधनाचा अनुभव घडला असेल त्यांनाच केवळ वरील देखाव्याचें शब्दचित्र मोहित करील. इरावतीनें किंचित् लाज्जित होऊन, दृष्टी खालीं करून विनीत भावानें उभें राहणें, आणि सिद्धरामानें प्रेमभावानें तिचा कोमल हस्त धरून तिच्या मधुर सौंदर्याचें निरीक्षण करणें कोणत्या रसिकवराचें चित्त मोहित करणार नाहीं ?

इतक्यांत कमला एक स्वच्छ वस्त्राखालीं झांकलेली एक मूर्ति घेऊन आली आणि सिद्धरामापुढें ठेऊन ह्मणाली, "पहा ओळखा बरें, सखी इरावतीनें ही कोणाची मूर्ति बनाविली आहे ती ?" सिद्धरामानें आपली हुबेहूब मूर्ति अवलोकन करून आश्चर्यचकित होऊन ह्मटलें, "प्रिये, धन्य आहेस, तुझें कौशल्य अत्यंत प्रशंसनीय आहे. जशी तुझ्या ठिकाणीं लज्जा आणि नम्रता वास्तव्य करीत आहे त्याप्रमाणेंच तुझ्याठिकाणीं गुणही अपूर्व आहेत." इरावती कांहीं वेळ स्तब्ध राहून म्हणाली, "नाथ, मी एक शकून पहातें. पाहूं बरें काय होतें तें ?" इतकें ह्मणून तिनें एक कमलपुष्प घेऊन तें एका कमलपत्रावर ठेऊन सरोवरांत सोडून दिलें. पत्रावर पुष्प तरूं लागलें. तेव्हां तिनें किनाऱ्यावरून हातानें पाण्यास आंदोलन दिलें. त्या योगानें जलवेगाबरोबर पुष्पासह तें पत्र डोलूं लागलें. कांहीं वेळपर्यंत तें पुष्प त्या पत्रांवर तग धरून होतें. तें पाहून इरावती ह्मणाली "नाथ, अद्यापपर्यंत तरी आपलें प्रेम निश्चल आहे हें खास." इतक्यांत तें पुष्प उलटून पाण्यांत पडलें आणि पत्र तसेंच पोहत राहिलें. तें पाहून इरावतीचे नेत्र अश्रुजलानें भरून आले.

तेव्हां सिद्धराम ह्मणाला "प्रिये, हें काय तुझें पोरपण ? असल्या गोष्टीवर विश्वास ठेऊन एकाद्या अजाण माणसाप्रमाणें माझें तुजवर अचल प्रेम नाहीं असें समजतेंस ?"

इरावती—नाथ यद्यपि आपलें ह्मणणें यथार्थ आहे, तरी न जाणों माझें चित्त इतकें अधीर कां होत आहे ! खरोखरच माझा अगदीं धीर सुटून

आंतून हृदय कांपत आहे. आपल्या वचनावर माझा दृढ विश्वास आहे खरा, तरी पण आपण ज्या नगरास जात आहांत तेथील अनुपम शोभा पाहण्यांत आपलें चित्त गुंग होऊन गेल्यावर मग या दासीचें आपणांस स्मरण होणें कठीण आहे.

सिद्धराम—प्रिये अशी शंका मनांत आणूं नकोस. हें हृदय तुला कधींही विसरणार नाहीं. इतक्यांत एकीकडून हातांतील काकणांचा ध्वनि त्यांचे कानीं आला. तेव्हां इरावती ह्मणाली, नाथ, मला वाटतें माझी तांबूलवाहिनी निपुणिका इकडे येत आहे. बहुधा आई माझें स्मरण करीत असेल. यावेळीं आपणांला सोडून जाणें माझ्या कसें अगदीं जिवावर आलें आहे. इतक्यांत निपुणिका तेथें येऊन ह्मणाली "सखी तुमच्या उभयतांच्या प्रेमालापांत विच्छेद करणें बरोबर नव्हें परंतु, माताजींची आज्ञा ह्मणून सांगणें भाग आहे. त्या आपणांला बोलावीत आहेत आणि ह्मणत आहेत कीं, आज इरावतीला उद्यानांतून येण्यास इतका विलंब कां लागला."

मग इरावती अत्यंत विनयपूर्वक सिद्धरामाची आज्ञा घेऊन निपुणिका आणि कमला यांसह तेथून चालती झाली. इकडे सिद्धरामही आपल्या गुरूकडे जावयास निघाला. त्यावेळीं याचा मंदमंद पदसंचार त्याला पुढें घेऊन चालला होता परंतु, त्याचें हृदय मागें इरावतीकडे आकर्षित झालें होतें. गुरूसमीप गेल्यावर सिद्धरामानें त्यांस प्रणाम करून तो जवळच एका आसनावर बसला. त्यास कुल्लुकानें विचारिलें, "एवढा वेळपर्यंत तूं कोणीकडे होतास?" सिद्धराम ह्मणाला, "मी येथील उद्यान आणि सरोवर यांची शोभा अवलोकन करीत होतों," पुढें सिद्धराम उद्यानाच्या शोभेचें कांहीं वर्णन करीत होता इतक्यांत सल्हाणाकडून आलेला दूत पुढें येऊन अत्यंत नम्रतापूर्वक हात जोडून म्हणाला, 'भोजन तयार असून स्वामी आपल्याच येण्याची वाट पहात आहेत.' कुल्लुक म्हणाला 'ठीक आहे, चला आह्मी आलोंच.' आलेला दूत निघून गेल्यानंतर कुल्लुक आणि कुमार तेथून उठून सल्हाण ज्याठिकाणीं बसला होता त्याठिकाणीं आले. तेथें भोजनाकरितां अनेकप्रकारचे स्वादिष्ट पदार्थ अगदीं तयार करून ठेविले होते. आपले अतिथि येतांच सल्हाणानें अत्यंत सत्कारपूर्वक त्यांस भोजनास बोलाविलें. भोजन

ग्रंथालय

चाललें असतां मधून मधून त्यांचीं अनेकप्रकारचीं भाषणें होत होतीं परंतु, त्या भाषणांत प्रेमाचा लवलेश नव्हता. तें केवळ औपचारिक होतें. तेवेळीं कुल्लुकानें मंदस्मितपूर्वक कुमाराकडे पाहिलें. कुमारही त्याचे मनांतील आशय समजला. त्याचे मनांतील भाव हाच कीं, गुरुपद योगिराज यांचे आश्रमांत केवळ कंदमूलादिकांचें भोजन होतें परंतु, तें अत्यंत प्रेमादरानें अर्पण केलें असल्यामुळें प्रस्तुतच्या स्वादनापेक्षां अधिक तर रुचकर होतें. भोजनोत्तर थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून ते लवकरच निद्रावश झाले. कारण त्यांना दुसरे दिवशीं अरुणोदयीं उठून आग्र्याकडे जावयास निघावयाचे हाते.

परंतु, कुमार सिद्धरामास चांगलीशीं झोंप लागेना, ह्मणून तो आपली तरवार जवळ घेऊन बारद्वारीच्या खिडकींत येऊन उभा राहिला. तेथून त्या अपूर्व दुर्गाची आणि उद्यानाची शोभा दृष्टीस पडत होती. तसेंच दुसऱ्या बाजूस अनेक मंदिरांचे कळस आणि ध्वजा अस्पष्टशा दृष्टीस पडत होत्या. त्यावेळीं कुमाराच्या चित्तास इरावतीचें ध्यान तर लागलेलेंच होतें. परंतु, त्याहीपेक्षां त्या विलक्षण योग्याच्या भाषणानें त्याच्या चित्तास फारच चटका लाविला होता. सल्हाणासमक्ष त्यानें त्यांच्याशीं जें भाषण केलें होतें, व त्यानें मार्गांत गुरुपद योगिराजांच्या सिंहाचा पाठलाग केल्याची जी त्यास खूण दिली होती, त्याचें तर त्याला फारच आश्चर्य वाटत होतें. तेवेळीं तो आपल्या मनांत म्हणाला, " योगिराज गोरखाला आमचा मार्गांतील वृत्तांत कसा अवगत झाला ? याचा परिणाम काय होणार आहे न कळे. मी सल्हाणाच्या ह्मणण्यावर विश्वास ठेवून त्याच्या बुद्धिवादाप्रमाणें वर्तन करूं काय ? तसेंच प्रातःकाळीं सल्हाणाशीं जें माझें भाषण झालें आहे, तें गुरुजीपासून गुप्त ठेवूं अथवा त्यासर्व गोष्टी स्पष्टपणें त्यांना कळवून त्यांची अनुमती घेऊं ? "

वरील प्रकारच्या विचारांत सिद्धराम अगदीं गढून गेला असतां एकाएकीं तेथून समोर दिसत असलेल्या वाड्याच्या सज्जावर चंद्रकिरणांच्या मंद प्रकाशांत दोन व्यक्ती येऊन उभ्या राहिल्या आणि मोठ्या जोरानें हातवारे करून एकमेकांशीं भाषण करूं लागल्या. सिद्धरामानें त्यांच्याकडे न्याहाळून पाहिलें, तों त्यांपैकीं एक योगिराज गोरख असून दुसरा सल्हाण

आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. अशा रात्रीच्यावेळीं ते दोघे त्यास्थळीं येऊन काय गुप्त मसलत करीत होते तें कळण्यास कांहींच मार्ग नव्हता. यावेळीं त्यांनीं दिवसाचा पोषाख टाकून वेगळा पोषाख धारण केला होता. दोघेही इकडून तिकडे फिरतां फिरतां मोठ मोठ्यानें हात हलवून बोलत होते. इतक्यांत आणखी ही पुष्कळसे लोक तेथें आलेले सिद्धरामाच्या दृष्टीस पडले. ते शरीरानें सडपातळ आणि वर्णानें काळें असून त्यांच्या कमरेस एक एक धोतर मात्र गुंडाळलेलें होतें. सर्वांच्या गळ्यांत असलेलीं शुभ्र स्वच्छ यज्ञोपवीतें दुरूनही स्पष्ट दिसत होतीं. ते सर्व लोक समीप येतांच सल्हाण एका गुप्त जिन्यानें खालीं उतरला आणि गोरखानें मोठ्या गौरवानें हातानें खूण करून आपला मार्ग स्वीकारल्यावर तो सर्व विलक्षण जनसमूह हळूं हळूं दाबून पावलें टाकीत त्याचे मागें चालला. कुमार सुकाट्यानें असल्या जागींच उभा राहून त्यांची मोजदाद करीत होता. क्रमशः ते सर्व लोक तेथून निघून जाऊन दिसेनासें झालें.

त्या लोकांचा तो विचित्र वेष, गोरखाचें संदिग्ध व संशययुक्त भाषण, सल्हाणानें दाखविलेलें कालिकेचें मंदिर इत्यादि गोष्टी मनांत येऊन कुमार सिद्धराम कांहीं काळपर्यंत भयचकीत झाला व मनांत म्हणाला, "ज्या लोकांचा वृत्तांत मी आजपर्यंत ऐकत आलों ते अजूनपर्यंतही विद्यमान आहेत काय ?" सिद्धरामानें ठगांचा वृत्तांत आपल्या देशांत असतां ऐकिला होता व ते लोक दुर्गादेवीचे भक्त असून तिला नरबली अर्पण करणारे आहेत असेंही त्याला समजलें होतें. वर वर्णन केलेला जनसमूह दृष्टीस पडतांच त्याला त्या ठगवृत्तांताचें स्मरण झालें. तेव्हां तो पुन्हां आपल्या मनांत म्हणाला, "काय ? माझे भावी श्वशूर बादशहाचे सेवक असूनही या असल्या लोकांशीं संबंध ठेवतात काय ? छे, छे, असें असणें कदापि संभवणार नाहीं. हा केवळ माझ्या अज्ञानाचा दोष आहे." अशाप्रकारचा विचार करीत करीत तो तेथून परतला आणि अंगावरील वस्त्रें काढून ठेऊन पलंगावर पडला तथापि त्याला निद्रा कशी ती मुळींच आली नाहीं. त्याचे चित्तांत केव्हां इरावतीचें मुखकमल, केव्हां सल्हाण आणि साथीदारांसह गोरख यांच्या मूर्ति वारंवार उभ्या रहात. तेवेळीं त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला कीं, जें कांहीं मी आज पाहिलें किंवा

ऐकिलें याची चर्चा गुरुजीजवळ करावयाची नाहीं. सल्हाणाच्या वर्तनाबद्दल तर त्यास पक्काच संशय आला होता. त्यासंबंधानें तो ह्मणाला, “ कोणता राजनीतिज्ञ पुरुष अशा वर्तनाचा अवलंब करणार नाहीं ? त्यानें जीं कित्येक राजरहस्यें मजपाशीं बोलून दाखविली आहेत, तसेंच आतां ज्या कित्येक विलक्षण गोष्टी सहजासहजी माझ्या दृष्टीस पडल्या त्या केव्हांही आणि कोणापाशींहि प्रकाशित करणें माझा धर्म नव्हे. कदाचित् मजकडून असें घडल्यास त्याबद्दल खुद्द गुरुजी देखील मजवर अप्रसन्न होतील यांत संशय नाहीं. करितां आजचा सर्व प्रकार पूर्णपणें गुप्त ठेवणेंच उचित होय. ”

# खंड ३ रें.

## आग्रा.

प्रातःकाळी तुतारीचा शब्द ऐकून कुमार सिद्धराम जागा झाला आणि पहातो तों त्याचे बरोबर आग्रा येथें जाणारी घोडेस्वारांची पलटण अगदीं तयार होऊन उभी राहिली आहे. तसेंच त्याचा सेवकही त्याचा घोडा कसून तयार करीत आहे. तेव्हां कुमारानें अल्पकाळांत आपला अवश्यक प्रातर्विधि आटोपून, तो कुल्लुक आणि

सल्हाण हे तयार होऊन येण्याच्या पूर्वींच त्यांची मार्गप्रतीक्षा करीत उभा राहिला. इतक्यांत ते दोघेही कुमारापाशीं आले. सल्हाणाच्या आज्ञेनें घोडेस्वार पुढें चालूं लागले आणि थोडक्याच वेळांत कुमार आणि कुल्लुक सल्हाणाची परवानगी घेऊन आपला मार्ग क्रसूं लागले. सल्हाणही कांहीं कालपर्यंत त्यांचेबरोबर त्यांना पोचविण्यास ह्मणून चालला होता. तेवेळीं कुल्लुक आणि सल्हाण यांनीं आपले घोडे थोडेसें पुढें काढिलेले पाहून, कुमार सिद्धरामानें आपला घोडा किंचित् मागें किल्ल्याकडे वळविला. त्याचे मनांत एकदां परत जातेवेळीं इरावतीचें दर्शन घ्यावयाचें होतें. इकडे इरावतीही मोठ्या पहाटे उठून सिद्धरामाच्या आगमनाची वाटच पहात होती. कारण जातेवेळीं सिद्धराम उभ्या उभ्या तरी आपली भेट घेतल्यावांचून जाणार नाहीं अशी तिची खात्री होती. वर लिहिल्याप्रमाणें सिद्धराम किल्ल्याकडे येत असलेला पाहून इरावतीचें हृदय धडधड करूं लागलें. कुमारानें किल्याचे तटाखालीं येऊन तेथूनच वरती सज्जांत बसलेल्या इरावतीकडे अवलोकन करून आम्रचास जाण्याविषयीं तिची परवानगी मागितली. तेव्हां इरावतीनें आपली प्रेमाची भेट ह्मणून मोठ्या परिश्रमानें तयार केलेला हातरुमाल त्यास अर्पण केला. त्यावरील कशिद्यांत पुढील श्लोकाच्या अर्थाचें पालोपद तिनें काढिलें होतें.

॥ लावूनियां प्रीति-लतेस जातां ॥
॥ जावें सुखें मी न करीन चिंता ॥
॥ शुद्धी तिच्या सत्वर सिंचनाची ॥
॥ ठेवा, न ती जाउ सुकून साची ॥ १ ॥

इरावतीनें वरून खालीं टाकिलेला तो रुमाल सिद्धरामानें बरचीच्या टोंकावर झेलून घेतला. तेव्हां त्याजवरील पालोपद वांचून त्याचे डोळे अश्रुजलानें भरून आले. तथापि तो त्या स्थळीं फार वेळ न राहतां रुमाल हृदयाशीं धरून प्रेमपूर्ण अशा नेत्रांनीं इरावतीच्या मुखकमलाकडे पहात पहात केवळ नेत्र संकेतानेंच तिचा निरोप घेऊन तेथून चालता झाला. इरावती दीर्घकालपर्यंत त्या स्थळीं उभी राहून त्याच्या गमनमार्गाकडे एकसारखी टक लावून पहात होती. पुढें जेव्हां कुमार सिद्धराम लांब गेल्यामुळें दिसेनासा झाला तेव्हां ती बिचारी विरहाग्नीनें दग्ध होऊन भूमीवर पडली.

निपुणिका आणि कमला यांनीं तिची किती तरी समजूत केली, कितीतरी धीराच्या गोष्टी सांगितल्या तथापि कोणत्याही उपायानें इरावतीच्या मनाला धीर झणून आला नाहीं. इकडे कांहीं वेळानंतर सिद्धराम मार्गांत गोष्टी बोलत जात असलेल्या कुल्लुक आणि सल्हाण यांस येऊन मिळाला. नंतर सल्हाणानें आपल्या पाहुण्यांचा निरोप घेतला. तेवेळीं तो सिद्धरामास झणाला, " कदाचित् तुमची व माझी पुन्हा लवकरच भेट होईल. कारण, थोड्याच दिवसांनीं माझीही आग्र्यास येण्याची मनीषा आहे. " इतकें बोलून सल्हाण मागें प्रयागाकडे वळला आणि कुल्लुकासह कुमार सिद्धरामही सेनेसहीत आग्र्याकडे चालूं लागला.

वाट चालतां चालतां आणि उन्हाची पर्वा न करितां वाटेंतील सडतर संकटें सोशीत सोशीत आमचे प्रवासी कांहीं दिवसांनंतर एकेदिवशीं संध्याकाळीं आग्र्यापासून थोड्या अंतरावर जाऊन पोचलें आणि त्याठिकाणीं रात्रीची रात्र मुक्काम करून दुसरे दिवशीं प्रभातकाळीं त्या प्रसिद्ध नगराच्या अगदीं सन्मुख आले. यमुनेच्या अपरतीरावरूनच नगराची शोभा पाहून कुमाराचें चित्त अत्यंत हर्षभरीत झालें आणि तेणेंकरून मार्गांतील संपूर्ण परिश्रमांचा त्यास एकदम विसर पडला.

कुमारानें पाहिलें तों यमुनेच्या किनाऱ्यावर कोठें उद्यानें, कोठें किल्ल्याचे तट, कोठें राजमहाल आणि कोठें कोठें एकसारख्या मशीदींच्या रांगा अर्धवर्तुलाकार उभ्या आहेत असें त्याच्या दृष्टीं पडलें. त्यावेळीं जें ऐकण्यांत येत होतें कीं, ( अकबराबाद ) आग्र्यासारखें नगर आखिल भरतखंडांत दुसरें नाहीं, तें त्याच्या बाहेरच्या शोभेनेंच सत्य भासत होतें. त्याच्या मध्यभागीं असलेला बादशहा सलामत याचा राजप्रासाद सर्वांत उंच असून जणूं अहंकारानें डोकें वर करून उभा आहे व भोंवतालच्या संपूर्ण भवनराजीवर आपलें अधिपत्य चालवीत आहे असें वाटत होतें. *त्याचे अनेक प्रचंड आणि उन्नत घुमट स्वर्णमय कलशांनीं युक्त असल्या-

* आग्र्याच्या किल्ल्यांतील हा अकबर बादशहाचा महाल समग्र लाल रंगाच्या पाषाणांनीं बनविलेला आहे. हें स्थान चौकोनी असून त्याची लांबी दोनशेंसाठ फूट आणि रुंदी दोनशेंएकुणपन्नास फूट आहे. त्याचे

मुळें फारच सुंदर दिसत होते व त्यावरून सूर्यकिरणांचें परावर्तन होऊन प्रेक्षकांच्या नेत्रांस दिपवून टाकीत होते. त्या प्रासादाच्या चारी बाजूंस क्रीडास्थानें आणि अमात्यभवनें सुशोभित होतीं. त्याशिवाय आणखीही कित्येक श्रीमान् नागारिकांची घरें आणि उंच उंच मनोरे आपलीं शिरें उंच करून नगराची शोभा द्विगुणित करीत होते.

याप्रमाणें नगराचें सौंदर्य अवलोकन करून आमच्या प्रवाशांनीं आपले घोडे थोपविले आणि अत्यंत प्रसन्न चित्तानें ती शोभा अवलोकन करण्यांतच त्यांनीं तेथें कांहीं काळ घालाविला. त्यावेळीं कुमार सिद्धराम आपल्या मनाशीच विचार करूं लागला कीं, " काय ईश्वरी लीला आहे पहा ! कीं, केवळ एकाच व्यक्तीनें आपलें बाहुबल आणि बुद्धिबल यांच्या प्रतापानें हें अखंड राज्य स्थिर केलें आहे आणि या अपूर्व शोभेचा विस्तार करून ठेविला आहे. जर प्रभूची इच्छा असेल तर लौकरच मला त्या महानुभाव व्यक्तीचें प्रत्यक्ष दर्शन होईल आणि त्याजबरोबर माझ्या गोष्टीहि होतील ! मग दुसरें कांहीं कां होईना ? "

नदी उतरून पलीकडचे तीरीं गेल्यावर सिद्धराम आणि कुल्लुक यांनीं बरोबर आलेल्या सेनापतीचा निरोप घेऊन दुसरा मार्ग स्वीकारिला आणि आपल्या सेवकांसहित कुल्लुकाच्या एका मित्रानें पूर्वींच ठरवून ठेविलेल्या एका गृहांत जाऊन ते उतरले. तें घर अत्यंत स्वच्छ आणि सुशोभित असून आवश्यक वस्तूंनीं भरलेलें होतें. त्याच्या समीप एक छोटेसें उद्यान असून सन्मुखच श्रीयमुनाजीचें चंचल तरंगयुक्त पात्र भक्तजनांच्या हृदयांत आनंदोर्मी उत्पन्न करीत होतें.

कांहीं कालपर्यंत विश्रांती घेऊन वाटेच्या श्रमाचा परिहार केल्यावर कुल्लुक सिद्धरामास ह्मणाला, ' चला आतां व्यर्थ कालक्षेप करितां कामा नये. आपलें सर्व उंट येऊन पोंहोचले. आतां वस्त्रें भूषणें परिधान करून

---

मध्यभागीं एक दिवाणखाना बहात्तर फूट लांब आणि एकाहत्तर फूट रुंद असा बनविलेला असून त्याच्या दोहोंबाजूस दोन मोठमोठीं दालनें आहेत. या दिवाणखान्याचा घाट अगदीं हिंदूपद्धतीचा आहे, अर्थात् त्याला मुसलमानी तऱ्हेच्या मेहरपी वगैरे नसून साधें छत पाटविलें आहे.

वजीर अबुलफजल याच्या घरीं आपणांला गेलें पाहिजे. आपण स्नानें वगैरे आटपूं तोंपर्यंत वत्स घाठोडीं उतरून आणून आपणांकरितां वस्त्रें तयार करून ठेवील.'

सुमारें एक तासानंतर दोघेही वजिराच्या भेटीस जाण्याकरितां तयार झाले. सिद्धरामाच्या अंगावर एक जरीचा चोगा असून तो पायाच्या घोट्यापर्यंत लोंबत होता. त्याचे गळ्यांत एक सुंदर मोत्यांची कंठी होती. मस्तकावर सुंदर रंगाचें उंची पागोटें असून त्यावर समोरचे बाजूस एक बहुमोल हिरा लाविला होता. कुल्लुकानेंही आपल्या योग्यतेनुरूप चांगला भडकदार पोषाख धारण केला आणि दोघेही आपापल्या घोड्यांवर आरूढ होऊन घराबाहेर निघाले.

तेथून वजिराचें घर फारसें दूर नव्हतें. द्वारासंनिध पोहोंचतांच तेथील द्वारपालानें त्यांना जवळच्या दिवाणखान्यांत बसावयास सांगून तो स्वतः त्यांच्या येण्याची वर्दी देण्याकरितां आंत गेला. थोड्याच वेळांत दरवाज्यास असलेला पडदा दूर करून आंतून अबुलफजलनें जेथें कुल्लुक आणि सिद्धराम हे दोघे बसले होते तेथें प्रवेश केला. मंत्री अबुलफजल हा शरीरानें किंचित् स्थूल असून मध्यमचणीचा मनुष्य होता. त्याची उमर पन्नास वर्षांची होती. त्यानें एक पिवळें बुट्टीदार बहुमूल्य रेशमी वस्त्र परिधान केलें होतें. त्याला दाढी नव्हती. यद्यपि त्याचें वयोमान अर्धेअधिक झालें होतें. तथापि, त्याचें मुख प्रसन्न असून त्यावर चित्ताची दृढता आणि शरीरबल हीं स्पष्टपणें प्रतीत होत होतीं. *

---

* अबुलफजलच्या पित्याचें नांव शेखमुबारक. ह्याचा आजा शेखखिदर नामक सिंधचा रहिवासी होता. मुबारक हा आपल्या काळचा एक अत्यंत बुद्धिमान आणि स्वतंत्रविचारी पुरुष होता. त्याचा द्वितीयपुत्र अबुलफजल हा होय. याचें जन्म तारीख १४ जानेवारी सन १५५१ इ. रोजीं झालें. विद्योपार्जनाचें कामीं त्यानें अत्यंत परिश्रम केले असून त्यावेळीं उपलब्ध असलेल्या उत्तमोत्तम ग्रंथांचेंही अवलोकन केलें होतें. त्याचा वडील भाऊ फैजी यानें आपल्या वयाच्या बाराव्या वर्षीं बादशाही दरबारांत प्रवेश केला आणि पुढें त्याच्याच द्वारें अबुलफजलचाही इसवी सन १५६८

अबुलफजल यास पाहतांच सिद्धराम आणि कुल्लुक यांनीं त्यास मोठ्या आदरानें उत्थापनपूर्वक सलाम केले. त्यानेंही त्यांस उलट सलाम करून ह्मटलें, " आपण फार लौकर परत आलांत हें पाहून मला मोठा संतोष होत आहे. मला वाटतें कुमार महाशय सिद्धराम बादशहा सलामत यांच्या सेवेंत प्रविष्ट होण्याविषयीं फार उत्सुक झाला असेल. "

कुल्लुक—"यांत काय संशय. आपली इतकी कृपा आणि बादशहा सलामत यांची इतकी अनुग्रहदृष्टी जर याजवर आहे तर आह्मी परत येण्यास विलंब करणें अत्यंत अनुचित नाहीं काय ? "

अबुलफजल— छे छे ! कृपा कशाची ! याचें त्या पदावर आरूढ होणें उचितच आहे. आह्मी असें पहातों कीं केवळ स्वजातीय लोकांनाच राज्यांतील संपूर्ण उच्च पदांचा अधिकार देणें उचित नाहीं; तर कित्येक उच्चपदांचे अधिकार ज्या हिंदु लोकांशीं आमचा दृढ संबंध आहे त्यांनाही दिले पाहिजेत. शिवाय तुह्मी पहातच आहां कीं, आमचे रजपूतभाई

---

या वर्षीं ह्मणजे त्याच्या वयाच्या सतराव्या वर्षीं बादशाही दरबारांत प्रवेश झाला. अबुलफजल हा चांगलाच गुणवान् असल्यामुळें त्यावर बादशहाची मर्जी बसली आणि त्याची योग्यता प्रतिवर्षीं अधिकाधिक वाढत गेली. शेवटीं तो शहानूशहा अकबर याचा वजीर आणि चार हजारांचा मनसबदार झाला. अबुलफजलनें आपल्या हुद्याचें काम फार सुयोग्यपणें आणि सफलतापूर्वक निभाविलें. आपल्या पित्याप्रमाणेंच हे दोघे बंधु स्वतंत्र आणि उदार विचाराचे पुरुष होते. ते आपले विचार मनांतले मनांत न ठेवितां ते आचरणांत आणून त्यांचा अनुभव घेत. यामुळें त्यावेळचे कट्टे मुसलमान लोक त्यांना विधर्मी आणि " आजाद " ह्मणत. फक्त बादशहास मात्र त्यांचे विचार पसंत पडत असे दोन ग्रंथ रचिले आहेत. अबुलफजल इ० सन १६०२ च्या आगष्ट महिन्याच्या १२ व्या तारखेस मारला गेला. यानें " आइने अकबरी " आणि " अकबरनामा " अकबरनामा या ग्रंथांत त्यानें इ० सन १६०२ पर्यंत अकबराच्या राज्याचा सविस्तर इतिहास दिला आहे. अबुलफजल यास संस्कृतभाषाही फार चांगल्यारीतीनें अवगत झालेली होती.

त्यांच्याच पैकीं कोणीतरी त्यांचा सेनापति असल्याशिवाय प्रसन्न रहात नाहींत. अन्यजातीचा सेनानी त्यांच्यावर नियुक्त केल्यास ते कधींही त्याच्याशीं प्रसन्न चित्तानें वागत नाहींत. अशा स्थितींत सिद्धरामासारख्या माझ्या प्राचीन आणि विश्वासपात्र मित्राच्या पुत्रास बोलावून त्यास अशा एखाद्या पदावर नियुक्त करणें मला अधिक श्रेयस्कर नाहीं काय ? त्याच्या पित्याचीही इच्छा त्यास बादशाही दरबारांत एखादें उच्च पद मिळावें अशी आहे, तेव्हां यांत आम्हां उभयतांचेही हेतु सिद्धीस जात असल्यामुळें मला मोठा संतोष वाटत आहे.

सिद्धरामानें अत्यंत विनयपूर्वक उत्तर दिलें कीं, ‘ असें जरी आहे तरी हें आपल्या कृपेचेंच फळ आहे आणि याबद्दल मी मोठ्या कृतज्ञ अंतःकरणानें खुद्द मजकडून आणि पिताजींकडूनही आपणांस धन्यवाद देतों आणि आशा करितों कीं, ज्याअर्थी आपण मजवर एवढी कृपा केली आहे त्याअर्थी मीही आपल्या अधिकाराच्या कामाचा उत्तमप्रकारें निभाव लावीन. ’

अबुलफजलनें गंभीरभावानें म्हटलें, “ पहा, सत्य आणि धर्म हे सर्व श्रेष्ठ आहेत. वस्तुतः तुला अशा प्रकारचा उपदेश करण्याची अवश्यकता दिसत नाहीं. तथापि, कांहीं दिवसपर्यंत येथें वास्तव्य केल्यावर तुला स्वतःलाच कळून येईल कीं, छल, कपट आणि विश्वासघात या गोष्टी तर येथें प्रत्येक कोनांत आणि सांधींत दबा धरून बसल्या असून, कधीं कधीं अत्यंत धार्मिक लोक देखील त्यांच्या जाळ्यांत सांपडून दुष्कर्म करण्यास प्रवृत्त होतात. उदईक तुझे सेनापति तुला तुझ्या कामाची माहिती देतील आणि रजपूत लोकांशीं अत्यंत सावधगिरीनें राहण्याविषयीं तुला सूचना देतील. याचें कारण तुला ठाऊकच आहे कीं, त्यांपैकीं अनेक लोक वंशमर्यादेनें तुझ्याहून यत्किंचित्ही कमी नसतां तुझ्याहून खालच्या पदावर नियुक्त झालेले आहेत. अतएव तूं त्यांना सामान्य शिपाई समजून त्यांचे बरोबर कमी दर्जाचें वर्तन करूं नकोस. ” नंतर तो कुल्लुकाकडे वळून त्यास म्हणाला, ‘ आज यांना आमचें शहर दाखवा. ’ हें त्याचें भाषण झाल्यावर कुल्लुक आणि सिद्धराम तेथून जाण्याकरितां उठण्याच्या बेतांत होते. इतक्यांत अबुलफजलनें त्यांस जरा थांबा असें म्हणून आप-

त्या सेवकांस हांक मारिली व तो त्यास ह्मणाला, 'पहा बरें, पर्विज घरांत आहे कीं नाहीं ? '

सेवक—जी हुजूर, सेवकानें त्यांना आतांच आंतमध्यें फिरतांना पाहिलें.

अबुलफजल— अच्छा ! त्याला बोलावून आण.

सेवक—जसा हुकूम.

कांहीं वेळानें सिद्धरामाच्याच वयाचा एक तरुण तेथें आला. त्याच्या अंगावरील वस्त्रें अत्यंत मूल्यवान् होतीं आणि त्याचे गळ्यांत एक बहुमोल हिऱ्यामोत्यांची कंठी होती. तेथें येतांच तो मोठ्या विनीतभावानें अबुलफजलास सलाम करून उभा राहिला. त्यावेळीं त्याचें मुखमंडल अत्यंत तेजस्वी आणि प्रसन्न असें दिसत होतें.

अबुलफजल त्यास ह्मणाला "पर्विज जे काश्मीराहून येणार आहेत ह्मणून मीं एकेवेळीं तुला ह्मटलें होतें, तेच हे दोघे सद्गृहस्थ. कुमार सिद्धराम तुझ्या मैत्रीला योग्य आहे. आज याला तूं आपल्या बरोबर घेऊन आपल्या शहराची सर्व शोभा दाखीव. हा आज प्रथमच या शहरीं आलेला आहे.

पर्विज— मोठ्या आनंदानें, मी तर याच्यांत मोठी थोरवी आणि सन्मान समजतों.

कुल्लुक सिद्धरामास ह्मणाला " वत्स, तूं पर्विजबरोबर जाऊन नगरशोभा अवलोकन कर. तूं परत येईपर्यंत मी येथेंच थांबतों. मला मंत्रीमहाशन यांचे बरोबर कांहीं विशिष्ट गोष्टींच्या संबंधानें संभाषण करावयाचें आहे.

सिद्धराम— जशी गुरुजींची आज्ञा.

याप्रमाणें भाषणें होऊन सिद्धराम तेथून जावयास निघाला असतां अबुलफजल त्यास ह्मणाला, " तुह्माला आजच माझे धाकटे बंधू फैजी यांचे भेटीस जावयाचें आहे. ही गोष्ट उद्यांवर टाकूं नका. नाहींतर ते कदाचित् रागावतील. करितां गुरुजीसहवर्तमान तुह्मी आज तिकडे जाण्याचें करा. समजलांत ? "

सिद्धराम— जशी आज्ञा.

नंतर सिद्धराम आणि पर्विज तेथून उठून चालते झाले. ते कांहींसें पुढें गेल्यावर पर्विज म्हणाला, "दैवयोगानें आज कांहीं विशेष कडक ऊन्ह पडलें नाहीं. चला आपण पायींच जाऊं आणि प्रथमतः आग्रा शहरांत सर्वांत उत्तम आणि पहाण्यास योग्य असलेलें "शाहीमहाल" नांवाचें स्थान पाहूं. कसें काय ? पायीं जाण्यानें आपणांस फारशी तख-लिफ तर नाहींना होणार ?"

सिद्धरामानें मनामिळाऊपणानें ह्मटलें, "कांहीं हरकत नाहीं. मी शीतोष्णाची विशेष पर्वा करीत नाहीं. कारण कीं, आमच्या पर्वतीय प्रदेशांत बहुधा सर्वांनाच शीतोष्ण सहन करण्याची संवय असते आणि जरी तें स्थान दूर असलें तरीही कांहीं हरकत नाहीं. आपणांला मात्र आमच्याकरितां व्यर्थ श्रम घ्यावे लागत आहेत, याबद्दल क्षमा असावी. कारण कीं, आपण येथील सर्व स्थानें बहुधा अनेकवेळां पाहिलींच असतील."

पर्विज हंसून ह्मणाला, "नाहीं, नाहीं, जरी मला आपल्यासारखा शीतोष्ण सहन करण्याचा अभ्यास नाहीं तरी थोडेंबहुत चालण्यानें किंवा ऊन्ह अंगावर घेण्यानें आह्मांला ह्मणजे विशेष तखलिफ् होईल असें नाहीं आणि त्यांतूनही थोडेसें ऊन्ह जरी लागलें तरी तें आपल्या सहवासांत असल्यामुळें होणाऱ्या आनंदांत समजावयाचें देखील नाहीं."

याप्रमाणें इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलतां बोलतां त्यांचें मन एक-मेकांशीं इतकें मिळून गेलें कीं, पुढें क्रमाक्रमानें तें एकमेकांशीं एकमे-कांच्या मनांतील गुह्य गोष्टीही बोलूं लागले. पर्विज ह्मणाला, 'मला सेनाविभागामध्यें काम करण्याची अभिरुचि नाहीं. आमचे बाबाही मला त्याकामीं अयोग्य समजत असून मला दुसऱ्या एकाद्या खात्यांत घाल-ण्याची त्यांची इच्छा आहे.'

याप्रमाणें गोष्टी बोलत चालतां चालतां ते दोघे एका मोठ्या रुंद रस्त्यावर येऊन पोहोंचले. हा रस्ता म्हणजे प्रासादाकडे जाण्याचा मुख्य मार्ग होता. या सडकेच्या अंती एक फार मोठा मेहरपदार दरवाजा होता. अंबारीसह उंच हत्ती त्यांतून सहज निघून जाईल इतकी त्याची उंची होती. या दरवाजाच्या आंत गेल्यावर

त्यांना एक मोठें थोरलें मैदान लागलें. या मैदानांतील सर्व सडका दुतर्फा घनदाट वृक्षांनीं सुशोभित केलेल्या होत्या. त्यांतील मुख्य सडका सहा असून त्या प्रत्येकीच्या शेवटीं वर वर्णन केल्याप्रमाणें एक एक मेहरपदार दरवाजा होता. मध्यभागीं एक मोठा थोरला पाषाण-निर्मित हत्ती उभा असून त्याच्या वळवून वर केलेल्या सोंडेंतून कारंजाप्रमाणें पाण्याचें फवार सुटत होते. या स्थानाच्या तीन बाजूंस संगमरवरी दगडाचे खांब उभे असून त्याच्या मागें स्वच्छ आणि सुंदर गृहांची शोभा दृष्टीस पडत होती. यद्यपि येथील शोभा नदीतटाकावरील शोभेची बरोबरी करूं शकत नव्हती तथापि राजमहालाचा प्रचंड विस्तार आणि ठिकठिकाणीं दिसणारे किल्ल्याचे घुमट व गृहांचा समुदाय यांच्या योगानें तेथील एकंदर दृश्य मोठें मनोरम झालें होतें.

पर्विज—येथील सर्व स्थानांचें निरीक्षण एक दिवसांत होणें अशक्य आहे. फिरतां फिरतां आपण जरी थकलों नाहीं, तरीपण आपणांस इतका वेळ तरी कुठें आहे ? तथापि आजच्या सहलींत आपण सर्व गोष्टी उडत उडतच पाहून घेऊं. पुढें आपणांला येथें रहावयाचें आहेच तेव्हां प्रसंगाप्रसंगानें आपणांस प्रत्येक स्थान यथास्थित पहावयास सांपडेल.

राजवाड्याच्या दरवाज्यापाशीं जातांच पर्विजनें द्वारपालास बोलावून त्याचे कडून एक मार्गदर्शक घेतला. तेव्हां त्या मार्गदर्शकानें त्यांना दाखविण्यायोग्य असलेलीं सर्व स्थानें दाखविलीं. प्रथमतः ते त्याच्या बरोबर एका मोठ्या प्रशस्त दालनांत गेले. तेथें एकापेक्षां एक उत्तम उत्तम दिवाणखाने देशी रिवाजाप्रमाणें बनविलेले होते. त्याच्या पलीकडे एक अत्यंत सुंदर उद्यान असून त्यांत नानाप्रकारचें पुष्पवृक्ष आणि पुष्पलता लाविलेल्या होत्या. मधून मधून थुईथुई उडणारी कारंजीं बागेची शोभा दुणावीत होतीं. शुभ्र संगमरवरी पाषाणांच्या भिंतींत अनेक रंगांच्या दगडांचें जडाऊ काम करून त्यांत नानाप्रकारच्या वेलबुट्टी दाखविल्या होत्या. कारंजांतून उडणारें पाण्याचें तुषार वातावरण शीतल करीत होते. ठिकठिकाणीं जरींच्या काशिद्याचे रेशमी पडदे सोडिले असून दिवाणखान्याच्या जमिनींवर मोठमोठाल्या उंची सतरंज्या आणि गालिचे हंतरलेले होते.

पर्विज— " याच्या पलिकडच्या बाजूस याहीपेक्षां प्रेक्षणीय स्थानें

[stamp]

आहेत. परंतु, तीं बेगमांचीं स्थानें असल्यामुळें आपल्यास तिकडे जातां यावयाचे नाहीं. तीं स्थानें तयार झाल्यावर एक वेळच माझे दृष्टीस पडलीं होतीं ". इतकें बोलून तो मार्गदर्शकास म्हणाला, " थारला दिवाणखाना उघडला आहे काय ? " तो म्हणाला, " जी हुजूर, अजून तो उघडला नाहीं. परंतु, आतां थोडक्यांच दिवसांत तो उघडला जाईल. "

पर्विज— कांहीं चिंता नाहीं. थोड्या दिवसांनीं त्यास्थलीं एक महासभा भरावयाची आहे. त्या दिवशीं तो सहजच आमच्या दृष्टीस पडेल. तसेंच बादशहा सलामत यांचे दिवाणखाने वगैरे आमच्या पाहुण्यांना आपोआप दृष्टीस पडावयाचे आहेत.

वर वर्णन केलेल्या थोरल्या दालनांतून निघून ते दुसऱ्या बाजूस वळले. त्या ठिकाणीं कित्येक नौकरचाकर आणि शिपाईप्यादे आपआपल्या कामांत निमग्न असलेले दृष्टीस पडले. पर्विजनें तेथील आजूबाजूंच्या कित्येक स्थलांचें वर्णन करून सिद्धरामास त्यांची माहिती करून दिली. नंतर त्यांनीं तेथील राजकीय सरस्वतीभुवन पाहिलें त्या स्थलीं एकाहून एक सुंदर हस्तलिखित पुस्तकें उत्तम बांधणी करून संरक्षित केलेलीं होतीं. तेथून फिरतां फिरतां ते सोनार, जव्हेरी, गंधी यांचीं स्थानें, तसेंच भांडार आणि पाकशाला, शस्त्रशाला, अश्वशाला, गजशाला इत्यादिकांची शोभा पहात असतां कुमार सिद्धराम अगदीं आश्चर्यचकित होऊन गेला.

सिद्धरामास वाटलें होतें कीं, राजवाड्याचा बहुतेक भाग पाहून झाला. परंतु, तो त्याचा समज चुकीचा होता. त्यानें जेव्हां पशुशाला अवलोकन केली तेव्हां अद्याप आपण कांहींच पाहिलें नाहीं असें त्यांस वाटलें. तेथील पशुशाला म्हणजे एक मोठाथोरला गांवच होता. कुमार सिद्धराम अत्यंत आश्चर्ययुक्त होऊन ह्मणाला, " मला वाटतें, येथें असलेल्या पशूंची गणना देखील करितां यावयाची नाहीं. "

पर्विज—यांत काय संशय. या शालेंत नुसते पांच हजार हत्तीच आहेत मग इतर जनावरांची गणना कोठून होणार !

सिद्धराम— परंतु केवळ एका व्यक्तीच्या जिवाकरितांच येवढें अवडंबर ना ?

पर्विजनें उत्तर दिलें, “ हे सर्व साहित्य बादशहा सलामत यांनीं केवळ स्वतांकरितांच जमविलें आहे असें नाहीं. त्यांचा स्वभाव अगदीं साधा आहे. त्यांचा पिता हुमायून बादशहा राज्यभ्रष्ट होऊन देशाटन करीत असतां त्या प्रवासांत एका भयाण जंगलांत त्यांचा जन्म झाला असल्यामुळें ती स्थिति मनांत स्मरून बादशहा सलामत आपलें प्रस्तुतचें संपूर्ण राजैश्वर्य केवळ तुच्छ समजत असतात. परंतु, ते सांप्रत ज्या प्रदेशाचें राज्य करीत आहेत, त्या प्रदेशांतील लोकांच्या अभिरुचीस अनुसरून त्यांचें वर्तन असलें पाहिजे. ही गोष्ट त्यांचें लक्षांत आहे. राज्य संरक्षणार्थ प्रचंड सैन्य आणि बुद्धिमान व राजनीतिज्ञ पुरुष यांशिवायही कित्येक गोष्टींची अवश्यकता असते. शिवाय आपले हिंदुलोक, आमचें फारशी, मोगल आणि आरबनिवासी या सर्वांचा सामान्यत: असा समज आहे कीं, ज्या बादशहाजवळ बाहेरचा डामडौल आणि थाटमाट यांचें अवडंबर असेल तो बादशहा उत्तम व त्यासच ते जास्त मान देतात. असें जरी आहे तरी या अवडंबरामुळें व्यर्थ द्रव्याचा व्यय होत असेल असें मात्र आपण समजूं नका. एवढी मोठी घडामोड या स्थलीं चालूं असतां, एकादी वस्तू गहाळ होणें किंवा एकाद्या कामांत विनाकारण अधिक खर्च होणें याठिकाणीं संभवत नाहीं. ज्याप्रमाणें येथील दरबारांत बादशाही आज्ञेचें दृढ प्रतिपालन होत असतें, त्याचप्रमाणें राज्याच्या इतर भागांतही होतें. खरोखर बुद्धिमान् राजाचा राज्यप्रबंध कसा असतो याचें प्रस्तुतचें राज्य हें एक उदाहरण आहे. आमचे वडील या सांप्रतच्या राज्यप्रबंधावर “ आइने अकबरी ” नांवाचा एक ग्रंथ लिहीत आहेत. त्यांत ते प्रस्तुतच्या बारीकसारीक परंतु, महत्वाच्या सर्व गोष्टींचा उल्लेख करणार आहेत. अशाही कित्येक थोड्या गोष्टी आहेत कीं, ज्याबद्दल कित्येक असमंजस लोक बादशहा सलामत यांना अपव्ययी समजतात. उदाहरणार्थ दीनदु:खी लोकांना मदत करणें आणि विद्वान व शिल्पी लोकांना उत्तेजनार्थ द्रव्य देणें या गोष्टी जेव्हां बादशहा सलामत सढळ हातानें करूं लागतात, तेव्हां बिचारे खजानजीसाहेब द्रव्य देतां देतां अगदीं टेकीस येतात. ”

इतकें बोलून पर्विज सिद्धरामास ह्मणाला, “ चला आतां आपण परत

जाऊं. कारण, ऊन्हही कडक झालें आहे आणि मलाही किंचित् थकवा आल्यासारखा वाटत आहे. ”

सिद्धराम—चला तर मग. आज आपण माझ्याकरितां फार परिश्रम घेतले, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें.

यापमाणें भाषण झाल्यावर ते दोघे तेथून निघाले. पर्विज सिद्धरामास पोचविण्याकरितां त्याजबरोबर घरापर्यंत आला. सिद्धरामाचा निरोप घेऊन परत जातेवेळीं तो त्यास ह्मणाला, “ उद्ईक कदाचित् आपणाला आपल्या सेनाकार्यामध्यें व्यग्र रहावें लागेल. अतएव नगर पहावयास येण्यास आपणाला सवड होणार नाहीं. करितां परवां अगर आणखी एखादे दिवशीं जेव्हां आपणांस सोईचें पडेल तेव्हां आपण नगराची अवशिष्ट शोभा पहाण्यास जाऊं. ”

सिद्धराम—ठीक आहे. आपण पुन्हां माझे बरोबर येऊन नगरशोभा दाखविण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली, या आपल्या कृपेबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. ज्या दिवशीं मला सवड असेल त्या दिवशीं मीच स्वत: आपलें घरीं येईन. नंतर आपण दोघे मिळून आजच्या प्रमाणेंच सहलीस जाऊं.

इतकें भाषण झाल्यावर पर्विज आपल्या घराकडे चालता झाला आणि सिद्धराम आपल्या रहावयाच्या जागेंत जाऊन वाटेच्या श्रमांचा परिहार करण्याकरितां विश्रांति घेत पडला. सायंकाळीं सिद्धराम आणि कुल्लुक दोघे मिळून अबुलफजलचा भाऊ फैजी याचे भेटीस गेले. फैजी याचे निवासस्थान एका अत्यंत रमणीय अशा वाटिकेंत होतें. ती वाटिका सदां उत्तम फलदायक आणि सुवासिक पुष्पांनीं युक्त अशा सघन वृक्षांनीं भरलेली असे. हे दोघे तेथें जातांच एका सेवकानें आंत जाऊन फैजीस त्यांच्या आगमनाची वर्दी देऊन त्याच्या आज्ञेनुरूप तो त्यांना आंत नेण्याकरितां पुन्हां बाहेर आला. आंत गेल्यावर सिद्धरामानें पाहिलें तों एका लहानशा दिवाणखान्यांत उत्तमप्रकारची बैठक घातलेली असून तीवर बसून कांहीं कागदपत्र पहात असलेला एक तरुण पुरुष त्याचे दृष्टीस पडला. त्यास पाहतांच सिद्धराम आणि कुल्लुक यांनीं त्यास लवून सलाम केले. तेव्हां त्यानेंही मोठ्या गौरवानें मोठ्या उत्थापनपूर्वक त्यांचे

सलाम घेतल्यावर ते तिघेही एका पडवीत अंथरलेल्या गालिच्यावर बसले.

* फैजी हा आपल्या भावापेक्षांही अधिक मनमिळाऊ असून सरळ अंतःकरणाचा आणि प्रसन्नवदन असा पुरुष होता. त्यानें जरी कित्येक वेळां समरभूमीवर जाऊन आपल्या वीरतेची साक्ष पटविली होती, तरी त्याहीपेक्षां त्याच्या अंगचे इतर गुण फारच वर्णनीय होते. त्याच्या दृष्टींतील गांभीर्यावरून तो मोठा दूरदर्शी आणि शांत स्वभावाचा पुरुष असावा, अशी त्यास पहाणाराची खात्री होत असे. बादशहा सलामत यानें अनेकवेळां त्यास दूत बनवून परराष्ट्रांत वकिलीकरितां पाठविलें होतें, व त्यानेंही आपली कामगिरी उत्तमप्रकारें बजाविली होती.

कुशल प्रश्न वगैरे झाल्यावर फैजीनें बोलण्यास सुरवात केली. तो ह्मणाला, ' आपण लवकर परत येऊन आह्मांस आपल्या पुनर्दर्शनाचा लाभ द्याल अशी माझी खात्रीच होती. आपल्या शिष्यास पाहून मी मोठा प्रसन्न झालों आहे '. सिद्धरामाकडे वळून ' कसें काय ? आपण आमच्या शहराची शोभा वगैरे पाहिली कीं नाहीं ? '

सिद्धराम—जी हां ! आपले चिरंजीव पर्विज यांनीं मोठ्या प्रेमानें मला आज सकाळीं आपल्या राजवाड्याचा कांहीं भाग दाखविला. खरें ह्मटलें असतां तेवढ्यानें मीं कांहीं पाहिलें असें होत नाहीं. येथील कारागिरी आणि कलाचातुर्य पाहून, माझें तर मन अगदीं थक्क होऊन गेलें. खरोखर माझ्या अनुमानापेक्षांही जास्त अशा कित्येक गोष्टी माझ्या दृष्टीस पडल्या.

फैजी—आपलें ह्मणणें यथार्थ आहे. प्रथमतःच येथें येणाऱ्या मनुष्याला असेंच होत असतें. येथील आमच्या राजप्रासादाचें कोणी कितीही कां वर्णन ऐकलेलें असेना, त्याला प्रत्यक्ष दर्शनापासून होणारा आनंद कधींही

---

* फैजी हा अबुलफजलचा वडील भाऊ होता. तो उत्तम कवी असून त्यावर अकबराची प्यारमर्जी असल्यामुळें त्यानें त्यास ' कविशिरोमणी ' अशी पदवी दिली होती. कादंबरीकारानें फैजीस अबुलफजलचा धाकटा भाऊ बनविलें आहे तें चुकीचें होय.

प्राप्त व्हावयाचा नाहीं. खरोखरच या प्रासादाच्या प्रत्यक्ष दर्शनानें कोणाही मनुष्याचें अंतःकरण आश्चर्यचकीत झाल्यावाचून रहावयाचें नाहीं, कुल्लुकाकडे वळून, ' बरें तें असो. कसें काय कुल्लुकमहाशय सांप्रत आपल्या देशाची कशी काय हालहवाल आहे ? काश्मीराकडील वृत्तांत ऐकण्याविषयीं माझें मन नेहमीं अतिशय उत्सुक असतें. '

कुल्लुकानेंही फैजीची इच्छा जाणून काश्मीराकडील बहुतेक सर्व वर्तमान सांगितलें. परंतु, तेथील राजघराण्यांत उत्पन्न झालेल्या विषमभावाचा एक लवलेशही आपल्या मुखावाटें बाहेर काढिला नाहीं. फैजीनें सिद्धरामासही एक दोन प्रश्न विचारिले आणि त्यानेंही त्यांचीं रीतीप्रमाणें ठराविक उत्तरें दिलीं. याप्रमाणें गोष्टी होतां होतां पुढें विद्याविषयक चर्चा निघाली. फैजीचें मनमिळाऊपणाचें वर्तन पाहून कुमार सिद्धराम हाही त्याजबरोबर अनेक गोष्टी मोकळ्या मनानें बोलूं लागला.

फैजी सिद्धरामास उद्देशून ह्मणाला, " एकूण आमचा राजप्रासाद तुह्माला तुमच्या कल्पनेंहून अधिक उत्तम दिसला ह्मणतां ! मी जेव्हां तुह्मां हिंदुलोकांचे वेदशास्त्रादिकांचे ग्रंथ अवलोकन करूं लागलों तेव्हां माझ्याही मनाची अशीच स्थिति झाली होती. आमच्या धर्माचे लोक कांहीं विशेष विद्वान् नाहींत. त्यांनीं तुमच्या ग्रंथांची निंदा करून मला अगदीं खात्रीपूर्वक त्यांत कांहीं नाहीं ह्मणून सांगितलें होतें. ते ह्मणत कीं, ' हिंदुलोकांच्या ग्रंथांत केवळ व्यर्थ कुरापती भरल्या असून त्यांच्या वाचनापासून आमच्या सभ्यतेस मात्र हानी पोंचणारी आहे. तसेंच अल्ला आणि रसूलिल्ला यांच्या दृष्टीनें तर ते ग्रंथ केवळ अविश्वासार्ह होत. ' या शेवटच्या गोष्टी संबंधानें मी तूर्त विशेष कांहीं बोलत नाहीं. परंतु, काव्यालंकारांच्या आणि ज्ञानाच्या उन्नतिसंबंधानें पाहतां हिंदु ग्रंथकार आह्मांहून पुष्कळच पुढें आहेत. हिंदु लोकांची वीररसप्रधान काव्यें आणि शृंगारविषयक काव्यें यांच्या सौंदर्याची बरोबरी इतर भाषेंतील ग्रंथ कधींही करूं शकणार नाहींत. तुमच्या प्राचीन ऋषिप्रणीत ग्रंथांत जशी गंभीरता, शुद्धता आणि धर्मपरायणता दृष्टोत्पत्तीस येते, तशी दुसरीकडे कोठेंही दिसावयाची नाहीं. वस्तुतः आपल्या सारख्याजवळ माझ्यासारख्यानें या गोष्टींचें विशेष वर्णन करीत बसणें व्यर्थ आहे. आपण हे सर्व

विषय मजहून अधिक चांगले जाणत आहां मला आपली गर्वाणभाषा शिकण्यालाच, ती आमच्या फारशी आणि अरबी याहून अगदीं भिन्न असल्यामुळें अगोदर कितीतरी परिश्रम लागले. ”

सिद्धराम— मी स्वत: हिंदु असूनही मला तरी गीर्वाणभाषा कोठें चांगली येत आहे. मला देखील फारशी भाषेचाच विशेष सहवास असल्यामुळें संस्कृत बरेंच कठीण गेलें. मला संस्कृत शिकवितांना गुरुजीस किती त्रास पडला तें त्यांना विचारा पाहिजे तर.

कुल्लुक फैजीस उद्देशून ह्मणाला, “ प्रथमत: जरी आपणाला गीर्वाण भाषेचा अभ्यास फार कठीण गेला, तरी आतांचें आपलें तीमधील प्राविण्य कांहीं सामान्य नाहीं. आपला काश्मीरचा इतिहास आणि नलदमयंतीच्या कथेचा अनुवाद पाहून ही कोणा यवनग्रंथकाराची रचना आहे असें कोण ह्मणेल ? ”

संस्कृत साहित्याविषयीं फैजीचे मनांत फारच प्रेम वास करीत होतें. कुल्लुकानें त्याची प्रशंसा केल्यावर तो अधिकच उत्सुकतेनें ह्मणाला, “ अहाहा ! नलदमयंती आख्यान ! ! काय अपूर्व कविता ! त्याचा मी केलेला अनुवाद कितीका चांगला उतरलेला असेना. जें पदलालित्य, जो अर्थगौरव आणि जें ओज संस्कृतामध्यें आहे, तें कदापि अनुवादांत साधावयाचें नाहीं. शिवाय तो कथाभाग तरी किती उपदेशपर ! दमयंतीची धर्मपरायणता आणि अखंड पतिप्रेम ही केवळ लोकोत्तर होत. तिजवर कितीही संकटें कोसळलीं, पतीनेंही तिचा त्याग केला, तथापि सत्य आणि पातिव्रत्य यांपासून तिनें आपलें पाऊल चळूं दिलें नाहीं. मी केवळ बादशहा सलामत यांच्या संतोषार्थ त्या कथेचा अनुवाद केला. त्यांना स्वत:ला कार्यबाहुल्यामुळें कठीण अशा विदेशी भाषा शिकण्याला फुरसत नसते. आणि जिज्ञासा तर सर्व गोष्टींची. आतां त्यांनीं मला इंजीलचा अनुवाद करण्याची आज्ञा केली आहे. ”

कुल्लुक—काय ? कशाचा अनुवाद ?

फैजी— इंजील ह्मणून इसाई ( ख्रिस्ती ) लोकांचा पवित्र ग्रंथ आहे. या इसाई लोकांचा वृत्तांत आपणही कदाचित् ऐकला असेल. त्यांच्या ग्रंथांत अनेक गोष्टी वाचण्यालायक आहेत. मला त्यांत पुष्कळशा गोष्टी

फारच चांगल्या दिसून आल्या. तशाच कित्येक साधारण गोष्टीही त्यांत आहेत. परंतु, ज्यांना ह्मणून आपल्या हिंदुशास्त्रग्रंथाचें ज्ञान आहे, त्यांना मात्र त्यांत कांहीं नवीन गोष्ट मिळण्यासारखी नाहीं. आपल्या ग्रंथांतील रूपकादिकांचें मी काय वर्णन करूं ! मला त्यांत फारच गोडी वाटते. हें पुढील सुभाषितच पहाना किती बहारदारीचें आहे तें;—

**न चोरहार्यं न च राज हार्यम् ।**
**न भ्रातृभाज्यं न च भारकारि ॥**
**व्ययेकृते वर्धत एव नित्यम् ।**
**विद्याधनं सर्वधनप्रधानम् ॥ १ ॥**

( जे चोराला हरण करितां यावयाचें नाहीं, राजाला हरण करितां यावयाचें नाहीं, भावाला वांटणी करून मागतां यावयाचें नाहीं, ज्याचें कधीं ओझें व्हावयाचें नाहीं आणि ज्याचा व्यय केला असतां जें नित्य वाढत मात्र जातें तें विद्याधन सर्व धनांत श्रेष्ठ होय. )

कां ? श्लोक ह्मणतांना मी कांहीं अशुद्ध उच्चार तर नाहीं केले ?

सिद्धराम किंचित् हंसून कुल्लुकाच्या मुखाकडे पाहूं लागला.

फैजी— जर कुठें कांहीं चूक झाली असली तर सांगा.

सिद्धराम— आपल्या उच्चरांत कोठें अशुद्ध तर नाहीं. परंतु, आपले वर्णोच्चार जसे स्पष्ट असावेत तसे नाहींत.

फैजी— ठीकच आहे. तुमच्यासारखे आमचे वर्णोच्चार कसे असूं शकतील ? बरें तें असो. आतां आपण एकादें सुभाषित काढा.

सिद्धरामानें किंचित् थांबून पुढील सुभाषित ह्मटलें.

**स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् ।**
**परिवर्तिनी संसारे मृतः को वा न जायते ॥ २ ॥**

( ज्याच्या जन्मास येण्यानें वंशाची उन्नति होते, तोच खरा जन्मला ह्मणावयाचा. नाहींतर या भ्रमणशील संसारांत मरत कोण नाहीं ? अर्थात् सगळेच जन्मतात आणि सगळेच मरतात ! )

हें सिद्धरामाच्या तोंडचें अत्यंत मधुर आणि स्पष्ट वाणीनें उच्चारिलेलें सुभाषित ऐकून फैजी किंचित् हंसून ह्मणाला, “ कां होईना हा मधुर भाषणाचा गुण आपल्या अंगीं केवळ अपूर्व आहे. ”

सिद्धराम—छे, मी यथार्थ सांगतों कीं आपलें आणि आपले बंधू अबुलफजल यांचें नांव सांप्रत फारस देशापासून तों थेट हिंदुस्थानच्या दक्षिण धुरेपर्यंत सर्वतोमुखीं झालें असून, तें असेंच अनंत कालावधी कायम राहील, अशी माझी खात्री आहे.

फैजी—निःसंदेह, माझ्या वडील बंधूंचें नांव सामान्यतःच सर्व लोकां-च्या हृदयांत अनंतकालपर्यंत वास्तव्य करील. कारण कीं, त्यांचा अकबरनामा हा ग्रंथ त्यांचें अक्षय स्मारक झालें असून तें लोकांना त्यांच्या नांवाचा कधींही विसर पडूं द्यावयाचें नाहीं. तो ग्रंथ असा अपूर्व झाला आहे कीं, त्याचे पुढें माझे सगळे ग्रंथ तुच्छ आहेत. तथापि, मीं त्यांना एक गोष्ट उघड-पणें सांगितली कीं, आपण अकबर बादशाहास अगदीं अस्मानावर चढ-वीत चालले आहांत. परंतु, कसें झालें तरी तोही मनुष्यच आहे. अर्थात् इतर मनुष्याप्रमाणें त्याचे ठिकाणींही गुणदोषांचें मिश्रण असलें पाहिजे. मला मोठी भीति आहे कीं, भविष्यकाळीं लोक त्यांना बादशाहाची खुशा-मत केल्याचा दोष न लावोत. मी जरी त्यांना इतकें स्पष्ट सांगितलें, तरी देखील त्यांनीं माझें कांहींही न ऐकतां बादशहाची तारीफ लिहिण्याचें काम चालविलेंच आहे. माझ्या भाषणावर त्यांनीं मला असा जबाब दिला कीं ज्या गोष्टींबद्दल माझें अंतःकरण पूर्ण साक्ष देत असून, ज्या मला केवळ सत्य वाटत आहेत, त्या गोष्टी लिहिण्याचे कामीं मीच जर माघार घेतली, तर त्या गोष्टी दुसरा कोण लिहूं शकणार आहे ?

फैजीचें भाषण ऐकिल्यानंतर सिद्धराम कांहीं वेळ स्तब्ध राहून आणि विचार करून ह्मणाला, " मी आपणांला कांहीं विचारूं इच्छितों. "

फैजी—कांहीं हरकत नाहीं, विचारा. मी आपणाला अगदीं मोकळ्या मनानें त्याचें उत्तर देईन.

सिद्धराम—आतां आपल्या जेष्ट बंधूंची गोष्ट निघाल्यावरून त्यांनीं सांगि-तलेल्या एका गोष्टीचें मला स्मरण झालें. त्यांनीं मलाही गोष्ट चितवून सांगितली आहे की, बादशहा सलामत यांच्या दरबारीं अनेक छली, कपटी आणि विश्वासघातकी लोक रहात असून त्यांजबरोबर उत्तम प्रकारची सावधगिरी ठेवावी ह्मणून. आपले विचार श्रेष्ठ, पूजनीय आणि यथार्थ आहेत. आपणही बादशहाचे-दरबारीं असले मूर्ख व दुष्ट लोक आहेत असें समजतां कीं

काय? आणि असले लोक दयाळू बादशहाच्या दरबारीं राहून केवळ छल, कपट आणि विश्वासघात करीत असतील असें आपणांस वाटतें काय?

फैजी— आमच्या बड्या भाईसाहेबांना तर सर्वत्र छल आणि विश्वासघातच दिसत असतो. परंतु, असें नाहीं. मंत्री महाशयांचा आणि विशेषतः ज्याच्यावर राज्यांतील अनेक गोष्टींचा भार पडलेला असतो अशा लोकांचा हा एक स्वभावधर्मच आहे. आपण अगदीं निश्चिंत रहा. येथील लोक इतके नीच आणि मूर्ख नाहींत कीं, ते बादशहा सलामत यांच्या विरुद्ध एकाद्या गोष्टींत सल्ला देऊन आपल्या हातानेंच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतील."

फैजीचें भाषण ऐकून कुल्लुक गंभीरतेनें म्हणाला, "मित्र महाशय, हा सर्व आपल्या शुद्ध अंतःकरणाचा परिणाम आहे. आपणाला या जगांत वाईट असें कांहीं दिसावयाचेंच नाहीं. परंतु, तसा समज इतर लोकांचा असून चालावयाचें नाहीं. विशेषतः सिद्धरामासारख्या तरुण आणि नवथर मनुष्यास तर येथें आपणाप्रमाणेंच सर्वांवर सारखा विश्वास बिनधोकपणें कधींही ठेवतां यावयाचा नाहीं."

फैजी–आपलें म्हणणें यथार्थ आहे. परंतु, आपल्या शिष्यासबंधानें माझा अभिप्राय कांहीं वेगळाच आहे. माझें असें ह्मणणें आहे कीं, आरंभापासूनच त्याचें मस्तक या राजनैतिक प्रपंचांनीं बिघडून जाऊं नये. त्यांनीं प्रथमतः दृढनिश्चय आणि दृढविश्वास त्यांच्या मजबूत पायावर आपल्या कार्यास आरंभ करावा. आह्मीं प्रथमतः जेव्हां या दरबारांत प्रवेश केला, तेव्हां आम्हालांही असेंच मोठें गूढ पडलें होतें. परंतु, आह्मीं आपलें सरळपणाचें ब्रीद सोडिलें नाहीं आणि ईशकृपेनें आह्मांवर या घडीपर्यंत तसें संकटही आलें नाहीं. म्हणून मीं ह्मणतों कीं, प्रारंभापासून जर त्याच्या मनांत असा प्रत्येक व्यक्तीविषयीं संदेह रहात गेला तर शेवटीं तो कोणावरच विश्वास ठेविनासा होईल. इतकेंच नव्हें, तर तो कदाचित् आम्हां बंधूंचाही विश्वास धरणार नाहीं.

सिद्धरामानें फैजीकडे पाहून निश्चयाच्या स्वरानें ह्मटलें, 'असें कदापि व्हावयाचें नाहीं. ज्याअर्थीं आपण मजबरोबर कोणत्याही प्रकारचा भेद-

भाव ठेवीत नाहीं, त्याअर्थी माझें अंतःकरण आपणांविषयीं शंकित असणें कसें संभवेल ? ’

त्यावर कुल्लुक सिद्धरामास म्हणाला, ‘ पहा बरें, या तुझ्या भाषणाचें तुला पक्कें स्मरण असूं दे आणि हीही गोष्ट लक्षांत आण कीं कांहीं झालें तरी मानवशक्ति अगदीं परिमित आहे. कोणीही मनुष्य खात्रीपूर्वक सांगूं शकणार नाहीं कीं, केव्हां आणि कोणत्या कारणानें त्याच्या अंतःकरणावर कशाप्रकारचा परिणाम घडेल.

फैजीनें हंसून म्हटलें, ‘ पहा, पुन्हां येथें न्यायाची गोष्ट आली. यद्यपि माझा आपणासारखा अभ्यास झालेला नाहीं. तथापि, आपण थोडीशी सांख्य आणि वेदांत यांची चर्चा करूं. आपण तर या शास्त्रांत परमप्रवीण आहांत. सांप्रत सायंकाळचा सुमार झाला असल्यामुळें वेळही मोठी आनंददायक आहे. यावेळीं बादशहा सलामत येथें असते तर बरें झालें असतें. आपणाला माहीतच आहे कीं, नाचरंगापेक्षां त्यांना विद्याविषयक चर्चेंत अधिक प्रीति आहे.

कुल्लुक— सन्मित्र महाशय, याहून आनंदाची गोष्ट ती कोणती ? आपल्याबरोबर चार घटका अशा गूढ शास्त्रविषयांवर वादविनोद झाला असतां तो मला हितप्रदच आहे. परंतु, अडचण इतकींच कीं, उदईक प्रातःकाळींच सिद्धरामास सेनेचा अधिकार दिला जाणार आहे आणि मलाही काश्मीरास जाण्याकरितां आजच्या रात्रींतच तयारी करून ठेवावयाची आहे. तिकडे जाण्याला परवांचेच दिवशीं सुमुहूर्त आहे. करितां सांप्रत आपण आम्हाला क्षमा कराल अशी आशा आहे. आपण जो आज आमचा इतका सत्कार केला, त्याबद्दल आह्मी आपलें अत्यंत आभारी आहोंत.

फैजी—काहीं चिंता नाहीं.

इतकें भाषण होऊन सिद्धराम आणि कुल्लुक जावयास निघाले असतां पुन्हां सिद्धरामास उद्देशून फैजी ह्मणाला, “ पहा बरें, सावध रहा. आपले हातून कोणतीही अनुचित गोष्ट न होईल असें करा. तुमच्यासारख्या तरुणांचे हांतून प्रसंगोपात चूक होण्याचा संभव आहे. याकरितां जर कधीं तुम्हाला जडभारी पडेल तर सरळ

मजकडे निघून या. मी मोठ्या आनंदानें आपणास आलेली आडचण दूर करीन. ”

सिद्धराम ह्मणाला ‘ जशी आपली आज्ञा. ही आपली मजवर मोठीच कृपा होय. ’ इतकें भाषण झाल्यावर फैजीचा निरोप घेऊन कुल्लुकासह सिद्धराम तेथून निघाला. तें वेळीं तो आपल्या मनांत म्हणाला, “ खरोखर मी मोठा भाग्यवान् आहें. आरंभापासूनच माझी सर्व कार्यें निर्विघ्नपणें सिद्ध होत चाललीं आहेत. मला साह्य करणारांचीं आणि सल्लामसलत देणारांची तर मुळींच कमतरता नाहीं. लहान मोठ्या कार्यांत परम बुद्धिमान आणि समर्थ अशा फैजीचें मला साह्य आहे. परंतु, जर तसेंच कांहीं एकादें संकट उपस्थित झालें तर मला गुरुपदांचें आश्वासन आहेच. अगोदर मंत्री अबुलफजल यांनीं मला आश्वासनपूर्वक बादशहा सलामत यांचा उत्तमप्रकारचा परिचय करून देण्याचें अभिवचन दिलेंच आहे. आणखी काय पाहिजे ? ”

# खंड ४ थें.

## अकबर.

दुसऱ्याच दिवशीं प्रातःकाळीं किल्ल्याच्या मैदानांत कुमार सिद्धरामानें रजपूत सेनेच्या मुख्य मनसबदाराचे हातीं आपल्या ठरलेल्या सेनाविभागाचें आधिपत्य स्वीकारिलें. सिद्धरामानें सत्कारपूर्वक आपल्या वरिष्ट अधिकाऱ्यास अभिवंदन केलें आणि त्या अधिकाऱ्यानें त्याला एक श्वेत-

वर्ण पक्षांचा तुरा त्याचें पदचिन्ह ह्मणून अर्पण केला. हा अधिकारी आपल्या कामाची अंमलबजावणी करण्यांत जरी अत्यंत कडक होता तरी साधारणतः त्याचा मनमिळाऊपणा आणि मित्रप्रेम हे दोन गुण अत्यंत प्रशंसनीय होते. कुमारानें जेव्हां आपली सेना एकरंगी भव्य पोषाख घालून एकसारखी रागेनें उभी असलेली पाहिली तेव्हां त्याचें चित्त अत्यंत प्रसन्न झालें. त्याच्या सेनेतील सर्व शिपाई उत्तमप्रकारचें आश्वारोहणपटु असून त्यांच्या मुखावर उज्वल कांति आणि वीरता जणूं झळकत होतीं.

मुख्य मनसबदाराच्या आज्ञेनुसार सिद्धरामानें आपल्या सेनेकडून थोडीशीं कवाईत करविली. त्या प्रसंगीं सिद्धरामासही आपल्या अंगच्या विलक्षण अश्वारोहणपाटवाचें प्रदर्शन करण्यास अवसर मिळाला. त्यावेळीं कुल्लुकगुरू जर तेथें असते तर आपला शिष्य विद्याबलानें समर्थ झालेला पाहून त्यांस फारच संतोष झाला असतां. असो. कांहीं वेळ कवाईतीचे खेळ वगैरे झाल्यावर तुतारी वाजली. त्यावरून त्या दिवशींचें कृत्य समाप्त झाल्याची सर्वांस सूचना मिळाली. सिद्धरामानें आपल्या घोड्याची वागदोर जवळ उभा असलेल्या वत्सनामक सेवकाचे हाती देऊन विश्रांतिस्तव तेथून समीप असलेल्या एका उद्यानांत प्रवेश केला. त्या उद्यानांत केवळ त्याच्याच सारख्या उच्चपदावर युक्त असलेल्या लोकांनाच जाण्याची परवानगी होती. सिद्धरामानें उद्यानांत पाऊल टाकिलें मात्र तों त्याचे मागून एक उच्च घराण्यांतील दासीप्रमाणें दिसणारी तरुण स्त्री येत असलेली त्यानें पाहिली. ती स्त्री सिद्धरामाजवळ येऊन प्रथमतः किंचित दचकून बोलूं लागली. ती ह्मणाली, ‘ महाशय, आपलेंच नांव सिद्धरामजी आहे काय ? आणि आपणच काश्मीराहून आलातना. ? ’

सिद्धराम—होय. पण हें तुझाला कसें कळलें.

दासी ह्मणाली, ‘ मी तर आपणांला ओळखत नाहींच, पण माझ्या स्वामिनिनें आपल्या स्वरूपाचें वर्णन सांगून ’ आपणांस घेऊन येण्याविषयीं मला आज्ञा केली आहे. कृपा करून जर आपण मजबरोबर चलाल तर त्या क्षणभर आपणापाशीं कांहीं भाषण करण्याची इच्छा करीत आहेत.

सिद्धरामानें विचारिलें, ‘ तुझी स्वामिनी कोण आहे ? ’

दासी— ‘ क्षमा करा ! यावेळीं मी त्यांचें नांव सांगूं शकत नाहीं . आपण जर कृपा करून आज सायंकाळीं त्यांचेवर आपल्या दर्शनाचा अनुग्रह कराल तर त्या स्वतःच आपणांला सर्व मजकूर निवेदन करितील. रात्रीं सुमारें दहा वाजणेचे सुमारांस आपण त्या मशिदीजवळ या. ’ इतकें बोलून तिनें तेथून जवळ असलेल्या सूर्यप्रकाशांत चमकणाऱ्या स्वर्णमय घुमटांच्या एका सुंदर गृहाकडे अंगुलीनिर्देश केला.

कुमार सिद्धराम— आपल्या मनांत किंचित् दचकून विचार करूं लागला कीं, “ हिला काय बरें उत्तर देऊं ? काय, कोणी कामिनी मला मोहावयास पहाते आहे काय ? ” तितक्यांत त्याला त्याच्या इरावतीचें स्मरण झालें. तो पुन्हां मनांशीं ह्मणाला “ कांहीं गुप्त राजकीय रहस्य तर नाहीं ! ” तत्क्षणीं त्यास अबुलफजलच्या चितावणीची आठवण झाली.

दासी—कांहो महाशय, आपण असे वीरपुरुष असून एका साधारण स्त्रीची भेट घेण्यांत इतका आगापीछा बघत आहांत ! तेव्हां आपल्या मनांत कांहीं भीति तर नाहीं आली ?

भीतीचें नांव निघतांच सिद्धराम क्रोधाविष्ट होऊन तिला ह्मणाला, “ काय ह्मटलेंस ? कोणी पुरुषानें जर मजपुढें असें भाषण केलें असतें तर खचीतच यावेळीं मीं खुद्द त्यालाच भीतीचा आस्वाद घ्यावयास लाविलें असतें. परंतु, तूं स्त्री पडलीस, ह्मणून मला तसें कांहीं करितां येत नाहीं. मी कसला विचार करीत आहें तें तुला काय ठाऊक ? बरें जा ठरलेल्यावेळीं मला त्या मशिदीपाशीं भेट. मी अवश्य तुझ्या स्वामिनीच्या भेटीस येईन. ”

दासी ह्मणाली, “ आपण मोठी कृपा केलीत. सांगितलेल्या ठिकाणीं मी खास उभी असेन, ” इतकें बोलून ती दासी तेथून चालती झाली.

प्रथमतः तिच्या मागें मागें जाऊन मुकाट्यानें ती कोठें जातें आणि तिला कोणीं पाठविलें आहे याचा सुगावा काढावा असें सिद्धरामाच्या मनांत होतें. परंतु, त्यानें पुन्हां असा विचार केला कीं, कदाचित् आपणाप्रमाणें तिच्याही मनांत संशय येऊन ती भलत्याच मार्गाचा स्वीकार

कशावरून नाहीं करणार ? शेवटीं त्यानें पूर्णपणें विचार करून परत उद्यानाचा मार्ग धरिला.

हें उद्यान अत्यंत रमणीय असल्यामुळें तेथें जातांच सिद्धरामाची चित्तवृत्ति गारीगार होऊन गेली. तेथें अनेक स्वच्छ आणि सरळ असे छायापथ होते. त्यांचे दोहोंबाजूंचे वृक्ष अत्यंत सघन असून मधील जमिनी सुंदर गुळगुळींत दगडांच्या केलेल्या होत्या. उद्यानाच्या मध्यभागीं लहान मोठें संगमरवरी पाषाणांचे हौद बांधलेले असून त्यांमध्यें कारंजी उडत होतीं. ठिकठिकाणीं फुलझाडांचे वाफे आणि सघन निकुंजाची शीतल छाया हीं पथिकजनांच्या चित्तास लोभवीत होतीं. कांहींवेळपर्यंत कुमार त्या बृहदुद्यानांत फिरत होता तरी त्यास तेथें कोणीही भेटलें नाहीं. परंतु, तेथून कांहींसा तो पुढे जाऊन पहातो तों एका घनदाट वृक्षाच्या शीतल छायेंत एक मध्यम वयाचा वीर पुरुष बसलेला त्याचे दृष्टीस पडला. त्या अनोळखी पुरुषाच्या मुखावर अशी कांहीं अवर्णनीय कांति होती कीं, तिच्या योगानें सिद्धरामाच्या हृदयांत एकाएकीं एकप्रकारचा पूज्यभाव उभा राहिला. आजपर्यंत सिद्धरामाच्या अनेक राजपुरुषांशीं भेटी झाल्या होत्या. परंतु, सांप्रत जी अज्ञात व्यक्ति त्याचे दृष्टीसमोर होती, तिची एकंदर प्रभा अशी कांहीं लोकोत्तर होती कीं, तिचें वर्णन करितां येणें अशक्य आहे. ह्यापुरुषाचें मुख अत्यंत गंभीर आणि हास्ययुक्त होतें. दाढी मुळींच नव्हती. त्याचा वर्ण गौर आणि शरिरावरील वस्त्रें साधीं परंतु बहुमोल होतीं. त्याच्या तरवारीच्या मुठीवर सर्वोत्कृष्ट जडाऊ मिन्याचें काम केलेलें होतें आणि शिरोभूषणावर असलेला एक असामान्य हिरा आपल्या तेजोलहरींनीं त्याचे सर्व शरीर प्रकाशित करीत होता. कुमारानें गुरुपद योगिराज यांच्या मुखावर जी तेजस्विता अवलोकन केली होती तशीच किंबहुना तीहूनही अधिक अशी तेजस्विता या उद्यानास्थित अनोळखी पुरुषाच्या मुखावर होती. या त्याच्या एकंदर परिस्थितीवरून तो कोणीतरी मोठा दरबारी किंवा मुत्सद्दी अथवा राजघराण्यांतीलच एकादा पुरुष असावा असा सिद्धरामानें तर्क केला. सिद्धरामाचे मनांत त्याचे अंगावरून पुढें निघून जावें असें होतें. परंतु, तो पुढें जाऊं लागतांच त्या अज्ञातपुरुषानें त्याचें नांव घेऊन त्यांस हांक

मारिली आणि 'आपल्या सेनेंतील रजपूत लोकांशीं आपला उत्तम-प्रकारचा परिचय झाला काय'? असें विचारिलें. जेथें जावें तेथें सर्व लोक आपणांस आपल्या नांवानें ओळखितात, हें पाहून सिद्धरामास फारच आश्चर्य वाटलें. तथापि त्यानें लागलींच तेथें थबकून उत्तर दिलें, 'होय. आजच त्यांचा माझा परिचय होऊन मीं त्यांचें आधिपत्य स्वीकारिलें आहे. तें असो. परंतु, आपण मला कसे ओळखिलें ?'

तो पुरुष म्हणाला, "आपल्या चिन्हविशेषांवरून मीं आपणांस ओळखिलें. आपल्यासारख्या दुसऱ्याही कित्येक अधिकारी लोकांशीं माझा परिचय आहे आणि आपणांला आपल्या पदाचा आजच अधिकार मिळावयाचा होता ही गोष्टही मला पूर्वीपासून माहित होती, त्यामुळें अनुमानानें मला आपणांस ओळखितां आलें. आपणांला आपलें पद कसें काय वाटतें? असे माझ्यावळ येऊन बसा."

याप्रमाणें त्याचें सलगीचें भाषण ऐकून सिद्धराम त्याचेजवळ जाऊन बसला आणि म्हणाला, 'माझ्या पदाविषयीं आपण विचारितां काय ? निःसंदेह तें अत्यंत बहुमानाचें आहे. मी जर त्याबद्दल माझे स्वामी आणि अनुग्रहकर्ते बादशहा सलामत त्यांना शतवार धन्यवाद दिलें नाहींत तर माझ्यासारखा कृतघ्न कोण असणार आहे ?'

अज्ञात पुरुष म्हणाला, आपलें म्हणणें यथार्थ आहे परंतु, आपण मला हें सांगा कीं, बादशहांची यथार्थ सेवा करण्याकरितां आला आहांत अथवा अधिकार सुख भोगण्याच्या इच्छेनें आला आहात ?"

कुमार—आपला हा प्रश्न विचारणीय आहे. तरीही पण मी याक्षणीं इतकें सांगूं शकतों कीं, मीं यावत्शक्य बादशहांची सेवा मानमर्यादा आणि कर्तव्यपूर्वक करण्याचा विचार केला आहे. ही गोष्ट तर आपणांला एवढ्यावरूनच कळून येईल कीं, मीं केवळ स्वेछेनुसार या पदाचा विचार केला आहे.

अज्ञात पुरुष ह्मणाला, "आपण मोठ्या चतुराईनें उत्तर दिलेंत. परंतु, आतां असा प्रश्न आहे कीं, मान मर्यादा आणि कर्तव्य' यांचा आपण काय अर्थ समजतां ? या शब्दांचा अर्थ अत्यंत गहन आहे."

सिद्धराम—होय, कदाचित् दुसऱ्या लोकांकरितां तसें असेल. परंतु,

मी तर त्या शब्दांचा रूढार्थच घेतों. मान मर्यादा आणि कर्तव्य यांच्या अनुरोधानें मी कदापि स्वदेशाच्या विरुद्ध कोणतेंही काम करावयाचा नाहीं. मग खुद्द बादशहा सलामत त्याविषयीं मला स्वतः कां आज्ञा देईनात. तशा स्थितींत त्याच्या कृपादृष्टीनें सहज प्राप्त होणाऱ्या संपूर्ण अधिकारांनाही तृणवत् समजून मी त्यांचा परित्याग करीन.

पुरुष—– खरें आहे. आपलें म्हणणें अत्यंत उचित् आहे. परंतु, आपल्या अगर आपल्या देशवासी लोकांच्या हांतून जी गोष्ट पूर्ण होण्याची आशा नाहीं ती गोष्ट करण्याची ते आपल्याला आज्ञा करतील असें आपण कशावरून समजतां ?

हें त्या पुरुषाचें भाषण ऐकून सिद्धराम कांहींसा चपापला. तितक्यांत त्याला एकाएकीं सल्हाणाच्या भाषणाचें स्मरण झालें. तेव्हां त्यानें त्या अज्ञात पुरुषाकडे न्याहाळून पाहून म्हटलें, " हें काय आपण म्हणतां ? बादशहा सलामत यांना तृष्णा नाहीं काय ? "

अज्ञात पुरुषानें अत्यंत गंभीरस्वरानें म्हटलें, " पहा ! कुमार महाशय, एवढावेळपर्यंत आपलें भाषण सावधपणाचें होतें. परंतु, हें काय आपले शहाणपण ? कीं, आपण बादशहा सलामत यांच्या नगरांतील एका अनोळखी मनुष्यासमोर अशाप्रकारचें अविचाराचें शब्द मुखावाटें काढून बसलांत !

सिद्धराम—आपण पाहिजे तर त्यांना खुशाल अविचाराचे शब्द म्हणा. परंतु, मी आपल्या निर्मळ अंतःकरणांतील गोष्ट आपणांस सांगितली. हें खरें कीं, मी आपणांस जाणीत नाहीं. परंतु, आपल्या एकंदर संभाषणावरून माझी अशी खात्री होत आहे कीं, आपण माझ्यासारख्या अडाणी परंतु निष्कपट मनुष्याचें भाषण मनास आणून त्याला कांहीं अपकार करण्याचें मनांत आणणार नाहीं.

सिद्धरामाचें तें निष्कपट भाषण श्रवण करून त्या अज्ञात पुरुषाचें मुखकमल कांहींसें प्रफुल्लित झाल्यासारखें झालें. तो पुरुष सिद्धरामाच्या भाषणांतील माधुर्यापेक्षां निर्मळपणावरच अधिक लुब्ध झालेला होता. त्याला मिथ्याप्रशंसा अर्थात् खुशामत अगदीं आवडत नव्हती. परंतु, कुमाराचें तें भाषण अंतःकरणापासून निघालेलें असल्यामुळें तो अत्यंत

संतुष्ट आणि प्रसन्न झाला. त्यावेळीं त्यानें सिद्धरामाच्या खांद्यावर हात टाकून सावकाश आणि मधुर अशा स्वरानें झटलें, ' आपण जें बोललांत तें खरें आहे. यद्यपि आपण मला ओळखत नाहीं, तथापि आपला मजवर विश्वास आहे आणि मी आशा करितों कीं, जेव्हां आपण मला चांगल्याप्रकारें ओळखाल तेव्हांही मजवर असाच विश्वास ठेवाल. अस्तु. आपण काय झटलेंत कीं, ' बादशहाला अत्यंत तृष्णा नाहीं काय ? ' कबुल आहे. मी त्यांना ओळखतों आणि ते तृष्णायुक्त आहेत हें गृहीत धरितों. परंतु, कोणत्या विषयांत ? बादशहा सलामत यांना आपलें अगोदरच विस्तृत असलेलें राज्य अधिकाधिक वाढविण्याचीं इच्छा असते अशी आपल्या दिलाची समजूत जाहे काय ? जेवढें त्यांना प्राप्त झालें आहे, तेवढ्यांत ते संतुष्ट नाहीत ? मला ठाऊक आहें कीं, वडिलार्जित राज्यापैकीं दिल्ली आणि आग्रा या व्यतिरिक्त त्यांना कांहींच मिळलेलें नव्हतें. त्यांचें पूज्य पिता जेव्हां परलोकवासी झाले तेव्हां केवळ इतकेंच राज्य त्यांच्या ताब्यांत होतें. परंतु, सांप्रत त्यांची राज्यधुरा पश्चिमेस फारस देशापासून तों पूर्वेस बंगालच्या सीमेपर्यंत आणि दक्षिणेस गोवळकोंड्यापर्यंत पसरली आहे. मग आपण असें कसें अनुमान करितां कीं, त्यांना नवीन देश काबीज करण्याची इच्छा आहे आणि विशेषत: आपला दूरवर्ती देश काश्मीर जो जिंकिल्यापासून केलेले श्रमही सुफल व्हावयाचे नाहींत. तथापि अशी कांहीं कारणें घडतात कीं, ज्याच्या योगानें कोणताही राजा आपल्या समीपवर्ती राज्याची स्वतंत्रता सहन करूं शकत नाहीं. अर्थात् जेव्हां त्या समीपवर्ती राजाकडून त्याच्या प्रजेच्या सौख्यानंदांत आणि उन्नतींत अंतराय येतो तेव्हां त्याला निरुपाय होऊन आपल्या इच्छेविरुद्ध म्यानांतून तरवार बाहेर काढणेंच भाग पडतें. मग तो त्या समीपवर्ती राजाच्या प्रजेला जरी स्वतःच्या प्रजेप्रमाणें मानीत असला तरी देखील त्याला युद्धावांचून गत्यंतर रहात नाहीं. अशाच प्रकारच्या अनेक कारणांनीं आमचे तैमूर कुलोत्पन्न बादशहा आपली राज्यतृष्णा आवरूं शकत नाहींत. जेव्हांपासून त्यांना कळूं लागलें तेव्हांपासून त्यांची हीच तृष्णा अर्थात् लालसा आहे कीं, एक मोठें थोरलें प्रचंड राज्य स्थापित व्हावें आणि सर्वपरी त्यांना

रात्रंदिवस हीच चिंता असते कीं, सर्वशक्तिमान परमेश्वरानें ज्या प्रजाजनांना त्यांच्या हातांत सोंपविलें आहे त्यांचीं सुखसंपत्ति आणि विद्या यांची उन्नति कशी होईल ! बादशहा सलामत यांनीं आपल्या प्रजेच्या उन्नतीकरितां अनेक यत्न केले व करीत आहेत. भिन्न भिन्न जातींचे धर्मकलह तसेच द्वेशभाव आणि विरोध त्यांनीं एकप्रकारें नाहींसे केले आहेत आणि स्वार्थसाधु प्रबळ अधिकाऱ्यांच्या अत्याचारास आळा घातला आहे. त्यांनीं वंगदेशाच्या कारागिरिस विशेष साह्य केलें असून ते सदां सर्वत्र उन्नति करण्याच्या उद्योगांत मग्न असतात. अहोरात्र त्यांना शिल्पविद्या आणि साहित्य यांच्या उन्नतीचाच वेध लागलेला असतो. आणि आपली प्रजा सभ्यतेच्या आणि शिष्टतेच्या उच्च सोपानावर कशी आरूढ होऊन देशाचे यश वाढवील, याच गोष्टींचा ते विचार करीत असतात. आतां आपणच सांगा कीं, हें एक मनुष्याचें काम आहे काय ? पुन्हां अशाच रीतीनें एकाद्या दुष्प्राप्य वस्तूच्या प्राप्तीस्तव उद्योग केला गेला तर तो निंद्य कसा ह्मणतां येईल ? खरें पुसाल तर बादशहांची मनोभावना कधीं पूर्ण होणारी नाहीं. न जाणो कितीएक वर्षें त्यांनीं याच विचारांत आणि परिश्रमांत घालविलीं. परंतु, त्या मनोभावनेची प्राप्ती किती दूर आहे तें ईश्वरास ठाऊक. ”

कुमार सिद्धराम त्या अज्ञात पुरुषाचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होता. इतक्यांत तो पुरुष उठून उभा राहिला दोन्ही हात आकाशाकडे करून ईश्वराची प्रार्थना करूं लागला. शेवटीं त्यानें खालीं बसून मान खालीं झुकविली. आपल्या समोर असलेला अज्ञात पुरुष खुद्द बादशहा सलमत तर नव्हे ? असा सिद्धरामास संशय येऊन तो उठून उभा राहण्याच्या बेतांत होता, इतक्यांत पुन्हा त्याला असें वाटलें कीं, कोणीकडे बादशहा सलामत आणि कोणीकडे हा एक साधारण मनुष्य ! सिद्धरामानें त्या अज्ञात पुरुषाविषयीं कांहीं विशेष माहिती मिळावी ह्मणून त्यास तशा धोरणाचे प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. इतक्यांत एक नखशिखांत श्वेतवर्ण वस्त्र परिधान केलेला ठेंगणासा दाढीवाला मुसलमान समोरून येत असलेला त्यानें पाहिला.

त्यांस पहातांच त्या अज्ञातपुरुषानें मंदस्वरानें ह्मटलें, "अब्दुलकादिर* येत आहेत वाटतें ?"

अब्दुलकादिर आल्यावर अज्ञात पुरुषानें, त्याचा सलाम घेऊन त्यास कुशल प्रश्न विचारीत असतां, आपलें नांव उघड न करण्याविषयीं त्यास सुचविलें. पुढें अब्दुलकादिरानें अत्यंत अहंकार दृष्टीनें सिद्धरामास नखशिखांत अवलोकन केल्यावर, त्याच्याशीं एक शब्दही न बोलतां तो त्याजकडे पाठ करून उभा राहिला. हें त्याचें अपमानकारक वर्तन पाहून कुमार सिद्धरामाचें रक्त खवळून जाऊन क्रोधानें त्याला दरडावून अशा बेइज्जती आचरणाचें कारण विचारण्याच्या तो बेतांतच होता. इतक्यांत अज्ञात पुरुषानें त्याला प्रतिबंध करून ह्मटलें, " जाऊं द्या सिद्धरामजी, आपण माझ्या या मित्राच्या वर्तनाबद्दल राग मानूं नका. मला पूर्णपणें ठाऊक आहे कीं, हें त्याचें वर्तन केवळ आपणाशींच आहे असें नाहीं; तर हिंदु-

* मुल्ला अब्दुलकादिर अल्बदौनी याचें जन्म बदाऊन येथें इसवी सन १५४० त झालें होतें. तो गानविद्या, ज्योतिष आणि इतिहास यांमध्यें अत्यंत प्रवीण होता. आणि त्याचा आवाज मोठा असल्यामुळें तो 'दरबारी इमाम' नेमला गेला होता. तो लहान वयाचा असतांच त्याचा अकबरच्या दरबारीं प्रवेश झाला. आणि अकबरानें त्याजकडून अरबी आणि संस्कृत ग्रंथांचें फारशींत भाषांतर करविलें. हा अगदीं कट्टा मुसलमान होता. तो जरी अबुलफजलच्या हाताखालीं काम करीत होता, तरी त्यानें त्याला काफ़ीर आणि विधर्मी समजून आपल्या ग्रंथांत अनेक जागीं त्याचें संबंधानें दुर्वचनांचा उपयोग केला आहे. त्यानें एक 'तारिखे–बदौनी' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यानें 'गझनवी' बादशहापासून तों थेट इ. स. १५९० पर्यंतचा इतिहास दिला आहे. त्याच ग्रंथांत अकबराच्या राज्याचा चाळीस वर्षांचा वृत्तांत लिहिला आहे. खुद्द अकबराविषयींही त्यानें अनेक जागीं निंदाप्रचुर शब्दांचा प्रयोग केला आहे. अल्बदौनी यानें रामयण, महाभारताचा कांहीं भाग आणि काश्मीरचा इतिहास यांचें फारशींत भाषांतर केलें आहे. तो इ. स. १६१५ ह्या वर्षीं मृत्यु पावला.

मात्राचें मुखावलोकन होतांच हा नेहमीं असाच बिथरून जात असतो. कारण, याचा असा समज आहे कीं, एकाद्या हिंदूचें नुसतें मुखावलोकन झाल्यानें आपला धर्म भ्रष्ट होऊन आपणांस बाट लागतो. ( अब्दुलकादिरकडे पाहून ) कां दोस्त, मी ह्मटलें हें बरोबर आहे ना ? ”

अब्दुलकादिर ह्मणाला, “ हुजूरचें ह्मणणें खरें आहे. ” कुमाराकडे पाहून “खरेंच पुसाल तर खास तुमच्याशीं माझें कांहीं वैर नाहीं. परंतु, तुमच्या जातीशीं आहे. होईल तितकें करून तुह्मां काफर लोकांचीं पाळेंमुळें खणून टाकून तुमचें निसंतान करण्याचें मीं ब्रीद बांधिलें आहे. बस्स, हमेशा याच खटपटींत मी असतों आणि तुमच्या जातीचा नेहमीं तिरस्कार करितों. असें जरी आहे तरी तुमच्याठिकाणीं माणुसकी आहे आणि तुमच्या जातींतही कांहीं थोडे लोक असे आहेत कीं, त्यांना मी मान देतों. परंतु, मोठी खेदाची गोष्ट ही आहे कीं, तुह्मी लोक आमच्या धर्माची निंदा करितां ती करितां आणि बादशहा सलामत यांनाही धर्मबाह्य आचरण करावयास लावितां. तुह्मी अल्लाताला आणि रसूलिला यास न मानणारे असून हमेशा आह्मा धर्मभोळ्या लोकांना काढून टाकून राज्यांतील सर्व मोठे मोठे हुद्दे आणि श्रेष्ठ पदव्या आपणच बळकावून बसण्याची खटपट करीत असतां. ज्याच्या वांचून खरोखरच दुसरा देव असणें संभवनीय नाहीं, त्या आमच्या खुदाच्या ऐवजीं तुह्मीं आपलीं खोटीं धर्मतत्वें आणि नाशवंत मूर्ति यांनाच कायम करितां आणि आम्हांसारख्या त्याच्या खऱ्या खऱ्या धर्मनिष्ठ लोकांच्या अध्यात्मज्ञानाची पायमल्ली करितां. याचकरितां आणि फक्त याच सबबीवर मी तुमचा आणि तुमच्या जातीचा अत्यंत तिटकारा करीत असतो आणि माझ्या जिवांतजीव आहे तेथपर्यंत मी तुमच्या विरुद्धच खटपट करीत राहणार. तुह्मी लोक अधर्मी, पाखंडी आणि मूर्तिपूजक असून हरप्रयत्नानें लोकांची दिशाभूल करून त्यांना भलत्या मार्गाला लावीत असतां आणि आमचे बादशहा सलामत यांचें चित्तही गढूळ करून टाकीत असतां. बस्स, पुरें झालें; तुह्मी लोक काफर, अधर्मी, पाखंडी— ”

अशा प्रकारचें भाषण करीत असतां अब्दुलकादिरचा चेहरा रागानें लाल होऊन गेला आणि त्या आवेशाचे भरांत गळा दाटून आल्यामुळें

त्याच्यानें पुढें एक शब्दही बोलवेना. अब्दुलकादिराचें भाषण बंद झालें एवढ्यानें बरें झालें. कां कीं, तो जर तसाच पुढें बोलत जातां तर कदाचित् कुमार सिद्धरामाचा क्रोधही अनावर होऊन त्याचा परिणाम भयंकर झाला असतां. कांहीं वेळ जाऊन पहिला रागाचा झटका कमी झाल्यावर अब्दुलकादिर पुन्हां म्हणाला " आम्हां खऱ्या धार्मिक लोकांना एवढेंच पुरें आहे कीं, तुह्मी लोक अधर्मी आहांत ! परंतु, तुह्मीं काय कोणाची पर्वा करणार आहांत ? मी जरी इतका तुमच्या विरुद्ध आहे, तरी मी तुमचें कांहींच करूं शकत नाहीं. मी केवळ एक क्षुल्लक मनुष्य आहे. बादशहा सलामत यांचें आपणाला मेहेरबानीचें वचन मिळालेंच आहे. त्यांच्या मनास जसें येतें तसेंच तें करूं शकतात आणि करतातही. तुह्मी लोक विधर्मी ह्मणून जे कर आणि जे महसूल पूर्वीं तुह्मांवर लागूं केले होते ते सर्व त्यांनीं तुह्मांस माफ करून टाकिले. ते तुह्मां लोकांना बोलबोलवून तमाम हुद्दे आणि फौजेंतील मोठमोठ्या जागा तुमच्या स्वाधीन करीत आहेत आणि तुमच्याच लोकांतून ते हमेशा सल्लागार आणि मित्र पसंत करीत असतात. यापेक्षां आपण आणखी काय चाहतां ? चला सोडा, आह्मांला जाऊं द्या; आह्मी आपलें कांहींएक नुकसान करूं शकत नाहीं. परंतु, कधीं तरी एके दिवशीं तुह्मां लोकांवर खुदाचा कोप गुजरेल आणि आश्चर्याची गोष्ट नाहीं कीं, ज्यानें तुम्हां लोकांना तरवारीनें शिक्षा देण्याचें ऐवजीं तुमच्यावर मेहेरबानी करून तुम्हांला पोटाशीं धरलें आहे, त्या बादशहा सलामतवरही परमेश्वराचा अघटित कोप उतरेल. वास्तविक पहातां खुदानें त्याला तुम्हां आम्हां विधर्मी लोकांना सक्त सजा देण्याकरितांच तक्तनशीन बनविलें आहे. "

अब्दुलकादिरच्या या भाषणानंतर अज्ञात पुरुषानें मृदुस्वरानें म्हटलें, ' परंतु मला असें वाटतें कीं, अशाप्रकारच्या भाषणापासून कांहीं लाभ न होतां उलट वितुष्ट मात्र वाढतें. सिद्धरामजी, निःसंदेह या भाषणाच्या प्रत्युत्तरादाखल तुम्हांला पुष्कळसें बोलावयाचें असेल आणि खुद्द मी देखील यांच्याशीं सहमत नाहीं.

सिद्धराम—आपलें ह्मणणें यथार्थ आहे. मीही रिकामा वाद वाढवूं इच्छित नाहीं. यावेळीं विलंब होत आहे; सबब, पुन्हां कधीं प्रसंग आल्यास मी यांना उत्तर देईन.

अज्ञात पुरुष म्हणला, ‘ बहुत अच्छा, आपण ठीक बोललांत. ’ कुमार सिद्धराम त्या अज्ञात पुरुषाला मुजरा करून चालता झाला. तो गेल्यावर अज्ञात पुरुषानें अब्दुलकादिरास उद्देशून ह्मटलें, ‘ कसें काय अब्दुलकादिरसाहेब, ठीक आहेना, आपण विनाकारण आपल्या जिवास इतका त्रास कशाकरितां करून घेतलात ? ’

अब्दुलकादिर म्हणाला खुदावंत, ( वाचकांनीं जाणिलेंच असेल कीं, तो अज्ञात पुरुष खुद्द बादशहा सलामत शाहनशहा अकबरच होता. ) ज्याअर्थी हुजूरची पूर्ण कृपा या ताबेदारावर आहे त्याअर्थी त्याला विनाकारण त्रास होण्याचें कांहींच कारण नाहीं. असो, सांप्रत बंदा कांहीं अत्यंत जरूरीच्या कामाकरितां हुजुरच्या पायापाशीं आहे. मित्रत्वाच्या आणि प्रजेच्या नात्यानेंही तें माझें कर्तव्यच आहे.

बादशहा— मला ठाऊक आहे कीं, खास आपणाला माझी कधींही गरज लागत नाहीं; तसें असतें तर कांहीं हरकत नाहीं; मीं आपल्या इच्छेप्रमाणें आपणाला खुष करून निश्चिंत बनविलें असतें. मला वाटतें आपण कांहीं धर्मसंबंधीं बाबींवर बोलूं चाहतां आहां. कांहीं चिंता नाहीं, बोला; परंतु, मेहेरबानी करून कांहीं भलतेंच बोलूं नका.

अब्दुलकादिर—हुजूरचें ह्मणणें रास्त आहे. केवळ धर्मसंबंधीं कर्तव्यकर्म बजावण्याकरितांच हुजूरच्या पायापाशीं आला आहे. हुजूरनीं क्षणभर स्वस्थचित्तानें माझ्या विनंतीचा विचार करावा.

बादशहानें सरळ भावानें ह्मटलें, “ तुह्मांला जें काय बोलावयाचें असेल तें खुशाल बोला. मी तें लक्षपूर्वक ऐकेन. शर्त एवढीच कीं आपण मात्र मर्यादे बाहेर पाऊल टाकूं नये. ”

अब्दुलकादिर— हें तर हुजूरवर अवलंबून आहे. मी आपल्याकडून होईल तेथपर्यंत काकुळतीनेंच विनंति करीन. मजकडून जाणूनबुजून मर्यादेबाहेर पाऊल पडणार नाहीं. ज्या ज्या गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत त्या त्या हुजूरला विदित करणें हें हुजूरची भलाई चाहणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. खुद्द हुजूरांसही पूर्णपणें ठाऊक आहे कीं, आह्मां धर्मनिष्ठ मुसलमानांत कित्येक दिवसांपासून एकप्रकारची नाराजी चाळत आली आहे आणि त्या नाराजीचें कारण हुजूरनीं बादशाहींतील

तमाम हुद्दे अबुलफजल सारख्या बेपर्वा आणि फैजीसारख्या काफर लोकांच्या हातीं देऊन ठेविलें आहेत. शिवाय या गोष्टीचीहि हुजूरला पुरेशी माहिती नाहीं कीं, खुदावंतांच्या राज्यास आणि दरबारांत कांहीं थोड्या लोकांनीं कट करून हुजूरच्या वैभवाची किंमत कमी करण्याची शपथ खाल्लीं आहे. याचें कारण हुजूरांनीं त्यांच्या हक्काच्या नेमणुका त्यांना मिळण्याविषयीं कांहींच मेहेरनजर केली नाहीं. आतां नुकताच मजला या गोष्टीची प्रचीति पाहण्याचा प्रसंग मिळाला. मी सहजगत्या एकेजागीं मुल्लांच्या मजालसीस गेलों होतों. त्या ठिकाणीं जें कांहीं मीं ऐकिलें तेणेंकरून माझें काळीज अगदीं चरकून गेलें. या खुदा! ज्या मजालसींत असे वैभवशाली पंडित जमा होतात, ती बादशहांच्या विरुद्ध काय करूं शकणार नाहीं ? आणि त्यांतही त्यांना जर आपल्या राज्यांतील नाखुष झालेल्या बंडखोर सरदारांची मदत मिळाली, तर मग कांहीं बोलावयासच नको. आमच्या बादशाही दरबारांत आणि तमाम हिंदुस्थानांतही बंडखोर लोकांची उणीव नाहींच !

अकबरानें विचारिलें, ‘आपले मुल्ला आणि त्यांचे अनुयायी यांची काय इच्छा आहे ? त्यांना पूर्ण स्वातंत्र्य नाहीं काय ? आह्मांकडून तर त्यांना सर्व तऱ्हेची पूर्ण मोकळीक आहे व त्यांनीं खुशाल आपल्या मर्जीप्रमाणें लोकांना इस्लामी धर्माचा उपदेश करून आपखुषीनें होतील तितके लोक मुसलमान बनवावेत. आह्मीं कोणत्याही रीतीनें त्यांच्या मार्गांत आड येत नाहीं. ’

अब्दुलकादिर-- कधींहि नाहीं. हुजूरचें ह्मणणें बरोबर आहे. पण मी ह्मणतों या धर्मसंबंधांत हुजूरनीं इतकी उदासीनता कां दाखवावी ? मुल्लालोकांच्या यत्नानें हुजूरकरितांही स्वर्गाचीं कपाटें खुली राहणार नाहींत काय ? हुजूर ह्मणतात मुल्ला लोकांना पूर्ण स्वातंत्र्य आहे; परंतु, जें स्वातंत्र्य देशीविदेशी आणि धर्मीअधर्मी लोकांना सारखेंच दिलें जातें तें आह्मां खऱ्या धार्मिक लोकांच्या काय कामाचें ? पहा, येथें आपल्या दरबारांतील, फौजेंतील आणि राज्यांतील प्रत्येक मोठमोठा हुद्दा या काफर लोकांच्या हातीं गेल्यानें आम्हां खऱ्या धार्मिक मुसलमानांचें मन दुखविलें जात आहे. हुजूरनींच सांगावें कीं, जो परमेश्वराचा प्रतिनिधी

आणि शहांचा शहा म्हणविला जातो, त्यानें सर्व प्राणिमात्रांकडून धर्माचरण करविलें पाहिजे. तें आपणांकडून कोठें घडतें आहे ?

बादशहा— झालें, तुमची पुराणी कर्मकथा पुढें यावयाची ती आलीच. तुम्हां लोकांना वाटतें कीं, खरीं धर्मतत्त्वें काय तीं तुम्हांलाच कळलीं असून बाकी सर्व लोकांनीं तुमचें ह्मणणें मंजूर केलें पाहिजे आणि असें जो न करील तो काफर ह्मणजे अधर्मी—परंतु, हीं सत्यधर्मतत्त्वें फक्त आपणांलाच तेवढीं लाभावींत आणि दुसऱ्यांना त्यांतलें कांहींच लाभलें नाहीं असें तुह्मीं मानावें तें काय ह्मणून !

अब्दुलकादिर—याचें कारण असें आहे कीं, खुद्द हजरत रसूलिला पैंगबर यानें फक्त आम्हांवरच मेहेरबानी करून आम्हांलाच तीं खरीं धर्मतत्त्वें अर्पण केलीं आहेत आणि ज्या अर्थी—

बादशहा—आणि तुम्हांशिवाय असे दुसरे कोणी लोक झालेच नाहींत. कां बरें ? तुह्मीं जरा फिरंग्यांच्या मुलखांतून आलेल्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडे नजर टाका आणि पहा कीं, ते लोकही तुह्मांप्रमाणेंच करामती, भले आणि इमानी आहेत. त्या लोकांतही एक रसूल ( प्रेषितदूत ) असून त्याची ते खुदातालाप्रमाणेंच भक्ति करितात व त्यांस परमपूज्य मानितात. मला त्यांच्या धर्माची जरी पुरतीशी माहिती नाहीं तरी मला एवढें खास ठाऊक आहे कीं, तो तुमच्या मुसलमानी धर्माहून पुष्कळच जुना आहे. पुन्हां तिकडे यहुदी लोकांकडे लक्ष द्या, ते तर दुसऱ्या कोणासही मान न देतां हजरत मूसा यालाच मान देतात. याहिपेक्षां ब्राम्हण लोकांच्या संबंधानें आपलें काय ह्मणणें आहे ? त्यांचीं धर्मपुस्तकें इतकीं कदीमी ( सनातन ) आहेत. कीं, त्याची अटकळ करणें कठीण आहे. त्या धर्मपुस्तकांशीं हजरत मूसाचा तौरीद ( जुना करार ) इसाई यांचें इंजील आणि तुम्हां मुसलमानांचें कुराण शरीफ ताडून पाहतां तीं अगदीं अलीकडे स्थापिलेलीं दिसतात. आतां मी आपल्यालाच विचारतों कीं, ज्या मीं इतकें ज्ञान संपादन केलें असूनही, वास्तविक पहातां मला त्यांच्या धर्ममतांचा एकशतांशही कळला नाहीं. त्या मला अमुकच एक धर्म खरा आणि अमुक खोटा याचा फैसला कसा करितां येईल ? या गोष्टीचें तुह्मींच विचारपूर्वक उत्तर द्या. मजकडून एक-

दम मुसलमानीच धर्म तेवढा खरा आणि इतर सर्व धर्म खोटे असें विधान होणें कसें संभवेल ?

अब्दुलकादिर--परंतु, अल्लातालानें तर हुजूरच्या धर्मनिष्ठेनेंच इस्लामी धर्माची योग्यता वाढविली आहे.

बादशहा--आपलें ह्मणणें रास्त आहे. तथापि तेणेंकरून धर्मनिर्णय होतोच असें नाहीं. प्रत्येक मनुष्याचें हें कर्तव्यच आहे कीं, त्यानें अंध-दृष्टीनें आपल्याच धर्मबाबाला न कवटाळून धरितां खऱ्या ईशतत्त्वांचा शोध करावा. सांप्रत माझ्या धर्ममतांचा आणि भक्तिभावाचा राज्यांतील लोकांशीं कांहींएक संबंध नाहीं. मी या अवाढव्य मोंगल पादशाहीचा मालक असून मला सर्व समान असलेल्या अनेक जातींच्या लोकांशीं मीं दोन तऱ्हेचें वर्तन कसें करावें हें तुह्मीच सांगा. जेथपर्यंत तुम्ही उभय पक्षांच्या धर्मतत्त्वांकडे विचारपूर्वक लक्ष देत नाहीं तेथपर्यंत तुम्हांला या माझ्या प्रश्नाचें नीट रीतीनें उत्तर देता यावयाचें नाहीं.

अब्दुलकादिर-- तर मग हुजूरची पादशाहत आणि तक्त यांवर जें भय उभें राहण्याचा संभव आहे त्याचें काय करावें ?

बादशहानें हंसून उत्तर दिलें, ' आपण म्हणतां यांशिवाय मला कित्येक तरी महत्वाच्या आणि फायदेशीर गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. '

अब्दुलकादिर-- त्या कोणत्या ? हुजूराला कोणा परराष्ट्राकडून भय प्राप्त झालें आहे कीं, काय ? कदाचित् त्यांना येथल्याच लोकांकडून गुप्त मदत मिळाली असेल. विशेषत: त्यावेळीं हें भय हुजूरचे खासगी नौकर आणि मुसलमान यांना तर फारच बाधक होईल. हुजूरचे प्रियपुत्र शहाजादा--

बादशहा-- सेलिम ? हां ही गोष्ट कांहीं अशक्य नाहीं. खुद्द मी या घरगुती बेबनावांचा फायदा घेऊन कित्येक राजघराण्यावर फत्ते मिळविली आहे ! आपलें म्हणणें हेंच कीं नाहीं, कीं, खुद्द शहाजादा सेलिमच माझ्या विरुद्ध त्या बंडखोर लोकांना मिळण्यास तयार झाला आहे ?

अब्दुलकादिर--जी हुजूर, तें त्यांना जाऊन मिळालेंच असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु, न जाणो धर्मवेडाच्या भरांत ते अशी गोष्ट करून बसतील अशी मला भीति वाटत आहे.

बादशहा— परंतु, हें खचित् समजा कीं, तसें जरी असलें तरी त्याला सेलिमाची धर्मश्रद्धा कारण असणें मुळींच संभवनीय नाहीं. तो कुराण आणि रसूलिला यांपेक्षां माशुक आणि मद्य यांवर अधिक लुब्ध झालेला आहे. कसेंही असो. आपण मला ही गोष्ट अगोदर विदित केली याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. ही गोष्ट जर आरंभीच आपण काढतां तर एवढावेळपर्यंत जें निष्फल भाषण झालें तें झालें नसतें. आपण पुढेंही जर मला अशा गोष्टींची वर्दी देत जाल तर मी आपला अधिकच आभारी होईन. आपल्या सूचनेनें मला हुषार राहून असल्या लोकांवर सक्त नजर ठेवितां येईल.

अब्दुलकादिर—तर मग आतां सेवकाला जाण्याची परवानगी मिळावी. सेवक नेहमीं हुजूरच्या हुकुमाची आठवण ठेवील.

बादशहानें हंसून ह्मटलें, फार चांगलें, यावें. ‘ बादशहाची परवानगी घेऊन अब्दुलकादिर निघून गेल्यावर ’ बादशहा आपल्या मनाशीं ह्मणाला, ‘ याच्या मनावर माझ्या भाषणाचा कसा काय परिणाम घडतो पहावें. ’

तिकडे मार्गांत जातां जातां अब्दुलकादिर आपल्या मनाशींच विचार करीत चालला होता. तो म्हणाला, मीं सेलिमचें नांव घेतलें हें बरें झालें. माझ्या मनांत याला धाक घालून आपल्याकडे वळवून घेण्याचें होतें. परंतु, त्यांना गोष्ट तर कळून चुकली आणि माझा मतलब जशाचा तसाच राहिला. आतां ते मात्र आम्हांवर आणि आपल्या पुत्रावर सक्त नजर ठेवूं लागतील. आतां त्यांना आम्हांपैकीं कांहीं लोक त्यांच्या चिरंजिवाना मिळाले आहेत असा संशय आला असेल. अब्दुल-कादिर ! तुला लोक अक्कलवान् म्हणतातना ? आणि तूं हें काय मूर्खपणाचें काम केलेंस ? आफ़सोस ! तुझ्या अंगीं जशी हिंमत वास्तव्य करीत आहे, तशीच जर बादशहा सलामत यांच्याप्रमाणें अंतःकरणाची गंभीरता वास्तव्य करीत असती तर तूं काय न करतास ! ’

वर वर्णन केल्याप्रमाणें विचार करीत करीत अब्दुलकादिर आपल्या घरीं गेला. आणि बादशहा सलामत रमत रमत आपल्या दिवाणखान्यांत आला. त्या ठिकाणीं एक पुरुष त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसला होता. हा पुरुष ह्मणजे आमच्या वाचकांचा दृढपरिचित गुरु कुल्लुक होय. जर कदाचित्

अब्दुलकादिरची आणि याची गांठ पडती तर फिरून एक नवीनच भानगड उपस्थित झाली असती ! असो. गुरु कुल्लुक दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यांत बसून समीप असलेल्या उपवनाची शोभा अवलोकन करीत होता आणि उपवनाकडून येणारा शीतल सुगंधीत मंद समीर त्याचे चित्तास संतुष्ट करीत होता. चोपदाराच्या ललकारण्यानें बादशहा सलामत याचे आगमनाची वर्दी लागतांच तो उठून उभा राहिला आणि बादशहाचें दिवाणखान्यांत पाऊल पडतांच चट्कन् पुढें होऊन त्यानें त्यास आशीर्वाद दिला.

कुल्लुकगुरूस पाहतांच अकबरानें सन्मानयुक्त स्मितहास्यानें त्यास म्हटलें, " आपणाला पाहून मला अत्यंत संतोषानंद वाटत आहे. मला दृढतर आशा आहे कीं, आपण काश्मीराकडील कांहीं आनंददायक वृत्तांत सांगाल. "

कुल्लुक— प्रभो मी आपणाला काय निवेदन करूं ! तेव्हांपासून मी तो वृत्तांत गुप्तच राखिला आहे. परंतु, ज्याअर्थी श्रीमंताचा मजवर पूर्ण विश्वास आहे आणि ज्याअर्थी स्वदेशहिताविषयीं माझें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे, त्याअर्थी श्रीमंतापुढें मात्र त्याचे गोपन करणें उचित् वाटत नाहीं.

बादशहा— मी समजलों. तीच पाहिली भानगड पुनश्च उपस्थित झाली. होय ना ? आपसांतील द्वेष आणि फाटाफूट ! पितापुत्रांची भांडणें ! आणि बंधूबंधूचे कलह पुन्हां उपास्थित झाले असतील !

कुल्लुक— श्रीमंताचा तर्क खरा आहे. आपल्या बंधूच्या हातीं समग्र राज्याधिकार देऊन महाराज नंदीगुप्त काश्मीर सोडून गेल्यावर तरी राज्यांत शांतता राहील असे आम्हांला वाटत होतें. परंतु, तें वाटणें अगदीं निष्फळ झालें. तशी कांहीं काळपर्यंत राज्यांत शांतता राहून प्रजा संतुष्ट होती. तथापि, पुढें थोडक्याच काळांत तें मन्वंतर बदललें. द्रोही मंडळींनीं चहूंकडे असंतोष पसरविण्यास सुरवात केली आणि आतां पुन्हां कांहींतरी उत्पात होऊं पहात आहे. सगळ्यांत कठीण अशी गोष्ट ही आहे कीं, त्या सर्व उपद्व्यापाचें आदिमूळ कोठें आहे याचा कांहींच पत्ता लागत नाहीं. महाराजांचे चिरंजीव जे सांप्रत त्यांच्या विरुद्ध डोकें वर करूं पहात आहेत, ते केवळ स्वेच्छेनुसार आहे असें नाहीं; तर या कामांत त्यांना

भरीस घालून त्यांची उठावणी करणारा दुसरा कोणीतरी असला पाहिजे यांत तर संदेह नाहींच; पण हा भर देणारा कोण असावा याचा मला कांहींच शोध लागत नाहीं.

बादशहा— कांहींही असो. तो अकारण कलह करीत असो अथवा कोणाच्या चिथावणीनें भरी भरलेला असो. तीच पूर्वीची गोष्ट पुन्हां उपस्थित होऊं पहात आहे खरी. आणि जर त्याचा वेळींच प्रतिबंध केला गेला नाहीं तर परिणाम अत्यंत भयंकर होण्याचा संभव आहे. पूर्वीप्रमाणेंच निरनिराळ्या जमावांचे लोक आपआपलीं शस्त्रें सांवरतील आणि अपसांतील वितुष्टांनीं देशाचा सत्यानाश करतील. चहूंकडून या उपद्व्यापी लोकांचीं सैन्यें उभीं राहिल्यावर फक्त काश्मीर देशानेंच त्यांची तृष्णा न संपतां ते आपल्या उत्पातांनीं माझ्या प्रजेलाही पीडा देण्यास आरंभ करतील. याकरितां मी स्पष्टपणें सांगून ठवितों कीं, ती गोष्ट मात्र मला सहन व्हावयाची नाहीं आणि मला प्रसंगोपात आपल्या प्रजेच्या रक्षणाकरितां काश्मीरावरही चढाई करून येणें भाग पडेल. लुटारु लोकांची गय करून आपल्या प्रजेला त्रास पोचूं देण्यांत काय लाभ आहे ? अतएव त्यांचीं पाळें मुळें खणून टाकणेंच सर्वथा उचित् आहे.

यद्यपि गुरु कुल्लुक याचें बादशहावर अत्यंत प्रेम असून तो त्यास मोठाच मान देत असे; तथापि त्याच्या या वरील अहंकारयुक्त आणि स्वदेशविरोधी भाषणानें त्याचा अंतस्थ क्रोधाग्नी भडकून उठला आणि जरी त्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं तरी त्याचा तो क्रोध बादशहास गोचर झाल्यावांचून राहिला नाहीं. त्याच्या अंतस्थ क्रोधानें त्याचें नेत्र लाल झाले आणि ओठ फुरफुरूं लागले.

कुल्लुकगुरूची ती अवस्था पाहून बादशहा ह्मणाला, ' मित्र महाशय, क्षमा करा. माझ्या भाषणानें आपण इतकें क्षुब्ध होऊं नका. आपणांला पूर्णपणें विदित असूं द्या कीं, माझ्या भाषणाचा रोख आपल्यासारखे सज्जन अथवा प्रस्तुतचे आपले महाराज किंवा त्यांचे मंत्री यांचें मन दुखवावें असा मुळींच नाहीं. परंतु, जे अत्याचारी लोक तुमच्या देशावर आपत्ती आणून माझ्या राज्यासही संसर्ग लावूं पहात आहेत, त्यांचें संबंधानें नेहमीं सावध असणें मला भागच आहे. या संबंधांत इतर कोणापेक्षांही माझें ज्ञान विशेष

आहे आणि मी तुझासही सांगून ठवितों कीं, तुमच्यानें झाल्यास तुम्ही माझे श्रम वाचवण्याचा प्रयत्न करा. ह्मणजे मी कधींही तुमच्या काश्मीर–विषयक राजकारणांत हात घालणार नाहीं.

कुल्लुक—आपल्या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. मला जो किंचित् क्रोधाचा आवेश आला त्याचें कारण असें कीं, अगोदरच माझे चित्तांत त्या विद्रोही लोकाबद्दल खेद वागत असून आपलें चढाईचें भाषण तो खेद वाढविण्यास अधिकच कारणीभूत झाले. परंतु, वास्तविक पहातां प्रस्तुतची परिस्थिती आपणासारख्याचे मनांत भय उत्पन्न करणारी आहे खरीं. असें जरीं आहे तरी विश्वासघातकतेचें बीज आमच्या काश्मीरांतच तेवढें रुजतें आणि अन्यस्थळीं नाहीं अशी आपली समजूत आहे कीं काय? ही गोष्ट असंभवनीय समजूं नका कीं, आपल्याच दरबारांतील आणि आपल्या स्वजातियापैकीं कित्येकच लोक आपल्या आणि आमच्या विरुद्ध खटपटी करण्यांत गुंतलेले आहेत. ”

बादशहा— तें कसें काय? या आपल्या भाषणाचा अभिप्राय माझ्या लक्षांत आला नाहीं.

कुल्लुक— मी जरी हा विषय आपणापुढें स्पष्टपणें बोलत आहे, तथापि मलाही कित्येक गोष्टींविषयीं बराच संदेह आहे. आपले पुत्र शहाजादा सेलिम—

बादशहानें विचारिलें, “ काय ह्मणतां सेलिमही त्यांत आहे! ”

कुल्लुक— मी खात्रीपूर्वक असें आपणांला कांहींच सांगूं शकत नाहीं. परंतु, कित्येक लक्षणांवरून मला श्रीमंतांना सावध करून देणें उचित वाटलें. या गोष्टींत जर कांहीं तथ्य नसेल तर उत्तमच आहे. नाहींतर आपणांकडून सावधान आणि सतर्क राहण्यांत तरी काय हानी आहे?

बादशहा— सावधान तर मी नेहमींच आहें आणि पुढेंही राहीन. सांप्रत सर्वच गोष्टी अनुमान आणि तर्क यांवर अवलंबून आहेत. अतएव कोणतेंही काम पूर्ण विचारावांचून करणें योग्य नव्हें. आपण आतां जी गोष्ट मला कळविलीत तिचा मी बारकाईनें शोध करीन आणि पुन्हां आपली भेट झाल्यावर त्यासंबंधानें यथोचित् बंदोबस्त करण्याचा आपण विचार करूं. अस्तु. आपणांला एक आनंदकारक वर्तमान सांगावयाचें तसेंच राहिलें. आतांच

थोड्या वेळांपूर्वीं माझी आणि आपल्या शिष्याची भेट होऊन त्याजबरोबर माझें थोडेंसें संभाषणही झालें.

कुल्लुकनें आश्चर्ययुक्त होऊन ह्मटलें, " सिद्धरामाबरोबर ? त्याला आपल्या समोर कोणीं आणिलें ? "

बादशहा—कोणीही नाहीं. अकस्मात् त्याची माझी बगीच्यांत गांठ पडली आणि अनुमानानें त्याला ओळखून मीं त्याच्याशीं संभाषण करून बऱ्याच गोष्टींची विचारपूस करून घेतली. आपल्याला माहीत आहेच कीं, मजला अशा गुप्त रीतीनें संभाषण करणेंच प्रायः आवडतें.

कुल्लुक—तर काय आपण बादशहा सलामत यांजबरोबर संभाषण करीत आहों ही गोष्ट सिद्धरामाच्या लक्षांत आली नाहीं ?

बादशहा—नाहीं, त्याला या गोष्टीचा मागमूस देखील लागला नाहीं. आपण मात्र त्याला इतक्यांतच या गोष्टीची ओळख देऊं नका. मीच एकादे दिवशीं स्वतः त्याला पाचारण करून या गोष्टीची ओळख देईन. कदाचित् त्याचे संबंधानें माझें मत काय झालें आहे हें जाणण्याची आपणांला उत्कट इच्छा झाली असेल. तरी तो आपला शिष्य मोठा योग्य आणि सन्मान्य पुरुष असून माझ्या विश्वासासही तो पात्र आहे, ही गोष्ट आपणांस कळविणें मला इष्ट वाटतें. परंतु, कांहीं थोडासा गैरसावधपणा त्याचे ठिकाणीं मला दिसून—

कुल्लुक हंसून ह्मणाला, " छे, आपण कोणाबरोबर बोलत आहों हें जर त्याला कळतें तर तशाप्रकारचा गैरसावधपणा त्याचे ठिकाणीं आपणांस दिसून आला नसता. "

बादशहा—परंतु, त्यासंबंधानें आपण कांहीं चिंता करूं नका. मी जेव्हां त्याचा गैरसावधपणा त्याच्या प्रत्ययास आणून दिला, तेव्हां त्यानें आपला दोष अशा खुबिदार रीतीनें पदरांत घेतला कीं, तेणेंकरून माझें चित्त खरोखरच अत्यंत प्रसन्न होऊन गेलें. एवढ्यांतच आपण लक्षांत आणा कीं, ज्यानें पहिल्याच भेटींत मला इतकें रिझविलें, तो सुयोग्य पुरुषच असला पाहिजे. आतां त्यानें इतकेंच केलें पाहिजे कीं, ही माझी प्रसन्नता जेणेंकरून कायम राहील असें आपलें वर्तन ठेवावें.

कुल्लुक—जशी श्रीमंतांची आज्ञा.

इतकें भाषण झाल्यावर बादशहानें कुल्लुकास प्रणाम केला आणि कुल्लुकही त्यास आशीर्वाद देऊन तेथून निघाला. तो गेल्यावर बादशहा आपल्याशींच म्हणाला, 'खरोखर या गृहस्थावर मात्र मी विश्वास ठेवूं शकतों. याचें अंतःकरण केवळ निष्कपट आहे. या गृहस्थाचें कुल, धर्म आणि याची पदवी हीं अगदीं भिन्न असतांही हा मजवर इतका स्नेह आणि विश्वास ठेवितो, हें माझें त्याच्याशीं असलेल्या उचित वर्तनाचेंच फळ आहे.' वाचकहो, बादशहाचेंच ह्मणणें सर्वथा खरें होतें. कांकीं, कित्येक मोठमोठ उच्च पदस्थ अधिकारी यांचा बादशहाशीं अत्यंत निकट संबंध असतांही त्यांचे संबंधानेंही त्याचें अंतःकरण कुल्लुकाइतकें निर्मळ नव्हतें.

## खंड ५ वें

### नवीन आणि जुना परिचय.

त्याच दिवशीं रात्रीं ठरल्याप्रमाणें नेमलेल्या वेळीं सिद्धराम त्या मशीदीजवळ जाऊन पोहोंचला आणि पहातो तों ती दासी त्याठिकाणीं त्याचीच वाट पहात उभी असलेली त्याचे दृष्टीस पडली. सिद्धरामास पाहतांच तिनें त्याला आपल्या पाठीमागून येण्याचा संकेत केला आणि निरनिराळ्या आडवाटांनीं ती त्यास एका उद्यानासमीप घेऊन गेली. त्या

उद्यानाच्या चहूं बाजूंस असलेल्या भिंती फारच उंच उंच होत्या. हीं दोघें जेव्हां तेथें पोंचलीं तेव्हां त्याचें फाटक बंद होतें. मग दासीनें हळूंच त्याची दिंडी उघडून सिद्धरामास आंत नेलें आणि पुन्हां दिंडीचें दार घट्ट दाबून बसविलें. आंत गेल्यावर दोहों बाजूंस सुंदर सुरूचे वृक्ष लागले आहेत, अशा फरसबंदी मार्गावरून जातां जातां कुमार सिद्धराम एका चवथऱ्याजवळ जाऊन पोहोंचला. त्याठिकाणीं अनेक फुलझाडें आणि फळझाडें यांच्या मधून सुंदर कारंजीं उडत होतीं. चवथऱ्याचे पाठीमागचे बाजूस एक सुंदर आणि स्वच्छ असें दोन अंगांनीं पुष्पलता वेष्टित उद्यान-गृह होतें. त्याच्या प्रशस्त संगमरवरी पायऱ्यांवरून दासी सिद्धरामास वरच्या बारद्वारी बंगल्यांत घेऊन गेली. त्याठिकाणीं चहूंकडून येणारा उद्यानगत अतएव परम सुगंधित वायु चित्तास प्रफुल्लित करीत होता. तेथें सिद्धरामास बसवून जवळच्या दाराचा पडदा दूर सारून दासी आंत गेली. तेथें एक यवन जातीची अत्यंत सुकुमार सुंदरी बाला बहुमूल्य वस्त्रभूषणांनीं मंडित असलेली मंचकावर निजली होती. दासीच्या मुखानें कुमाराच्या आगमनाचें वर्तमान कळतांच ती चट्कन् उठून उभी राहिली आणि मंदमंद पाउलें टाकीत तो पडदा दूर सारून मेघनिर्गत सौदामिनीसारखी बाहेर आली. तिचें अपूर्व सौंदर्य अवलोकन करून कुमार अगदीं चकित झाला. तें चंद्रासारखें स्वच्छ मुख, ते कमलपत्राकार काळेभोर डोळे, पक्व बिंबफलासमान ओष्ठ, ते अनुरागयुक्त कपोल आणि धनुष्याकार भुंवया हीं सर्व कोणाचेंही चित्त मोहित करणारीं होतीं. तिच्या गौरवर्ण मनगटांतील रत्नजडित कंकणांचा छनत्कार आणि पायांतील पैंजणांचा झणत्कार तर हृदय भेदून पार होत होता.

त्या तरुण स्त्रीनें येतांच कुमाराकडे अत्यंत स्नेहमय दृष्टीनें अवलोकन करून त्यास मृदुमधुर शब्दांनीं ह्मटलें, “ या, या, माझ्या करितां आपणांला फार कष्ट झालें. परंतु, आपण मजवर इतकी कृपा केली याबद्दल मी आपले निरंतर आभार मानीन. कदाचित् येवढ्या रात्रीं आपणांला येथें येण्याचें श्रम दिले ही गोष्ट आपणांस अनुचित् वाटेल. परंतु, आपण जेव्हां याचें कारण ऐकाल, तेव्हां आपणांला माझें यथार्थ करणें वाटेल.

सिद्धराम— सहसा कोणाच्याही निमंत्रणाचा स्वीकार न करणें कांहीं

सभ्यपणाचें नाहीं आणि पुढेंमागें आपण माझें खरेंच स्मरण केल्याचें जर कळतें तर माझी उत्कंठा मात्र अधिक प्रबल होती.

त्यावर ती तरुण स्त्री ह्मणाली, " परंतु, आपण माझ्या विनंतीस मान दिलात ही आपली मजवर फारच मोठी कृपा झाली. आपणाला हे श्रम देण्यांत कांहीं मला माझें स्वतःचें हित साधावयाचें नाहीं तर मला माझ्या हृतप्रेमभगिनीसखीचें हित साधावयाचें आहे. कांहीं दिवसांपूर्वी निरुपाया-स्तव तिला येथून पळून जाऊन आपला काश्मीर देश पहावा लागला. याचें कारण येथील कित्येक दुराचारी जबरदस्त अधिकाऱ्यांनीं तिला आपल्या राज्यांत फसविण्याचा यत्न केला होता. सांप्रत मला तिज-कडे फारच जरूरीचा निरोप पाठवावयाचा आहे. आजपर्यंत ज्याच्यावर मला विश्वासानें हें काम सोंपवितां यईल असा कोणीहि विश्वासपात्र मनुष्य मिळाला नाहीं. आज मला अकस्मात् खबर लागली ( कशी तें सांगण्याची कांहीं अवश्यकता नाहीं ) कीं आपण आपले प्राचीन गुरु कुल्लुक यांचेसह येथें आला असून कुल्लुकगुरु तर परवाचेच दिवशीं पुन्हां काश्मीरास परत जावयाचे आहेत. तेव्हां मीं मनांत विचार केला कीं, त्यांच्यापेक्षां विश्वासपात्र मनुष्य मला दुसरा कोण मिळणार ? करितां आतां अपणांला मी येवढीच प्रार्थना करितें कीं, आपल्या शब्दानें कुल्लुकगुरु माझें पत्र घेऊन जातील असें करा. मी आपली फार फार आभारी होईन. "

हें तिचें भाषण ऐकून सिद्धरामाचें चित्त बरेंच स्थिर झालें. कांकीं केवळ एक साधारण पत्र पोंचविण्याचेंच काम असून, त्यांत आपली कांहींच हानी दिसून येत नाहीं आणि त्यांत आपला विशेषसा संबंधही नाहीं, अशी त्याची पक्की खात्री झाली. तेव्हां त्यानें तिच्या इच्छेप्रमाणें तिचें पत्र गुरुजींकडून तिच्या सखीस पोहोंचतें करविण्याचें तिला आश्वासन दिलें.

तरुण स्त्रीनें इशारा करितांच, त्या दासीनें आंत जाऊन एक रेशमी दोऱ्यानें बांधून लाखेनें मोहोरबंद केलेला लखोटा आणिला आणि तो त्या स्त्रीचें हातीं दिल्यावर ती तेथून चालती झाली. दासी निघून गेल्यावर तरुण स्त्री ह्मणाली, " या लखोट्यावर माझ्या सखीचा पत्ता नसून यावर

दुसऱ्याच एका व्यक्तीचें नांव लिहिलेलें आहे. कदाचित् या व्यक्तीला आपण जाणतही असाल. ”

सिद्धराम—होय, आम्हीं दोघे प्रायः बरोबरच शिकार खेळत असूं.

तरुण स्त्री म्हाली, ‘ झालें तर, आपले गुरुजी जर त्या व्यक्तीला हें पत्र नेऊन देतील तर ते त्या माझ्या सखीला पोचतें करील. यापासून विशेष गोष्ट ही होईल कीं, आपल्या गुरुजीनाही माझी सखी कोण हें कळणार नाहीं. बनेल तेथपर्यंत ही गोष्ट गुप्तच ठेवणें उचित् आहे. ’ ती किंचित् थांबून पुन्हां ह्मणाली, ‘ मला माझ्या सखीच्या वियोगाचें दुःख तर सहन करावें लागतच आहे. परंतु, ती मात्र मोठी भाग्याची म्हणावयाची; कां कीं, तिला आपल्या नंदनवनोपम भूप्रदेशाचें सुख भोगावयास सांपडत आहे. त्या आपल्या देशाचें वर्णन मीं पुष्कळसें ग्रंथांतरींही वाचलें असून, प्रायः लोकसुखानेंही त्याची स्तुति वारंवार कानीं पडते. आतां तें वर्णन यथार्थ आहे किंवा केवळ कवींची कपोल कल्पना मात्र आहे, हें आपण कृपा करून मला सांगा. ’

सिद्धराम— केव्हांही अत्युक्ति न करण्याविषयीं माझ्या गुरुजींची मला आज्ञा आहे. म्हणून मी खरेंच सांगतों कीं, आमचा देश म्हणजे खरोखर या भूलोकची अमरावतीच म्हटली पाहिजे. तुमचें हें शहर जरी रमणीय आहे, येथील महालांची आणि उपवनांची शोभा चित्ताला हरण करणारी आहे तथापि, ती सृष्टिशोभा, तीं गिरि शिखरें, ती वनश्री आणि तरायांची सहज छबी फक्त आमच्याच प्रदेशाच्या वाट्यांस आली आहे ! तेथील अनुपम सौंदर्याचें तुह्मां लोकांना नुसतें अनुमान देखील व्हावयाचें नाहीं. ’ जों जों सिद्धराम त्या सुंदरीपाशीं आपल्या जन्मभूमीचें वर्णन करी तों तों स्वदेशानुरागानें त्याचें हृदय अत्यंत प्रफुल्लित होत जाई. तो शेवटीं म्हणाला, ‘ आतां आह्मांला जाण्याची आज्ञा द्या. कां कीं, रात्र अधिक अधिक होत चालली. ’

तरुण स्त्री ह्मणाली, ‘ मी आपल्या मुखानें आपणांला जा असें कसें ह्मणूं ? आतां प्रार्थना इतकींच कीं, आपल्या येथें येण्याचा वृत्तांत कोणालाही न कळावा. नाहींतर, माझ्या सखीचें नुकसान होईल; करितां ही

गोष्ट जितकी गुप्त राहील तितकें चांगलें. याशिवाय आणखीही एकदोन वेळ आपणांला येथवर येण्याचें श्रम घ्यावे लागतील.'

सिद्धराम—श्रम कशाचे ? परंतु, अद्यापपर्यंत मला तुमचें नांव वगैरे कांहींच कळलें नाहीं. माझें विचारणें जर अप्रशस्त वाटत नसेल तर आपण आपला विशेष परिचय द्याल.

तरुण स्त्री ह्मणाली, 'ज्याअर्थी आपण मजवर इतका अनुग्रह केलांत त्याअर्थी माझ्या संबंधाची कोणतीही गोष्ट आपणांपासून लपवून ठेवण्याचें मला कांहींच कारण दिसत नाहीं. माझें नांव रझिया आहे. माझा पिता मूळचा अर्मिनिया प्रांतांतील रहिवासी असून तो येथें व्यापाराच्या निमित्तानें आला असतां मी त्याजबरोबर होतें. पुढें त्यानें माझा विवाह येथीलच एका सौदागिराशीं करून दिला होता. लग्नांतच माझ्या पतीचें वय मर्यादेहून अधिक होतें. लग्नानंतर कांहीं दिवसांनीं माझे पति कांहीं कामानिमित्त फारस देशाकडे निघून गेले; त्यावर त्यांचा आजपर्यंत कांहींच पत्ता नाहीं. ते गेल्यापासून मी या एकांत उपवनांत आपण पहात आहांत त्या स्थितींत नेहमीं पडून असतें. याप्रमाणें माझी हकिकत आहे. जरी कदाचित् आपली आणि माझी पुन्हा भेट न झाली तरी एवढ्यावरू आपली कोणाशीं भेट झाली होती हें आपल्या ध्यानांत राहील.'

सिद्धराम— छे, छे, पुन्हां भेट नाहीं असें कसें होईल ? निदान आपल्या सखीचा परत आलेला निरोप सांगण्याकरितां तरी मला तुमच्याकडे यावे लागेल.

रझिया—ही तर आपली मोठीच कृपा म्हणावयाची. पत्रोत्तर आल्यावर एकादे दिवशीं संध्याकाळीं आपण जराशी तसदी घ्या. माझी दासी आपणाला भेटेलच आणि जेव्हां आपणाला इकडे यावयाचें असेल तेव्हां तिच्या द्वारें मला पूर्वी सूचना पाठविण्याचें करा.

यानंतर कुमार सिद्धराम तें पत्र घेऊन तेथून निघाला आणि लौकरच आपल्या राहण्याच्या जागीं येऊन पोहोंचला. घरीं आल्यावर त्या ऐन मध्यरात्रीच्या समयीं कांहीं काळपर्यंत तो आपल्या बंगल्याचे पडवींत हळूं हळूं पावलें टाकीत तेथून सन्मुख असलेल्या यमुनानदीची शोभा पहात राहिला. त्यावेळीं त्याचे मनांत विचार आला कीं, हेंच यमुनाजल

येथून वहात वहात प्रयागच्या किल्ल्याखालून जात आहे आणि तेथेंच माझी प्रिया निवास करीत आहे. याप्रमाणें इरावतीचें स्मरण होतांच त्यानें आंत जाऊन तिची तसबीर काढून आणिली आणि तो एकसारखा तिजकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पाहूं लागला. तेव्हां त्याला ती इरावतीची छबी अधिकाधिकच प्रिय वाटूं लागली. परंतु, त्यानें जेव्हां आपली दृष्टि उद्यानाकडे फेंकली तेव्हां सौंदर्यवल्ली रझिया हिचा मुखचंद्रही त्याचे दृष्टीपुढें उभा राहिला. तेव्हां तो आपल्याशींच विचार करूं लागला कीं, हिचा आपला काय संबंध आहे; तथापि कोणत्याही वस्तूचें निष्पाप दृष्टीनें सौंदर्य पाहण्यास काय हरकत आहे ? तेणेंकरून माझें इरावतीवरील प्रेम थोडेंच कमी व्हावयाचें आहे. अशा तऱ्हेच्या विचारांत निमग्न असतां सिद्धरामास निद्रादेवीनें माळ घातल्यामुळें तो आपल्या शयनमंदिरांत जाऊन निद्रावश झाला.

दुसरे दिवशीं सकाळींच पर्विजनें दारावर येऊन आवाज दिला कीं, "वत्स, तुझे यजमान उठले कीं नाहीं ?"

वत्स— आपण या स्थळीं बसावें. यजमान प्रातःस्नान करून संध्यावंदनाला बसले आहेत. ते बहुधा लवकरच बाहेर येतील.

नित्य नियमाप्रमाणें सिद्धराम आपले संध्योपासनादि प्रातर्विधि आटोपून वस्त्रें परिधान करून आपल्या बैठकीच्या दिवाणखान्यांत आला आणि तेथें त्यानें पर्विजला घेऊन येण्याविषयीं सेवकास आज्ञा केली. आंत येतांच पर्विजनें सिद्धरामाच्या आदरसत्काराचा स्वीकार करून त्यास म्हटलें, 'कसें काय ? सेनेचा अधिकार तर आपणांला मिळालाच, तेव्हां बहुधा आपणांला आतां कामावर जावयाचें असेल.'

सिद्धराम— होय, अधिकार तर मिळालाच. परंतु, तूर्त दोन दिवस कामाच्यासंबंधानें आम्हांस सुटी मिळाली आहे.

पर्विज— तर मग फार चांगलें आहे. आज आपण कोठें तरी सहल करावयास जाऊं.

सिद्धराम—फार चांगलें, जशी आपली इच्छा. आज कोणीकडे चलण्याचा विचार आहे ?

पर्विज—ठीक आहे. तर मग आज * फत्तेपूर शिक्रीकडे जाऊं. त्याठिकाणीं खुद्द बादशहा सलामत हे रहात असतात आणि जे वैदेशिक लोक या नगरांत येतात, ते एकवार तें स्थान पाहिल्याशिवाय जात नाहींत.

सिद्धराम—मजकडून तयारी आहे. परंतु, आपण किंचित् कालपर्यंत येथेंच बसावें. आज आमचे गुरुजी काश्मीरास जावयाचे असून ते अगदीं निघण्याच्याच बेतांत असतील, करितां मी त्यांना भेटून त्यांची रवानगी करून येतों.

पर्विज—ठीक आहे.

पर्विजला तेथें दिवाणखान्यांत बसवून सिद्धराम कुल्लुकाकडे आला. तो अगदीं निघण्याच्या तयारींतच होता. सिद्धरामानें त्या तरुण स्त्रीनें दिलेलें पत्र त्याचें स्वाधीन केलें. तदनंतर कुल्लुक यानें सिद्धरामास दरबारीं वर्तनासंबंधानें थोडासा उपदेश केल्यावर त्यास प्रेमपूर्वक आशीर्वाद देऊन तो वाट चालूं लागला. कुल्लुक गेल्यावर सिद्धराम आणि पर्विज आपआपल्या अश्वांवर आरूढ होऊन फत्तेपुराकडे जावयास निघाले. फत्तेपुराकडे जाणारा मार्ग दोन्हीं बाजूंस सुंदर प्रछायवृक्षराजींनीं सुशोभित असून, त्यावरून जाणारास भोंवतालच्या क्षेत्रांचीही मनोहर शोभा दृष्टीस पडत असे. ती सर्व शोभा अवलोकन करीत करीत आमचे पथिक शिक्रीकडे चालले होते.

मार्गांतून जात असतां पर्विज सिद्धरामास ह्मणाला "पाहिलेंतना सिद्धरामजी, बादशहा सलामत यांनीं अशाचप्रकारें हरएक मार्गावर वृक्षराजी उभ्या केल्या आहेत. पूर्वीं जेथें एखादें हिरवें पानही दृष्टीस पडत नसल्यामुळें बिचारे पांथस्थ सूर्यतापानें व्याकुळ होऊन जात असत तेथें सांप्रत अनेकतऱ्हेच्या सुंदर वृक्षराजी उठल्या असून त्या प्रवासीजनांच्या चित्तास आल्हाद देत आहेत. केवढें परोपकाराचें कृत्य हें ? अनेक

* हें स्थान आग्र्यापासून सहा कोसांवर आहे. येथें असलेली एक मशीद फारच अपूर्व आहे. इ. स. १५७० पासून तों आपल्या अवसानकालापर्यंत शाहनशहा अकबर तेथेंच रहात असे.

पथिकजन आणि यात्रेकरी बादशहा सलामत यांना जो दुवा देत आहेत तो निःसंदेह यथार्थ आहे.

सिद्धराम—खरोखरच बादशहा सलामत हीं मोठमोठीं आणि स्तुत्य कामें करीत आहेत.

हें भाषण करीत असतां सिद्धरामाच्या चित्तांत एकाएकीं पूर्वी बगीचांत भेट झालेल्या अज्ञात पुरुषाची मूर्ति उभी राहून त्यानें त्यावेळीं घडलेलें इत्थंभूत वर्तमान पर्विज यास निवेदन केलें; आणि "अशा एकाद्या पुरुषाला आपण जाणतां काय ?" असें त्यानें त्यास विचारिलें.

पर्विजनें हंसून ह्मटलें, "नाहीं, मी तर अशा कोणाही पुरुषाला जाणत नाहीं. परंतु, कदाचित् फिरूनही तुमची आणि त्याची भेट झाल्यास—"

सिद्धराम—होय, पुन्हांही एकादे प्रसंगीं त्याची भेट होण्याचा संभव आहे. परंतु, कांहो पर्विज, मला हें तर सांगा कीं, येथें मला अनेक लोक दाढीवांचून दृष्टीस पडतात याचें कारण काय ? तुह्मां मुसलमान लोकांत तर दाढीचा मोठा सत्कार आहे, अशी माझी समजूत होती.

पर्विजनें उत्तर दिलें, "होय, आपलें ह्मणणें खरें आहे. परंतु, बादशहा सलामत यांचे विचार कांहीं वेगळेच असतात. तुह्मां आह्मांप्रमाणें ते आपल्या तोंडावर लहानशा मिशा तेवढ्या राखतात. पण, त्याशिवाय आधिक कांहींएक चेहऱ्यावर ठेवणें त्यांना पसंत नाहीं. मोठ्या लोकांच्या मोठ्याच गोष्टी असतात, त्यांतीलच ही एक समजा. अथवा हें त्यांचें आचरण धार्मिक लोकांच्या चित्तास कष्ट देण्याकरितां आणि त्यांच्या रीतिरिवाजांचें आपण कांहीं विशेषसें महत्व समजत नाहीं; असें दाखविण्याकरितां असेल. तें कांहींही असो, हें त्यांचें आचरण व्यर्थ अथवा केवळ पोरकटपणानेंच कां घडत असेना, त्यापासून नगरामध्यें विशेष चर्चा होत असून लोकांमध्यें असंतोष वाढत चालला आहे."

हें भाषण चाललें असतां पर्विजची दृष्टि तेथून जवळच असलेल्या एका खेड्याकडे जाऊन तो ह्मणाला, 'तें पाहिलेंत कां समोर एका हिंदु-सरदाराचें घर दिसत आहे. आमच्या काकांच्या संबंधानें त्याची आणि माझी बरीच ओळख झालेली आहे. आपण ह्मणत असाल तर तेथें जाऊन

आपण कांहीं वेळ विश्रांति घेऊं. तोंपर्यंत सेवक घोड्यांना पाणी पाजून ताजेतवानें करतील. माझा घोडा फारच तान्हेला दिसतो.'

पर्विजचें ह्मणणें मान्य होऊन ते दोघे त्या सरदाराच्या वसतिस्थानाकडे चालले. त्याठिकाणीं चिंचा आणि लिंब यांच्या दाट छायेंत एक सुंदर गृह होतें. हे दोघे गृहस्थ दृष्टीस पडतांच एक मध्यम वयाचा सरदार आंतून पुढें आला आणि यांचे त्यांचे नमस्कार चमत्कार झाल्यावर यांचा यथोचित् सत्कार करून त्यानें यांस बसावयास सांगितलें. पुढें सरदारानें आदरपूर्वक आणून दिलेल्या साखरपाण्याचा स्वीकार केल्यावर त्यांचीं अनेक विषयांवर भाषणें झालीं. त्यांत शेवटीं शेतकी आणि इतर देशसुधारणा या संबंधाची चर्चा निघाली.

सरदार— सांप्रतच्या उत्तमावस्थेचें कारण कांहीं तर आह्मां लोकांचा उद्योग आणि परिश्रम आहेत. परंतु, या संबंधांत आह्मी बादशहा सलामत यांचे अत्यंत आभारी आहोंत. त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें जी अभियुक्त शासनपद्धति स्वीकारली आहे तिच्या योगानें आह्मांला आपलें कर्तव्य दाखविण्यास अवसर मिळाला आहे.

सिद्धराम—मींहि त्यांच्या शासनपद्धतीची अनेक वेळां तारीफ ऐकिली आहे. परंतु, ती पद्धति कोणती हें मात्र मला अजून चांगलेसें समजलें नाहीं.

सरदार—त्यांत कांहीं मोठेंसें गूढ नाहीं. आणि विशेषतः आपल्यासारख्या विचारी पुरुषाला तर तो विषय सहज समजण्यासारखा आहे. ती पद्धति ह्मणजे एकंदर भूमीचे चार विभाग करून त्यांवर यथायोग्य रीतीचा सारा लागू केला आहे. परंतु, यापेक्षांही विशेष महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे शेतकरी आणि जमीनदार लोक यांना मिळणारा न्याय होय. पूर्वीं सर्वतोपरी गप्पागोंधळ आणि अव्यवस्था असे. आपणापाशीं जमीन आहे किती आणि तिजबद्दल सरकारांत किती कर भरावा लागेल याची देखील शेतकरी लोकांस दाद नसे. एखादे वेळीं तर आह्मीं गांवकरी लोकच मिळून कोणत्या शेतावर किती कर बसविला पाहिजे याचा निर्णय करीत असूं. ती सर्व पद्धत आतां बदलली. आतां जमिनींचीं उत्तमप्रकारें मोजणी झाली असून त्यांच्या चतुःसीमाही बांधल्या गेल्या

आहेत. तसेंच शेतांतील उत्पन्नाच्या मानानेंच त्यांवर कर बसविला गेला आहे आणि अशा रीतीनें चोख व्यवस्था होऊन सर्व जमीनी कुळांकडे कांहीं नियमित वर्षांच्या मुदतीनें लागवडीस दिल्या आहेत. त्यांतही विशेष सोईची गोष्ट ही झाली आहे कीं, सरकारांत कर भरणें तो रोख पैशानें भरावा. कांहीं तटा बखेडा उत्पन्न झाल्यास त्यासंबंधानें कोणताही सरकारी अधिकारी मनमानेल तसें वर्तन करूं शकत नाहीं. तर केवळ न्यायाला अनुसरून जें असेल तेंच त्याला करावें लागतें. या एकंदर व्यवस्थेचा परिणाम असा झाला आहे कीं, एखादा शेतकरी अथवा जमीनदार आपल्या जमिनीचें वार्षिक उत्पन्न किती, त्यांत मालगुजारी अथवा सारा किती जाईल आणि आपणा स्वतःला काय राहील हें बिनचूक सांगूं शकतो. अशाप्रकारचा बंदोबस्त झाल्यामुळें शेतकरी लोक जिवापाड मेहनत करून जमीनीची मशागत करूं लागले. यांत काय आश्चर्य आहे ? पूर्वी शेतकऱ्यांना रात्रंदिवस श्रम करूनही पोटभर खावयास मिळत नसे. बादशहांच्या या शासनपद्धतीचा सुपरिणाम चहूंकडे दृष्टि फेंकली असतां तुह्माला सहज दिसून येणार आहे. परंतु, तुह्मी जर या देशाची पूर्वस्थिति अवलोकन केलेली असती तर त्या स्थितींत आणि हल्लींच्या स्थितींत किती अंतर पडलें आहे हें तुह्मांला चांगलें कळून आलें असतें.

सिद्धराम—खरोखर अशा प्रकारची सुव्यवस्थित शासनपद्धति असल्यावर तिचा उत्तम परिणाम कां बरें नाहीं होणार ? निःसंशय ज्या देशावर अकबरासारखा राजा असेल तो देश मोठा भाग्यवान् समजला पाहिजे.

सरदार—बादशहांशिवाय त्यांच्या मंत्रिमंडळाचाही आह्मांवर कमी अनुग्रह आहे असें नाहीं. विशेषतः राजा तोडरमल आणि अबुलफजल या दोघांचे तर आह्मावर अत्यंत उपकार झाले आहेत. ह्या दोघांनीं उद्योग करून ही शासनपद्धति अमलांत आणिली आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायजनित लुटींपासून शेतकऱ्यांचे जीव वांचाविलें. प्रथमारंभीं असें वाटलें होतें कीं, या पद्धतीपासून कांहीं सरकारी प्राप्ति कमी होईल. परंतु, तसें न होतां सांप्रत त्याच्या उलट ती अधिकच वाढत चालली आहे.

शिवाय जरी कदाचित् थोडीशी कमी प्राप्ति झाली असती तरी कांहीं हरकत नव्हती. कांकीं नवीन पद्धतीनें वसूल होणारा सारा खात्रीनें आणि सरकारांत वेळच्यावेळीं पोचूं लागला.

सिद्धरामानें विचारिलें ' पण काहो महाशय, तुह्मी मला असें सांगा कीं, जर बादशहा सलामत यांच्या पश्चात् कोणी दुसरा पुरुष सिंहासनारूढ झाला. आणि तो यांच्या इतका बुद्धिमान नसला तर ही पद्धति आणि ती अमलांत आणण्याचे सर्व परिश्रम धुळींतच मिळणार ना ? '

सरदार—छे, छे, असें कदापि व्हावयाचें नाहीं. जे अधिकार एकदां प्राप्त होऊन चुकले आहेत ते कोणताही राजा हिसकावून घेऊं शकणार नाहीं. मग तो स्वत: कसाही स्वेच्छाचारी असेना ? तुह्माला ठाऊकच आहे कीं, एकंदर प्रजेवर जरी बादशहा सलामत यांचें राज्य आहे तरी निरनिराळ्या ठिकाणीं मांडलिक राजांची योजना आहेच त्यामुळें आह्मीं जरी बादशहाचे अंकित आहोंत तरी एकेप्रकारें आह्मीं स्वतंत्रही आहोंत. जर कोणी एखादा बादशहा आमचे अधिकार हिसकावून घेण्याची इच्छा करील तर त्याला अनेक भिन्न भिन्न राजे आणि महाराजे यांचेबरोबर युद्धप्रसंग करावा लागेल. आणि अशा रीतीनें त्या सर्वांचें दमन करणें पुरेशा सेनेच्या अभावास्तव मोठें कठीण पडेल. यदाकदाचित् याकामीं जरी तो विजयी झाला तरी त्या विजयाचा त्याला कांहीं एक उपयोग होणार नाहीं. कारण तसें झालें असतां सर्व प्रजा आपापलीं घरें सोडून त्राग्यानें रानावनांत जाऊन बसेल व तेणेंकरून पुरेंनगरें उजाड होऊन जातील. प्रजा कांहीं राजकीय गोष्टींत हात घालून रिकामी ढवळाढवळ करण्याची इच्छा करीत नाहीं. राजांनीं आपल्या खजिन्यांतील द्रव्याचा अंदाज पाहून खुशाल देशांतरच्या राजांशीं युद्ध करावें. त्यासंबधांत प्रजा कांहीं आडकाठी आणणार नाहीं.

सिद्धराम— अहाहा ! उभयपक्षांकरितां ही पद्धति किती तरी सोईची आहे ?

पर्विज— परंतु, अशानें लोकांचें ऐक्य वाढूं शकत नाहीं.

सरदार— आपण म्हणतां तें यथार्थ आहे. परंतु, ज्या आमच्या हिंदुस्थान देशांत अनेक जातींचे आणि अनेक धर्मांचे लोक वास्तव्य

करीत आहेत. त्यांतील लोकांचें वास्तविकपणें ऐक्य होईलच याचा काय आपणांला भरंवसा आहे ?

पर्विज— ही गोष्ट कठीण आहे हें खरें. तथापि या संबंधांत अवश्य उद्योग होणें इष्ट आहे.

सरदार — तो तर बादशहा करीतच आहेत. याप्रमाणें आमच्या सिद्धरामाला अत्यंत प्रिय असलेल्या राज्यविषयक गोष्टी त्यांच्यामध्यें पुष्कळ वेळपर्यंत होत होत्या. कांहीं वेळानंतर सिद्धराम आणि पर्विज उठून उभे राहिले आणि सरदाराचे अनेकवार आभार मानून त्याची परवानगी घेऊन तेथून निघून पुढें चालले. जातां जातां ते दोघे फत्तेपूरच्या राजमहालासन्मुख येऊन पोहोंचले. त्या स्थळाची दुरूनच शोभा पाहून कुमार अत्यंत चकित होऊन गेला. आग्र्याची शोभा ज़री अत्यंत प्रशंसनीय होती तथापि फत्तेपूरच्या महालांची छबी कांहीं निराळयाच स्वरूपाची आहे असें कोणाही प्रेक्षकाच्या प्रतीतीस आल्यावांचून रहात नव्हतें. एकाहून एक उंच आणि चकचकीत असे राजमहाल अशा रीतीनें उभे होतें कीं, ते जणो आकाशस्थ नक्षत्रसमूहाशीं संभाषणच करीत आहेत आणि रुंद रुंद संगमरवरी पाषाणाच्या पायऱ्या आणि रत्न-जडित कंगोरे प्रेक्षकांच्या नेत्रांस दिपवून टाकीत होते.

सिद्धराम आणि पर्विज यांनीं आपापलें घोडे सेवकांच्या स्वाधीन करून आंत प्रवेश केला. तेव्हां दोन्हीं बाजूंच्या उद्यानांची शोभा पाहून सिद्धरामाचें चित्तकमल जणूं विकास पावूं लागलें. या ठिकाणची सर्व शोभा निसर्गदर्शक बनविली होती. तेथील मार्ग गहनमार्गाप्रमाणें उंच सखल केलेले होते. जवळच एक कृत्रिम पर्वत अशा चातुर्यानें बनविला होता कीं, तो पहातांच खऱ्या पर्वताचा भास होत होता. कांहीं काळप-र्यंत ते दोघे मित्र त्या ठिकाणीं फिरलें. नंतर पर्विज ह्मणाला, “ चला कोठें तरी बसून आपण थोडीशी विश्रांति घेऊं. ”

सिद्धराम—ठीक आहे.

कांहींसें पुढें गेल्यावर पर्विज पुन्हां ह्मणाला, ‘ मित्रोत्तम, इकडे येतेवेळीं आमच्या काकांनीं येथील एका अधिकाऱ्यास देण्याकरितां एक पत्र दिलें आहे. आपण क्षणभर या शेजारच्या कुंजांत बसून विश्रांती घ्या. तेथ-

पर्यंत मी तेवढें पत्र देऊन परत येतों. पाहिजे तर आपण या समोरच्या मंदिरांतील देवीचें दर्शन करा; तोंवर मी येतोंच. '

सिद्धराम—ठीक आहे. आपण फार चांगलें सांगितलें. मी याच मंदिरांत आपली वाट पहात बसतों. आपण आल्यावर मला हांक मारा अथवा आपणांकरितां मीच मंदिराच्या द्वारांत येऊन उभा राहतों.

याप्रमाणें भाषण होऊन पर्विज तेथून निघून गेल्यानंतर सिद्धराम मंदिराकडे जावयास निघाला. तें मंदिर तांबड्या पाषाणाचें बांधिलेलें असून त्याची रचना फारच मनोहर केलेली होती. आंत श्रीजगत्कल्याणकारिणी दुर्गादेवीची मूर्ति असून तिचे सन्मुख असलेला प्रस्तरनिर्मित सिंह आपलें पुच्छ उभारून जणो तिच्या आज्ञेचीच वाट पहात आहे असा दिसत होता. कुमार त्या मंदिरांत जाऊन आदिमायेचें दर्शन घेऊन माघारा फिरला. इतक्यांत ' ओम् ' असा गंभीरध्वनी त्याचे कानीं आला.

कुमारानें—मागें वळून पाहिलें तों ज्याची प्रयागास गांठ पडली होती तोच दुर्गेचा पुजारी गोरख समोर उभा असलेला त्याचे दृष्टीस पडला. त्यास पहातांच कुमारानें त्यास मोठ्या नम्रतेनें लवून प्रणाम केला. त्यावर गोरख योगी यानें ' अखिलविश्वप्रतिपालिनी दुर्गा त्वां पातु ' असा आशीर्वाद देऊन ह्मटलें ' कसें काय आमची ओळख विसरलास वाटतें ? कदाचित् तुला आमचा विसर पडेल. परंतु, जेव्हां तुला मी बद्रिनारायणाच्या पहाडावर प्रथम अवलोकन केलें तेव्हांपासून तुला मात्र मी विसरलों नाहीं. '

सिद्धराम—आपली आमच्यावर मोठीच कृपा समजली पाहिजे. नाहीं तर आपल्यासारख्या थोरांना माझ्यासारख्या अकिंचन मनुष्याची काय कारणानें इतकी स्मृति रहावी ?

गोरख—कां बरें ? तूं माझा प्रिय शिष्य आणि प्रिय मित्र जो सल्हाण त्याचा भावी जामात आहेस आणि ह्मणून तुला कित्येक गोष्टींची सूचना करणें माझें कर्तव्य आहे. बरें तें असो. तूं योगिराज गुरुपद यांना पूर्णपणें ओळखून आहेसना ?

सिद्धराम— कोण ? गुरुपद ? होय, ते एक पर्वतारण्यवासी योगी आहेत, हीं गोष्ट मला माहीत आहे.

गोरख— ठीक आहे. परंतु, त्यांनीं योगिराज हें नांव धारण करण्या-

पूर्वी ते कोण होते ही गोष्ट तुला माहीत आहेना ? असे विचारण्याचा माझा अभिप्राय आहे.

कुमार— ही गोष्ट मला माहीत नाहीं. यासंबंधांत त्यांचें माझें मुळीं भाषणच झालें नाहीं.

गोरख—परंतु, तुझा गुरु कुल्लुक यानें तर तुला कांहीं सांगितलें असेल कीं नाहीं ?

सिद्धराम—यासंबंधांत मी त्यांना कधींहि प्रश्न केला नाहीं अथवा त्यांनीं होऊन मला कधीं कांहीं सांगितलें नाहीं.

सिद्धरामाचें अशाप्रकारचें भाषण ऐकून गोरख योगी कांहींसा क्रुद्ध झाला आणि अत्यंत तीव्र दृष्टीनें त्याजकडे पाहूं लागला. परंतु, आमच्या दृढनिश्चयी सिद्धरामास त्याचें काय भय होतें ? तोही कांहींसा तीव्र स्वर काढून ह्मणाला ' आणि जरी मला त्यांतलें कांहीं माहितही असलें तरी तें सांगण्याची माझी इच्छा नाहीं हें आपणांला कळूं नये काय ? '

गोरख हंसून म्हणाला ' अस्सें ! अस्सें ! मजवर तुझा विश्वास नाहीं काय ? आणि मला तूं अगदीं तुच्छ समजतोस वाटतें ? मी सल्हाणाचा गुरु आणि मित्र आहे ही गोष्ट तूं विसरलास होय ? '

सिद्धराम किंचित् भिऊन म्हणाला, ' होय तें मला माहीत आहे. '

गोरख— काय माहीत आहे ?

सिद्धराम— जें माहीत आहे तें आहे. तुम्हांला इतकी चौकशी करण्याचें कारण ?

सिद्धरामाच्या या भाषणानें गोरखास बराच राग आला. परंतु, प्रस्तुत हा विषय जास्त न वाढवितां मुकाट्यानेंच बसण्यामध्यें जास्त शहाणपणा आहे असें त्यांस वाटून त्यानें तो विषय तसाच सोडून दिला आणि तो आपल्या मनाशीं म्हणाला ' यानें जें मला माहीत आहे म्हणून ह्मटलें त्याचें काय तात्पर्य बरें ? ' नंतर तो कुमारास ह्मणाला ' असो, जशी तुझी इच्छा. परंतु, तूं ऐवढें पक्कें लक्षांत ठेव कीं, तूं जर माझ्या कृपेची अथवा अवकृपेची परवा करीत नाहींस तर मीही बलात्कारानें तुला आपला बनवूं चाहत नाहीं. ज्या देवीचा मी सेवक आणि उपासक आहे ती कल्याणकारिणी आहे आणि संहारकारिणीही आहे. आणि ज्यावर तिच्या

भक्ताची कृपादृष्टी होणार नाहीं त्याला आपला उद्धार होण्याची मुळींच आशा नको. ' अशाप्रकारें धमकीचें भाषण करून तो आशीर्वाद न देतां तसाच जवळच्या कोठडींत अंतर्धान पावला. सिद्धराम त्याजकडे एक-सारखा टक लावून पहात होता आणि जरी त्यावेळीं गोरख तेथें एकटाच होता, तरी तो अंतर्धान पावतेंवेळीं पूर्वी प्रयागांत पाहिल्याप्रमाणें कित्येक उघड्याशरीराचे आणि श्वेतवर्ण यज्ञोपवीतें धारण केलेले लोक त्याचे मागून जात आहेत, असा भास झाला. असो, पुढें पर्विज परत आल्यावर ते दोघे तेथील सर्व शोभा अवलोकन करून नंतर परत घरीं आले.

घरीं आल्यावर सिद्धरामानें आपला विश्वासु सेवक वत्स यास बोला-वून आणिले आणि रात्रीं झोपीं जाण्याचे पूर्वी त्याजजवळ पुढीलप्रमाणें विचारपूस केली.

सिद्धराम— वत्स, प्रयागांत मीं तुला विचारल्यावरून तुजशीं किंवा गुरुजींच्या सेवकाशीं कोणा योग्याची गांठ पडून कांहीं बोलणें वगैरे झालें नाहीं असें तूं मला सांगितलेंस. बरें, त्याशिवाय आणखी कोणाशीं तुझी भेट होऊन त्याजबरोबर तुझें आपल्या प्रवासासंबंधानें भाषण झालें होतें काय ?

वत्स—ठीक विचारिलें. आपल्या या प्रश्नानें मला एका गोष्टीचें स्मरण झालें आहे. घोड्यांच्या तबेल्याजवळ मी उभा असतां एक गव्हाळ्या रंगाचा आणि केवळ एक उपरणें पांघरलेला मनुष्य मला भेटून त्याच्याशीं माझें किल्ला, नगर वगैरे संबंधानें बरेंच भाषण झालें. त्यानें मला आपल्या प्रवासासंबंधाची हकीकत विचारिली होती.

सिद्धराम—तर मग तूं त्याला गुरुपद योगिराजांच्या सिंहाचा वृत्तांत सांगितला होतास वाटतें ?

वत्स—होय सरकार.

सिद्धराम—तर मग तूं त्याजपाशीं योगिराजांच्या स्वरूपाचेंही वर्णन केलें असलें पाहिजे ?

वत्स—होय, त्याच्या एकंदर वृत्तीवरून मला त्याचा यत्किंचितूही संशय न आल्यामुळें मीं आपल्या प्रवासाची समग्र हकीकत मोकळ्या मनानें त्यास निवेदन केली.

सिद्धराम—गुरुपदांच्या स्वरूपाचें तूं अगदीं यथार्थ वर्णन केलेस काय?

वत्स—त्या गोष्टीचें मला आतां पुरतेसें स्मरण नाहीं. परंतु, त्याजपाशीं माझें आपल्या प्रवासाविषयीं पुष्कळसें बोलणें झालें खरें.

सिद्धराम आपल्या मनाशीं ह्मणाला " यांत कांहीं तरी गूढ आहे हें खास. निःसंदेह या योग्यानें आपल्या हेराकडून आमच्या प्रवासाची हकीकत समजून घेतली आहे आणि गुरुपदांच्या संबधानें त्याचे ठिकाणीं कुढाभाव वास्तव्य करीत आहे. त्यानें मजकडूनही कांहीं माहिती काढण्याचा प्रयत्न केला होता; परंतु, तो निष्फळ झाला. वास्तवीक पहातां गुरुपदांच्या संबंधानें इतकी बारीक चौकशी करून याला काय करावयाचे आहे ? यावरून येथें कांहीं तरी गूढ खास आहे आणि त्यांत माझ्या भावी श्वशुरांचेंही अंग आहे. "

आपला धनी चिंतामग्न होऊन बसलेला पाहून वत्स ह्मणाला, ' तर काय माझ्या त्या भाषणानें गुरुपदांच्या संबंधांत कांहीं विशेष हानी झाली कीं काय ? '

सिद्धराम—छे, छे, कांहीं मोठीशी हानी झाली आहे असें नाहीं आणि तुझाही त्यांत कांहीं मोठासा दोष नाहीं. कारण, तूं कांहीं जाणून बुजून ती गोष्ट केली नाहींस. तुम्हां लोकांस या संबंधानें पुर्वीच सूचना द्यावयास पाहिजे होती. परंतु, तसें घडलें नाहीं. अस्तु, जें झालें तें झालें. यापुढें पक्कें लक्षांत ठेव कीं, गुरुपदांच्या संबंधांत कोणीं कांहीं विचारपूस केल्यास एक अक्षरही सांगावयाचें नाहीं. मग तो विचारपूस करणारा कोणीही असो. समजलास ना ?

वत्स— यापुढें कोणाला कांहीं सांगण्याचें काय प्रयोजन आहे ! मी आतां असा होऊन बसतो कीं, जणो मी गुरुपदांना कधीं पाहिलेंच नाहीं. मी मुळीं त्यांना विसरूनच जातों.

सिद्धराम मनाशी ह्मणाला, ' आतां कुल्लुक गुरु आणि गुरुपद यांनाही सावध करून ठेविले पाहिजे. आणि माझे भावी श्वशुर सल्हाण यांचेंही यांत कांहीं विशेष प्रकारानें अंग आहे कीं काय याची चौकशी करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. '

# खंड ६ वें.

## सेलीम.

किल्ल्याच्या आंतील मैदानांत सेना उभी असून सर्व वीर पुरुष आपआपल्या शस्त्रास्त्रांनिशीं सुसज्जित झाले आहेत. इतक्यांत त्या सर्व सेनेचा अधिपति सिद्धराम तेथें येऊन त्यानें आज्ञा केली कीं, ' बादशहा सलामत आज आपली संपूर्ण सेना अवलोकन करूं चाहताहेत. करितां सर्वांनीं एका रांगेनें त्यांच्या समोरून चलावें. '

याप्रमाणें सेनापतीची आज्ञा होतांच ती सर्व सेना एका रांगेनें किल्ल्याच्या बाहेर पडून थोडक्याच वेळांत कवायतीच्या मैदानांत येऊन पोहोंचली. मैदानाची शोभा अवलोकन करून सिद्धरामाचें अंतःकरण हर्षभरीत झालें. मैदानाच्या एका बाजूस नगरनिवासी प्रेक्षकजनांची गर्दी झालेली होती. आणि एका बाजूस अनेक तऱ्हेच्या डेरे राहुट्यांचीं रांग लागलेली होती. त्यांच्या मध्यभागीं एक लालभडक मखमलीचा बादशाही डेरा होता. तो सर्वांत मोठा आणि भव्य असून त्यावर बनारसी जरतारी कशिद्याचें काम केलेलें होतें. त्याचा कळस उत्कृष्ट बावनकशी सोन्याचा असल्यामुळें तो सूर्यप्रकाशांत फारच चमकत होता. डाव्या बाजूस भिन्न भिन्न सेनानायकांच्या सेना आपआपल्या झेंड्यानिशाणांसह सज्ज होऊन उभ्या राहिल्या होत्या. कोणीं योद्धा पाठीवर बाणभाता टाकून उभा आहे तर कोणी मोठा थोरला पल्लेदार भाला हातीं घेऊन त्याची

करामत दाखविण्याकरितां तयार होऊन उभा राहिला आहे. कोणीं शिरस्त्राण, कोणीं बक्तर, कोणीं गोधा, कोणीं अंगुलित्राण आणि भारी वजनाचीं चिलखतें धारण केलीं होतीं. एका बाजूस हत्ती, घोडे आणि उंट यांची रांग उभी होती. आणि उजव्या बाजूस असलेल्या डेऱ्यांत बसून राजस्त्रिया आणि कित्येक सुप्रतिष्ठित नागरिकांच्या स्त्रिया तो संपूर्ण देखावा अवलोकन करीत होत्या.

पुढें रजपुतांच्या सेना येऊन पोहोंचतांच एकेक दळ रांगेनें बादशहा सलामत यांच्या तंबू समोरून जाऊं लागलें. सिद्धरामानें पाहिलें तों शाहनशहा बादशहा अकबर एका अत्युच्च स्वर्णासनावर विराजमान झाला असून ज्याचे मस्तकावर सुवर्णमय छत्र धरिलेलें आहे आणि सेवकजन चामरें वारीत आहेत. त्यांस पहातांच सिद्धरामाचें अंतःकरण कांहींसें भयचकित झालें. कारण, पूर्वीं राजोद्यानांत ज्या पुरुषाची आणि त्याची भेट झाली तो खुद्द बादशहाच होता अशी त्याची खात्री झाली.

जेव्हां बादशहा समोर जाण्याची खुद्द त्याचीच पाळी आली तेव्हां त्यानेंही नियमाप्रमाणें मस्तक लववून त्यास मुजरा केला आणि हातांतील बर्चीचें टोंक जमिनीवर रेचून मोठ्या शिताफीनें घोड्यास टांच देऊन तो त्याचे समोरून पुढें निघून गेला. जातां जातां त्यानें चोरट्या नजरेनें बादशहाकडे दृष्टी फेंकली. तेव्हां आपणांकडे पाहून बादशहानें स्मित-हास्य केलेसें त्यानें पाहिलें. त्यावरून आपल्या स्पष्टोक्तीनें बादशहा रुष्ट न होतां आपणांवर संतुष्टच झाला आहे अशी त्याच्या मनानें कल्पना केली. त्यामुळें आतां पूर्वीं ठरल्याप्रमाणें फैजी जरी आपणांला त्यांच्या समोर घेऊन गेला तरीं भय बाळगण्याचें कारण नाहीं असें त्यास वाटलें. सुदैवानें तो सुप्रसंगही लौकरच आला. सर्व सेना बादशहांच्या समोरून निघून गेल्यावर विश्रांतीचें शिंग वाजलें. निरनिराळे सेनानायक आप-आपलीं दळें घेऊन आपआपल्या गोटांकडे जावयास निघाले. इतक्यांत फैजीनें हस्तसंकेतानें सिद्धरामास आपल्याकडे बोलाविलें. तेव्हां सिद्ध-रामही तत्क्षणीं त्याजकडे गेला. मग ते दोघे तंबूच्या रांगेवरून जातां जातां बादशाही डेऱ्याजवळ जाऊन पोहोंचले. सिद्धरामास बाहेरच उभा राहण्यास सांगून फैजी स्वतः त्याच्या आगमनाची वर्दी देण्यास आंत

गेला. फैजीच्या मुखानें सिद्धराम आल्याची वर्दी पोचतांच बादशहा सलामत यांनीं त्यास आंत घेऊन येण्याविषयीं चोपदारास आज्ञा केली. चोपदार तंबूच्या बाहेर येऊन सिद्धरामास आंत घेऊन गेला. आंत जातांच सिद्धरामानें अत्यंत नम्रतापूर्वक अकबराला मुजरा केला आणि एका रेशमी रुमालावर पांच मोहरा ठेवून तो रुमाल त्यांस नजर ह्मणून त्यांचेपुढें ठेविला. बादशहानें मंदस्मितपूर्वक हांसत त्या रुमालास स्पर्श केल्यावर फैजीनें सिद्धरामास खालीं बसण्याविषयीं खुणेनें सुचविलें. नियमाप्रमाणें सिद्धराम गुढघे टेकून खुरमांडी घालून बसला. फैजीनें अत्यंत नम्रतापूर्वक त्याचा परिचय करून दिल्यावर बादशहा म्हणाला 'आज सेना निरिक्षणसमयीं यांना मी अवलोकन केलें आहे. आणि त्यावरून हे आपल्या हुद्याचें काम उत्तम प्रकारें बजावतील अशी माझी खात्री झाली आहे. यांच्याशीं पूर्वींही एक वेळ माझा परिचय झालेला आहे. कदाचित् यांना मात्र त्यावेळीं माझी ओळख पटली नसेल.'

सिद्धराम—कृपानिधान सेवकाला त्याच वेळेस कांहींसा संशय आला होता. परंतु, अनेक कारणास्तव त्यावेळीं जास्त विचारपूस करितां येत नव्हती. त्याप्रसंगीं सेवकाकडून कांहीं अपराध झाला असल्यास क्षमा करणार प्रभू समर्थ आहेत.

बादशहानें हांसून ह्मटलें, " छे, छे, आपल्याकडून कांहीं अपराध घडला नाहीं. माझ्या संबंधानें लोकमत काय आहे हें स्वतः कानानें ऐकण्याची आणि डोळ्यांनीं पाहण्याची मला फार इच्छा असते. नुसतें जागच्या जागीं बसून कांहीं तरी अनुमान करणें अनुचित समजतों. तुमच्या प्रथम भेटीच्या अनुरोधानें मी तुह्मांला आज्ञा करून ठेवितों अथवा असें समजा कीं, तुम्हांला सल्ला देतों, कीं तुम्हीं मजवर पूर्ण विश्वास ठेवा. आणि जेव्हां तुम्हांला माझ्या संबंधांत किंवा अन्य कोणा राजवर्गीय मनुष्याचें संबंधांत कांहीं बोलावयाचें असेल तेव्हां बेलाशक माझे सन्निध येऊन बोलत जा. मी आपल्या प्रजाजनांचीं अथवा सेवकवर्गाचीं दुःखें समक्ष ऐकून घेण्याचें कामीं कधींही हयगय अथवा कानाडोळा करीत नाहीं. यदाकदाचित् त्यांच्या तक्रारी निर्मूल आहेत असें समजून आलें तर त्यांची तशाप्रकारें समजूत घालितों आणि जर त्या खऱ्या आहेत

असें कळलें तर त्यांचें निवारण करून त्यांस सुखी करितों. माझे मित्र फैजी यांना माहीत आहेच कीं, मी मिथ्या भाषण आणि कपट करणारांवर मात्र रुष्ट होत असतों. परंतु निर्मळ मनाच्या आणि स्पष्टवक्त्या लोकांवर मी कधींही रुष्ट होत नाहीं. ”

नंतर कित्येक सेनाविषयक गोष्टींची चर्चा होऊन दरबार बरखास्त झाला. फैजी आणि सिद्धराम यांनीं परत जाण्याविषयीं बादशहाची आज्ञा घेतली. सिद्धरामाची बादशहाबरोबर केव्हां आणि कशी भेट झाली याचें फैजीस मोठें आश्चर्य वाटलें. वाट चालत असतां फैजीनें विचारिल्यावरून सिद्धरामानें आपल्या बादशहाबरोबर झालेल्या भेटीची समग्र एकीकत त्यास निवेदन केली.

फैजी—बादशहा सलामत सरळ स्वभावाचें असल्यामुळें त्यांच्या अशाप्रकारच्या अज्ञात भेटीपासून कांहीं नुकसान होण्याचा संभव नाहीं. परंतु, अन्य बादशहांच्या वेळीं त्यांची अशाप्रकारें भेट होणें धोक्याचें असें. तुह्मांला अशाप्रकारचा प्रसंग अनुभवण्यास सांपडला हें तुमचें मोठेंच भाग्य असें मी समजतों, कारण, असें प्रसंग फारच थोड्या लोकांच्या वाट्यांस येतात. बादशहाच्या भाषणांवरून ते तुमच्या स्पष्टोक्तिबद्दल अंतःकरणांतून अत्यंत प्रसन्न झाले असल्याचें दिसत आहे. आणि त्यासंबंधानें मलाही मोठा संतोष वाटत आहे. इतक्यांत समोरून कोणी येत आहेसें पाहून तो ह्मणाला. ‘ समोरून कोण येत आहे बरें ? मला वाटतें पर्विज येत आहे. ’

फैजीचें भाषण संपतें न संपतें तोंच पार्विज तेथें आला आणि अदबीनें लवून सलाम करून जवळ उभा राहिला.

फैजी—फर्जंद कोणिकडून येत आहेत ?

पर्विज—असाच आपला सहज बाहेर निघालों आहें हवा खायला.

फैजी— बरंच झालें. तुमचे मित्रही तुह्मांला भेटलें.

याप्रमाणें त्यांचें अपसांत बोलणें चाललें आहे इतक्यांत कित्येक घोडेस्वार मोठ्या वेगानें घोडे फेंकीत समोरून येत असलेले त्यांचे दृष्टीस पडले. त्यांच्या मध्यभागीं एक नववयस्क पुरुष होता. त्याचा एकंदर थाटमाट इतर घोडेस्वारांहून फारच उच्च प्रतीचा होता. तो आपल्या घोड्यास

फारच सुंदर चालीवर घेऊन चालला होता. त्याचीं सर्व वस्त्रेंभूषणें राजकीय होतीं. त्याच्या अंगांत जरीचा अंगरखा आणि गळ्यांत हिरेमोत्यांचा कंठा होता. त्यानें आपल्या मस्तकावरील शिरस्त्राणांत सुर्खाबनामक जलपक्षाचा पंख बसाविला असून त्याचे मुळाशीं तीन सुंदर हिरे जडविले होते. सुर्खाबपक्षाच्या पंखाचें शिरोभूषण धारण करणें हें अत्यंत वैभवोन्नतीचें द्योतक आहे. त्याच्या भुजदंडावरही बहुमूल्य बाहुभूषणें होतीं. बोटांतून हिऱ्याच्या मुद्रिका चमकत होत्या. त्याच्या घोड्याचें सर्व सामान जरतारी असून त्यावर मोत्यांचा कशीदा काढलेला होता. अशाप्रकारें त्याचा सर्व सरंजाम तेजस्वी होता खरा. परंतु, त्याच्या मुखावर मात्र तेज झळकत नव्हतें. त्याचा चेहेरा निस्तेज आणि पिकुटलेला दिसत होता. त्याचे डोळे खोल गेलेले होते आणि मिशा नितळ व भुरकट दिसत होत्या. या त्याच्या मुखचर्येवरून तो पूर्वी अत्यंत सुंदर आणि तेजस्वी पुरुष असून सांप्रत कुसंगत आणि कुमार्गवर्तन यांनीं त्याची अशी दशा होत चालली असल्याचें स्पष्ट दिसून येत होतें.

सिद्धरामानें त्या पुरुषाची चौकशी केल्यावरून फैजी म्हणाला, ‘ आपण यांना जाणीत नाहीं काय ? हेच बादशहा सलामत यांचे नयनानंददायी युवराज सेलीम होत. ’

फैजी वगैरे मंडळींशीं कांहीं एक न बोलतां पुढें निघून जावें असें प्रथमतः सेलीमच्या मनांत होतें. परंतु, इतक्यांत कांहीं विचार केल्यासारखें करून त्यानें आपला घोडा फैजी जवळ आणून उभा केला. लागलींच फैजीनें त्यास लवून सलाम केला. शहाजादा सेलीम यानें किंचित् हात उचलून त्याचा सलाम घेऊन झटलें, ‘ आपल्या मंडळींची भेट झाल्यानें मी फार खुष आहे. आज सायंकाळी कांहीं थोडेसे लोक आमच्या घरीं मैफलीस यावयाचे आहेत. त्या प्रसंगीं आपणही येण्याचें केल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन. ’

त्यावर फैजीनें नम्रतापूर्वक उत्तर दिलें ‘ हुजूरचा हुकूम शिरसावंद्य झाला असतां परंतु, नाइलाज आहे. कारण, आजच सायंकाळीं मजला बादशहांच्या खिदमतींत हजर रहावयाचें आहे.

सेलीमानें किंचित् हंसून तुच्छतापूर्वक ह्मटलें ' तर मग मला वाटतें आज आपण आमच्या वडिलांना त्या काफिर लोकांच्या धर्मसंबंधाची आणखी एकादी कहाणी ऐकविणार असाल ! '

फैजी—बादशहांच्या हुकुमाची तामिली करणें हें माझें कर्तव्य आहे. त्यांनीं सांगितलेलें काम जर अगोदर करावयाचें नाहीं तर मग दुसरें कोणतें करावयाचें ?

सेलीम जरा शांत आणि गंभीर मुद्रेनें ह्मणाला ' आपण रागावूं नका. खुशाल आपण आपलें काम अगोदर पहा. आह्मीं आपलें काम पहातों ' असें म्हणून तो पर्विजकडे वळला आणि म्हणाला ' हे आपल्या बरोबर असलेले नवीन गृहस्थ कोण ? '

पर्विजनें सिद्धरामास जवळ बोलावून उत्तर दिलें ' हे माझे मित्र काश्मीराहून येथें आले असून बादशहांच्या हुकुमानें यांना आपल्या सेनेंतील एक मोठी हुद्याची जागा मिळाली आहे. '

पर्विजचें भाषण संपतांच सिद्धरामानें अत्यंत नम्रतापूर्वक सेलीम यास सलाम केला.

सेलीम— ' मीही त्यांच्या आगमनाची बातमी ऐकिली होती. ठीक आहे. यांच्या भेटीचा मला मोठा आनंद वाटतो. ' नंतर सिद्धरामाकडे वळून तो पुन्हां ह्मणाला ' तर मग आपणही आपल्या मित्रांसह मैफलीस येण्याचा लाभ द्याल. '

सिद्धरामानें पुन्हां आदरपूर्वक लवून सलाम करून ह्मटलें ' मी मोठ्या आनंदानें येईन. उलट या निमंत्रणानें आपण माझा फारच मोठा सत्कार केला असें मी समजतों. '

सेलीम— ' येथील बादशाही दरबारांत मी एक क्षुल्लक मनुष्य आहे. तथापि उमेद आहे कीं, माझ्या भेटीपासून तुह्मांला थोडा तरी आराम प्राप्त होईल. तर मग आपलें आज सायंकाळचें मैफलीस येणें निश्चित समजावयाचें. ' इतकें बोलून त्यानें आपल्या घोड्यास टांच दिली. त्याबरोबर त्याचें सहचारी घोडेस्वारही त्याचे मागून घोडे उडवीत चालते झाले.

सेलीम निघून गेल्यावर सिद्धराम पर्विजला ह्मणाला, " तर मग आपलीही मी आतां रजा घेतों. कारण मला अजून कित्येक सेनाकार्यें करावयाचीं आहेत. "

पर्विज—सायंकाळीं आपण जेव्हां मैफलीस जावयास निघाल तेव्हां आमचे घरावरूनच जाण्याचें करा. ह्मणजे आपण दोघे बरोबरच जाऊं.

"फार उत्तम" असें ह्मणून सिद्धराम फैजी आणि पर्विज यांचा निरोप घेऊन स्वस्थानीं गेला.

त्याच दिवशीं सायंकाळीं सिद्धराम आणि पर्विज दोघे मिळून शहाजादा सेलीम याच्या दिवाणखान्यांत असलेली मैफल पहावयास गेले. सेलीमच्या राजमहालाची एकंदर शोभा कल्पनेहूनही विशेष आहे, असें सिद्धरामास दिसून आलें. मुख्य दारावर मोठे मोठे जरी पटक्यांचें झेंडे फडकत होते. दोन्ही बाजूंस शस्त्रास्त्रांनीं सुसज्जित झालेले शिपाई होत. द्वारावरच्या नगरखान्यांत एकसारखा नौबतीचा ध्वनी सुरू होता. हे दोघे मित्र तेथें गेल्यावर अनेक चौक ओलांडून जेथें मैफल व्हावयाची होती त्या मुख्य दिवाणखान्याजवळ गेले. तेथें दोन्ही बाजूंस उभे राहून चोपदार आणि इतर द्वाररक्षक आतिथि मंडळीस मुजरा करून त्यांना स्थानापन्न करीत होते. तेथील दीपशोभा नेत्रांस दिपवून टाकीत होती. भिंतीचे बाजूंस उत्तमोत्तम काश्मीरी पडदे सोडिले होते. जमिनीवरचा गालिचा इतका मृदु होता कीं, त्यावर पाऊल ठेवतांच तें त्यांत बुडून जात असें. जागजागीं लहान मोठें पलंग मच्छरदाण्यांसह मांडिलेले होते. पुष्पपात्रांत उत्तम सुगंधी पुष्पांचे गुच्छ ठेविले असल्यामुळें त्यांच्या सुवासानें ती सारी मैफल सुगंधमय झाली होती. ठिकठिकाणीं बनारसी आणि मुरादाबादी सोनेरी आणि रुपेरी नकशीचीं पात्रें आणि पेले मांडिले होत. भिंतींना मोठे मोठे अलेप्पो येथील आरसे लाविले असल्यामुळें त्यांत सर्व दिवाणखान्याचें प्रतिबिंब पडून तो अनेक पटींनीं मोठा आहेसें वाटत होतें. छतास टांगलेल्या हंड्यांतून आणि झुंबरांतून सुवासिक मेणबत्त्या तेवत होत्या. एका बाजूंस कित्येक कलावंतिणी, भांड आणि कत्थक वगैरे लोक आपापले साज घालून तयार होऊन बसले होते. एवंच त्याठिकाणीं अपूर्व आनंदाचें संपूर्ण साहित्य एकत्र झालेलें होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तो अपूर्व देखावा पाहून सिद्धराम अत्यंत आश्चर्यमोहित झाला.

दिवाणखान्याच्या पार्श्वभागीं असलेल्या एकांतस्थानीं कित्येक पाहुणी मंडळी स्वस्थ सुखासनांवर पडली होती आणि कित्येकजण दिवाणखा-

न्यांतील मैफलींत बसून नृत्यगायनादि अवलोकन करीत होते. सिद्धराम आणि पर्विज तेथें जातांच एक चोपदार पुढें येऊन त्यास त्याच्या नियुक्त-स्थानीं नेवून बसविण्याकरितां आंत घेऊन आपल्या आसनावरूनच हस्त-संकेतानें त्यांना त्यांच्या जाग्यावरून बसण्याची आज्ञा केली.

ते दोघे तसेच मागल्यापायीं परत फिरून आपल्या आसनावर बसण्याच्या बेतांत होते. इतक्यांत सिद्धरामानें आपल्या पाठीमागें उभा असलेल्या सल्हाणास पाहिलें. त्यास पाहतांच त्यानें त्यास लवून मुजरा केला. सल्हाणानें त्यास आशीर्वाद देऊन ह्मटलें ' तुह्मांला येथें आलेले पाहून मला मोठा आनंद झाला—मीही आजच प्रयागाहून येथें आलों. बरें, हे पहा माझे एक मित्र समोरून येत आहेत. त्यांच्याशीं तुमचा परिचय होणें अत्यंत अगत्याचें आहे. हे जरी दरबारांत कमी दृष्टीस पडतात तरी यांच्या योग्यतेचा अन्य पुरुष विरळाच असेल. '

ज्या पुरुषाचें सल्हाणानें आतां वर्णन केलें तो पुरुष ह्मणजे आपला पूर्वपरिचित अब्दुलकादिर अलबदौनी होता. सिद्धरामाचें त्याजबरोबर राजकीय उद्यानांत पूर्वींच संभाषण झालें होतें. तो येतांच मोठ्या प्रेमानें सल्हाणाशीं बोलूं लागला. आणि पूर्वीं सिद्धरामास पाहून ज्याप्रमाणें त्यानें कपाळास आठ्या घातल्या होत्या तसा कांहींच प्रकार यावेळीं घडला नाहीं, हें पाहून सिद्धरामास फारच आश्चर्य वाटलें.

मोठ्या उत्सुकतेनें पुढें होऊन सल्हाण अब्दुलकादिरशीं सिद्धरामाचा परिचय करून देण्याच्या बेतांत होता. इतक्यांत अब्दुलकादिर म्हणाला ' माझी यांची एकवेळ भेट होऊन चुकली आहे. ' आणि सिद्धरामास उद्देशून तो पुन्हां ह्मणाला ' त्यावेळच्या माझ्या भाषणाचा हेतु आपले ध्यानांत आलाच असेल आणि तुह्मी आतां पहातच आहा कीं, मी जरी कितीही अन्यधर्मी लोकांच्या विरुद्ध असलों तरी माझा कोणाशीं खासगी द्वेष नाहीं. '

सिद्धराम—आपलें म्हणणें यथार्थ आहे. यद्यपि आपलें म्हणणें मला सर्वस्वीं संमत नाहीं याचा मला खेद वाटतो. कदाचित्—

' कदाचित् तें काय ? ' असें अब्दुलकादिर रागानें म्हणाला.

सल्हाणानें त्यास मध्येंच थांबवून म्हटलें ' जाऊं द्या, हा धर्मविषयक

कलह यावेळीं कशाला पाहिजे ? अगोदर आम्हां हिंदूवर आणि दीनदार मुसलमानांवरही पुढें येऊं घातलेल्या संकटाचा विचार केला पाहिजे. ”

असें बोलणें झाल्यावर सिद्धराम आणि पर्विज कांहीं मित्रांसमवेत पुढें जाऊन आपल्या जाग्यावर बसले आणि इकडे कांहीं सल्हाणादी एका गटाचे हिंदु आणि मुसलमान आपआपसांत गोष्टी बोलूं लागले. कळवंतिणीचा ताफा उभा राहण्यास कांहींसा उशीर असल्यामुळें त्यांना संभाषण करण्यास सहजच अवसर मिळाला.

सल्हाण हळूं स्वरानें म्हणाला ‘ बादशहांनीं जर आमच्या कुलधर्माच्या विरुद्ध असलेल्या या नवीन धर्माची शिवाळ आपल्या गळ्यांत अडकविण्याचें मनांत आणिलें तर पुढें कसें करावयाचें ? सांप्रत या देशावर स्वामित्व चालविणारे तुह्मी मुसलमान लोक आपल्या अल्लाचा त्याग करून सूर्यचंद्र आणि तारे यांच्या समोर मस्तक वाकवाल काय ? आणि कदाचित्— ’

अब्दुलकादिर आपल्या तरवारीच्या मुठीस हात घालून ह्मणाला “ ईश्वर समर्थ ! आपण तर केवळ– ”

त्यास मध्येंच थांबवून सल्हाण ह्मणाला “ जाऊं द्या, हीचशी काय आणखी यांहूनही महत्वाच्या अशा कित्येक गोष्टी आहेत. जरा विचार तर करा कीं, अलीकडे बादशाही हुकुमांवर आणि शिक्यांवर “ अल्लाहो अकबर ” असें काय लिहिलेलें असतें ? “ अल्ला अर्थात् ईश्वर महान् आहे ” असाच जर त्याचा अर्थ असेल तर कांहीं चिंता नाहीं. परंतु, “ अकबर ईश्वर आहे ” असा जर त्याचा अर्थ करण्याचें त्यांचे मनांत असेल तर मात्र मोठें संकटच आहे ह्मणावयाचें. ”

अब्दुलकादिर संक्रुद्ध होऊन ह्मणाला “ निःसंशय ! असें जर कोणी ह्मणत असतील तर तें त्यांचें ह्मणणें निराधार अतएव अविश्वसनीय होय.”

सल्हाण—अस्तु. जें जें व्हावयाचें असेल तें तें होईल. सध्यां आपण उगींच तर्क करीत बसण्यांत अर्थ नाहीं. कदाचित् आपण ऐकिलेल्या गोष्टींत कांहीं तात्पर्यही नसेल. परंतु, जर खरोखरच तसा कांहीं प्रकार असला तर पुढें काय करावयाचें ? बादशहांच्या हुकुमाप्रमाणें वर्तन करावयाचें कीं काय ?

त्यावर अब्दुलकादिर आणि दुसरेही कित्येक लोक ह्मणाले " मुळींच नाहीं. मुळींच नाहीं. "

हें सर्व संभाषण सिद्धराम आपल्या जागेवरून लक्षपूर्वक ऐकत होता. तेणेंकरून त्याच्या चित्तांत अनेक विचार तरंगांचें काहूर उठलें. बादशहा सलामत एका नवीन धर्मपंथाची स्थापना करण्याच्या विचारांत असल्याचें त्यानें उडत उडत ऐकिलें होतें. तेव्हां " बादशहा सलामत आपल्या नवीन धर्माच्या संस्थापनेच्या कामीं बलात्कार करणार कीं काय ? " असा त्यानें आपल्या मनाशीं प्रश्न केला.

तिकडे सल्हाण पुन्हां ह्मणाला ' असो. या विषयासंबंधानें आपण पुन्हां एकादेवेळीं बसून विचार करूं आणि ईश्वर करील तर अशी एकादी युक्ती काढूं कीं जिच्या योगानें आपणांवर हें संकट न येतां बादशहांना भलतीकडे वाहून नेणाऱ्या लोकांनाही त्यांच्या कृतीचें फळ भोगावें लागेल. सांप्रत मैफलीची सर्व तयारी झाली आहे करितां आपण तिकडे लक्ष देऊं. चला पुढचें पुढें पाहतां येईल. तुह्मी यासंबंधांत जो जो प्रयत्न कराल त्यांत माझें पूर्ण सहाय्य आहे. ' इतकें बोलून सल्हाण स्वस्थ बसला.

इतक्यांत दुसऱ्या एका गृहस्थानें हळूंच विचारिलें, ' आणि त्या काश्मीरच्या हकीकतीचें काय झालें ? तिकडे खबर दिली गेली काय ? '

त्यावर उत्तर मिळालें ' तिकडचें काम फारच उत्तम प्रकारें जमून आलें आहे. '

पहिला मनुष्य— आणि पत्र ?

दुसरा—पत्र अशा मनुष्याचें हातीं दिलें गेलें आहे कीं, तसा दुसरा कोणी सांपडावयाचाच नाहीं.

सिद्धरामाचें आसन बरेंच दूर असल्यामुळें त्याला वरील भाषण पुरतेसें ऐकू आलें नाहीं. तरीपण " काश्मीर " आणि " पत्र " यासंबंधानें कांहींतरी बोलणें चाललें आहे. एवढें मात्र त्याला कळलें. तेव्हां तो आपल्या मनाशीं ह्मणाला " हें काय गौडबंगाल आहे कांहीं कळत नाहीं. आमच्या काश्मीरच्या गृहकलहांशीं तर याचा कांहीं संबंध नसेल ना ? तरीच सल्हाणांनीं मला एकदां या संबंधानें सुचविलें होतें आणि पत्रा-

संबंधानें काय बरें बोलणें चाललें होतें ? ” एकाएकीं त्याला राझिया हिनें दिलेल्या पत्राचें स्मरण झालें. त्यावर तो ह्मणाला ‘ मग त्या पत्राचा राजकीय गोष्टींशीं काय संबंध ’ ?

इतक्यांत एक नायकीण नृत्य करावयास उभी राहिल्यामुळें सर्वांचें चित्त तिकडे वेधलें आणि त्याबरोबर सिद्धरामासही त्या चित्ताला अस्वस्थ करणाऱ्या विचारांचा विसर पडला.

नायकिणीनें प्रथमतः उत्तम तऱ्हेचें नृत्य केल्यावर फारशी भाषेंत गजल गाण्यास सुरवात केली. तिचें गायन श्रवण करून सेलीमासह अनेक मुसलमान लोक खुष होऊन गेले. सेलीमानें सिद्धरामास विचारिलें “ आपल्याला हें गायन समजतें काय ? ”

सिद्धरामानें किंचित् लवून हात जोडून उत्तर दिलें. “ जी हां, कांहीं थोडें बहुत समजतें. परंतु, ब्रिज भाषेंत अथवा संस्कृतांत जर गाणें होईल तर तें जास्त चांगलें समजेल. फारशीचा मला तितका अजून अभ्यास झालेला नाहीं. ”.

सेलीम— ‘ ठीक आहे. मी आपल्याला संस्कृत गायन ऐकावितों. ’ असें ह्मणून त्यानें रंभेला पुढें आणण्याविषयीं चोपदारास हुकूम केला.

चोपदाराच्या सूचनेवरून रंभा गावयास पुढें आली. तिनें शिरस्त्या-प्रमाणें सेलीमास मुजरा करून नृत्यास प्रारंभ केला आणि नंतर प्रथमतः पुढील अष्टपदी आरंभिली:—

॥ अष्टपदी ॥

( वसंत रागेण रूपक ताले गीयते. )

ललितलवंगलता परिशीलन कोमलमलय समीरे ।
मधुकरनिकरकरंबित कोकिलकूजित कुंजकुटीरे ॥
विहरति हरिरिह सरस वसंते । नृत्यति युवति
जनेनसमं सखि विरहिजनस्य दुरंते ॥ १ ॥ ध्रु० ॥
उन्मदमदनमनोरथ पथिकवधूजनजनित विलापे ।
अलिकुलसंकुल कुसुमसमूहनिराकुलबकुलकलापे ॥
माधविकापरिमलललिते नवमालति जात सुगंधौ ।
मुनिमनसामपि मोहनकारिणि तरुणाकारणबंधौ ॥

( हे सखि राधे, विरहिजनांना कंठन करण्यास कठीण, आणि

मनोहर अशा लवंगलतांच्या सहवासानें सुगंधित आणि कोमल असा मलयपर्वतावरून वहात येणारा दक्षिणवायु ज्यामध्यें वहात आहे, तसेंच ज्यामध्यें भ्रमरसमुदायांचे गुंजारव आणि कोकिलपक्षांचें कूजित यांनीं कुंजकुटिका गुंजित होत आहेत आणि आपल्या मनोरथांनीं काम आणि हर्ष यांना उत्पन्न करणाऱ्या पांथस्त्रिया ज्यामध्यें विलाप करीत आहेत आणि भ्रमरसमुदायांनीं व्याप्त आहेत पुष्पसमूह ज्यांचे, असे बकुलवृक्ष ज्यामध्यें आहेत, माधवी लतांच्या आणि मालतीपुष्पांच्या समुदायानें जो सुगंधित होत आहे आणि जो मुनिजनांच्याही मनाला मोह उत्पन्न करणारा व तरुणजनांचा अकारणमित्र अशा या सरस वसंत ऋतूंत या वृंदावनामध्यें श्रीकृष्ण विहार करीत आहेत आणि युवतीजनां-सह नृत्य करीत आहेत. )

याप्रमाणें रंभेनें अष्टपदीचीं दोन कडवीं ह्मणून त्याचाच पुन्हां फारशी भाषेंत अनुवाद गाऊन दाखविला. तेव्हां शहाजादा सेलीम सिद्धरामास म्हणाला ‘ कसें काय ? तर्जुमा कसा काय उतरला आहे ? ’

सिद्धराम—जरी त्यांत कोठें कोठें कसर राहिली आहे तरी एकंदरीनें तो चांगला उतरला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अलीकडे अशा प्रकारची कविता दुर्लभ झाली आहे. आणि भाषांतरकार कितीही कुशल असला तरी जें पदलालित्य संस्कृतांत आहे तें भाषांतरांत उतरणें कठीण. हा तर्जुमा कोणाच्या हातचा आहे ?

सेलीम—आज सकाळीं ज्यांच्यासमोर आपली गांठ पडली होती, त्या फैजी कवींचा आहे.

फैजीचें नांव ऐकतांच सिद्धराम जरा संकोचल्यासारखा झाला. तें सेलीमच्या ध्यानांत येऊन तो ह्मणाला ‘ कांहीं चिंता नाहीं, याबद्दल फैजी मुळीं देखील नाराज होणार नाहीं. आपण त्याच्या कवितेंतील खरे खरे दोष दाखविले याबद्दल उलट तो आपलें आभारच मानील. ’ इतकें बोलून तो पुन्हां रंभेकडे वळून ह्मणाला:—

“ अच्छा रंभा, आणखी एखादी अष्टपदी गाऊन दाखीव. ”

रंभा— जसा हुजूरचा हुकुम. हें राधाजीचें आपल्या सखी बरोबर भाषण आहे.—

॥ संचरदधरसुधामधुरध्वनिमुखरित मोहन वंशं ॥
॥ चलितदृगंचर चचलमौलि कपोलविलोल वतं सं ॥
॥ रासे हरिमिह विहित विलासं, स्मरति मनोमम कृतपरिहासं ॥
॥ चंद्रकचारु मयूरशिखंडकमंडलवलीयत केशं ॥
॥ प्रचुर पुरंदरधनुरनुरंजितमेदुर मुदित सुवेशं ॥ १ ॥

( हे सखि, अधरसुधास्रावित मधुर ध्वनींनें युक्त अशी मुरली वाजविणारा आणि ज्याचें मस्तक चंचल असून कपोलभाग कुंडलांनीं भूषित आहे व ज्यानें मजकडे नेत्रकटाक्ष फेंकिले आहेत, तसेंच चित्रविचित्र रंगाच्या मयूरपिच्छांनीं वलयाकार बांधिले आहेत केश ज्यानें आणि विस्तीर्ण इंद्रधनुष्यासह शोभायमान दिसणाऱ्या सघन मेघांसमान आहे कांति ज्याची आणि या वृंदावनांत रासोत्सवप्रसंगीं ज्यानें मजबरोबर सपरिहास विलास केला त्या कृष्णाचें माझ्या मनाला स्मरण होत आहे. )

वरील अष्टपदी संपविल्यावर किंचित् थांबून रंभेनें जणूं अत्यंत शोकपूरीत, मृदु आणि मंदमधुर शब्दांनीं पुढील अष्टपदी गाऊन दाखविली.

निभृत निकुंजगृहंगतया निशि रहसिनिलीय वसन्तं ।
चकिताविलोकित सकलदिशा रति रभसभरेण हसन्तं ॥
सखि हे केशी मथनमुदारं । रमय मया सहमदनमनोरथ
भावितया सविकारं ॥ १ ॥
प्रथमसमागम लज्जितया पटुचाटुशतैरनुकूलं ॥
मृदुमधुरस्मित भाषितया शिथिलीकृतजघनदुकूलं ॥ १ ॥

( हे सखि, गुप्त गुंजगृहांमध्यें प्राप्त झालेली मी, आणि रात्रीचे वेळीं दडून बसणारा श्रीकृष्ण, तसेंच चकित होऊन सकल दिशांचे ठिकाणीं अवलोकन करणारी मी, आणि रत्युल्लासभरानें मजकडे पाहून हसणारा श्रीकृष्ण; तसेंच प्रथम समागमानें लज्जायुक्त होणाऱ्या मला स्तुतियुक्त भाषणांनीं वश करण्याचे कामीं प्रविण आणि कोमल मधुर हास्यसहित भाषण करीत असतां जो जघनवस्त्र शिथिल करणारा उदार मनाचा आणि प्रेमळ असा जो श्रीकृष्ण त्याचेसहवर्तमान माझा संग करीव. )

याप्रमाणें रंभेनें उत्तम लयकारींत गायन समाप्त केलें असतां चहूंकडून ‘ वा: वा: ’ असा अनुमोदनपर ध्वनि निघाला. आणि सर्वांचीं अंत:करणें आनंदानें भरून गेलीं.

सेलीम—याच्यापुढें राधाजी आणि कृष्णचंद्र यांची भेट होईल नाहीं बरें ? तें असो. इतकें बोलून तो अब्दुलकादिरकडे वळून ह्मणाला ‘ कसें काय शेखसाहेब, आपला काय अभिप्राय आहे ? ही हिंदु लोकांची कविता आपणांला आपल्या दीनदार शाहिरांच्या कवितेप्रमाणेंच पसंत आहे कीं नाहीं ? किंवा यांच्या अतिशयोक्तीची तुह्मांलाही चीड आहे ? ’

अब्दुलकादिरानें मोठ्या प्रयासानें आपला क्रोध आवरून धरून ह्मटलें ‘ या कवितांच्या विषयांत आमची ह्मणण्यासारखी गति नसल्यामुळें आह्मांला त्यांत कांहीं विशेषसे समजत नाहीं. शिवाय आमच्या रसूलिल्ला पैगंबर साहेबांनीं वाजवी रीतीनें अमरुलकैस याला शाप दिला आहे. मग दुसऱ्या लोकांनीं त्याच्या ‘ मुलाखती ’ ची कितीही कां तारिफ केली असेना ! पण हिंदु लोकांची तर त्याहूनही निराळी तऱ्हा आहे. त्यांच्या कविता ऐकून आपल्याला तर तेव्हांच कंटाळा येतो. काय ह्मणे हे लोक राधाकृष्णांची देवासारखी पूजा करितात ! लाहौल ! ’

अब्दुलकादिरच्या भाषणाचें समर्पक उत्तर देऊन त्याचें समाधान करावें असें सिद्धरामाच्या मनांत होतें. परंतु, सेलीमनें त्याचा रोख जाणून पुढें वाद न वाढूं देण्याच्या हेतूनें म्हटलें ‘ बरें तो विषयच सोडून द्या. आणि या धर्मासंबंधीं तंट्यापासून मला दूर ठेवा. तो विषय आमच्या वडिलांसाठीं राखून ठेवलाच आहे. या वेळीं देखील ते फैजीला जवळ घेऊन आपला मेंदू रिकामा खर्च करीत बसले असतील ? आपण नवीतरणी मंडळी केवळ आजचा दिवस हासून खेळून ऐष आरामांत घालविण्यासाठीं जमलों आहोंत; धर्मसंबंधीं तंटे पुढें घेऊन बसण्यासाठीं नाहीं. हे पहा, जीनतमहफिल ( सभासुंदरी ) ला पुढें येऊन दोन दिलखुष गजल गायला सांगा कीं, ज्यांच्या ऐकण्यानें तब्यत गार होऊन जाईल. शेखसाहेब, आपण जरा राग सोडून चित्तवृत्ति खुष ठेवा. कारण एका कवीनें ह्मटलें आहे.—

शेर ( फारशी सुभाषित. )

॥ बवक्तंनैपरास्तिश आं के दस्तअझ जाम बर्दारद ॥

नमींदानम् च सां वर्रहमतेहक ऊ नजर दारद ॥ १ ॥

अर्थः— मदिरापूजनसमयीं जो मनुष्य पेल्यापासून हात ओढून मागें घेतो त्यानें ईश्वराच्या कृपेची काय ह्मणून आशा करावी हें कांहीं मला कळत नाहीं. तर मग या प्रामाणिक सुभाषिताप्रमाणें आपण कां बरें वर्तन करूं नये ? ’

अब्दुलकादिर मनांतल्या मनांतच चुरमुरे खात राहिला. तो पुढें कांहीं एक बोलूं शकला नाहीं. कांकीं शहाजाद्याला जर अप्रसन्न करावें तर अकबरानें नवीन धर्माचा स्वीकार केल्यावर आपला कोणीच पाठिराखा नाहीं हें तो जाणून होता. त्यामुळें तो सहसा त्याला नाखुष करीत नसे. असो, इकडे बहुतेक सर्व मंडळींनीं यथेष्ट मद्यपान केल्यावर उन्मत्त होऊन अवर्च्य वर्तनास सुरुवात केली.

रंभेनें आपलें गाणें समाप्त केल्यावर पिसवाज उतरून नेहमींचा पोषाख केला. आणि कांहीं संभषाण करण्याच्या उद्देशानें ती सिद्धरामाचे संनिध येऊन मर्यादेनें बसली. सिद्धरामानें तिचें मर्यादेचें वर्तन पाहून आणि तिचा हेतू जाणून तिच्याशीं बोलण्यास सुरवात केली. त्या दोघांचें बरेंचसें भाषण झाल्यावर रंभा ही जरी धंद्यानें नीच आहे तरी ती चांगली शिकली सवरली असून सुशील आहे अशीं सिद्धरामाची खात्री झाली.

रंभा—आमच्या येथील वेश्याजनांच्या चालीरीतींचा मला मोठा तिरस्कार आहे. लहानपणीं कोठून तरी मुली विकत घ्यावयाच्या आणि पुढें त्यांच्या साऱ्या जन्माची मृत्तिका करावयाची ! माझीही दशा तीच व्हावयाची; परंतु, भाग्यवशात् मला गाण्याचा छंद लागला आणि माझ्या पोशिंद्यांनींही मला त्या विषयाचें चांगलें शिक्षण देवविलें. आतां त्या विद्येच्या जोरावर मी हजारों लोकांच्या अंतःकरणास एका क्षणांत पाझर आणून सोडितें, हें खरें, तरीं पण वृद्धावस्थेंत—

सिद्धराम— कां ? वृद्धावस्थेंत काय भय आहे ?

रंभा— तसें नाहीं, आपण माझा अभिप्राय समजला नाहीं. रूपरंग तर मेघांच्या छायेप्रमाणें आहे. तशींच केवळ गुणाची गोष्ट नाहीं, हें खरें. खरा गुण जो आहे तो कोणत्याही अवस्थेंत सारखांच. तो सदा निर्भयच आहे.

यांचें इकडे वरीलप्रमाणें संभाषण चाललें असतां तिकडे मैफल अगदीं

ऐन रंगांत येऊन पोंचली होती. एकीकडे गाणेंबजावणें सुरूंच होतें. पण दुसरीकडचा देखावा कांहीं अपूर्वच होता. कोणी बोलताहेत, कोणी हंसताहेत, कोणी तर मद्याच्या धुंदींत स्वतःच गाऊं नाचूं लागले आहेत. ज्याच्या जें मनास येईल तें तो निरपत्रप होऊन करीत आहे. कोणी वारांगनांच्या कंठांत हात घालून त्यांना मद्यपानाविषयीं आग्रह करीत आहेत, कोणी हातांत मद्यानें भरलेले पेले घेऊन त्यांच्या वर्णनपर गीत गात आहेत. त्या प्रसंगीं आपण कोणासमोर काय करीत आहों याची कोणालाही शुद्ध राहिली नव्हती.

खुद्द शहाजादा सेलीम तर मुळींच भानावर नव्हता. तो दोन वारांगनांच्या अंगावर बेहोष होऊन पडला होता आणि त्या जन्मवंचका त्याच्या कंठांतील भूषणें चोरून लपवीत होत्या ! इतक्यांत त्यानें पुन्हां एकवार मद्याचा घोट मागितला. त्याबरोबर जवळच्या वेश्येनें तो तत्काळ त्यास दिला. तो पिऊन तो पुन्हां बेशुद्ध होऊन पडला.

हा सर्व देखावा सिद्धराम लक्षपूर्वक पहात होता आणि शहाजाद्याचा व दरबारी लोकांच्या या परम शोचनीय अवस्थेबद्दल मनांत कांहीं विचार करीत होता. इतक्यांत मागून एका मनुष्यानें त्याच्या पाठीवर हात ठेविला. सिद्धरामानें मागें वळून पाहिलें तों सल्हाण उभा आहे असें त्यांस दिसलें.

सल्हाण—चला उठा, आतां या ठिकाणीं जास्त वेळ थांबण्याची सोय नाहीं. यावेळीं कोणावर काय प्रसंग गुजरेल याचा नेम नाहीं. आतां येथून काढता पाय घेणेंच योग्य होईल.

सिद्धराम उभा राहून ह्मणाला " फार चांगलें. परंतु, शहाजाद्यांची आज्ञा न घेतां जाणें उचित होईल काय ? "

सल्हाण—ज्याला स्वतःची देखील शुद्ध नाहीं तो दुसऱ्यांना काय ओळखतो ? आणि कशाची वास्तपुस्त करितो ! येथें आतां कोण गेला आणि कोण राहिला हें कोण विचारायला बसला आहे ? मुकाट्यानें चला झालें.

याप्रमाणें भाषण होऊन ते दोघे तेथून उठून बाहेर पडले आणि आपापल्या मार्गास लागले. वाट चालत असतां सिद्धरामाच्या मनांत एक-

सारखा तो तेथें पाहिलेला देखावा घोळत होता. इकडे वृक्षांच्या दाटींतून एकाएकी एक सडपातळसा मनुष्य बाहेर पडून सल्हाणाशीं बोलूं लागला. या मनुष्यासंबंधानें वाचकांना आह्मी विनाकारण संशयांत ठेवीत नाहीं. हा मनुष्य ह्मणजे आपला पूर्वपरिचित गोरख नांवाचा योगी होय.

गोरख—कसें काय ? सर्व कांहीं यथास्थित आहेना ?

सल्हाण—यथास्थित तें काय असावयाचें ? आतां याहून आमची दुर्दशा ती काय व्हावयाची राहिली आहे ? आमचे आतां चांगलेच पौबारा होणार खास. सांप्रत मला सर्व कांहीं नीटपणें सांगतां येणार नाहीं. जरा थांबा; आपण आपल्या लोकांना मात्र तयार ठेवा. जेव्हां जरूर लागेल तेव्हां आपणांला खबर देईन.

गोरख— आणि तें अजागळ पोर ?—जरा त्याजवरही नजर असूं द्या. आपल्यासंबंधानें त्याच्या मनांत कांहीं संशय आहे असें वाटतें. एकदा तो आमच्या हातांत आला ह्मणजे झालें, मग कसें काय ? चिमणी फासांत अडकली कीं नाहीं.

सल्हाण—अजून नाहीं. पण अडकलीच ह्मणावयाची.

त्यावर गोरख किंचित् हंसला. आणि नंतर तेही दोघे आपापल्या ठिकाणीं गेले.

# खंड ७ वें.

## गुप्त सभा आणि गुप्त भेटी.

फैजी यानें सेलीमाच्या मैफलीचें निमंत्रण स्वीकारिलें नव्हतें. ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेलच. तें फैजीचें करणें निष्कारण नव्हतें. ज्या समयीं सेलीमाचें पाहुणे मद्यपान करून आपलें जीवित निष्फल करीत होते, त्याचसमयीं फैजी महाशय एका महान् व्यक्तीची मार्गप्रतीक्षा करीत बादशाही दिवाणखान्यांत बसले होते. त्याचे जवळ एक मोठा धर्मग्रंथ असून तो त्याच्या वाचनांत निमग्न झाला होता. इतक्यांत एका बाजूचा पडदा दूर सारून चोपदार आंत आला. त्याचे बरोबर एक ख्रिस्तधर्मी मनुष्य होता. हा मनुष्य म्हणजे त्या वेळच्या मिशनरींचा मुख्य स्टयूडाल्फ अकेविया होय. त्यास पाद्री समाजानें आपल्या तर्फे प्रतिनिधी म्हणून आग्र्याचे दरबारीं पाठविलें होतें. *

---

* इ. स. १५७८ सालीं गोवें येथून एक राजदूतसमूह अकबराचे दरबारीं आला होता. त्याचा मुख्य ऍंटोनियो केबल हा होता. त्यानंतर पुन्हां कांहीं विद्वान् पाद्री आपल्या मताच्या समर्थनार्थ पाठविण्याविषयीं अकबराकडून फर्मान गेल्यावरून स्टयूडाल्फ अकेविया, ऍंटोनियो मानसेरा आणि एनरीक असे तीन निवडक विद्वान् पाद्री आग्रा येथें आले होते. एनरीक यास फार्शी भाषेचें थोडेसें ज्ञान असल्यामुळें तो दुभाष्याचें काम करीत होता. बादशहानें

अकेविया दिवाणखान्यांत येतांच फैजीनें त्यास योग्य रीतीनें उत्थापन देऊन त्याचा सन्मान राखिला आणि चोपदाराचे हातीं बादशहांकडे वर्दी पोंचवून तो त्यास आपले बरोबर त्यांजकडे घेऊन गेला.

बादशहाचे सन्मुख जातांच अकेवियानें मोठ्या नम्रभावानें लवून सलाम केला आणि बादशहानेंही त्याची योग्यता जाणून तो दृष्टीस पडतांच मोठ्या आदरानें उभा राहून त्याचा सत्कार केला आणि ह्मटलें "यावें पूज्य महाशय. आह्मी मोठ्या पूज्यभावानें आपलें स्वागत करितो. कांहीं भिन्न रीतीनें कां होईना पण तुह्मी त्या परमेश्वराचें पूजन करितां. असो. मार्गांत आपणांला बरेच श्रम झाले असतील. परंतु, त्याबद्दल आपण क्षमा कराल अशी मला आशा आहे."

अकेविया—श्रीमान् मजवर इतका लोभ ठेवितात याबद्दल श्रीमानांचा मी फार आभारी आहें. आपल्या अनुग्रहानें आणि जगदीश्वराच्या कृपेनें मार्गांत आह्मांला कोणत्याही प्रकारें त्रास झाला नाहीं. यद्यपि माझें शरीर कृष आहे आणि मार्गांतील त्रास सहन करण्याचें मला अवसान नाहीं, तथापि आपल्या दर्शनाची उत्कट इच्छा असल्यामुळें तो सर्व त्रास सहन करून मी येथवर आलों. आम्हांला मार्गांत विशेषसा त्रास झाला नाहीं हें खरें; तरी पण आपण तुच्छ मानवांनीं परमेश्वर ठेवील तसेंच राहणें भाग नाहीं काय ? मग थोडासा त्रास झाला ह्मणून काय बिघडलें?

बादशहा— आपलें म्हणणें यथार्थ आहे. असो. आपण जे इंजील वगैरे ग्रंथ पाठविले होते त्याबद्दल आपला मी अत्यंत आभारी आहें. माझे मित्र फैजी यांनीं त्यांचा अनुवाद करून त्याचा बराच भाग मजला ऐक-

---

या लोकांचा चांगला सत्कार केला व तेणेंकरून बादशहा आपल्या धर्माचा स्वीकार करील असें त्यांस वाटत होतें. परंतु, तें वाटणें केवळ निष्फळ झालें. बादशहानें त्यांना कांहीं दिवस ठेऊन घेऊन परत पाठविलें. त्या नंतर आणखी एकवेळ पाद्रीलोक पाठविण्याविषयीं बादशहाकडून फर्मान गेल्यावरून तीन विद्वान् पाद्री लाहोर येथें बादशहाच्या भेटीस आले. परंतु, त्यांचीही बादशहाचें धर्मांतर करविण्याचे कामीं निराशा होऊन ते निरुपायास्तव परत गोव्यास गेले.

विला होता. तो मी आणि अबुलफजल अशा दोघांनीं लक्षपूर्वक ऐकून मनन केला आहे.

अक्केवियानें अतीशय प्रसन्न अशा मुद्रेनें म्हणाला ' तर मग त्यासंबंधानें आम्हांला मोठा संतोष वाटतो आणि आह्मी आशा करितो कीं, आमचे हातून उत्तम जमिनींत बीजारोपण झालें. '

बादशहा " ह्मणाला, आपल्या कित्येक पवित्र ग्रंथांची मी अत्यंत प्रशंसा करितों. कांकीं आतां माझा त्या ग्रंथांशीं चांगलाच परिचय झाला आहे. त्यांत नीति आणि सत्यता यांचें उत्कृष्ट शिक्षण दिलें आहे. आणि तें शिक्षण खरोखरच आह्मां साधारण मनुष्यांच्या बुद्धीच्या बाहेरचें आहे. तथापि आमच्या इसलामी धर्मग्रंथांतही अशाप्रकारचें शिक्षण नाहीं असें नाहीं. आपल्या ग्रंथांत आत्मश्लाघा आणि अहंकृति यांचा परित्याग उत्तमप्रकारें वर्णन केला आहे. तसेंच आपल्या ग्रंथांत प्रेम आणि औदार्य यांचेंही शिक्षण फारच उत्तमप्रकारें दिलेलें आहे. निःसंशय आमच्या कुराणांत अशा कित्येक गोष्टींची कमतरता आहे आणि त्यावरून मी मुसलमानी धर्मापेक्षां ईसाई धर्माला किती जास्त मान देतों याचें आपणांला अनुमान होईलच. " अक्केवियानें आकाशाकडे दृष्टी लावून आणि हात जोडून ह्मटलें " प्रभूमहिमा अगाध आहे. खरा मार्ग ह्मटला म्हणजे हाच आहे कीं, सत्यासत्याची तुलना करून निभ्रांत चित्तानें सत्याची नेहमीं कास धरावी. तेणेंकरून आत्म्याला दृढतां येते. आपल्या सारख्या विद्वान्, बुद्धिमान् आणि सदसद्विचारी बादशहांनीं सत्य निर्णय करून जल आणि पय वेगळें करून दाखविलें यांत काय आश्चर्य ! "

बादशहा—मजविषयीं आपला अशाप्रकारचा अभिप्राय आहे. ही मोठ्या संतोषाची गोष्ट असून आपल्या मोठेपणाची ही द्योतक आहे. परंतु, अद्याप मला आणखींही कांहीं बोलावयाचें आहे. माझ्या अंतःकरणांतील सर्वभाव कांहींएक लपवून न ठेविता आपल्या समोर बोलावा अशी माझी इच्छा आहे. असो, आपल्या धर्म ग्रंथांत दृष्टीस पडणाऱ्या अनेक उत्तमोत्तम विषयांची मीं मनापासून वाखाणणी केली, यावरून वेदासारख्या पुरातन ग्रंथापासून मिळणाऱ्या ज्ञानाचा स्वीकार करण्याविषयीं मी विमुख आहे असें मात्र आपण समजूं नका.

अकेविया कांहींशा तीव्रस्वरानें ह्मणाला ‘ काय ? आपण या मूर्तिपूजकांच्या ग्रंथावर विश्वास ठेवितां ? ’

बादशहानें शांतपणें उत्तर दिलें ‘ यांत काय संशय ! त्यांच्या पैकीं कांहीं लोकांना आपण मूर्तिपूजक या नांवानें संबोधूं शकाल. परंतु, सर्वांनांच तशा नांवानें तुम्हाला कधींही संबोधितां यावयाचे नाहीं. कांहो फैजी, असेंच ना ? माझें ह्मणणें यथार्थ आहे कीं नाहीं ? ’

फैजी— हुजूरचें म्हणणें सत्य आहे. हुजूर या गोष्टी उत्तमप्रकारें जाणत आहेत. ( अकेवियाकडे वळून ) महाशय, आमचे बादशहा सलामत यांनीं त्यांच्या वेदादि ग्रंथांचें उत्तमप्रकारें अवलोकन केलें आहे. आणि ते त्याच ग्रंथांतून अशीं कित्येक स्थळें काढून दाखवितील कीं, जीं आपल्या पवित्र ग्रंथांहून यत्किंचित् देखील कमी योग्यतेची नाहींत.

अकेविया निश्चयपूर्वक ह्मणाला ‘ हे सर्वथैव असंभवनीय आहे. ’

फैजी मंदस्मितपूर्वक म्हणाला ‘ तें कसें ? ’

बादशहा— असंभवनीय कशावरून ? आपण ते ग्रंथ थोडेबहुत तरी पाहिले आहेत काय ?

अकेविया किंचित् गोंधळल्यासारखा होऊन म्हणाला ‘ मी त्यांचें कांहीं थोडेंसें अवलोकन केलें आहे. परंतु, विशेष जाणण्याची माझी इच्छाही नाहीं आणि अवश्यकताही नाहीं. त्यापासून आमचा काय मतलब साध्य होणार आहे ? शिवाय मी हुजूरलाच असें विचारितों कीं, सत्य एकच संभवेल कीं अनेक संभवतील ? ’

बादशहा—आपलें म्हणणें यथार्थ आहे. परंतु, सत्य ह्मणजे काय ? आणि तें कोठें मिळूं शकेल हा प्रश्नच आहे. तें काय एकाच धर्मांत आहे ? कीं आणखीहि कोठें मिळणारें आहे ? आपण स्वभावतः असेंच ह्मणणार कीं तें फक्त आपल्याच धर्मांत मिळणारें आहे. परंतु, त्याला प्रमाण काय ?

अकेविया—आह्मां लोकांना ईश्वराचा पुत्र प्रभू ईसामसीह यानें सत्याचा उपदेश केला आहे.

बादशहा—हें तुमच्याच लोकांचें ह्मणणें झालें ? परंतु, माझे मित्र अब्दुलकादिर ह्मणतात कीं त्यांना हजरत महंमद साहेब यांनीं सत्याचा

उपदेश केला. आपले ईसामसीह जर ईश्वराचे पुत्र आहेत असें आपलें ह्मणणें आहे तर तें प्रमाणासिद्ध असलें पाहिजे.

फैजी— आणि आमच्या वैष्णव बंधूंचें ह्मणणें आहे कीं त्यांना त्यांच्या ऋषिमुनींपासूनच केवळ सत्य प्राप्त झालें असें नाहीं. तर साक्षांत् परमेश्वरानेंच अवतार धारण करून त्यांना सत्याचा उपदेश केला आहे.

अकेविया —आमच्या धर्माच्या सत्यतेबद्दल ईश्वराचें वाक्य जें बायबल तें प्रमाण आहे.

बादशहा—मग तसें मुसलमानांचें कुराण आणि हिंदूंचें अनेक शास्त्रग्रंथ प्रमाण आहेत.

अकेविया— परंतु, ज्या धर्माचें मूळ मजबूत असेल तोच धर्म खरा.

बादशहा— सर्वच लोक आपल्या धर्माचें मूळ मजबूत आहे असें ह्मणतात.

अकेविया— सर्वच लोक तसें म्हणतात खरें. परंतु, इसलामी धर्मापेक्षां तरी ईसाई धर्म फार जुना आहे हें खास.

बादशहा— परंतु, तो वेदांहून मात्र प्राचीन नाहीं. फार कशाला बौद्ध धर्म देखील ईसाई धर्माहून अधिक जुना आहे. तसेंच ईसाई धर्मांतील प्रेमविषयक उपदेश जरी मला अत्यंत महत्वाचा वाटतो तरी पण दुसऱ्या धर्मांतील क्षमा आदिकरून गुणांच्या शिक्षणाची तो बरोबरी करूं शकणार नाहीं.

बादशहाच्या या भाषणानें अकेवियास अतिशय क्रोध आला; आणि आपण कोणासमोर बोलत आहों याचें भान न राहून तो म्हणाला 'मग अशारीतीनें आमच्या धर्माचा प्रसार कसा होणार ? आणि आमचें हित कसें साधणार ? '

बादशहानें मंदस्मितपूर्वक उत्तर दिलें ' पूज्य महाशय, ठीक आहे. आपलें काय म्हणणें आहे तें मी समजलों. परंतु, माझ्या अल्प बुद्ध्यनुसार मला असें वाटतें कीं, आपण जर या देशांतील भिन्न भिन्न धर्मांचें नीटरीतीनें अवलोकन केलें असतें तर कोणता धर्म काय योग्यतेचा आहे हें आपणांस उत्तमप्रकारें कळून आलें असतें. '

अकेवियानें उत्तर केलें " येवढ्याकरितां नाहीं मी येथें आलों. मी

फक्त आमच्या इंजीलचा उपदेश करून लोकांना पातकापासून बचावण्याकरितां आणि त्यांचा नरकापासून उद्धार करण्याकरितां आलों आहें. ”

बादशहानें आपल्या स्वाभाविक गंभीर वृत्तीस अनुसरून ह्मटलें “ आपलें मनोरथ सफल होवोत असें मी मनापासून इच्छितों. परंतु, दुसऱ्या लोकांच्या धर्मग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें उत्तमप्रकारचें ज्ञान संपादन केल्याशिवाय तुह्मी आपलींच धर्ममतें खरी ठरवूं पहाल तर आपला मनोरथ कितपत सिद्धीस जाईल याची आह्मांला मोठी शंकाच आहे. ”

अकेवियानें अकबराच्या या भाषणास विशेषसें महत्व न देतां ह्मटलें “ परंतु, कोणी मनुष्य कितीही कठीण हृदयाचा असला अथवा प्रत्यक्ष मूर्तिपूजक किंवा नास्तिक जरी असला तरी आमच्या धर्माच्या अंगीं असें सामर्थ्य आहे कीं तेणेंकरून त्याच्या विचारांचें परिवर्तन झाल्यावांचून राहणार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे. ”

बादशहा—आपल्या अशाच प्रकारच्या उपदेशानें कीं नाहीं ?

अकेविया—निःसंदेह, अशाच प्रकारच्या उपदेशानें.

बादशहा—ठीक आहे, यद्यपि इतर धर्माहून आपल्या धर्मांत हा विलक्षण गुण आहे असें आपण ह्मणतां तथापि माझें चित्त कांहीं तिकडे ओढ घेत नाहीं. मी स्वतः सर्वांचा सारखाच आदर करितों. शिवाय जी धर्ममतें आपल्या धर्ममतांशीं मिळतीं आहेत त्यांचे संबंधांत परिवर्तन तें काय व्हावयाचें आहे ? कांहो फैजी, आपलें काय ह्मणणें आहे ? आपले ठायीं माझेपेक्षां विशेष गांभीर्य वास करितें अतएव आपली अनुमति विशेष ग्राह्य होईल.

फैजीचें भाषण ऐकून घेण्याचें अकेवियाचें मनांत नव्हतें. परंतु, निरुपायास्तव त्याला तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागलें.

फैजी—हुजूरचा अभिप्राय दृढ करण्यास माझ्या भाषणाची मुळींच अपेक्षा नाहीं. कांकीं तो मूळचाच यथार्थ आहे. तथापि आमचे पाद्रीसाहेब माझ्या भाषणाकडे नीट लक्ष पुरवितील अशी मी आशा करितों. आमच्या या पाद्री महाशयांनीं जरी एक दोन मनुष्यांना आपलें अनुयायी बनविलें, तरी यांचें धर्मशिक्षण कधींही मुसलमानांत अथवा ज्यांना हे मूर्तिपूजक समजतात त्या हिंदूलोकांतही बिलकुल मूळ धरणार नाहीं. जे

लोक अद्वैतमतवादी आहेत ते एका ईश्वरांत तीन ईश्वर मिश्रित आहेत असें कधींही गृहीत धरणार नाहींत. शिवाय, असेही कित्येक हिंदु आहेत कीं, जे तीन सोडून तेहत्तीस कोटी रूपांमध्यें ईश्वराचें पूजन करितात. या शिवाय तुमच्या धर्मांत अशाही कित्येक गोष्टी आहेत कीं, त्या त्यांना स्वप्नांत देखील मान्य व्हावयाच्या नाहींत. उदाहरणार्थः– ईश्वरानें मनुष्याला उत्पन्न करून त्यानेंच स्वतः पुन्हां त्याला पतित केलें, अथवा ईश्वरानें आपल्या प्रिय पुत्रास क्रुसावर चढविण्यास पाठविलें. असल्या गोष्टींवर विश्वास ठेवून ते कधींही ईश्वराचें पदरांत जबरीनें अज्ञान घालणार नाहींत, आणि असल्या विलक्षण प्रायश्चित्ताचें तर ते मुळींदेखील महत्व समजणार नाहींत. अधिकोत्तराची क्षमा असावी. परंतु, ते असल्यागोष्टींना केवळ निरुपयोगी आणि अज्ञानमूलक समजतात. मग ते लोक आपल्या वाडवडिलापासून चालत आलेल्या, बुद्धिसंगत आणि प्राचीन धर्माचा त्याग करून आपल्या या विलक्षण नवीन धर्माचा स्वीकार करतील असें मी कसें ह्मणूं ? आपण " ईश्वर पापीजनांना पश्चातापानंतर क्षमा करितो, तो कृपाळू, दयाळू आणि न्यायपरायण आहे, सर्व जगांतील लोकांनीं परस्परांवर प्रेम करणें उचित आहे, अहंकाराचा त्याग करणें श्रेयस्कर आहे. " इत्यादि गोष्टींचाच जर नुसता उपदेश कराल तर ते तो मनोभावानें श्रवण करतील. परंतु, तेवढ्यावरूनच त्यांच्या धर्मांतराची मात्र आपण आशा करूं नये. कारण, हीं तत्वें कांहीं त्यांना नवीन नाहींत. आणि त्यामुळें तीं आपण पुन्हां पुन्हां त्यांना सांगणें बाहुल्य मात्र आहे.

या फैजीच्या भाषणावर अक्केवियानें किंचित् क्रोधपूर्वक उत्तर दिलें " परंतु, आमच्या धर्मावर आमचा दृढ विश्वास आहे. आमचा धर्म पातकी प्राण्यांना रौरव नरकापासून उद्धरणारा आहे. आणि ह्मणूनच आह्मीं त्याच्याकरितां हरघडी अनेक प्रकारचे कष्ट सोसण्यास अथवा तिरस्कार सहन करण्यास तयार असतो. आणि प्रसंगविशेषीं येशूचें नांव घेऊन आपले जीव प्राणसंकटांत घालण्यास देखील आह्मी मागेंपुढें पहात नाहीं. "

याप्रकारचें भाषण करून क्रोधानें कांपत असलेल्या अक्केवियाच्या खांद्या-

वर हात टाकून अकबरानें प्रेमपूर्वक मृदुस्वरानें ह्मटलें " आणि याच-करितां जोंपर्यंत या हिंदुस्थानांत अकबराचें राज्य आहे तोंपर्यंत तुह्मां लोकांना निर्भय राहून आपला उद्योग करण्याची परवानगी आहे. आपण किमपि चिंता करूं नये. माझी खात्री आहे. कीं, माझ्या रियासतीच्या हद्दींत आपला कोठेंही यत्किंचित् देखील अपमान झाला नसेल. इतकेंच नाहीं तर उलट आपल्या कल्पनेबाहेर आपला सन्मानच झाला असला पाहिजे. माझ्या राज्यांत धर्मोपदेश करण्याची मी आपणांला पूर्ण मुभा दिलेलीच आहे. परंतु, अशा रीतीनें आपला धर्म येथील प्रचलित धर्मांवर आपला पगडा बसवील असें मात्र मला वाटत नाहीं, इतकेंच माझें ह्मणणें होतें आणि इतर सदुपदेशासंबंधानें ह्मणाल तर फैजीनें ह्मटल्याप्रमाणें तो खरोखरच बाहुल्य आहे. "

त्यावर अकेविया ह्मणाला ' हुजूरनीं जर या कामीं उदाहरण घालून दिलें तर आह्मांला कृतकार्य होण्याला मुळींच उशीर लागावयाचा नाहीं. '

अकबर— आपलें ह्मणणें बरोबर आहे. परंतु, आपल्या धर्मावर माझा विश्वास बसला पाहिजे. माझ्या अंतःकरणाला ज्या गोष्टी मुळींच पटत नाहींत त्या केवळ आपल्या संतोषार्थ मी स्वीकाराव्या असें आपलें ह्मणणें आहे कीं काय ?

पाद्री— मला असें कसें ह्मणतां येईल ? परंतु, त्या आमच्या पवित्र ग्रंथाच्या वाचनानें भारतवर्षाचे राजाधिराज यांचें चित्त सत्य धर्माकडे आकर्षित होईल अशी मला पूर्ण आशा होती आणि ती आशा सांप्रत सर्वस्वी वृथा होऊं पहात आहे. यामुळें भाषणांत कांहीं प्रमाद झाला असल्यास त्याची आपण क्षमा करावी.

अकबर— छे, छे, पूज्यवर, क्षमा प्रार्थनेची काय अवश्यकता आहे ? आपल्या हृदयस्थ खेदाला मी ओळखून नाहीं असें नाहीं आणि आपला उपदेश मी ऐकणार नाहीं असेंही पण मी म्हणत नाहीं. उलट मी आपणांला मोठ्या प्रसन्न मनानें अवसर देतो आणि आपण आपल्या प्रयत्नानें माझ्या हृदयमंदिरांत आपल्या सत्य धर्माचा प्रकाश पाडावा. आजचा दिवस आपल्या व आमच्या भाषणाचा प्रथम सुदिन आहे. आज आपल्याशीं आमचें अनेक विषयांवर संभाषण झालें. परंतु. पुढच्या वेळीं आपण

एकाद्या विवक्षित विषयांवर संभाषण करूं आणि न जाणो आपली विद्या आणि वक्तृत्व यांच्या योगानें कदाचित् माझ्या मनावर प्रस्तुतपेक्षांही जास्त चांगला परिणाम घडेल.

अकबराच्या वरील भाषणांत जरी व्यंगोक्ति होती तरी ती त्याच्या स्वरांत किंवा मुखचर्येंत मुळींच दिसून येत नव्हती. असो, आपलें भाषण स्वस्थपणें ऐकून घेतल्याबद्दल अक्केवियानें अकबराचे फार फार आभार मानिले आणि अकबरानें आपल्या दरबाराच्या नियमानुसार त्यास अत्तर गुलाब देववून अत्यंत सन्मानपूर्वक त्याची पाठवणी केली.

पाद्रीसाहेब निघून गेल्यावर बादशहा फैजीस ह्मणाला " बसा, कोणाकडे पाहिलें तरी पुन्हां पुन्हां एकच गोष्ट निष्पन्न होते. तुह्मीं पाहिजे तर अक्केवियासंबंधानें विचार करा अगर अब्दुलकादिरसंबंधानें करा. दोघेही विश्वास, ईश्वरी प्रेरणा, आणि धर्म धर्म ह्मणून कंठशोष करितात. परंतु ज्ञान, बुद्धी आणि अनुभूति यांसंबंधानें अवाक्षरही त्यांचे मुखांतून निघत नाहीं. तथापि, या दोघां कट्ट्या धर्माभिमानी गृहस्थांशीं संभाषण करण्यांत माझ्या मनाला नेहमीं प्रसन्नता प्राप्त होते. प्रस्तुतच्या भिन्न भिन्न धर्मांच्या पुढाऱ्यांशीं संभाषण करण्यानें जीव आणि ब्रह्म या संबंधाचें जितकें ज्ञान प्राप्त होतें तितकें ग्रंथद्वारा होऊं शकत नाहीं. "

त्यावर फैजी ह्मणाला " यथार्थ आहे. परंतु, मी ह्मणतों केवळ आपल्या स्वतःच्याच ज्ञानबळावर जीवतत्व शोधूं पाहणाऱ्या या अर्धवट लोकांशीं माथेफोड करीत बसण्यापेक्षां ईश्वरप्रेरित प्राचीन ग्रंथांवरच डोळे मिटून विश्वास ठेवणें उत्तम नाहीं काय ? या लोकांच्या चुका जेव्हां यांच्या पदरांत घालण्याचा प्रसंग येतो तेव्हां हे देखील त्या प्राचीन धर्मग्रंथांकडेच बोट दाखवितात कीं नाहीं ? सर्व लोक जर आपापल्या ठिकाणीं योग्य विचार करितील तर सर्व कांहीं ठीक होणार आहे. परंतु, तसें घडतें कोठें ? जो तो आपलाच हेका धरून अहंकारभारानें दडपलेला ! मग त्याचें डोकें वर कसें निघावें ? "

फैजीचें हें भाषण श्रवण करून बादशहा किंचित् स्तब्ध राहिला आणि नंतर ह्मणाला ' आपण ह्मणतां तेंही ठीक आहे. असो, आतां

उशीर बराच झालेला आहे. करितां आपण आणखी एकादेवेळीं या विषयावर संभाषण करूं. ’

फैजी—तर मग बंदगी. ( नमस्कार )

याप्रमाणें बोलणें झाल्यावर फैजी आपल्या घरीं गेला आणि बादशहानेंही रात्र बरीच झाली असल्यामुळें शयन केलें.

पुढें बरेंच दिवसपर्यंत वरील प्रकारच्या भेटी नित्य होत असून त्यांत धर्मविषयक चर्चा होत असे. त्यावेळीं निवडक कांहीं लोकांशिवाय इतरांस तो संवाद ऐकण्याची परवानगी नसे.

याप्रमाणें बादशहाकडील वृत्तांत झाला. आतां आपण सिद्धराम आणि रझिया यांचेकडे काय वृत्त चाललें आहे तें पाहूं.

रझियेच्या पहिल्या भेटीनंतर सिद्धराम एकसारखा तिच्या दासीच्याच शोधांत होता. नंतर एके दिवशीं ती त्याला पूर्वींच्याच जागीं राजोद्यानासमीप भेटली व तिनें रझियेकडील कांहीं हकिकत त्यास निवेदन केल्यावर त्याचदिवशीं त्यानें पुन्हां तिची भेट घेण्याचें ठरविलें.

पूर्वसंकेतानुरूप सिद्धराम रझियेच्या भेटीस गेला आणि त्या दिवसानंतर नित्यनेमानें त्या दोघांची भेट होत होत त्यांच्या त्या भेटीला प्रेमपरिचयाचें स्वरूप आलें. त्यांना एकमेकांचा वियोग सहन होईनासा झाला. नगराची शोभा, अबुलफजल आणि बादशहा यांच्याशीं संभाषण अथवा पर्विजसारख्या मित्रांची भेट इत्यादि गोष्टींकडे सिद्धरामाचें चित्त लागेनासें झालें. त्या उद्यानवासिनी चंद्रमुखीचेंच त्याला एकसारखें वेड लागलें. हळूहळू याचा इरावतीवरील प्रेमरंग फिकट होत चालला. ही सिद्धरामाच्या चित्ताची झालेली चलबिचल रझियेच्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकली. आणि तिचेंही अंतःकरण सिद्धरामाविषयीं प्रेमसंबद्ध झाल्यामुळें तीही आपलें मनोगत उघड करून दाखविण्याचा प्रयत्न करूं लागली. असा प्रकार चालला असतां एके दिवशीं सायंकाळीं सूर्यास्तानंतर चार घटकांच्या सुमारास सिद्धराम रझियेसमीप बसून प्रेमालाप करीत होता. त्यावेळीं अंतरिक्षांत पूर्णचंद्राचा उदय झालेला असून उद्यानांतील जलयंत्रें वर्षा काळांतील पर्जन्याप्रमाणें जलवृष्टि करून उद्यानाची शोभा वृद्धिंगत करीत होती. रझियेच्या मुखचंद्रापुढें तो अंतरिक्षांतील पूर्णचंद्रही

सिद्धरामास यावेळीं मंदतेज भासूं लागला. तिच्या नेत्रचापल्यापुढें खंजन पक्ष्याची चपलताही तुच्छ वाटूं लागली. तिच्या लज्जायुक्त अवलोकनांत अशीं कांहीं अपूर्व जादू भरली होती कीं, तेणेंकरून आमचें सिद्धरामजी स्वतःला पूर्णपणें विसरून अगदीं तन्मय होऊन गेले ! इतक्यांत एकाएकीं रझियेनें गंभीर वाणीनें म्हटलें ' एकेवेळीं आपण मजवर अनुग्रह करून माझें पत्र काश्मीरांत पाठवून दिलें. आज आणखी एका गोष्टीची आपणाजवळ याचना करावयाची आहे. आपण जर मान्य कराल तर त्यांत आपलेंही कल्याण होणार आहे. तरी पुन्हां एकवार मजवर कृपा व्हावी. '

सिद्धराम— त्यांत कृपा ती कसली करावयाची ! काय हेतु असेल तो उघड करून सांग. तो तुझा हेतु शेवटास नेण्याचें कामीं मजकडून कदापि हयगय व्हावयाची नाहीं. बोल काय मनांत असेल तें.

रझिया—हें भाषण आपल्या मोठेपणाला योग्यच आहे. परंतु, इतर स्त्रियाप्रमाणें माझें मागणें सामान्य नाहीं. करितां वचन देण्यापूर्वीं एकवेळ चांगला विचार करा.

सिद्धराम—कांहीं कां असेना, तुला काय म्हणावयाचें असेल तें निःसंदेह माग. माझ्या सामर्थ्यानुरूप तें तुला देण्यांत मजकडून नकार नाहीं.

रझिया—तर मग ऐका. माझ्या पुढील प्रार्थनेंत माझ्यापेक्षां खुद्द आपलाच विशेष संबंध आहे. आपणांला कदाचित् अशी शंका असेल कीं, या एकांतोद्यानवासिनीचा राजकीय गोष्टीशीं काय संबंध असावयाचा आहे ? परंतु तसें मुळींच नाहीं. मला अकबराच्या दरबारांतील इथंभूत सर्व हकीकत कळत असते. ती कशी आणि कां हें विचारण्याचें आपल्याला सध्याच विशेष प्रयोजन आहे असें नाहीं. परंतु, मी जी हकीकत आपणांला पुढें सांगणार आहे तिची पक्की माहिती करून घेणें आपणांला आणि आपल्या देशवासी जनांना अत्यंत जरूरीचें आहे.

सिद्धराम—तुझ्या भाषणाच्या रोखावरून ती गोष्ट माझ्याही बरीच लक्षांत येत चालली आहे. काश्मीरावर स्वारी करण्यासंबंधानें जो बादशहाचा अंतस्थ उद्योग चालला आहे त्याविषयींच तूं कांहींतरी बोलणार असें दिसतें.

रझिया—आपण अगदीं बरोबर ओळखिलें आणि तो उद्योग सांप्रत

अगदीं पूर्णपणें घडून येण्याच्या बेतांत आहे असें आपण समजा. शिवाय त्यांत आणखी एक अतिमहत्वाची गोष्ट ही आहे कीं, त्या कामावर खुद्द आपलीच योजना व्हावयाची आहे. कारण, बादशाही सेनेंतील रजपूत लोक आपणांवाचून इतराच्या कह्यांत वागण्यास कुरकुर करितात. आणि शिवाय आपल्या कर्तबगारीबद्दलही बादशहाची पूर्ण खात्री होऊन चुकली आहे.

रझियेचें भाषण ऐकून कुमाराचें अंतःकरण सखेदाश्चर्यानें भरून गेलें. परंतु, त्यानें तो आपला हृदयस्थ खेद यत्किंतूही बाहेर पडूं न देतां प्रसन्नमुद्रेनेंच तिला ह्मटलें ' तसें असेल तर आपल्याला काय त्याचें ? आपणांकडून तयारी आहे. पण मुद्दाम आज ही हकीकत मजपुढें काढण्यांत तुझा कांहींतरी विशिष्ट हेतु दिसतो. तो काय बरें ? '

रझिया—त्यांत माझा आणि आपला असा उभयतांचाही संबंध आहे. पूर्वीं मीं आपणांपाशीं माझ्या एका सखीचा वृत्तांत कथन केला होता तो आपणांस स्मरत असेलच. आज मी आपणांस माझा हेतु स्पष्टपणें निवेदन करितें. माझ्या अंतःकरणाला दुःख देणारा माझा पति आतां लौकरच देशांतराहून परत येणार आहे. आणि त्याकरितां येथून आतां पळून काश्मीरास जाऊन रहावें असें माझ्या मनांत आहे. परंतु, बादशहाचा अधिकार जर काश्मीरप्रांतीं सुरू होईल तर मी पुन्हां पकडली जाईन. आणि मग माझे सर्व मनोरथ निष्फळ होतील.

सिद्धराम— तुझे मनोरथ कदापि निष्फळ व्हावयाचे नाहींत, हें मी तुला निश्चयपूर्वक सांगून ठेवितों. परंतु, या संबंधांत तूं काय तोड सांगणर ती कळूं दे. तुझ्यामतें या प्रसंगीं मीं काय करावें सांग पाहूं ?

रझिया—माझें ह्मणणें इतकेंच कीं, आपणच आपल्या देशावर चढाई करणारे होऊं नका. आपल्या दळांतील लोक आपला हुकूम मान्य करतील, इतकेंच नव्हे तर ते बादशहाशीं आंतून पुरते बिघडले असल्यामुळें आपला पक्ष देखील स्वीकारतील. शिवाय आपल्याला काश्मीराकडूनही मदत मिळेलच.

सिद्धराम—हा तर बादशहाशीं विश्वासघातानें वागण्याचा उपदेश ! याचा मजकडून कदापि स्वीकार व्हावयाचा नाहीं. बादशहानें ज्याअर्थी

मजवर विश्वास ठेविला आहे त्याअर्थी तो विश्वासच खरा करणें माझें कर्तव्य आहे. या माझ्या कर्तव्याचें मजकडून कालांतरींही अतिक्रमण व्हावयाचें नाहीं. आपल्या कर्तव्यकर्माला जागणें हाच मनुष्यमात्राचा खरा धर्म आहे आणि तो मी पाळणार.

रांझिया—ज्याअर्थी आपण बादशाहाचें निमकखात आहां त्याअर्थी आपलेंही ह्मणणें अयोग्य नाहीं हें खरें. परंतु, स्वदेशगौरव म्हणून कांहीं वस्तु आहेना ? पहा ! आपल्या इच्छेस येईल तसें करा. वाटेल तर कर्तव्याला जागा, वाटेल तर स्वदेश गौरव राखा.

सिद्धराम—सुंदरी, तुझ्या या भाषणानें मला खरोखरच कोड्यांत पड-ल्यासारखें झालें आहे. तथापि कर्तव्यकर्माला जागृत राहूनच मी सर्व गोष्टी सुयंत्रपणें सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करणार. मग ईश्वराचे मनांत जसें घडवावयाचें असेल तसें घडवील. तूं स्वतःसंबंधानें मात्र अगदीं बेफि-कीर रहा. तुझ्या एका केसाला धक्का लागला तर त्याचा जिम्मेदार मी; समजलीस.

याप्रमाणें त्या उभयांचें संभाषण चाललें असतां रात्र बरीच होऊन गेली. तेव्हां सिद्धराम परत जाण्याची परवानगी मागूं लागला. त्यावेळीं तिनें त्याला परत जाण्याची परवानगी तर दिलीच; परंतु, ती मोठ्या कष्टानें दिली. सिद्धराम निघून गेल्यावर रांझिया आपल्या आसनावर बसून नानातऱ्हेच्या विचारतरंगांत निमग्न झाली.

पुणे

# खंड ८ वें.

## राजवंशी पाहुणा आणि राजखटपट.

ज्या दूरच्या पर्वताकडे एकाग्रदृष्टीनें पहात असतां कांहीं दिवसापूर्वी एक मनुष्य येऊन भेटला होता, त्याच पर्वताकडे ह्यावेळेस अलहाबादची एक युवती आपल्या माडीच्या सज्जांत बसून पहात होती. आज पावेतों त्यावेळच्या देखाव्यांत कांहींच फेरफार झाला नव्हता. गंगेचें पाणी संथ वहात होतें. झाडांची गर्द छाया पूर्ववतच होती. दूरची पर्वत शिखरें हीं पूर्वीप्रमाणेंच रमणीय भासत होतीं. तसेंच सूर्यप्रकाशानें सर्व वस्तू तेजोमय दिसत होत्या. अहा ! जो पुरुष ह्यावेळस मोठ्या शहरीं ऐषआरामांत आणि राजदरबारीं कामकाजांत गुंतला होता तो ह्या सर्व वस्तू प्रमाणेंच राहिला असेल काय ? काय ! तो पुरुष अद्याप ह्या तरुणीची आठवण करीत असेल ! आणि ज्याप्रमाणें ही स्त्री त्याची तसबीर पाहून रोज आनंद मानीत होती त्याप्रमाणें, तो पुरुष तिच्या तसबीरीची कांहीं थोडीतरी आठवण करीत असेल काय ? अशाप्रकारचा संशय इरावतीच्या मनांत उत्पन्न झाला. आणि त्यामुळें त्या पुरुषाचा अपमान केल्याप्रमाणें तिला वाटलें. कारण; सिद्धरामाला ती जितकी चाहत होती तितकीच त्याच्याबद्दल तिच्या मनांत पूज्य बुद्धि होती. शिवाय त्यांच्या शेवटच्या भेटीचे वेळीं सिद्धराम तिला अती उत्साहपूर्वक उत्कंठेनें वचन देऊन गेला होता. इरावतीला

पाठविलेल्या कितीएक पत्रांतही त्यानें तीं वचनें पुनरपि लिहिलीं होती. आणि हीं पत्रें कितीएक दिवसांपासून बंद झालीं असून तो तिच्या भेटीला कां आला नाहीं ? एखाद्यादिवशीं येऊन इरावतीची भेट घेतल्यावांचून त्याच्यानें राहवले कसें ? खरोखर तो कामांत गुंतला असेल आणि अद्याप त्याला रजाच मिळाली नसेल. पण अरेरे ! ! ती त्याची वाट पहातां पहातां कित्येक दिवस निघून गेले. ते दिवस आणि तास ती मोठ्या आशेनें कंठीत होती.

एके दिवशीं सकाळीं इरावती विचारमग्न बसली असतां एकाएकीं तिच्या बापाच्या येण्यानें ती विचारांतून जागृत झाली. त्यानें हमेशच्या रिवाजाप्रमाणें हलक्या आवाजानें तिला हाक मारिली. आणि म्हटलें, आपल्याकडे आज एक पाहुणें आले आहेत.

वरील शब्द इरावतीचें कांनीं पडतांच तिला अत्यानंद झाला. परंतु, तो तिनें बाहेर बिलकूल दर्शविला नाहीं.

सल्हाण— ज्याचे आदरातिथ्य केल्यानें तुला जितका आनंद होईल; तितकाच त्याला मान दिल्याप्रमाणें होईल. तो पाहुणा राजपुत्र सेलीम आहे; आपल्या बापाच्या इच्छेनुसार अलाहाबाद मुक्कामी थोडे दिवस राहण्याकरितां तो आला आहे.

हें ऐकून इरावतीची फारच चमत्कारिक स्थिती झाली. झालेली चलबिचल बापाच्या नजरेस येऊं न देण्याचा तिनें यत्न केला खरा. परंतु, ती त्याला कांहींच उत्तर देऊं शकली नाहीं.

सल्हाणानें विचारिलें 'कां बरें ? ही बातमी ऐकून तुला आनंद होण्यासारखें नाहीं काय ? तुला जो मान मिळण्याचा आज संभव आहे ' त्याप्रकारचा मान मिळविण्याकरितां आपल्या सर्व वस्तु खुशीनें देणारे पुष्कळ आहेत. राजपुत्राच्या कोणीही अनुचरानें तुला पहावें अशी स्वाभाविक रीतीनें माझी इच्छा नाहीं. आतां पुढें होणारा बादशहा निराळ्याच प्रकारचा आहे. आणि त्याची मेहेरबानी तूं संपादन केलीस तर त्यापासून मला व त्याचप्रमाणें सिद्धरामाला दोघांनाही फायदा होण्याचा संभव आहे. अशी माझ्या मागोमाग ये.

सेलीम ज्या ठिकाणीं बसला होता तेथ इरावती आणि तिचा बाप

गेले. इरावतीला भेटण्याकरितां आणि नम्रतेनें सलाम करण्याकरितां सेलीम पुढें आला; परंतु, एकाएकी त्याची सर्व हिंमत नाहींशीं झाली. तो तटस्थ होऊन स्तब्ध उभा राहिला. असली शांत वृत्ति, त्याबरोबर अपरिमित लावण्य आणि विनय, अनुपमसौंदर्य, तसेंच मोहक आणि रमणीय चेहरा कोणत्याही अन्य स्त्रीचा त्यानें पाहिला नव्हता. इरावतीला सलाम करण्याकरितां सल्हाणानें ती आपली मुलगी आहे ह्मणून सांगेपर्यंत त्याचा हात उचलला गेला नाहीं.

सेलीम—सरदारकन्ये ! तुमच्या पाहुण्याचें आदरातिथ्य करण्याकरितां तुह्मी जी तसदी घेतली आहे त्याबद्दल खरोखर मी तुमचा फारच आभारी झालों आहे. कितीएक वेळां तुमचें नांव माझें ऐकण्यांत आलें आहे, आणि—परंतु जें विनययुक्त वाक्य त्याचें जिभेवर आलें होतें, तें त्याला अतीशय मिळमिळीत आणि अर्थरहित वाटलें; परंतु, जास्त चांगलें वाक्य त्यावेळीं त्याला आठवेना. शेवटीं तो ह्मणाला—तुमची समक्ष भेट होणें खरोखर मोठी आनंदाची गोष्ट आहे.

इरावती—आपल्या सारख्या राजपुत्रानें माझ्या वडिलांना तसेंच मला जो कांहीं मान दिला आहे तो मीं अती मौल्यवान् समजतें. आणि ज्या राजधानींत ऐषआरामाच्या पुष्कळ वस्तु आहेत. त्या राजधानीच्या प्रमाणानें पाहतां आमचें हें शांत अलाहाबाद आपणांस फारसें कंटाळवाणें वाटणार नाहीं अशी मला आशा आहे.

सेलीम—जर कुलीन सरदारकन्या आपल्या भेटीचा लाभ मला वारंवार देईल तर अलाहाबादचा कंटाळा येण्याची मला भिती नाहीं. तुह्मी राजधानीबद्दल ह्मणतां, तरी मला वाटतें तुह्मी ती राजधानी पाहिली आहे काय ?

इरावती—मी आग्र्यास बिलकूल गेलेंच नाहीं.

सेलीम—( आश्चर्यानें ) अगदीं नाहीं ! (सल्हाणाकडे वळून) सल्हाण, तुमच्या चतुर कन्येला ह्या दूरच्या किल्ल्यांत ठेवण्याऐवजी दुनियेच्या खुब्या दाखविण्याचा खरा वेळ हल्लीं आला आहे.

सल्हाण—तिचा भावी पती माझा जांवई ज्याच्यावर आपण पुष्कळ

कृपा केली आहे त्याच्या रक्षणाखालीं राहण्याचा माझ्या कन्येचा निश्चय झाला आहे.

हा विषय राजपुत्राला नापसंत आहे किंवा कसें हें ठरविणें फार कठीण होतें. तो शांत दिसत होता तरी जरा भिवया वर चढविल्या आणि त्या नंतर त्यानें अगदींच निराळा विषय काढिला. थोड्यावेळानें सल्हाणानें इरावतीस घरांत जाण्यास सांगितलें.

इरावती गेल्यानंतर कांहीं तासानें किल्ल्यांतील एका दिवाणखान्यांत सेलीम, सल्हाण आणि एक तिसरा मनुष्य बसले होते. त्यांच्या गोष्टी कोणाच्याही ऐकण्यांत न येण्याबद्दल फार खबरदारी ठेवण्यांत आली होती. कारण, अलाहाबादेंत ऐषआराम करण्यापेक्षां जास्त जरूरीच्या कामाचा विचार करण्याकरितां ते येथें बसले होते. तो तिसरा मनुष्य दुर्गेचा पुजारी गोरख योगी होता.

सेलीम—माझ्या मित्रांनो, ज्या चांगल्या कार्याकरितां आपण झटत आहोंत तें जवळ येत चाललें आहे. हल्लींची व्यवस्था तपासून दुसऱ्या काय काय नवीन युक्त्या केल्या पाहिजेत त्याचा आपण विचार करूं या. सल्हाण, मला वाटतें आपल्या तिघांत तुह्मी जास्त अनुभवी आहांत. राजमंडळांत सर्वांना माझा संशय आला आहे. अबुलफजल! अल्लाह त्याला शापीत करो! ह्या बाबतींत मला माहीत आहे कीं, तो आपल्याशीं दगलबाजी करणारा मनुष्य आहे. त्याचा सूड घेण्याला मला एक दिवस मिळेल. असो. सर्व जाऊं द्या. आतां तुमचा काय विचार आहे.

सल्हाण—हल्लीं सर्व गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणें घडत आहेत. मुसलमानांच्या धर्माबद्दल बादशहा तिरस्कार दाखवीत आहे, अमीर उमरावांचें पुष्कळ हक्क त्यानें हिसकावून घेतले आहेत त्यामुळें आग्रा, दिल्ली, लाहोर आणि दुसऱ्या कित्येक ठिकाणचें अमीरउमराव त्याच्यावर फारच रागावलें आहेत, ते आपणांस साह्य होतील. तसेंच कितीएक मोठमोठाले सरदारही आपणांकडे येऊन मिळतील. ह्याबाबतींत अब्दुलकादिरची आपणांस चांगली मदत आहे, परंतु त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवतां कामाचा नाहीं.

सेलीम— आणि तुमचा सिद्धराम?

सल्हाण— तो पूर्णपणें आपल्या पक्षांत आला आहे. त्याला कशा रितीनें मिळवून घेतलें आहे हें समजण्याची कांहीं जरूर नाहीं. परंतु, असें जाहलें आहे इतकेंच पुरे. अकबराकडील गुप्त बातम्या आणण्याचे कामीं त्याची योजना करण्याचा प्रथम माझा विचार होता. परंतु, लवकरच मला समजून आलें कीं, त्या कामाला तो अगदींच निरुपयोगीं आहे. तो फारच चांगल्या स्वभावाचा आणि राजकीय कामांत बिनप्रपंची असा आहे. कुल्लुकच्या विचाराप्रमाणें त्याला एकमार्गी शिक्षण मिळालें आहे आणि त्यामुळें आपल्या सारख्यांच्या कामांत त्याचा उपयोग होण्यासारखा नाहीं. तसेंच पहिल्याच भेटीच्या वेळीं अकबरानें आपल्या हमेशच्या रितीप्रमाणें त्याला अगदीं वश करून घेतला आहे. तरीपण तो निराळ्याच रीतीनें आपलें काम फारच उत्तम करील. हल्लीं त्याला मनसबूदारची पदवी मिळाली आहे व लवकरच त्याहून चांगला अधिकार मिळेल आणि ठरविलेली वेळ येईपावेतों तो एक मोठ्या रजपूत सैन्याचा अधिकारी होईल. काश्मीरांत त्याची चांगली ख्याती असल्यामुळें त्याच्या पक्षाचे पुष्कळ लोक आहेत आणि आपली योजना सफल होण्याचे वेळीं त्याचा फारच चांगला उपयोग होईल. नेमल्यावेळीं त्याचें सैन्य बादशहावर उलटेल आणि त्याचा दाखला घेऊन दुसरें कितीएक रजपूत व पठाण सरदार अकबरावर उलटतील.

सेलीम—पण काश्मीर संबंधीं योजना कशी काय आहे ?

सल्हाण— ह्याहून दुसरी चांगली योजना कोणतीच नसेल. आपण तेथें अपसांत उपस्थित केलेला विरोध फारच भयंकर थराला जाऊन पोहोंचला आहे. त्यांनीं एकमेकांवर शस्त्रें उचललीं आहेत, लुटारू लोकांनीं लूट फार सुरूं केली आहे आणि जास्त आनंदाची बातमी ही आहे कीं, आसपासच्या अकबराच्या राज्यांतील प्रदेशांतही मोठी चळवळ सुरूं झाली आहे. अकबराच्या वार्षिक उत्सवानंतर तो स्वतः एका मोठ्या सैन्यानिशीं काश्मीरावर स्वारी करून तेथें अक्षईची शांतता स्थापन करण्याकरितां जाणार आहे. लढाई सुरूं होतांक्षणीं आपला सिद्धराम आणि त्याच्या लष्करांतील मनुष्यें अकबराला सोडून काश्मीरच्या सैन्याला जाऊन मिळतील. त्यामुळें अकबराला परत जाण्याचा प्रसंग येईल.

ह्याच सुमारास आग्र्यांतील आपला पक्ष तुह्मांस सिंव्हासनावर बसवून किल्ला आणि राजकोश ताब्यांत घेईल. अकबर जरी सुखरूप परत आला तरी त्याच्या बरोबर युद्ध करण्याकारितां आपणांस पुष्कळसें सैन्य मिळेल. माझ्या समजुतीप्रमाणें शेवट परिणाम असा होईल कीं, त्याच्या पश्चांत गादीचे वारस तुह्मीच असल्या कारणानें राज्य तुमच्या स्वाधीन करून अकबर स्वस्थ बसेल.

सेलीम—सर्व व्यवस्था तर बरोबर झाली आहे. आपल्या युक्तीप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत आहेत, हें पाहून मला फारच आनंद वाटतो. तरी एक प्रश्न विचारतो. आपल्या युक्तीबद्दल कोणासही कांहीं बातमी लागण्याची तर भीति नाहींना? त्या बाबतींत चांगली खबरदारी ठेविली आहेना? पुराव्यादाखल आपण कश्मीरांत पाठविलेलें पत्र कदाचित् दुसऱ्या कोणाच्या हातीं गेलें तर ?

खल्हाण— तें पत्र ज्याला पाठविण्याचें होतें त्यालाच तें मिळालें आणि त्या बाबतींत तुमचा अंदाज कसा काय आहे ? तें पत्र नेणारा कोण असेल ? दुसरा कोणीही नाहीं. परंतु, कल्लुक स्वतःच.

सेलीम— अरे, केवढा मोठा हा अविचार !

सल्हाण— कांहींच नाहीं. त्या भल्या गृहस्थाला त्या पत्राबद्दल कांहींच संशय आला नाहीं. कारण, तें पत्र सिद्धरामानें त्याला दिलें होतें. यदाकदाचित् त्यानें तें वाचलें असतें तरी देखील तो त्याचा परिस्फोट करूं शकला नसतां. कारण, आपलीं नांवें त्यांत नव्हतींच आणि आपला कोणत्याही रीतीनें संशय आलाच नसता.

सेलीम— फार उत्तम केलें. तुह्मी दिलेल्या या वर्दीबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. पण वंद्य गोरख योगिराज आमच्या उपकाराला पात्र झाले नाहींत. ते आपले साह्यकर्ते नाहींत काय ?

गोरख— खरोखर मी तुमच्या मदतीला आहे. मी कांहीं स्वस्थ बसलों नाहीं. तुह्मास बोलल्याप्रमाणें—– पण जी गोष्ट तुह्मी असंभाव्य समजत होतां— ती, मी थेट राजमहालांत पोहोंचलों आहे इतकेंच नाहीं. परंतु, अकबराच्या खाजगी बैठकीच्या जागेंत माझा प्रवेश झाला आहे. त्याच्या राज्यांत निरनिराळे धर्मपंथ आहेत, त्यांची न्यायशास्त्रें शिक-

ण्याला तो किती तरी आतूर आहे हें तर तुह्माला माहीतच आहे. त्यामुळें अस्सल योगविद्येचें नियम ज्या बाबतींत त्याच्या पुष्कळ ऐकिवांत आहेत तरी स्वतःला त्याची कांहींच माहिती नसून फैजी किंवा कुल्लुकच्या विद्वत्तेचाही त्या बाबतींत उपयोग होण्यासारखा नाहीं. अशा योगविद्येच्या नियमांची चांगली माहिती मिळविण्याची त्यानें इच्छा दर्शविली होती. त्यावरून कित्येक विश्वासू मित्रांमार्फत योगशास्त्रांत माझ्या प्रवीणतेबद्दलची गोष्ट त्याचें कानांवर जाण्याची मी व्यवस्था केली. थोड्यावेळानें मला दरबारचें आमंत्रण आलें. अकबराच्या रूबरू जाऊन त्याच्या इच्छेनुसार योगशास्त्राच्या कितीएक मूळतत्वांची माहिती दिली; कीं, ज्या योगक्रियेनें मनुष्यप्राणी परमात्म्याच्या निकट संबंधांत पोहोंचतो, चित्तवृत्ती स्थीर होते आणि परमात्मीय नित्यतेच्या विचारांत तल्लीन होऊन परमात्मस्वरूपीं लीन होतो. अशा स्थितीला पोहोंचला असतां एकच जागेवर राहून पाहिजे तितक्या दूर आत्म्याला घेऊन जाण्याची, मर्जीस वाटेल तें रूप धारण करण्याची, अदृश्य होण्याची, तसेंच हवेहूनही हलके होण्याची शक्ति त्याचे अंगीं येते. मात्र विश्वासावर आधार न ठेविता प्रत्यक्ष प्रमाण दाखविण्याकरितां जादू किंवा हातचलाखींत प्रवीण अशा माझ्या एका शिष्याला त्याचेकडे मी घेऊन गेलो आणि त्याचेकडून जमीनीपासून अधर राहण्याचा एक खेळ करून दाखविला. हा खेळ खरोखर आश्चर्यचकित् करण्यासारखा आहे आणि फुरसतीच्यावेळीं तुह्मासही तो करून दाखवीन. तो खेळ पाहून बादशहाला फारच आश्चर्य वाटलें इतकेंच नाहीं, तर आमची गूढ विद्या शिकण्यालाही तो तयार झाला. त्याची आतूरता जास्त वाढविण्याच्या उद्देशानें जरूर दिसेल तितकींच हकिकत मी त्याला सांगत असतो. त्याच्या पुढें समक्ष जाण्याचा वारंवार मला प्रसंग येतो; आणि असली संधी फुकट दवडणारा मी नाहीं. आपल्या कामांस आगत्याची तेवढी सर्व बातमी माझीं मनुष्यें मला येऊन सांगतात. अकबर धर्मांध आणि फकीर लोकांपासून सावध तो काय राहणार ! परंतु, त्याच्या महालांत आणि खाजगी जागेंत जाणारीं येणारीं मनुष्यें बातम्या काढीतच असतात; त्यामुळें सेलीम आणि माझें मित्र सल्हाण, तुह्मास ज्या बातमीची माहिती अन्यमार्गांनें मिळणें कठीण ती सर्व मी देऊं शकतों.

सेलीम—- मला कबूल केले पाहिजे कीं, तुह्मीं खरोखर जादूगाराप्रमाणेंच आहांत. परंतु, आमच्याकरितां तुह्मी जी मेहनत घेतां त्याबद्दल तुह्मीं काय मागतां ? मी समजतों कीं माझ्या हातीं अधिकार आल्यावर सल्हाणाची काश्मीरचा अधिकारी होण्याची इच्छा आहे. ह्या सर्व गोष्टी घडून त्यांची इच्छा सफळ होईल. त्यांची मेहनत पहातां त्यांचें कांहीं विशेष मागणें नाहीं. परंतु, तुमची इच्छा काय आहे ? पहिल्यानेंच ही गोष्ट नक्की झालेली चांगली.

गोरख—जर मी कांहीं न मागितलें, तर तुह्माला आश्चर्य वाटेल नाही बरें ! पण ह्या बाबतींत मला उघड उघड सांगितलें पाहिजे. उलट मीच तुह्माला प्रश्न करितों कीं, तुह्मासच काय पाहिजे ? कोणी असें अनुमान करील कीं मनुष्य प्राण्याला ज्याची अपेक्षा आहे तें सर्व आपणांस अनुकूळ आहे. तुमच्याजवळ धन आहे, दौलत आहे, राजमहाल आहे, सुंदर स्त्रिया तुमच्या सेवेंत हजर आहेत, आनंदी मित्र आहेत, पाहिजे तशी उंची मदिरा पिण्यास मिळते आणि ह्या समर्थ तसेंच आबाद राज्यांत फक्त बादशहाच्या खालोखाल तुह्मीच आहांत. इतकें असून तुह्मांस असल्या भयंकर भानगडींत पडून आमची तसेंच तुमच्याहून खालच्या दर्जाच्या आणि तुमच्या हाताखालच्या मनुष्यांची मदत घेण्याची जरूर पडली ती कां ह्मणोन ? फक्त इतक्यांच करितां कीं, एकदम राज्य करण्याची तुमची इच्छा झाली आहे. तुमच्या वडिलांचा मरणकाळ येई तोंपर्यंत थांबण्याचें तुमच्यांत धैर्य नाहीं. आतां ह्यावरून तुह्मीही समजला असालच कीं ज्या वस्तूची तुह्मास अपेक्षा आहे त्याचीच मलाही आहे. ती कोणती म्हणाल तर दुसऱ्यावर राज्य करणें. अरे ! पण हलीं तुमच्या ताब्यांत तर कांहींच नाहीं आणि मी तर कधीपासून राज्य करीत आहे. हजारों मनुष्यें जरूर पडल्यास दुनियेच्या राज्यकर्त्या समोर सैन्यादाखल तयार होऊं शकतात. कांहींएक संशय घेतल्यावांचून किंवा हो ना केल्यावांचून माझी सहज सूचना होतांक्षणीं ते माझ्या आधीन होतात. मी एक गरीब, लोकांत अप्रसिद्ध पुजारी, ज्याचा पुष्कळ लोक तिरस्कार करितात तो मी—खाखी—नग्नयोगी—येवढी सत्ता भोगीत आहे कीं, तुमच्या पूर्ण वैभवांत देखील तुह्मी माझी बरोबरी करूं शकणार नाहीं. हे सर्व कशाच्या जोरावर माझ्या आधीन

आहे ? फक्त एक धर्मांधपणाच्या जोरावर; कीं ज्याचा प्रतिबंध कोणतीही वस्तु करूं शकत नाहीं. जेथें न्यायाचा निरुपयोग होतो, इच्छेचा ऱ्हास होतो, मनुष्यप्राणी एकाद्या चलनवलन असलेल्या बाहुलीपेक्षां जास्त समजला जात नाहीं. ज्याचे बाबलींत माझी इच्छा होईल मग तो तुझी असा किंवा कोणीही असो त्याचेकडे माझें बोटाची खूण होतांक्षणीं कधीही संतुष्ट न होणाऱ्या दुर्गेला कोणता नवा बळी पाहिजे तें माझ्या सेवकापैकीं कित्येकांच्या तात्काल लक्षांत येतें. बलिदानाकरितां निर्माण झालेला मनुष्य जसा प्रतिष्ठित असेल त्याप्रमाणें जास्त उत्सुकतेनें काम होतें. नेमलेल्या मनुष्यास कदाचित् माहिती मिळाली आणि त्यानें पाहिजे तितकी सावधगिरी ठेविली तरी फक्त दैवी कर्मानेच त्याची मुक्तता होते. बाकी हातीं लागल्यावांचून तो कांहीं रहात नाहीं. बलिदानाकरितां ठरलेल्या मनुष्याबरोबर माझे विश्वासू शिष्य रात्रंदिवस राहतात; आणि चांगली संधी पाहून रात्रीच्या वेळीं कोणासही संशय न येईल अशाप्रकारें कांहीं आवाज न होतां एकाएकीं त्याचे गळ्यांत दोरी पडते, आणि ओरडण्यास किंवा दुःखोद्गार काढण्यास त्याला वेळ मिळत नाहीं आणि दुर्गेला दिलेल्या अगणीत बळींत त्याचीही भर पडते. क्वचित्काळीं माझा शिष्य पकडला गेला तर त्या पकडणाऱ्या मनुष्याचें हातून एकाद्या सर्पाप्रमाणें निसटून तो आलेल्या मार्गानें अदृश्य होतो. यदाकदाचित् रस्ता नच मिळाला आणि हातींच लागला तरी त्यांत काय ? परमसुख मिळण्याच्या खात्रीनें तो आपला देह अर्पण करितो आणि ज्या कामांत तो निष्फळ जाहला असेल त्याचा यत्न करण्याकरितां दुसरें हजारों तयार होतात आणि लौकरच आपलें कार्य शेवटांस नेतात.

इतके बोलून तो योगी शांत झाला. दोघां पैकीं कोणीही एक शब्द पण बोलला नाहीं. ज्याला ह्या सर्व विचित्र गोष्टी पूर्ण माहीत होत्या, तो सल्हाण शांतपणानें सर्व कांहीं ऐकत होता. परंतु सेलीम जरी हिंमतवान् होता तरी पुजाऱ्याचे हे शब्द ऐकून फिका पडला व त्याच्याकडे पहात विचारमग्न झाला.

गोरख—तेवढ्याच करितां माझ्या रीतीप्रमाणें मीही राज्य करीत आहे.

जे माझ्यासमोर होतात त्याना कोणत्याही प्रकारचा संशय न येतां मी आपल्या मार्गांतून दूर करितो. ज्यांना माझी शक्ती माहीत आहे ते मला भिऊन वागतात. आणि उच्च किंवा हलक्या प्रतीचे कोणीही असोत ते सर्व माझ्या आज्ञेंत वागतात. आणि अशाप्रकारची सत्ता माझे हातीं असल्याकारणानें मला जो कांहीं आनंद होतो तो तुमच्या आनंदाहून जास्त नाहीं काय ? तुमचा अपमान करणाराचें जिवित्व तुमच्या हातीं आहे त्याबद्दल तुह्मास गर्व वाटत नाहीं काय ? असल्याप्रकारचे विचार करणारा कांहीं मी एकटाच नाहीं. दुनियेंत जे मोठें राजकर्ते मोजले जातात त्यांच्यावर आपला शह ठेवण्याचे उद्देशानें परदेशीय लोक गुप्तरीतीनें प्रयत्न करीत आहेत ते मी जाणून आहे. पश्चिमेकडून आलेल्या लोकांबरोबर आग्रच्यांत तसेंच दुसऱ्या कित्येक जागीं माझें संभाषण झालें आहे. ते लोक येथील प्रजेला ‘ आपल्या धर्माचा उपदेश करून ’ स्वधर्म भ्रष्ट करण्याच्या यत्नास्तव येथें आलें आहेत. त्यांचा उपदेश आनंदानें ऐकण्याचें ढोंग करून त्यांचा उपदेश काय आहे तें मी हळू हळू समजून घेत असतों. त्यावरून समजतें कीं, जरी त्यांचा ईशभक्तीचा मार्ग निराळ्याप्रकारचा आहे तरी कांहीं बाबतींत सारखाच आहे. आह्मी मनुष्यांचा गळा दाबून त्यांचा जीव घेतो आणि ते जिवंत मनुष्याला जाळितात. आतां जरी ह्या बाबतींत त्यांच्या धर्मगुरूला पुष्कळप्रकारचा त्रास सोंसावा लागतो तरी असल्या बाबतींत प्रतिबंधही करण्यांत येतो. तरी त्या धर्मगुरूच्या इच्छेआधीन होऊन ते त्याच्या मर्जीनुरूप वागतात. ही हकिकत प्रथम विचित्र वाटण्यासारखी आहे तरी ह्यावरून तुह्मीं समजलें असालच कीं सत्ता मिळविणे आणि तिचा उपभोग घेणे बाहेरच्या डामडौलावर किंवा दुसऱ्याच्या कबूल करण्यावर नाहीं.

गोरखनें भाषण संपविलें तरी देखील सेलीम कांहींएक बोलल्याबांचून चमत्कारिक दृष्टीनें गोरखकडे पहातच राहिला.

गोरख ( आपल्याशींच हंसून )– आपल्या मनांत ह्यावेळेस काय विचार चालले आहेत ते मी समजूं शकतों. माझ्यासारखा मदतगार एकादें वेळीं घातक होण्याचा संभव–करितां अशा मनुष्याला दूर करणें योग्य होईल किंवा नाहीं; असा एक प्रश्न तुमचें मनांत उत्पन्न जाहला आहे.

परंतु, वाघाच्या गुहेंतून परत येण्याची खात्री नसल्यास तींत प्रवेश करण्याचें साहस करणारा भोळा मनुष्य मी नाहीं. त्या दूरच्या पर्वतावरील देवळांत माझे सेवक माझी वाट पहात आहेत. सकाळ पावेतों मी त्यांना जाऊन भेटलों नाहीं तर दुर्गादेवीनें स्वतः पसंत केलेल्या पुजाऱ्यामार्फत कोणाला बळीदाखल पसंत केले आहे हें ते ताबडतोब समजतील.

सेलीम—तुमच्या हमेशच्या शहाणपणाप्रमाणें तुह्मी युक्ती करून ठेविली आहे. पण पूज्यगुरू गोरखराज, अशाप्रकारची सावधगिरी ठेवण्याची कांहीं जरूर नाहीं. पुष्कळ कामांत आह्मांस तुमची जरूर आहे, आणि कांहीं कारणावांचून आह्मीं तुमची मदत सोडणार नाहीं. पण मला वाटतें कीं मुख्याचा विषय सोडून आपण भलतीचकडे वळलों. एका बाबतींत मला जरा संशय आहे. सल्हाण, तुमचे मेहुणे जे काश्मीरचे प्रधान आहेत त्यांचेकडून आपणास मदत होईल काय ? ते आपल्या पक्षांत येतील ? अथवा तसे न झाल्यास ते आपणांस विघ्नकर्ते होतील काय ?

सल्हाण—मला त्यांची फारच धास्ती वाटते. तितकी शक्ती त्यांचे अंगीं आहे खरी. हल्लींचें राजाचा पक्ष ते सोडणार नाहींत. जरी हरले तरी ते आपणांकडे न येतां अकबराला जाऊन मिळतील. कारण, आपण त्यांच्या देशाला तसेंच प्रजेला त्रास देऊं अशी त्यांची समजूत आहे.

गोरख—असे असेल तर त्यांना माझें स्वाधीन करा.

सेलीम—तुह्मी काय कराल ?

गोरख—कांहीं प्रश्न विचारण्याची जरूर नाहीं. मी सांगतो कीं त्यांना माझें स्वाधीन करा आणि ते तुह्मांस कांहीं हरकतकर्ते होणार नाहींत. ह्याहून एक अगत्याची बाबत तुह्मांस सांगण्याची राहिली आहे. काश्मीरचा एक महान् पुरुष जो कांहीं वर्षांपूर्वीं मरण पावला ह्मणून वदंता आहे आणि जो स्वदेशी गेला तर आपल्या सर्व युक्त्या मोडून काढील तो मनुष्य अद्याप जिवंत आहे आणि ही गोष्ट खरी मानण्यास सबळ कारणेंही आहेत.

सेलीम ( अतिशय घाबरून )—काय ? हे तुह्मी काय बोलतां ? तुह्मी ज्याचे बाबतींत सांगत असतां तो ?

गोरख—तुह्मी अंदाज केला त्याच मनुष्याबद्दल मीही ह्मणतों, आणि तो, तो नंदीगुप्त !

सेलीम—काय नंदीगुप्त ! अगदीं असंभवनीय.

गोरख—कां बरं ? त्याच्या मृत्यूबद्दल कधींही खात्रीलायक माहिती मिळाली नाहीं. आपणांस इतकेंच माहीत आहे कीं, तो एकाएकीं नाहींसा झाला. त्यानंतर त्याचे बाबतींत कोणासही कांहीं माहीत नाहीं. बद्रिनाथाजवळ हल्लीं एक तपस्वी रहात आहे, त्याचें शरीराचा वर्ण वगैरे पूर्वीच्या राजासारखाच आहे. इकडे येतेवेळीं कुल्लुक आणि सिद्धराम त्याला भेटण्याकरितां गेले होते.

सेलीम—हे तर मोठे भीती बाळगण्यासारखें आहे.

गोरख—खरी बातमी काढण्याकरितां मी माझीं मनुष्यें ताबडतोब पाठविलीं आणि मला जो संशय होता तो खरा ठरला. ( ह्या सुमारास त्याचे दोघेही श्रोते समजतील अशी कांहीं खूण त्यानें केली. ) खरोखर दुर्गादेवी दुसऱ्याप्रमाणें त्याचाही स्वीकार करील. माझ्या सेवकांना जाऊन भेटण्याची वेळ झाली .आतां मी रजा घेतों.

सेलीमनें डोकें हालवून त्याला जाण्याला रजा दिली. त्या पुजाऱ्याला किल्ल्यांतून बाहेर जाऊं न देण्याची त्याची इच्छा झाली खरी; परंतु, ह्या वेळेस तर ते तिघेही आपआपल्या ठिकाणीं निघून गेले.

कधीं कधीं आपल्या बगीचांत इरावती एकटीच फिरत असे. सेलीम अलाहाबादेंत आला त्या दिवसापासून दररोज सायंकाळीं किल्ल्यांत चाललेल्या मेजवानीची गडबड तिच्या ऐकण्यांत येत असे. आनंदी मित्र आणि सुंदर नृत्य करणाऱ्या युवतीबरोबर हिंदुस्थानचा भावी बादशहा त्या ठिकाणीं मेजवान्या उडवींत होता. कारण सगळ्या दिवसाच्या श्रमपरिहारार्थ आणि आपण होऊन उपस्थित केलेल्या चिंता आणि काळजीचा कांहीं तरी विरस पडावा ह्मणून त्यानें हा मार्ग शोधून काढिला होता. इरावतीची निमकहलाल दासी निपुणिका आवांतर चाकरा बरोबर मिसळत असे आणि मेजवानीच्या ठिकाणीं वारंवार डोकावीत असे. ती केव्हां केव्हां आपल्या मालकिणीला एकंदर हकिकत येऊन सांगत असे. परंतु, ह्या गोष्टी ऐकून इरावतीला राग येत असे, आणि असल्या गोष्टी मनांत ठेवण्याला ती

आपल्या दासीस सांगत असे. आम्यास अशाचप्रकारच्या मेजवान्यांत सिद्धराम मिसळत असेल काय ? असल्या मोठ्या राज्याचा होणारा बादशहा आणि कोट्यावधी प्रजाजनांवर राज्य करण्याकरितां निर्माण झालेला हा सेलीम ज्याला दैवानुसार असली उच्च प्रतीची स्थिती प्राप्त झाली आहे त्याचें असलें अधमपणाचें वर्तन ऐकून तिला वाईट वाटत असें.

सल्हाणासमक्ष इरावती आणि सेलीमच्या वारंवार भेटी होत. एकाद्या चांगल्या वर्तणुकीच्या सभ्य गृहस्थाप्रमाणें त्याचें इरावतीशीं वर्तन असे ज्याप्रकारच्या वर्तनांत एकादी महान् चतुर राजकन्याही दोष काढूं शकणार नाहीं. तिच्याबरोबर जे शब्द सेलीम बोलत असे त्यांत खुशामत किंवा पोकळ विनयाचा कांहींएक भास होत नसे. परंतु, सरळ आणि स्वाभाविक रीतीचें शब्द त्यांचे तोंडून निघत. त्याच्या गोष्टी गमतीच्या असत. त्याला चांगलें शिक्षण मिळालें असून त्यानें चांगलें ज्ञान प्राप्त करून घेतलें आहे. असें त्याच्या एकंदर वर्तनावरून स्पष्ट दिसत होते. इरावती कितीएकवेळां मनांतल्या मनांत विचार करीत असें कीं, त्याच्या ह्या सर्व उत्तम गुणांचा तो चांगला उपयोग करील आणि आपल्या सद्गुणी पित्याचे गुणग्रहण करून त्याप्रमाणें वर्तन ठेवील आणि तें त्याचें कर्तव्यकर्म आहे असें तो समजेल तर किती चांगलें.

एके दिवशीं सायंकाळीं विचारांत तल्लीन होऊन इरावती बगीच्यांतील एका बैठकीवर बसली होती. ह्यावेळेंस सर्वत्र शांतता पसरली होती. किल्ल्यांत मेजवानीची वगैरे कांहींएक गडबड दिसत नव्हती. खिडक्यांत आणि सज्यांत कोठें कोठें दिव्यांचा उजेड दिसत होता. सर्वत्र शांतता पाहून तिला आश्चर्य वाटलें. फक्त उष्ण वायूची झुळुक वृक्षपर्णांतून वहात होती. आणि वृक्ष शाखा हळूं हळूं हालत होत्या. केव्हां केव्हां मधुर वेणूरव दूरच्या खद्यांतून ऐकूं येत होता, पक्षांचा किल्किलाट तसेंच मनुष्यांची जाण्यायेण्याची चाहूल बंद झाली होती, मात्र मळ्यांतून चालू असलेल्या मोटीचा चूं चूं असा ध्वनी निघोन सारंगी सारखा भास करीत होता, ह्यावरून असें अनुमान होत होते कीं, त्या शेंतकरी लोकांची मेजवानी चालली असावी.

परंतु त्या व्यापून राहिलेल्या शांततेंत एकाएकीं मनुष्याचें पावलांचा

आवाज ऐकूं आला. आणि सायंकाळच्या मंदप्रकाशांत एका मनुष्याची आकृती इरावती ज्या जागेवर बसली होती तिकडे येतांना तिच्या नजरेस पडली. त्रासून ती एकदम उभी राहिली. परंतु, तो पुरुष सेलीम स्वतः आहे असें पाहून तिला फार आश्चर्य वाटलें. सेलीमनें तिच्याजवळ येऊन आपल्या हमेशाच्या रिवाजाप्रमाणें तिला सलाम केला.

सेलीम (नम्रस्वरानें)—कुलीन सरदारकन्ये, तुह्मी येथें असाल असें मला माहीत नव्हतें. तुमच्या मर्जीउपरांत विक्षेप करण्याबद्दल मला क्षमा करा. माझा सलाम कबूल करा, आणि मी जास्तवेळ तुह्मांस तसदी देणार नाहीं.

इरावती—कांहीं हरकत नाहीं, तरी पण मी कबूल करितें कीं मी जरा घाबरलें खरीं. मी समजत होते कीं, आपल्यासारख्या राजपुत्रांना हा सायंकाळचा आणि रात्रीचा वेळ शांत रतिनें एकांतात फिरण्याऐवजी निराळ्याच प्रकारच्या ऐषआरामांत घालविण्याची संवय आहे.

सेलीम—तसा प्रकार होता खरा, आणि त्याबद्दल मला टपका देण्याचा तुमचा हक्क आहे खरा. ज्या घरांत तुह्मी राहतां त्या घरांत जास्त मर्यादेचें मला वर्तन ठेविलें पाहिजे, पण झाल्या गोष्टीला उपाय नाहीं. गतगोष्टीची आठवण करण्यांत फायदा काय ? ह्याउपर फाजील गडबड होऊन तुमच्या महालांत तुह्मांस त्रास होणार नाहीं. तसेंच रात्रीच्या शांततेंतही व्यत्यय येणार नाहीं.

इरावती हें ऐकून तटस्थ झाली. ह्याप्रमाणें सेलीम सर्व गोष्टीचा कां ह्मणून खुलासा करीत आहे, आणि त्याच्यांत असा एकाएकीं फेरफार होण्याचें कारण काय ?

सेलीम— माझ्या वर्तनांत फेरफार झाला आहे. आणि मी समजतों कीं, तो कांहीं असातसा नाहीं, तो फारच थोड्या अवकाशांत झाला आहे. आजपावेतों मी फारच ... झालो होतो. मी सांगतों ते ऐका भिऊन दूर सरूं नका. कारण, मी सर्व गोष्टी तुमच्या पुढें कबूल करणार आहे. आज तुह्मी माझे दोष श्रवण करा, आणि मी दोष स्वीकारतों. माझ्या दोषांचा भार कमी करितों आणि तुह्मी त्याकरितां दोष श्रवणगुरु योग्यच आहांत. आजपावेतों मी ऐष-

आरामांत गुंग झालों होतों, बहुतेक वेळ मी बदफैलींत काढीत होतो, आणि वारंवार छाकटा बनत होतो, कोणतीही गोष्ट छपविण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु, हल्लीं तशाप्रकारच्या वर्तनापासून मी दूर झालों आहे, पूर्वीप्रमाणें आतां माझें वर्तन नाहीं. माझी पूर्वीची वर्तणूक अगदींच बदलली आहे, आणि आजचा सेलीम त्यावेळच्या सेलीमहूनही अगदींच निराळ्याप्रकारचा मनुष्य आहे. ह्यावेळेपासून मी माझें कर्तव्यकर्म करण्यांत, प्रतिष्ठा मिळविण्यांत आणि कधींतरी माझ्या ताब्यांत येणाऱ्या प्रजेचें कल्याण करण्याच्या कामीं माझें आयुष्य घालवीन. सर्व लोभी आणि अघटित विचार माझें मनांतून टाकिले आहेत आणि विशेषेंकरून त्या हलक्या आणि निरुपयोगीं गमती, दैवयोगानें प्रथमपासूनच तुमची माझी भेट झाली असती तर ह्या सर्व बाबतींत किती महदांतर पडलें असतें ? माझ्या सुखाची सीमाच राहिली नसती, आतां तर ती वेळ गेलीच. तशी वेळ पुन्हां मिळणारच नाहीं. अफसोस ! !

इरावती—कुलीन राजपुत्र ! तुह्मी तुमच्या स्वतःच्या बाबतींत अन्याय करीत आहांत. तुम्हीं स्वतःला दोष द्या. परंतु स्वतःचा तिरस्कार करणें योग्य नाहीं. खात्रीपूर्वक समजा कीं, जरी मी तुमची कधींही होऊं शकत नाहीं, तरी तुम्हांस तुच्छही समजत नाहीं, तसेंच तुमचा तिरस्कारही करीत नाहीं. खरें विचाराल तर हल्लीं मी तुह्मांस ओळखीत आहे. आणि ह्या स्थितींत प्रेमरूपी संबंधानें मी दुसऱ्याशीं बांधली गेलेली आहे. ह्यापूर्वीं तुमची माझी ओळख झाली असती तर कदाचित् तुमच्या प्रेमाचा माझ्यानें बदला दिला गेला असता. खरोखर मी वचनभंग करावा अशी तर तुमची इच्छा नसेलच, कदाचित् मी वचनभंग केला तर माझ्याबद्दल तुमच्या मनांतील ज्या पूज्यबुद्धिमुळें प्रेम उत्पन्न झालें आहे ती पूज्यबुद्धि राहील काय ? नाहीं. तुमच्या मनांत माझ्याबद्दल तिरस्कार, धिक्कार, अपवाद, दिलगिरी आणि दोष हें सर्व एकदम उत्पन्न होतील. परंतु, ती बाबत हल्लीं जरी असंभवनीय आहे, तरी मोठ्या अधिकाराला भाळणारी कांहीं मी स्त्री नाहीं हे खास समजा. ज्या प्रकारच्या ऐषआरामांत तुह्मीं वेळ घालवितां तशाप्रकारचा ऐषआराम मला कधींच आवडला नसतां, आणि माझ्यावर जी मोठी जोखमदारी

टाकण्यास तुह्मी तयार आहांत ती माझ्यानें सहनही झाली नसती. मी अशाप्रकारचा उपभोग घेण्याकरितां माझ्या समजुतीप्रमाणें जन्मास आलेली नाहीं. परंतु, जी गोष्ट आतां कधीं होऊं शकत नाहीं त्याबाबतींत ‘ असें असतें किंवा तसें असतें तर असें झालें असतें. ’ असें फुकटचे विचार करण्याची काय जरूर आहे ? ज्या दैवीमायेच्या हातीं आपणा सर्वांच्या नशीबाची दोरी आहे. तिनें आपणांस निरनिराळ्या मार्गानें नेलें आहे. आणि तिनें तुमच्या बाबतींत तसेंच माझ्याही बाबतींत योग्य न्याय केला आहे ह्मणून तिच्या आधीन आपणांस झालें पाहिजे. समुद्राला सदोदित लाठा असणारच ! मला ज्या स्थितींत आपण पहातां त्याच स्थितींत राहूं द्या. आतां आपण जा आणि कायमचे मला विसरा. कदाचित् माझी आठवण झाल्यास ज्यावेळेस माझ्याबद्दल तुमचे मनांत चांगल्याप्रकारचें विचार आले असतील त्या वेळच्या विचाराप्रमाणें माझी आठवण करा. माझ्या बाबतींत विचारीत असल्यास मी सांगतें कीं, भविष्यांत मी तुमची आठवण करीन. आणि मला पूर्ण आशा आहे कीं, तुह्मीं राज्याधिकारी झाल्यावर सत्कृत्यें करून आपण यशवृद्धि कराल. ‘ त्याचप्रमाणें खात्रीपूर्वक समजा कीं, तुमच्या अगणित प्रजाजनांपैकीं एक स्त्री जी हल्लीं तिला एकटीला सोडून जाण्याची, त्याचप्रमाणें तुमच्या इच्छेआधीन न होण्याची, सक्त रीतीनें विनंति आहे; त्या स्त्रिहून कोणीही मनुष्य जास्त आतुरतेनें तुह्मीं आपल्या आयुष्यांत काय काय सत्कृत्यें करितां त्याबद्दल जास्त विचार करणार नाहीं. ’

ज्या जुलमी आणि स्वैर वर्तन करणाऱ्या राजपुत्राच्या सर्व आयुष्यांत त्याच्या समोर होण्याचें कोणीहि धारिष्ट केलें नव्हतें तो राजपुत्र योग्य उत्तर शोधण्याचा प्रयत्न करूं लागला. त्या युवतीसमोर जड मूर्तिप्रमाणें स्तब्ध उभा राहिला. बोलण्याचा यत्न केला परंतु, नानाप्रकारचे तरंग त्याचे मनांत उद्भवून प्रत्युत्तर देण्याची त्याची हिंमत झाली नाहीं. शेवटीं तो इरावतीजवळ गेला आणि अदबीनें तिला सलाम करून एकही शब्द बोलल्यावांचून परतला आणि आंधारांत कोठें चालता झाला तेही इरावतीस समजलें नाहीं.

दुसरें दिवशीं सकाळीं खबर मिळाली कीं. राजपुत्र एका चाकरानिशीं अलाहाबादचा किल्ला सोडून चालता झाला. ही बातमी एकाएकी ऐकून सल्हाण फारच घाबरला. परंतु, सेलीमच्या जाण्याबद्दल कोणासही कांहीं माहिती नव्हती.

## खंड ९ वें.

### सिद्धराम आणि फेजी.

एके दिवशीं सकाळीं सिद्धराम बाजारांत फिरण्याकरितां निघाला. दुकानांत नानाप्रकारच्या वस्तु शोभतील अशा रीतीनें मांडून ठेविल्या होत्या. ज्या ठिकाणीं खरीददार लोकांची पुष्कळ गर्दी जमली होती अशा ठिकाणीं तो इकडून तिकडे फिरत होता. बाजारांत एकच गर्दी उसळली होती. निरनिराळ्या प्रकारच्या लोकांचें मिश्रणानें विचित्र आणि आश्चर्यजनक शोभा आली होती. निरनिराळ्या प्रतिनिधींच्या टोळ्या इकडून तिकडे फिरत होत्या त्या गर्दीत तद्देशीय कमजास्त फिकट चेहऱ्यांचे, हिंदु, तसेंच चमत्कारिक आणि गलिच्छ पोशाक केलेले त्यांचे नोकर फिरत होते. तसेंच राज्यकर्त्यांच्या जातीचे मगरूर लोक, इराणी, आरब, त्याचप्रमाणें पश्चिमेकडून आलेले तार्तरी, आर्मेनियन, यहुदी आणि पूर्वेकडून आलेले ज्यांच्या शेंड्या लांबलचक आहेत,

अंगांत सैल आणि पायघोळ आंगरखे आहेत असें कांहीं चिनी लोकहीं होतें. ह्यांच गर्दींत कांहीं मनुष्यें पाहून सिद्धरामास आश्चर्य वाटलें. कारण, तशाप्रकारचीं मनुष्यें त्यानें पूर्वीं कधींच पाहिली नव्हती. त्यांचे डोक्यावर पिसे लावलेल्या बाजूनें रुंद आणि अणीदार अशा टोप्या होत्या, अंगरख्या ऐवजी जाडे डगले घातले होते, इजारी सैल होत्या आणि पायांत उंच टाचेचे आणीवांचूनचे आणि गुडघ्यापर्यंत लांब जोडे होते. जे धर्मगुरू पाद्री नुकतेंच बादशहाकडे जाऊन आले होते त्यांचे बरोबर हे लोक ह्यावेळेस फिरत होते.

ह्या मोठ्या समूहांत पुष्कळ मनुष्यें जरूरीच्या वस्तु खरेदी करण्याच्या उद्देशानें आली होतीं. आणि कितीएक ह्या मोठ्या समूहांत एकत्र झालेल्या चित्रविचित्र मनुष्यांना पाहण्याच्या उद्देशानें आले होते. अनेक जातींच्या आणि अनेक देशांच्या स्त्रियाही तेथें जमल्या होत्या. कित्येकींचे साधे परंतु सुंदर आणि रमणीय पोशाक होते. कित्येकींचे भपकेदार रंगीबेरंगी इराणी पोशाक होते, आणि कित्येकींचीं तोंडें बुरख्यांत झाकलीं गेलीं होतीं; त्या मुसलमानी रिवाजाप्रमाणें पडद्यांतील स्त्रिया होत्या. चालतानां त्यांच्या शरीराचा कोणताही भाग दिसण्यांत येत नव्हता. परंतु, पायांत घातलेल्या लाल सपाटा आणि ज्या बुरख्यानें त्यांचें सर्व शरीर अच्छादित झालें होतें त्याचे वरचे भागांत ठेवलेल्या दोन छिद्रांतून त्यांचे तेजस्वी श्यामनेत्र दिसत होते. ह्यापैकीं कितीएक घरकामाला उपयोगीं अशा वस्तु खरेदी करण्याकरितां आल्या होत्या आणि कितीएक थोड्या किंमतीच्या आणि निरुपयोगीं मौजेच्या वस्तु खरेदी करीत होत्या.

ही विदेशीय मनुष्यें कोण ह्मणून जवळून जाणाऱ्या मनुष्याला सिद्धराम विचारणार होता इतक्यांत त्याचा मित्र आणि उपकारकर्त्या फैजीला येतांना पाहून वरील प्रश्न त्यालाच विचारिला.

फैजी—ते फ्रेंच लोक आहेत. त्यांना फिरंगी ह्मणतात. व्यापार करण्याच्या उद्देशानें पश्चिमेकडील फार दूरच्या प्रदेशांतून ते आले आहेत. त्यांच्या बरोबर जीं मनुष्यें आहेत त्यांचें सांगण्यावरून समजतें कीं, मनुष्याचें आत्म्याचें तारण करणारा फक्त त्यांचाच धर्म आहे. त्या धर्मांत दुसऱ्यांना घेण्याचे उद्देशानें ते इकडे आले आहेत.

सिद्धराम—आणि ते पलीकडे दुसरे दोघे येतात ते कोण ? ते पण त्यांच्या पैकींच आहेत काय ? त्यांच्या सारखेंच पण त्यांचेही पोशाक आहेत, मात्र ह्यांचे चेहेरे जास्त सुंदर आणि दाढी लाल दिसते.

फैजी—ह्यांना पण फिरंगीच ह्मणतात. परंतु, ह्यांची आणि त्यांची जात निराळी आहे. हे * इंग्लिश आहेत. ते फ्रेंच लोकांना हिंदुस्थानांतून हांकून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, अद्याप यश मिळालें नाहीं. आपल्या बादशहानें तसेंच कित्येक मोठमोठ्या गृहस्थांनीं त्यांचा चांगला आदरसत्कार केला.

ह्यानंतर थोड्या वर्षांनीं पश्चिमेकडून आलेल्या मुसाफरांत, फैजी दुसऱ्या कित्येकांसही दाखवूं शकला असतां, ते लोक साधारण रित्या जरी फिरंगी ह्या नांवानें ओळखिलें जात होते, तरी पण ते निराळ्याच जातीचे होते. स्वतःचे त्याचप्रमाणें स्वतःचा इस्टइंडिया कंपनीचा डायरेक्टर याचे नशीबाची परिक्षा पाहण्याचें उद्देशानें पिटरवान § डरब्रोएचींच्या

* हे इंग्लिश लोक जॉन न्युबरी आणि राल्फफीच व्यापारी, विल्यमलीडस् झवेरी, जेम्सस्टोरी चित्रकार होते. आलेपो आणि ओरमझच्या रस्त्यानें हिंदुस्थानांत येत असतां, ओरमझच्या अधिकाऱ्यानें त्यांना कैद करून गोव्यास पाठविले होते. विल्टस् शायरचा राहणारा टेम्सस्टिवन्स नांवाचा एक पाद्री जो इंग्लिश होता, त्यानें मागाहून आपल्या मुसाफरीची हकीकत लिहिली होती. त्याची आणि वरील गृहस्थांची गोव्यास भेट झाली. त्यानें त्यांचेबद्दल रदबदली करून त्यांना चांगली मदत केली. इ० स० १५८८ च्या सप्टेंबर महिन्यांत ही मंडळीं आग्र्यास पोहोंचली. फत्तेपूर सिक्री पाहण्याकरितांही ते गेले होते. तेथून परत इंग्लंडला जातांना न्यूबरी इराणच्या रस्त्यानें मुसाफरीला निघाला. फीच बंगाल्यांत गेला आणि तेथून पेगु आणि मलाक्का पाहून शेवटीं कोचि आणि ओरमझला जाण्याकरितां सन १५८९ सालीं जलमार्गानें निघाला. लिड्सेनें अकबराच्या राज्यांत चाकरी पत्करली आणि अकबरानें त्याला राहण्याकरितां घर आणि चांगला पगार करून दिला.

§ पिटरवान डरब्रोएची सुरतेंत डच आणि वलंदे लोकांच्या कोठीचा

हाताखालीं आलेले दच आणि वलंदेलोक जे शरीरानें फारच मजबूत उंच आणि गमती स्वभावाचे होते. पुष्कळवर्षें हिंदुस्थानच्या बाजारांत त्यांनीं इंग्लिश लोकांशीं चांगली सरशी केली. इंग्लिशलोकांचें आणि त्यांचें हाडवैर होतें. दैवयोगानें राजखटपटींत इंग्लिशलोकांची सरशी झाल्यामुळें ते लोक अगदीं मागसले.

फैजी—ह्या सर्व लोकांच्या येण्यापासून आपलें कांहीं नुकसान होत नाहीं. परंतु, आपल्या व्यापाराला आणि निरनिराळ्या कलाकौशल्याला उत्तेजन मिळतें. त्यांच्यामुळें आपणांत कित्येक चांगले चितारी आणि कारागीर उत्पन्न होऊं लागले आहेत. विशेषतः त्यांचेकडून त्यांचे देशासंबंधीं पुष्कळप्रकारची माहिती आपणांस मिळाली आहे. तरी पण त्यांच्या राहणीवरून अंदाज होत आहे त्याप्रमाणें इकडे येऊन मालकाप्रमाणें वर्तन करण्याचा त्यांनीं प्रयत्न करतां कामा नये.

सिद्धराम—तसें असेल तर त्यांना चांगलाच हात दाखवून आल्यामार्गानें परत घालवून दिले पाहिजे.

फैजी—मी तुह्मांस खात्रीनें सांगतों कीं, थोड्या वेळानें तसाही प्रसंग येईल. परंतु, आतां त्या गोष्टी जाऊं द्या; आपण आपल्या विषयाकडे वळूं. त्याविषयीं मी तुह्मांस सांगितल्याप्रमाणें तुह्मी त्या माझ्या घोड्याला अजमावून पाहिला कां ?

सिद्धराम—हो, हो, मी त्याला अजमावून पाहिला आणि त्याचे बाबतींत मी फारच खुष झालों आहे.

फैजी—त्याला पाहून तुह्मास संतोष झाला ? तो तुमच्या पसंतीस आला ? मी त्याला तुमच्या तबेल्यांत पाठवून देईन. तुमच्या मर्जीस आल्यास ठेवा. पुढच्या स्वारींत तुम्हांस त्याचा चांगला उपयोग

---

अध्यक्ष होता. पूर्वेकडील व्यापाराचें आणि अदलाबदल करण्याच्या वस्तूचें त्याला फारच उत्तम ज्ञान होतें. अकबराच्या जमीनमहसुलाच्या नियमाची त्याला चांगली माहिती होती. तो मोठा विद्वान होता. डीलाइट नांवाच्या एका हिंदुस्थानसंबंधीं ग्रंथ लिहिणाऱ्या इतिहासकाराला फारच महत्वाची माहिती याचेकडून मिळाली होती.

होईल. तुमचा स्वतःचा घोडा फारच चांगला आणि शिकवलेला असेल, परंतु आमच्या घोड्याप्रमाणें चांगलें मजबूत घोडे फारच थोडें असतात. मी तर त्याच्यावर क्वचित् स्वारी करितो. कारण, मी कबूल करितों कीं आलीकडे मी जरा जास्त सुस्त झालों आहे, आणि त्यामुळें एकादा शांत प्राणी मी जास्त पसंत करितों.

सिद्धराम–हें तर खरोखर फारच किंमतीचें बक्षीस आहे. ह्मणून मी त्याच्या लायक नाहीं. परंतु, मजवरील आपला निष्कलंक प्रेमभाव पाहून मी त्याचा स्वीकार करितों. आपला घोडा चांगला कदावर आणि अस्सल जातीवंत अरबी घोडा आहे, आणि असल्या घोड्यावर मी आजपावेतों कधींहीं स्वारी केली नाहीं.

फैजी–मी जेव्हां म्हणून माझ्या मित्राला कांहीं वस्तु भेटीदाखल देतों तेव्हां ती ठेवण्यालायक आणि अक्षय आठवण करण्यालायक असेल तीच देतों. असो, आतां आपण दुसऱ्या विषयाकडे वळूं. कालरात्री बादशहाचे महालांत एक सभा होती, तुम्ही त्यावेळीं हजर असतां तर तुम्हास मोठी गम्मत वाटली असती. हल्लीं कितीएक प्रकारच्या अडचणी आणि बिकट प्रसंग चालू आहेत, तरीं देखील तत्वज्ञान आणि पारमार्थिक समाज भरविण्याची बादशहास इच्छा झाली. आणि गोव्याहून ख्रिस्ती धर्मोपदेशक इकडे आले असल्यामुळें असल्याप्रकारच्या समाजाला योग्य संधी दिसली. महालांतील एका विशाल दिवाणखान्यांत निरनिराळ्या धर्मांचे धर्माध्यक्ष एकत्र जमले होते. स्वाभाविक रीतीनें त्यांत अब्दुलकादिर तर होतेच तसेंच जेस्युइट, एक यहुदी, एक पारशी आणि तुमचे गुरु कुल्लुक हें सर्व हाजर होते. माझा भाऊ अब्दुलफजल तेथें हजर होता, आणि मला आमंत्रण आल्यावरून मीही गेलों होतो. ह्या वादविवादांत मी तुमच्या अनादि अनिश्वरवादी पदार्थविज्ञान शास्त्राचा पक्ष घेतला, अकबर जरा माझ्याकडचा होता. कुल्लुक शास्त्रानुसार ब्राह्मणांचे वेदांतमताचे प्रतिपादन करीत होता. अबुलफजलचा साधारण मनुष्य प्राण्यांच्या हिताचा विषय होता. वादविवादांत वारंवार बौद्धधर्माचें अविहित मत अबुलफजल दर्शवी आणि कुल्लुक त्या बाबतचा खुलासा करी. परंतु, त्याठिकाणीं कोणीही बौद्धधर्मी आपल्या पंथाचा बचाव करणारा

नाहीं असें ह्मणून एकमेकांशीं वाचावाची करीत. तुह्मास माहितच आहे कीं येथें थोडें बौद्धमार्गी आहेत. परंतु, असल्या प्रसंगीं कोणीहि नाहींत. त्याठिकाणीं तक्रार आणि वादविवाद चालला होता त्यांत बादशहा सामील होत नव्हता, फक्त सर्वांच्या गोष्टी ऐकत होता. खरोखर हें सर्व संभाषण ऐकण्यालायक तर होतेंच; परंतु, त्यांत शेवटीं शेवटीं मोठा बहारीचा प्रसंग आला. सुरवातींत सर्व चर्चा मर्यादित रीतीनें चालली. आमचे मुल्ला लोक शांत आणि गंभीर होते आणि क्वचितच बोलत होते. कैकाडी लोकांप्रमाणें मधुर आवाजानें बोलणाऱ्या पाद्र्याहून जास्त शांत त्याठिकाणीं कोणीच नव्हते, * मैमोनिडिस पंथाचा यहुदी पण तसाच होता. तो फारच शांत असून कांहीं चिंतातुर दिसत होता. पारशानें आपल्या कल्पना शक्तीची कमालच केली. त्याचे बोलण्याचा पुरता अर्थही कोणास समजत नव्हता. त्याचा वाद घोंटाळ्याचा होता. आह्मी तर अगदीं तत्वशास्त्रांतून मिळविलेल्या तसेंच आरब आणि इराणी लोकांकडून शिकलेल्या विषयांचें प्रतिपादन करूं लागलों. परंतु, ते ह्या वाद करणाऱ्यांना गोड लागेना. कांहीं कांहीं प्रश्नानें मंडळी घोटाळ्यांत पडे. हळूं हळूं कुरापती निघूं लागल्या. एकमेकांस दुर्वचनांचीं सुरवात झाली. हीं दुर्वचनें मुसलमान आणि जेस्युइट लोकांत चालली. बादशहा बसला असतां ते लोक एकमेकांस शिव्यागाळी देऊं लागले. मोठमोठ्यानें ओरडूं लागले. त्यांच्या ओरडण्यानें आमच्या तर कांठळ्या बसल्या. ह्या सर्वांत मुल्ला लोक मुख्य होते. कारण, तुम्हांस तर माहितच

---

* मोझीस बेन मेइमोन अथवा मैमोनिडिस हा यहुदीराबीपैकीं एक फारच प्रख्यात पुरुष होता. त्याचा जन्म सन ११३३ सांत कोर्डोवा येथें झाला. तो एवेरोसच्या हाताखालीं तत्त्वशास्त्र आणि वैद्यकीशास्त्र शिकला. तो उत्तरवयांत इजिप्त देशांत जाऊन राहिला आणि ७० वर्षांचे वयांत मरण पावला. त्याचे मुख्य ग्रंथ मरेह्नीमोचीन ( घाबरल्याचा शिक्षक ) नांवाचा आहे. ज्यांत कठीण वाक्यें आणि उपमा आलंकार वगैरेची माहिती आहे. यहुदी कायद्यासंबंधीं त्यानें दुसरे कितीएक ग्रंथ लिहिले आहेत. त्यानें आपल्या देशीं लोकांकरितां आलेक्झांड्रिया येथें एक पाठशाळा स्थापन केली होती.

आहे कीं, धर्माचे बाबतींत त्यांचें फार नुकसान झालें आहे, असें ते लोक समजतात. हा मूर्खपणाचा बाजार अकबर बसल्या बसल्या पहात होता; आणि मनांतल्यामनांत खूष होत होता. केव्हां केव्हां माझेंकडे पाहून हंसत होता. परंतु, शेवटीं असला प्रकार त्याच्यानें पाहवेना. माझ्याकडे इशारत करून तो ह्मणाला ‘ फैजी, कशाप्रकाचें वर्तन करावें हें ह्या लोकांना समजत नाहीं ह्मणून त्यांचेकरितां दरवाजे उघडा. ’ प्रत्येकास आपापल्या धर्माचीं मतें बरोबर समजावून देण्याची मी संधी दिली आणि त्यावरून जास्त मजबूत पुरावा कोण देतो त्याचा निर्णय मी स्वतः करणार होतों. परंतु यांनीं काय केले ? मोठ्यानें ओरडण्यांत आणि एकमेकांना शिव्याशाप देण्यांत आपलें शहाणपण व्यक्त केलें, इतकेंच. तरी ह्या गोष्टीचा शेंवट करणें जरूर आहे ! मी ह्मणालों “ नेक नामदार अलमेपनाह ” त्या सर्वांना रजा देणें बरें होईल. हें ऐकून अकबर हंसला. सर्वच गडबड चालली होती. तरी तो स्वतः शांत होता. नंतर बसल्या जागेवरून उभा राहून तो मोठ्या उग्र आवाजानें बोलूं लागला. तें ऐकून सर्वत्र शांतता झाली. ‘ सद्गृहस्थहो, तुमच्या कृपेनें आणि साहजिक भांडणानें आज ज्या आनंदांत माझा वेळ गेला त्याबद्दल मी तुमचे उपकार समजतों. थोड्या मुद्दतींत अशाच प्रकारच्या पुनर्भेटीच्या इच्छेनें ही आजची सभा विसर्जन करण्यांत येते. ’ इतकें म्हणून हाताच्या इशारतीनें तेथून जाण्यास सर्वांना सूचना केली. आणि त्यापैकीं बहुतेक तेथून बडबडत चालते झाले. अहा, हा ! सिद्धराम, गूढ आणि संदिग्ध विषय कीं, ज्याबद्दल त्यांना कांहींच माहीत नाहीं, आणि जरी माहीत असलें तरी काय ? एकमेकांना शिव्याशाप देणें आणि तिरस्कार करणें, किती मूर्खपणा !

सिद्धराम—तुमच्याच प्रमाणें माझेंही मत आहे. खरोखर हे दोन्हीं विषय समजणें फारच कठीण आहे.

फैजी—बरें मला सांगाल, तुम्हीं इकडे कसें आला ? मी समजत होतों कीं छावणींतील लष्करांत जाऊन मिळण्याकरितां तुम्ही तुमच्या मनुष्यांसह निघून गेला.

सिद्धराम—आह्मीं निघालों होतो खरें, परंतु आम्ह्यास जास्त दिवस

राहण्याचा दुसरा हुकूम मिळाला, त्यामुळें मला फारच आनंद झाला. कारण बादशहाच्या आजच्या जन्मोत्सवासंबंधीं मी पुष्कळ ऐकत होतो; ती संधी मला मिळाली.

आग्र्यांत राहण्याला तो खुशी होता, त्याचे दुसरेंहीं कारण होतें, आणि तें सांगणें सिद्धरामास इष्ट व्हतें.

फैजी—हो तुह्मी बरी आठवण केली. दरबारांत जाण्याची वेळ झाली आहे. आज बाहेरगांवचें वकील राजाचे भेटीला येतील. तुह्मी माझ्याबरोबरच चला आणि तुमच्या इतमामाचे जागेवर तुह्मी बसा.


## खंड १० वें.

### अकबरचा जन्मोत्सव आणि सिद्धरामास नवीन संशय.

दरबारांत सिद्धराम कितीएक वेळा गेला होता. सिंहासनाच्या मोठ्या दिवाणखान्यांत बादशहा कांहीं वेळ पूर्वीं आला होता. फैजीबरोबर तो तेथें दाखल झाला त्यावेळीं त्याचे मनाची कांहीं चमत्कारिक स्थिती झाली. भपकेदार शुभ्रसंगमरवरी खांब आणि भिंती ज्यांत सुंदर रंगीबेरंगी कांचा आणि रत्नें जडली होती, नाजुक कमानीवरून रेशमी आणि मखमलीचे पडदे सोडिले होतें. दरबारमंडपाचें वरचे भागांतही आरास केली होती आणि आजपावेतों त्याचें पाहण्यांत न आलेली अशा-प्रकारची मोठी गर्दी त्याठिकाणीं झाली होती. हें सर्व पाहून सिद्ध-

रामास फार आश्चर्य वाटले. अमूल्य रत्नजडित सिंहासनावर महान् मोंगल बादशहा बसला होता. त्याचे दोन्ही बाजूस लांब पावेतों रांगेनें उमराव, प्रधान, सरदार उच्चपदवीचे अमीर, त्यानंतर आसपासचे देशांतले आलेले प्रतिनिधी चित्रविचित्र पोशाकांत उभे होते. त्याहून जरा पुढें खालचे पायरीचे अधिकारी उभे होते. त्यांत आपल्या पदवीला योग्य अशा जागीं सिद्धराम जाऊन उभा राहिला.

अकबराची कुंडली.




आजचे दरबारांत मुख्यत्वें नजराणे घेण्याचा तसेंच पोशाक वगैरे देण्याचा समारंभ होता. प्रतिनिधी आणि दुसरे कितीएक पाळीपाळीनें सिंहासनाजवळ जाऊन उजव्या हातानें लवून मुजरा करीत होते आणि कलाकौशल्याच्या वस्तु सिंहासनाच्या पायरीजवळ नजराण्या-दाखल ठेवीत असत. अक्केवियानें एक सुंदर बुक " लॅटीन भाषेंत छापलेलें बाइबल " हातांत घेऊन, तेथील रिवाजाप्रमाणें तें बादशहापुढें ठेवणार तों बादशहानें मोठ्या आदरबुद्धीनें आपले हातांत घेतलें. आणि ह्मणाला, " पाद्री साहेब, अशाप्रकारच्या उमद्या भेटीबद्दल आह्मांला फार आनंद झाला आहे. आह्मांला पूर्ण उमेद आहे कीं, आमचेकडून जें बक्षिस तुम्हाला देण्यांत येईल, तें तुम्हीं अती मौल्यवान् समजाल " असें म्हणून जवळच्या एका ब्राम्हणाकडून एक मोठें आणि सुंदर रीतीनें सुशोभित केलेलें हस्तलिखित पुस्तक घेऊन तें त्याला बक्षिस दिलें. हिंदुस्थानच्या आमच्या पवित्र पुस्तकांपैकीं हा एक अनादि ग्रंथ आहे. ह्याला ' अथर्व-वेद ' असें म्हणतात. त्याचें फारसी भाषांतरही त्यांत दिलें आहे.

मानपूर्वक बादशाही भेट त्यानें स्वीकारली. परंतु खरोखर त्याला संतोष झाला किंवा नाहीं ह्याचा संशयच होता. तसेंच गेल्या रात्रीं सूचना मिळाली होती कीं काय त्याचा हीं कोणाच्यानें निर्णय होण्यासारखा नव्हता. तरी दुसरी बाबत जास्त संभवत होती. नजराणा काय काय वस्तु येणार त्याची बादशहास पूर्वीपासूनच वर्दी मिळत असे. ह्या बाबतींत पाद्र्याला कांहींही वाटो. परंतु, अस्सल ब्राम्हणांचे मनाची काय स्थिती झाली त्याचें अनुमान करणें फार कठीण होतें. ह्या सर्वांना ह्यावेळीं फारच राग आला असेल. परंतु, अब्दुलकादिरला आपला राग आवरून धरण्याचे फारच प्रयास पडले. त्याला वाटलें कीं खास ख्रिस्त्यासच मान देऊन शहाण्या आणि मायाळु अकबरानें मुसलमानांचा अपमान केला, परंतु, विचाराअंती त्यानें आपली चूक कबूल केली.

नजराणे घेण्याचें काम संपल्यावर बाहेरच्या लोकांच्या भेटी घेण्यांत आणि कांहीं नवीन नेमणुका करण्यांत कांहीं वेळ गेला दुसऱ्याप्रमाणें सिद्धरामासही त्याविशीं आमंत्रण होतें.

अकबर—सिद्धराम, कांहीं कारणानें तुझ्या बाबतींत मला संतोष झाला आहे आणि ह्मणून आजपासून तुला मी एक हजार सैन्याचें आधिपत्य देतों. आणि तुझ्यावर माझा जो विश्वास आहे तो तूं खरा करून दाखिवशील.

रिवाजाप्रमाणें कांहीं उत्तर दिल्यावांचून त्या नवीन सन्माननीय कृपेबद्दल—सिद्धरामानें बादशहाला लवून मुजरा केला. त्याचा चेहरा प्रफुल्लित झाला. हाच अकबराच्या भरंवशालायक आहे काय ? सैन्यांत हाच एक असल्याप्रकारच्या मानास योग्य होता काय ? असें कितीएक मनांतल्यानमांत पुटपुटलें. काश्मीर देशांत तो उपयोगीं होईल ह्मणूनच अकबरानें त्याला हा अधिकार दिला नव्हतां, त्याची दुसरीही कांहीं कारणें होती. त्या तरुण योध्याला अतिशय मान मिळाल्यामुळें इतर योध्ये मंडळींत घाबरल्याची चिन्हें व्यक्त होत होती आणि त्यावरून विजयाबद्दलची हीं चिन्हें आहेत असें अकबरानें लागलेंच अनुमान केलें. तेथून जाण्याची इशारत करतांना सिद्धरामाकडे प्रेमभावानें पाहून डोकें हलविलें. आणि नंतर कांहींवेळानें दरबार बरखास्त झाला.

ह्या दिवसाचें उत्सवाची वेळ होत आली. उत्सवाची जागा शहरापासून थोड्या दूर मैदानांत ठरविण्यांत आली होती. उत्सव पाहण्याकरितां सर्व शहर लोटलें होतें. निरनिराळ्या प्रकारच्या पोशाकाची मनुष्यें एकत्र झाल्याकारणानें एक अवर्णनीय शोभा आली होती. कितीएक पायीं चालत होते, कितीएक घोड्यावर कितीएक शृंगारलेल्या हत्तीवर आणि कितीएक उंठावर बसून निघाले होते. तसच कितीएक मर्जीस येतील त्या खाण्याच्या वस्तु खरेदी करीत होते. राजमहालांतून निघतांच सिद्धरामास पर्विज भेटला. सिद्धरामास मिळालेल्या नवीन अधिकाराबद्दल त्यानें त्याचा सत्कार केला. राजमहालांतून निघून पुढें सिद्धराम आणि पर्विज जनसमूहांत मिसळले. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यानंतर—

सिद्धराम—हल्ली तुमचें कसें काय चाललें आहे?

पर्विज (हंसत हंसत)— माझ्या स्वतःहाच्या बाबतींत तुम्हीं विचारतां नाहीं बरें? एकंदरींत हल्लीं ठीक चाललें आहे. माझें मन जिच्यावर बसलें आहे आणि जिला मी आपला देह अर्पण केला आहे तिची भेट अलिकडे वारंवार होत असते. जरी या गोष्टी गुप्तरीतीनें झाल्या होत्या तरी तिचा बाप * तोडरमल ह्याला कांहीं माहिती असावी असें

* राजा तोडरमल प्रख्यात कोशाध्यक्ष आणि कारभारी लाहोर येथील राहणारा एक क्षत्रीय होता. मरणसमयीं त्याजपाशीं कांहीं द्रव्यसंचय नसल्यामुळें, एक साधारण कारकुनाची चाकरी त्यानें प्रथम पतकरली. अकबराचा पिता हुमायूनला हाकून देणाऱ्या बुद्धिमान सरदार शीरशहानें आणि त्यानंतर अकबरानें स्वतः त्याला चाकरीत ठेविला. गुजराथेंत जमीन महसूलाचे नियम त्यानेंच केले. ते बादशहास फारच पसंत पडले. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील दुसरे प्रांतांत त्याला नेमण्यांत आले होते. अकबरचा मामा अबुलफजल त्याचे बाबतींत लिहितो कीं, प्रामाणिकपणा, सत्यता, धैर्य, काम करण्याची कुशलता आणि राज्यकारभारांत दक्षता त्याचे प्रमाणें साऱ्या हिंदुस्थानांत दुसरे कोणाचेही अंगीं नसेल. तोडरमल इ. स. १५८९ च्या नवेंबर महिन्याचे १० वे तारखेस लाहोर येथें मरण पावला.

मानण्याला मला सरळ कारणें आहेत. माझे काका फैजी यांच्यामुळें हें काम फारच सुरेख वठलें आहे. धार्मिक अब्दुलकादिर म्हणत असतात त्याप्रमाणें खरोखर अल्लाहाची त्यांचेवर मेहेरबानी आहे ?

असें म्हणून भोळा पर्विज ज्या स्त्रीवर तो मोहित झाला होता तिचें सौंदर्याचें आणि गुणाचें वर्णन करूं लागला. जरी तो विषय त्याला स्वतःला मोठा गमतीचा वाटत होता तरी त्याच्या जोडीदाराला त्यांत म्हणण्यासारखी मौज वाटत नव्हती. पाहिजे तें असो परंतु त्याच विषयावर गोष्टी बोलत ते दोघे मित्र उत्सवाचे जागेजवळ येऊन पोहोंचले.

खरोखर गमतीचे ठिकाण हेंच होतें. ऊंच, सखल परंतु, विशाल मैदानांत लहान मोठें असंख्य तंबू उभारले होते. चित्रविचित्र पोशाक केलेली अगणीत मनुष्यें ह्या विशाल मैदानांत सर्वत्र पसरली होती. सर्वांत काळ्या शरीराचें चकचकीत किंमतीच्या झालरी वगैरे मौल्यवान् वस्तूंनीं सुशोभित केलेले आंबारीचे हत्ती, घोडेस्वार आणि पायदळ फार मनोहर दिसत होतें. नीलमण्यानें जडित सुवर्णकवचानें बादशाही हत्ती शृंगारिलें होते. एकाद्या साधारण मनुष्याचें नशीब क्षणांत बदलण्याइतकें अगणित द्रव्य त्यांचे विशाल शरीरांवर ह्यावेळीं दिसत होतें. अशा एका हत्तीवर मोंगलबादशहा ह्यावेळीं बसला होता. दरबारी मनुष्यें ज्या ठिकाणीं उभीं होतीं त्याठिकाणीं अकबर हत्तीवरून उतरला आणि त्यादिवसाचें कार्य ज्या जागेवर मोठ्या थाटानें होणार होतें तेथें गेला. हें कार्य इतकें कांहीं चमत्कारिक आणि असरकारक होतें कीं, त्याचें वर्णन करणें अवश्य आहे. असल्याप्रकारचें कार्य करण्याचा हेतु काय असेल आणि त्यांत फायदा काय आहे त्याचा खुलासा निरनिराळ्या रीतीनें देण्याचा पुष्कळांनीं यत्न केला आहे. परंतु, अद्यापि त्याचा खरा भावार्थ कोणीही इतिहासकार समजूं शकला नाहीं.

एक मनुष्य चांगल्या रीतीनें बसूं शकेल अशी मोठी आणि मजबूत तूळा एका उंच जागीं टांगली होती. एक पारडें सोनें, रुपें, आणि किंमतीजवाहिरानें भरलें होतें. आणि दुसरें रिकामें होतें. एकत्र जमलेल्या आपल्या हजारों आणि लाखों प्रजाजनांसमक्ष बादशहा दुसरें पारड्यांत बसला. त्या जगविख्यांत आणि कीर्तिमंत मोंगल बादशहाचें वजन तंतो-

तंत होईतोंपर्यंत समोरचें तराजूंत कमजास्त करण्यांत आलें. जवाहीर, सोनें, रुपें वगैरे किंमतविस्तु बऱ्याच प्रमाणानें त्या तराजूंत ठेवाव्या लागल्या परंतु दिलगिरीची गोष्ट इतकीच होती कीं, स्वकर्तव्य, प्रतिष्ठा आणि सर्व चांगल्या आणि मनोहर वस्तुची आसक्ती ह्या सारख्या वस्तु त्या तराजूंत ठेवण्यासारख्या नव्हया. तसें होऊं शकतें तर खरोखर अकबर बादशहाचे समोरचे काट्यांत जास्त ठेवाव्या लागल्या नसत्या. ह्याप्रमाणें तूला झाल्यावर बादशहा तराजुंतून बाहेर निघाला. आणि जवाहिर, सोनें, रुपें वगैरे एकत्र झालेल्या लोकांस वाटून देण्यांत आलें. शेवटीं बादशहा आजुबाजूला उभे असलेल्या दरबारीं मंडळींत मिसळला. आसपासचे लोकांत लहान लहान सुवर्णपुष्पें उधळूं लागला. आणि कितीएकांबरोबर स्नेहभरित गोष्टी बोलूं लागला. अकबर बादशहा एक मोठा आणि समर्थ आहे इतकेंच नाहीं परंतु, फारच उदार मनाचा आणि आपला मोठेपणा वाढण्यापेक्षां आपल्या प्रजेच्या कल्याणाचीं कृत्यें करण्यास जास्त उत्सुक आहे. अशी खात्री बहुतेकांची झाली होती.

त्या दिवसाची ही महत्वाची आणि थाटाची कामगिरी संपल्यावर दुसऱ्या समारंभास सुरवात झाली. असंख्य प्रेक्षक समूहास पाहण्यालायक त्याठिकाणीं निरानिराळ्या प्रकारचे खेळ चालले होते. जादूचे खेळ, निरनिराळ्या प्रकारच्या कसरती, नृत्यांगनांचे मधुर नृत्यगायन, कांहीं दूरचे भागांत घोड्यांच्या सरकसी वगैरे परंतु खास हिंदुस्थानांतच पाहण्यांत येणारा आणि धर्माचें ढोंग करून आश्चर्यजनक तसेंच भयंकर देहकष्टाचा खेळ दोन मनुष्यें करून दाखवीत होती. त्यांच्या पाठींत अडकाविलेल्या लोखंडी गळाचें आधारानें जमिनीपासून वीस फूट त्यांना लटकाविण्यांत आलें होतें. आग्राशहरांत असला खेळ दुर्मिळ असल्यामुळें पुष्कळ मनुष्यांचें लक्ष तिकडें गेलें आणि जरी सिद्धरामानें असले खेळ पुष्कळ पाहिले होते, आणि त्याची तो पर्वा करीत नव्हता तरी पर्विज फारच आतूरतेनें तो खेळ पहात उभा राहिला.

पर्विज—ह्या लोकांना हे काय वेड लागले आहे ? धर्मश्रद्धेचा हा एक प्रकार आहे ह्मणतात, आणि जरी तसे असले तरी ह्या महोत्सवाचे

दिवशीं असला भयंकर खेळ करणें उचित होईल काय? हा कांहीं संतोषकारक देखावा नाहीं. तरी त्यांना कांहींच त्रास होत नसावा अशारीतीनें शांत दिसत आहेत ह्याचें कारण काय असावें बरें?

सिद्धराम— कदाचित् मी त्याचा खुलासा करूं शकेन. आपल्या नजरेसमोर पाहतो तशाप्रकारचीं देहकष्टाचीं कृत्यें आपली धर्मभोळी मंडळी, पुण्य कृत्याचा आणि स्वर्ग साधण्याचा मार्ग समजतात, हें तुह्मांस माहित असेलच. असल्या देहकष्ट देणाऱ्यांस पहाण्यांत आणि त्यांना द्रव्य देण्यांत पुण्य समजलें जातें. त्यामुळें भाविक लोकांपासून त्यांना जास्त फायदा होतो. परंतु, त्यांची खरी खुबी काय आहे तें समजत नाहीं. कितीएक सबळ कारणावरून माझें अनुमान होतें कीं, जरी स्त्रियांचे मोहांत न फसण्याचे ते लोक ढोंग दाखवितात तरी त्यांचे बरोबर स्त्रिया असतात. खेळाचे आदले दिवशीं सुमारें बारा चौदा तास ह्या स्त्रिया खांद्याचे हाडांतील मधला भाग चिमटे घेऊन बधीर करितात आणि त्यामुळें गळ टोंचले असतां त्यांना कांहीं लागत नाहीं.

पर्विज—फारच आश्चर्याची गोष्ट आहे!

सिद्धराम—हो असेंच खरें, त्याचप्रमाणें कंटाळा येण्यासारखेंही खरें. भाविक लोकांकडून त्यांना पाहिजे तसें उत्तेजन मिळतें, परंतु सूज्ञ ब्राह्मण तर ह्या गोष्टीचा तिरस्कार करितात. प्रण तुह्मी ह्मणत होताना कीं इकडे हत्तींची साठमारी होणार आहे?

पर्विज—हो होणार आहे. तो पहा तिकडे बावटा दाखविण्यांत येत आहे. त्यावरून समजतें कीं, आतां खेळाची सुरवात होईल. चला आपण तिकडेच जाऊं आणि एकादी निर्भय जागा पाहून उभे राहू.

त्यांना जागा मिळण्यास त्रास झाला नाहीं. कारण, दोर बांधून तयार केलेल्या जागेंत त्यांचे पदवीनुरूप त्यांना जाऊं देण्यांत आले आणि योग्य जागाही मिळाली. आखाड्याचा सर्व भाग दिसण्यांत येईल अशा जागीं अकबर बादशहा बसला होता. त्याचे आजूबाजूला सर्व दरबारी आणि कारभारी मंडळ बसलें होतें. सर्व आपआपल्या जागीं बसल्यावर थोड्या वेळानें समोरून आखाड्यांत लढणारे हत्ती दाखल झालें. त्यांचें अंगावर मौल्यवान् झुली होत्या. सुंदर पोशाक केलेले महात वर बसले होते. हत्ती आंत

आल्यावर दुसरी कांहीं तयारी करावयाची नव्हती. दोघेही प्रचंड प्राणी एकमेकांसमोर येतांक्षणीं एकमेकांवर मोठ्या त्वेषानें चवताळून गेले. मागचे पायांवर उभे राहून सोंडेनें एक दुसऱ्यास धरण्याचा तसेंच दंतशूलानें एक दुसऱ्याचा प्राण घेण्याचा यत्न करूं लागले. त्याचेवर बसलेले महात आपल्या जागीं स्थिर होते. कांहीं वेळ पावेतों त्या प्राण्यांचें युद्ध चाललें; परंतु शेवटीं त्यापैकीं एक हत्ती जमीनीवर पडला आणि लागलाच त्यावर बसलेला महात त्यावरून उडी मारून दूर जाऊन उभा राहिला. आणि जिंकणाऱ्या हत्तीवरील महातानें पडलेल्या हत्तीस कांहीं जास्त इजा होऊं न देतां अंकुशानें आपल्या हत्तीस आवरून धरिला. बादशहा तसेंच सर्व कारभारी मंडळींनीं त्यास शाबासकी दिली आणि त्या दोघांही प्राण्यांना परत नेण्यांत आले.

सिद्धराम—असल्या प्रकारची हत्तींची साठमारी बादशहाला फार आवडत असावी असें दिसतें.

पर्विज—मनुष्य किंवा इतर प्राण्यांच्या अंगीं धैर्य आणि चपलता असणें बादशहास फारच आवडतें. तुह्मांस माहितच आहे कीं, त्याचें अंगीं अचाट शक्ती आहे. शस्त्रांचा उपयोग करण्याचे कामीं तो कोणासही हार जाणार नाहीं. युद्धाचे किंवा शिकारीचे कामीं तो विलक्षण धाडसी आहे. भीति ही काय वस्तु आहे हें तो जाणत नाहीं. त्याच्या धाडसाच्या गोष्टी तुमचे ऐकण्यांत आल्या असतीलच. आणि जरी कितीएक गोष्टी तिखटमीठ लावून सांगण्यांत येतात तरी फैजीचे सांगण्यावर तुमचा विश्वास आहेच. कितीएक वेळीं तो बादशहाबरोबर असतो आणि एकादें दिवशीं फुरसतीचे वेळीं त्या सर्व गोष्टी तो तुह्मांस सांगेल.

ह्याप्रमाणें गोष्टी सांगत सांगत आजूबाजूंचीं सर्व ठिकाणें पाहण्यासारखीं होतीं तीं पाहून ते शहराकडे परतले. इतक्यांत एकाएकी सिद्धराम आश्चर्यचकित होऊन स्तब्ध झाला. एका फारच भपकेदार साज केलेल्या आणि अंगावर झूल घातलेल्या अंबारीच्या हत्तीवर त्याची नजर अनायासें गेली आणि रेशमी गादीला टेकून बसलेली दुसऱ्या एक दोन स्त्रियांसह त्यानें एक स्त्री पाहिली. ती राझियाच आहे अशी त्याची खात्री झाली. तिनें आपला रत्नजडित बुरखा एकेबाजूस सरका-

वून ठेविला होता. जवळ असलेल्या दोघी दासीही ओळखिच्याच होत्या. एकांतांत राहणारी आणि कोणाच्याही दृष्टीस न पडणारी स्त्री ह्या ठिकाणीं कां आली असेल? आणि तेही सिद्धराम सैन्याबरोबर गेला आहे असें तिला माहित असून. अशावेळीं इकडे येण्याचें कारण काय? काय तिनें त्याच्याशीं प्रपंच तर केला नसेल? अथवा त्याला सांगितलेल्या नांवाची स्त्री नसून दुसरीच स्त्री असेल?

रझियेनें पायीं चालणारांत सिद्धरामाला पाहिलें नव्हतें. तिच्याकडे बोट करून होईल तितक्या शांततेनें आणि बेपर्वाईनें त्यानें आपल्या मित्रास विचारलें, ‘ त्या स्त्रीला तुह्मी ओळखतां काय? ’

पर्विज—ज्या स्त्रीनें आपला बुरखा एके बाजूस ठेविला आहे, जिच्याजवळ मयुरपिच्छाचा पंखा घेऊन दासी बसली आहे त्याच स्त्रीबद्दल तुह्मी विचारतां काय? खरोखर मी तिला ओळखितो आणि तुह्मी तिला ओळखित नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आलीकडे ती क्वचितूच बाहेर निघते. ती स्त्री.....( ह्या वेळीं पर्विजनें जें नांव सांगितलें तें ऐकून सिद्धरामाला असा कांहीं क्षोभ झाला कीं, तशा प्रकारचा कधींही त्याच्या सर्व आयुष्यांत झाला नसेल. उत्तरेकडील एका पर्वत शिखरावरून खालचे खोल दरींत कडेलोट झाल्याप्रमाणें त्याची स्थिती झाली. ) पर्विज ह्मणाला, ती स्त्री कोण आहे ह्याबद्दल खरोखर तुह्माला माहिती असलीच पाहिजे. ती स्त्री फैजीची बेगम गुलाबदान आहे.

सिद्धरामाची ह्या वेळची विचित्र वृत्ती पाहून पर्विजला फारच आश्चर्य वाटलें आणि त्यानें विचारलें, ‘ त्या स्त्रीचें नांव ऐकून तुमचे मनाची अशी चलबिचल होण्याचें कारण काय? गुलाबदानला पाहतांक्षणीं तुह्मी तिच्यावर मोहित तर झाले नांहींना? संभाळून असा हो! असें करण्याची मी तुह्मास सल्ला देत नाहीं. फैजी मनुष्य तर चांगला आहे. परंतु, त्याच्या बेगमची गोष्ट निघाल्यास त्याचा चांगुलपणा राहणार नाहीं. कारण तिच्यावर त्याचें फारच प्रेम आहे.

सिद्धराम ( होईल तितक्या सावधगिरीनें )—ते नांव ऐकून पूर्वीच्या एका गोष्टीची मला आठवण झालीं आणि त्यामुळें तसें झालें. बाकी फैजीच्या बेगममुळें माझी वृत्ति बदलली नाहीं.

पर्विज ह्मणाला, ‘ असें असेल तर फार उत्तम. ’ असेच बोलत बोलत ते दोघेही पुढें चालले.

कसेंही करून पर्विज लवकर सुटेल तर बरा. असे विचार सिद्ध-रामाच्या मनांत चालले होते. दोघेही इकडून तिकडे फिरत होते. इतक्यांत एका मनुष्याला पाहून सिद्धराम ह्मणाला, ‘ जरा क्षमा करा, मला कांहीं त्या मनुष्यांशीं काम आहे करितां रजा घेतों. खरोखर आज आपण दोघे एकत्र असल्याकारणानें फारच गंमत वाटली. तुमचे माझ्यावर फारच उपकार झाले. ’ असें ह्मणून त्यानें पर्विजला सलाम केला आणि त्या स्वाराला आपल्याकडे येण्याची खूण केली. चाकरी संबंधीं कांहीं गोष्टी स्वाराबरोबर करूं लागला. परंतु पर्विज नजरेआड होतांक्षणीं स्वाराबरोबर चाललेल्या गोष्टी बंद केल्या आणि एकटाच पुढें चालता झाला. कोणीकडे चालला त्याचे त्याला भान नव्हतें. दारूच्या निशेंत भ्रमित झाल्याप्रमाणें तो विचार-मग्न दिसत होता. गुलाबदान ! फैजीची बेगम ! कसले भयंकर कपट ! जरी अज्ञानपणांत झालें तरी केवढें अधमप्रकारचें आहे ! ! कपट ! आणि तेंही कोणाशीं ? आग्रा शहरांत कोणाशींही ओळख नव्हती अशावेळीं अतीशय मान, ममता आणि प्रीतीनें ज्या मनुष्यानें माझा सत्कार केला होता, सदोदित खऱ्या मित्राप्रमाणें जो विश्वासास पात्र आहे, आजचा हा मोठा अधिकार मिळण्याला जो खरा कारणीभूत आहे, त्याच्याशीं कपट ! माझ्या सारख्या अयोग्य चाकरावर ज्या बादशहानें अगणित उपकार केले आहेत त्याच्याशींही कपट ! ज्या स्त्रीला एकदा देह अर्पण केला आणि वचनही देऊन चुकलों तिच्याशींही कपट ! कसला निर्लज्जपणा ! केवढा विश्वासघात ! हें सर्व कोणा करितां, एक स्त्री— जिनें माझा छल केला आहे, तिचा आतां त्याग केलाच पाहिजे. कसलीही परवा न बाळगितां ज्या स्त्रीवर मला प्रेम ठेविलेंच पाहिजे तिच्या करितां आतां मी काय करूं ? प्रतिष्ठा आणि कर्तव्य मोठ्या गर्जनेनें आज्ञा करितात कीं, पळून जा; एकदम पळून जा. आणि असें केलें असतांच रक्षण होईल. विलंब लावल्यास परिणाम भयंकर होईल. परंतु, कांहीं तयारी केल्यावांचून, तिचेंजवळ कांहीं खुलासा केल्यावांचून, जी अबला स्त्री मला चाहते, आणि जरी कदाचित् मला

आडमार्गानें नेला तरी आपल्या प्रतिष्ठेचा आणि कर्तव्यकर्माचा बळी देऊन चुकली आहे तिला असा एकाएकी सोडून देऊं काय ? असें करणें योग्य मोजलें जाईल काय ? मला ते उचित आहे काय ? असें होऊं शकेल काय किंवा तसा संभव पण आहे खरा ?

असले नानाप्रकारचे तर्कवितर्क करीत आजूबाजूला काय आहे आणि काय चालले आहे, कोणत्या दिशेला चाललो आहे त्याचे सिद्धरामाला कांहींच भान नव्हतें. शेवटीं त्यानें आजूबाजूला पाहिलें. त्याला समजलें कीं शहरापासून तो फार दूर नव्हता. राझिया ! सुखांत कालक्रमण केलेल्या दिवसाची राझिया ! तिचे राहण्याचे ठिकाणाजवळ तो येऊन पोहोंचला होता. ह्या वेळेस त्याला आठवलें कीं, फैजीच्या शहराबाहेरील बंगल्याला लागूनच तें ठिकाण आहे. संध्याकाळचा वेळ निघून गेला होता. बगीच्याचे भिंतीजवळ जाऊन परीचयाच्या खुणेनें दासीमार्फत आंत दाखल होण्याचा त्याचा हाच अक्षयचा वेळ होता. भिंतीजवळ जाऊन सांकेतीक करितांक्षणीं दार उघडण्यांत आलें आणि सिद्धराम आंत दाखल झाला.

राझिया, आणि खरें ह्मटलें असतां गुलाबदान ह्या वेळेस गादी टाकून स्वस्थपणें आराम घेत होती. तिच्या मनांत होतें कीं सिद्धराम सैन्याबरोबर गेला आहे. त्याचे बद्दल तिचे मनांत कांहींच विचार चालले नव्हते. जो मनुष्य कितीएक कोस दूर गेला असेल असें ती समजत होती, त्याला एकाएकीं दाखल झालेला पाहून ती स्तब्ध झाली.

'सिद्धराम काय हें ? ' एकाएकी घाबरून उभी राहिली आणि घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली, ' मी तर समजत होतें कीं तुह्मीं गेला आहांत. '

राझिया उर्फ गुलाबदान ! आतां मी तुला पूर्णपणें ओळखतों, तूं मला दगा दिलास, मी तुला शेवटचा सलाम करण्याकरितां आलो आहे. प्रतिष्ठा मला निघून जाण्यास सांगत आहे. पळून जाण्यावांचून आतां दुसरा मार्गच राहिला नाहीं. उद्ईक सायंकाळापूर्वी मी आग्रा सोडून जाइन आणि पुनरपि या शहरांत कधींहि येणार नाहीं. तसेंच तुझें तोंडही पाहणार नाहीं.

एका क्षणांत सिद्धराम सर्व बोलून गेला. त्यापूर्वी फैजीची बेगम सर्वप्र-

कार समजून गेली. आपला आशक सैन्य घेऊन बाहेर गांवीं गेला आहे अशी तिला खात्री होती. आणि ह्मणून ह्या महोत्सवांत उघड रीतीनें जाण्याची किंवा बुरखा पांघरून बसण्याची तिला कांहीं जरूर दिसली नाहीं. ह्या सुमारास सिद्धरामानें तिला पाहिलें असावें, आणि तिला ओळखून तिच्या खऱ्या नावांचा पत्ता मिळाला असावा हें उघडच दिसत होतें. आणि त्या बाबतींत प्रश्न विचारून खुलासा करणें त्या स्त्रीला आपलें काम साधण्याचें युक्ती विरुद्ध होतें. तिनें एक युक्ती रचिली; आपल्या नम्रदृष्टीनें विनंती करीत असावी असा चेहरा करून आणि हात जोडून क्षमा मागीत असावी अशा रीतीनें कांहीं वेळ सिद्धरामाकडे निरखून पाहिलें; नंतर झोंक जाण्याचा आविर्भाव दाखवून एकही शब्द न बोलतां तक्यावर तोंड लपवून गादीवर पडली.

कांहीं वेळ पावेतों सिद्धराम तसाच तिच्याकडे पहात राहिला. ज्याक्षणीं सिद्धरामानें गुलाबदानचें तोंड कधींही न पहाण्याचा निश्चय केला त्याच-क्षणीं पूर्वी कधीं न पाहिलेली अशी अवर्णनीय सुंदर कांती फैजीच्या बेगमची त्याला दिसली, आणि ह्या शेवटच्या भेटीची आठवण अक्षयची राहील असें त्याला वाटलें.

'जा, जा, एकदम चालता हो !' एक अदृश्य स्वर त्याचे कानांत गुणगुणूं लागला. आतां कांहीं बोलण्याच्या भानगडींत पडूं नको, सलाम करण्याला जास्त वेळ थांबू नको, नाहींतर ज्या मोहिनीची असर तुझ्या-वर होऊं लागली आहे त्यांतून सुटण्याची पंचाईत होईल.

त्यानंतर त्या स्त्रीनें आपलें विस्करलेले मोकळे केश सांवरून पाठीवर टाकिले. हळू हळू डोकें वर केलें आणि भर निद्रेंतून किंवा मूर्च्छेतून जागृत झाल्याप्रमाणें आपल्या तोंडावरून हात फिरविला.

सिद्धराम—रझिया ! पुनरपि एकदांच मला या नांवानें हाक मारूं दे. मला वाटलें कीं, एकही शब्द बोलल्यावांचून तुझा त्याग करणें उचित नाहीं. हा वियोग माझें मनांत सदोदित सलेल असें करूं नको. आतां एकमेकांचा वियोग झालाच पाहिजे. माझ्या ह्या विचाराला अनुमोदन दे. अज्ञानपणांत मीं उपकारा ऐवजीं अपकार केला आहे. अती सत्काराबद्दल

अधम पाप केलें आहे आणि खऱ्या मैत्रींत कृतघ्नता दाखविली आहे. अशा प्रकारचें आचरण चालूं ठेवणें महत्पातक आणि पूर्ण विश्वासघात होईल ह्यांत संशय नाहीं.

रझिया नम्रतेनें ह्मणाली ' प्रियकरा तुमचें ह्मणणें खरें आहे. आपला वियोग झालाच पाहिजे असें तुह्मास वाटत असेल ह्यांत संशय नाहीं. मला ह्या गोष्टीची पूर्वीपासून धास्ती होतीच आणि तेवढ्यांच करितां माझें खरें नांव मीं सांगितलें नाहीं. परंतु अक्षयींकरितां माझा त्याग करून जाण्यापूर्वी माझें सांगणें ऐका. तिरस्कारयुक्त विचारानें तुह्मांस माझी वारंवार आठवण व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. माझ्या स्वतःच्या बचावाकरितां नाहीं परंतु अशाप्रकारचें आचरण करण्याचें कारण काय तें मी सांगतें, तें मेहेरबानी करून ऐका. गोष्ट खरी कीं, मीं तुमच्याशीं प्रपंच केला. आणि तोही कितीएक वेळां. प्रथम भेटीपासून मी तुह्मांस खोटें खोटें समजावूं लागलें. आग्राशहरांत आल्यानंतर जरी तुह्मी मला पाहिले नाहीं तरी, लागलेंच मीं तुह्मांस पाहिलें आणि पाहतांक्षणीं मी तुमच्यावर मोहित झालें. समक्ष भेटी घेऊन मैत्री करण्याचा मी निश्चय केला. काश्मीरांत पत्र पाठविण्याचें ढोंग केलें. आणि माझ्या गैरसमजुतीचा तसेंच प्रेमांधपणाचा परिणाम काय झाला तें तर तुह्मीं जाणतच आहांत. खरोखर फैजीची आणि तुमची गाढ मैत्री झाली आहे हें मला त्यावेळीं माहित नव्हतें. मागाहून मला समजलें तेव्हां माझें अंगावर रोमांच थरारले. मी कोण आहे हे एकदम सांगून आपला संबंध तोडण्याचें मला धैर्य केलें पाहिजे होतें; परंतु, हा दैवा ! मी त्यावेळेस अगदींच निर्बळ कशी झालें ! प्रिय सिद्धराम ! एक स्त्री दुसऱ्यावर मोहित झाली आणि आपल्या त्या पसंत केलेल्या मनुष्यावर अतिशय अनुरक्त झाली तर ती जशी पराधीन होतें तशीच स्थिति माझी झाली आहे. प्रतिष्ठेकरितां जो वियोग तुह्मांस जरूरी वाटल्यावांचून राहिला नसता त्याच वियोगाची मलाही भिती होतीच आणि म्हणूनच मी मौन्य धारण केलें होतें. आतां आपला आक्षयचा वियोग होण्यापूर्वीं माझे अपराध क्षमा करा. समुद्राचें पाणी सदोदित उसळणारच. सिद्धराम ! '

इतकें बोलून जणूं त्याचे कोपानें भयभीत होऊन, घाबऱ्या घाबऱ्या

आपला हात त्याचेकडे लांबविला आणि हळूंच श्वासोच्छ्वास सोडीत पुन्हा गादीवर पडली आणि तिच्या डोळ्यांत अश्रुं भरून आले.

थोडावेळ सिद्धरामाचे मनांत अतिशय क्षोभ तसेंच दुःखदायक विचार उत्पन्न झाले. परंतु ते जास्त वेळ टिकले नाहींत.

मदनमोहन सुंदरी राझिया ! ज्या स्त्रीनें त्याला स्वाधीन करून घेतला होता, इतकेंच नाहीं परंतु प्रतिष्ठेकरितां जे कांहीं तो अमूल्य समजत होता त्याचाही विसर पाडिला. त्या स्त्रीला आलिंगन देऊन सिद्धराम ह्मणाला " राझिये, तुझ्यावांचून माझें अयुष्य शुष्क आहे. माझें जीवित व्यर्थ आहे. तुझ्या समागमांत राहणें कांहीं अपराध नाहीं. तसेंच त्यांत कांहीं शरमही नाहीं. " खरोखर तो सत्य बोलला. त्यांत त्यानें कांहीं अतिशयोक्ती वापरली नाहीं. गप्पागोष्टींत रात्रीचा पहिला प्रहर निघून गेला, अवर्णनीय सुखांत सिद्धराम मग्न झाला. जो दृढ ठराव करून तो आला होता तो सर्व विसरून गेला आणि त्या शामनेत्री मोहिनीला लुब्ध झाला. पुष्कळ वेळानें तो परतला. बागेंतून बाहेर पडण्याचें दार तो उघडणार इतक्यांत कोणीं दुसऱ्यानें तें दार उघडिलें. तें पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. तें दार उघडून एक मनुष्य आंत दाखल झाला. आणि सिद्धरामाला पाहिल्यावांचून तो तें बंद करूं लागला; परंतु, सिद्धरामाचें तोंडून एकाएकीं ' कोण आहे ' असा शब्द निघून गेला. तें ऐकून तो मनुष्य त्याचेकडे फिरला. तो मनुष्य कोण होता ? फैजी स्वतः तर नाहीं ! आपल्या मूर्खपणाबद्दल तसेंच अविचारीपणाबद्दल सिद्धरामास फार वाईट वाटलें. त्यानें आपली जीभ चावली; परंतु झाल्या गोष्टीला उपाय नव्हता.

' सैतानाचे नावानें तुला विचारतों कीं, तूं ह्या ठिकाणीं काय करतोस ! तो नवीन येणारा इसम एकदम आवेशानें बोलला. जरी रात्रीचें आंधारांत सिद्धरामास त्याचे तोंड बरोबर दिसलें नाहीं तरी सेलीमचा आवाज त्यानें ओळखिला.

सिद्धराम धैर्यानें ह्मणाला, ' तितक्याच किंवा जास्त हक्कानें मी तुला विचारतों. ' हें उत्तर ऐकून शस्त्राचा खणखणाट होऊं लागला. सिद्धराम समजला कीं सेलीमनें तरवार उपसली. सेलीम एक दोन पावलें पुढें

आला परंतु, आपल्या प्रतिस्पर्ध्याला ओळखून तरवार म्यानांत घातली.

सेलीम ( फारच चकित होऊन )– अहो सरदारबहादुर सिद्धराम ! शेवटीं तुमचे रात्रीचें साहसकर्म उघडकीला आलें तरी तुमच्या सारख्या तरुण पुरुषाचें बाबतींत त्यांत कांहीं वांधा घेण्यासारखें नाहीं. मी तुह्मांस फसवीन अशी धास्ती बाळगूं नका. तसेंच तुह्मांस त्याबद्दल ईर्षा आणण्याचें कांहींही कारण नाहीं. तुह्मांस सांगितलें पाहिजे कीं, तुमचें प्रियपात्र कांहीं अंशी आमच्या मसलतींत आहे. केव्हां केव्हां गुप्त रीतीनें रात्रीचें अंधारांत त्या बाबतींत विचार करण्याकरितां मी तिच्याकडे येत असतो. परंतु, कदाचित् असल्या अरसिक विषयाची चर्चा करणें तिला आज आवडणार नाहीं. दुसऱ्या एकादे वेळीं तिची भेट घेतां येईल.

अशी सबब दाखवून सेलीम दरवाजाकडे परतला आणि सिद्धरामाबरोबर बाहेर निघून त्यानें हळूंच दार बंद केलें. ‘ मला वाटतें तुह्मीं आतां तुमच्या मुक्कामावर जाल ! मी तर ह्या समोरच्या बाजूला जाणार आहे. ’ उत्तर काय द्यावें हें सिद्धरामास सुचेना, तो गुपचीप ऐकत होता. सेलीम पुन्हां ह्मणाला, ‘ पण आपल्या ह्या भेटीची बातमी तिसऱ्या कानीं जाऊं देऊं नका, शांत राहण्यांत दोघांचा लाभ आहे. आणि तेंच शहाणपणाचें होईल. असें ह्मणून सेलीम अंधारांत अदृश्य झाला.

‘ अनायासें त्यानें माझा फारच फायदा केला. ’ सेलीम मनांत बडबडला, ‘ फारच महत्वाची बातमी त्याचेकडून मिळाली. ही सर्व कारस्थानें त्या विलक्षण पुरुषाची असली पाहिजेत. ’

# खंड ११ वें

## अजीत अबला.

दुसरें दिवशीं सेलीमचा एक विश्वासू मनुष्य त्या शहराबाहेरील बंगल्याचे आजूबाजूला भटकत होता. कांहीं वेळानें गुलाबदानची दासी येऊन त्याला भेटली. लवकरच त्यांचे ठराव झाले. आपल्या मालकिणीची गुप्त गोष्ट तिनें खुशीनें त्याला सांगितली. कारण, तिची मालकीण आणि सिद्धराम दोघे मिळून जे कांहीं तिला देतील त्याहून सेलीमकडून तिला जास्त मिळणें साहजिक होतें. त्याचदिवशीं सायंकाळीं ती दासी राजमहालाजवळ गेली. आणि सेलीमचा विश्वासू मनुष्य तिला भेटला. कांहीं पत्रें तिनें त्याला दिली. आणि त्याबद्दल मिळालेले पैसे घेऊन परत आपल्या मालकिणीकडे घाईघाईनें चालती झाली. हा बनाव बनल्या नंतर दुसरें दिवशीं थोड्या मनुष्यांनिशीं सेलीम पुन्हां अलाहाबादेस जाण्यास निघाला.

त्या ठिकाणीं एकांतांत आणि दिलगिरींत खिन्न झालेली एक स्त्री रहात होती. आपल्या प्राणाधार प्रियकराकडील कांहींच माहिती तिला नव्हती. अहा ! शहरांत आल्यावर प्रथम त्यानें दोन पत्रें लिहिलीं होतीं. त्यांत त्यानें आपल्या खऱ्या प्रेमांत कधींही अंतर पडणार नाहीं असें स्पष्ट लिहिलें होतें. त्यानंतर तो सुखरूप आहे, आणि बादशहाची मेहेरबानी त्याच्यावर वाढत्याप्रमाणावर आहे. असें इरावतीस समजलें होतें; तरी सिद्धरामाकडून तिला एकही पत्र आलें नाहीं. इतकें दिवस तो स्वस्थ कसा राहिला, पत्र न पाठविण्याचें कारण काय? जस जसे

दिवसगत होत चालले, तसतशा तिच्या मनांत शंका उत्पन्न होऊं लागल्या. परंतु, तिनें धैर्य सोडिलें नाहीं. सिद्धरामानें दिलेल्या वचनांवर विश्वास ठेवून कालक्रमण करूं लागली. आपल्या प्रियकराबरोबर लहानपणीं काश्मीर देशांत वाचलेल्या एका पुस्तकाचीं पानें उगाच फिरवीत असतां आपल्या निपूणिका दासीला घाबऱ्या घाबऱ्या येतांना तिनें पाहिलें. बोलूं किंवा नको असा विचार करीत ती आपल्या मालकीणीजवळ येऊन पोंचली. इतक्यांत इरावतीनें विचारलें ' तूं मला काय सांगणार आहेस बाई ? तूं कांहीं वाईट समाचार घेऊन आली असावीस असें वाटतें !"

दासी—काय करूं ! ' ती हकीकत सांगण्यास माझी जीभ उचलत नाहीं, तरी जी गोष्ट ऐकिली आहे ती गुप्त ठेवणें मला रास्त वाटत नाहीं. ती हकीकत तुमच्या संबंधीच आहे. परंतु, ती सांगण्यास माझी हिंमत चालत नाहीं. "

इरावती– फाजीलपणा पुरें कर ! जे असेल ते एकदम सांगून टाक. तूं जे कांहीं सांगशील ते ऐकण्याला मी तयार आहे.

दासी– ऐका तर, " आग्र्याहून आलेल्या एका शिपायाची आणि तिची झालेली भेट, तसेंच त्यानें सिद्धरामासंबंधी सांगितलेली सर्व हकीकत प्रथम प्रथम तर फारच सावधपणानें ती बोलली. परंतु, शेवटीं फैजीच्या बेगम संबंधी सेलीमनें जो शोध मिळविला होता, ती सर्व हकीकत फुगवून सांगितली. "

ही गोष्ट सांगण्याचा परिणाम निपूणिकेला वाटला होता तसाच झाला. सिद्धरामाकडील हकीकत ऐकतांच, एकाद्या सुकलेल्या फुलाप्रमाणें इरावती एकदम निस्तेज झाली. कांहीं वेळ ती बोलूंही शकली नाहीं. नंतर एकाएकी उभी राहून कधीही पाहण्यांत न आलेल्या अशा आवेशानें तिनें तिला विचारिलें, " हें सर्व तुला कोणी सांगितलें ? तो कोणी शिपाईच होता काय, खरें सांग ? गप्पा झोकण्याची कांहीं जरूरी नाहीं. "

दासी—बाईसाहेब ! तुम्हांस फसविण्याचें धैर्य मी कसें करीन आणि तसें करण्याचें मला कारण पण काय आहे ! मी तुमच्यापुढें जी हकिकत सांगितली, ती मला सेलीमच्या चाकराकडून समजली.

इरावती ( मोठ्यानें )—सर्व गोष्टी अगदीं खऱ्या आहेत, " आतां सर्व माझ्या ध्यानांत आलें, कसला पाजीपणा ! " ती मनांत बडबडली. नंतर आपल्या दासीकडे वळून ह्मणाली. बाई निपुणिके ! तूं बरें केलेंस, खरोखर माझी काळजी बाळगून तूं जी खबर आणिलीस त्याबद्दल मी तुझे उपकार मानितें. परंतु, ती खबर कोणाकडून मिळाली हे समजल्यामुळें आतां मला त्याची पर्वा वाटत नाहीं. क्षणभर मला एकटी बसूंदे आणि ज्या मनुष्यानें तुला असल्या गोष्टी सांगितल्या त्याच्याशीं इतःपर जास्त प्रसंग ठेवूं नको.

इरावतीनें जें कांहीं ऐकिलें होतें त्याच्या शक्यतेबद्दल तसेंच संभवनीयतेबद्दल ती विचार करीत बराच वेळ हातांवर डोकें टेंकून बसली होती. एकाएकी समोर उभा असलेल्या सेलीमला पाहतांच त्यांतील सर्व इंगित तिला समजलें. सिद्धरामाचें बाबतींत तिचें मन कलुषित करण्याचें उद्देशानेंच असली निंद्य गोष्ट ह्या लोकांनीं आरंभीली आहे, अशी तिची खात्री झाली.

सेलीम—इरावती, तुमच्या दासीकडून जी गोष्ट तुमच्या कानांवर आली आहे, आणि जी मी सांगूं शकत नाहीं. त्यावरून माझ्या येण्याचें कारण तुमच्या समजण्यांत आलें असेलच, तरी मला अगदीं निराश करणारी आपली शेवटची भेट झाली असतां माझें पुनरपि इकडे येणें झालेलें पाहून तुह्मास आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं.

इरावती शांतवृत्तीनें ह्मणाली, " मी पूर्णपणें समजत आहे कीं, ज्या ठिकाणीं प्रीतीचे बाबतींत फुसलावण्यानें कांहीं काम साधत नाहीं. त्या ठिकाणीं निंदा केल्यानें तुमचें काम साधेल असें तुह्मास वाटतें काय ? आपल्या सारख्या राजवंशीय पुरुषाचे हातून असले निंद्य वर्तन होईल असें मला वाटत नव्हतें. "

सेलीम— तुमचें मन दुखविण्याचा विचार माझे मनांत कधींही येणार नाहीं. खोट्या गप्पा झोंकण्याचें मला कारण काय ? परंतु, खऱ्या हकीकतीला प्रत्यक्ष प्रमाण असेल तर ?

इरावती—काय प्रत्यक्ष प्रमाण ? तुह्मी काय बोलतां !

सेलीम—तुह्मी सिद्धरामाचे हस्ताक्षर ओळखाल नाहीं बरें ?

इरावती—बेशक ! !

सेलीम—बरें तर ही पत्रें पहा ! असें ह्मणून ( गुलाबदानच्या विश्वासू दासीनें आपल्या मालकिणी जवळची चोरून आणून, सेलीमला विकत दिलेली दोन पत्रें ) त्यानें इरावतीचें हातांत दिली.

तीं पत्रें फारच घाईनें तसेंच कामाच्या गडबडींत असतांना लिहिली होतीं. प्रेमाचीं वचनें त्यांत पुष्कळ वापरली होती. सिद्धरामानें रचलेल्या एक दोन कविताही त्यांत होत्या. त्या कवितेंत राझियेचे नांव कित्येंकवेळां आलें होतें. इरावतीनें तीं पत्रें वर वर न वाचतां नीट तपासून पाहिली, पुन: पुन: वाचलीं आणि एकदम फेंकून दिली व त्याचवेळेस ती बेशुद्ध होऊन जमिनीवर पडली. जरी सिद्धरामावर तिचें अपरिमित प्रेम होतें, तरी निर्बल आणि असल्या प्रसंगीं घाबरणारी ती स्त्री नव्हती. प्राचीनकाळचें आणि शूरवंशाचें रक्त तिच्या शरीरांत खेळत होतें. लवकरच शुद्धींत येऊन सेलीमकडे पहात, ती त्याच्या समोर उभी राहिली. आणि एकदम ह्मणाली, “ माझे नशीब नक्की होऊन चुकलें. कारण, मी जें ऐकलें तें सत्य आहे असें मला कबूल केलेंच पाहिजे. हावेळपावेतों जें अंत:करण माझ्या एकटीच्याच स्वाधीन होतें तें अन्य स्त्रीच्या हातीं गेलें आहे. परंतु, सेलीम ! ज्या एका स्त्रीच्या अंत:करणावांचून दुसऱ्या सर्व वस्तुवर तुमची सत्ता चालते त्या तुह्मीं राजकुलोत्पन्न पुरुषानें असें न समजलें पाहिजे कीं, हा वेळपावेतों तुमच्याकरितां जो मार्ग बंद होता, तो असल्या प्रकारचा शोध आगिल्यानें मोकळा झाला आहे. मी दिलेल्या वचना ऐवजीं मलाही वचन मिळालें आहे. जरी सिद्धरामाचे हातुन वचनभंग झाला आहे तरी माझें दिलेलें वचन व्यर्थ समजूं नका. जों पावेतों माझें वचन मला परत मिळालें नाहीं, तों पावेतों तें मी पवित्र समजेन.

सेलीम ( आश्चर्यानें )– ते कशारीतीनें ? ज्या प्रियतमाची बेइमानी तुह्मांस समजून चुकली आहे आणि तो जर अन्य स्त्रीवर मोहित होऊन तमचा त्याग करीत आहे तर तुह्मी स्वतंत्र झालो नाहीं ह्मणून म्हणतां हा किती मूर्खपणा ? माझें असें म्हणणें आहे कीं, ज्या वेळेस ते विचार तुमचे स्मरणशक्तींतून निघून जातील त्या वेळेस माझे बाबतींत विचार करा. जो मनुष्य दुसऱ्या सर्व वस्तुहून तुह्मांस जास्त प्रिय समजतों, दुसरा कोणीही देऊ

शकत नाहीं इतकी सत्ता आणि अब्रू तुम्हांस देतो, त्याचें सांगणें तुम्ही ऐकत नाहीं ही तुमची केवढी नादानी.

इरावती— तुम्हीं मला अद्याप ओळखीत नाहीं आणि कदाचित् ओळखूं शकणारही नाहीं. तुमचा ज्या स्त्रियांशीं परिचय झाला आहे त्या स्त्रीयाहून हिंदू स्त्रिया अगदींच निराळ्या प्रकारच्या असतात. तुमची समजूत असेल कीं, एकाद्या राजकर्त्याची प्रियसुलताना होणें हेंच स्त्रीजातीचें परम सुख ? छे ! ! परम निंद्य आहे. कित्येक स्त्रियास तसें वाटत असेल, परंतु इरावतीच्या बाबतींत तसें नाहीं. एका हिंदु स्त्रीला तिच्या प्रियकराच्या बैमानीची खात्री करून देणें व त्या योग्य पुरुषाला सोडून देऊन त्याच्यासंबंधी सर्व स्तुत्य विचार काढून टाकणें पुरें होईल असें तुम्हीं समजतां नाहीं बरें ?

सेलीम—आणि काय इतकें झालें म्हणजे पुरें.

इरावती ( जास्त दृढतेनें )— आमच्या सारख्या कुलीन स्त्रिया, ज्याठिकाणीं धर्म आणि प्रतिष्ठेची बाबत येईल त्याठिकाणीं मोठेपणा मिळण्याच्या लालचीनें कधींही फसणार नाहींत. मोठी पदवी मिळण्याची त्यांना परवा नाहीं. त्या पतिप्रेमांत कधींही अंतर पडूं देणार नाहींत. त्यांचे प्रेम जसेंचें तसेंच राहील आणि त्या आपल्या पातिव्रत्याचें संरक्षण करतील. आपल्या पतीच्या बाबतींत स्त्री किती इमानदार असतें त्याची सीमाच नाहीं. तुम्हास माहितच आहें कीं, आपल्या मृतपतीला भस्म करण्याकरितां पेटलेल्या चितेंत किती आनंदानें आर्ययुवती आपला देह अर्पण करितात. आमच्या पुरातन काळच्या पवित्र गोष्टी व शूरवीरांच्या दंतकथा पहा ! आणि स्त्रियांनींतर आपल्या अपवित्र पतींची देखील भक्तिपुरस्सर सेवा केल्याचें लिहिलें आहे. दमयंतीचें हृदयद्रावक पवित्र चरित्र फारच वंदनीय आहे. माझ्यानें होईल तितक्या अंशानें मीहि प्रति दमयंती होईन. सिद्धरामानें माझा त्याग केला आहे, परंतु त्याचें कारण इतकेंच कीं, क्रूर कलीनें त्याला वश करून आडमार्गानें नेला आहे. बाकी मजवर असला प्रसंग आणणार कोणीहि नाहीं. मोहजालांतून मुक्त होतांक्षणीं, नळराजाप्रमाणें तो परत माझ्याकडे येईल. दरएक बाबतींत मी पवित्र आणि निर्दोष

आहे अशी त्याची खात्री होईल. त्याचे नांवाची प्रतिष्ठा वाढविण्याची रीत त्याच्याहून मी जास्त चांगल्या रीतीनें समजतें अशी त्याची खात्री होईल.

सेलीम ( जरा थांबून )— मला फारच दिलगिरी वाटतें कीं, तो परत येण्याबद्दलची तुमची आशा कधींहि सफल होणार नाहीं. तो कशा स्त्रीचें मोहजालांत सापडला आहे ते मला पूर्णपणें माहित आहे. तुम्हांस पहाण्यापूर्वीं मीही तिच्यावर मोहित झालों होतो आणि तुह्मास उघड सांगतों कीं, तिच्या बाबतींत जो मोह उत्पन्न होतो तो जास्त पवित्र आणि शुद्ध प्रेम उत्पन्न करणाऱ्या स्त्रीवांचून दुसरें कशानेंही दूर होत नाहीं. नक्की समजा कीं आजपावेतों तुमच्याहून जास्त पवित्र आणि सद्गुणी स्त्री मी पाहिली नाहीं. तसेंच, तिच्याहून जास्त चित्तहरण करणारी स्त्रीही मी पाहिली नाहीं.

इरावती— माझी एक मागणी जरी असभ्य वाटेल तरी आपण कबूल कराल अशी माझी विनंती आहे. ह्यावेळेस मला सोडून जा. आपलें जे कांहीं संभाषण झालें त्यावरून मला वाटतें कीं, तूर्त मला एकांताचीच फार जरूर आहे. आपल्या सारखे सुविचारी राजपुत्र माझ्यावर एवढी मेहेरबानी करितील अशी मला पूर्ण आशा आहे.

सेलीम ह्मणाला, ‘ तुमचे स्वभावाचा लेशमात्रही दुरुपयोग करणें मी लायक समजत नाहीं. तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. जास्तवेळ दुराग्रह करण्याची ही वेळ नाहीं, इतकेंच नाहीं परंतु, त्यापासून माझें काम बिघडण्याचाही संभव आहे. ’ इतकें बोलून राजपुत्र चालता झाला.

सेलीम तेथून निघून गेल्यानंतर लागलेंच इरावतीचें धैर्य आणि आवेश मंद पडले. फारच श्रमित होऊन ती एका बैठकीवर पडली आणि तिला अतोनांत रडूं कोसळलें.

अशा प्रकारची विश्रांतीही तिला फारच थोडा वेळ मिळाली. तिच्याकडे येणाऱ्या कोणा मनुष्याची पाउलें ऐकून तिनें वर पाहिलें तों आपल्या समोर सल्हाण उभा आहे.

सल्हाण( मृदु स्वरानें )—इरावती, तूं काय विचारांत पडली आहेस तसेंच तुला इतकें शोकातुर होण्याचें कारण काय तें सर्व मला माहीत

आहे. आज जी गोष्ट तुझें ऐकण्यांत आली. ती कितीएक दिवसांपासून मला समजली आहे. सिद्धरामाची निमकहरामी, मी थोड्या दिवसांपूर्वी आग्र्यास असतांना मला समजली; परंतु, तुला समजण्याचा खरा प्रसंग येईपर्यंत मी ती गोष्ट गुप्त ठेविली; आतां तुला सर्व समजून चुकलें आहे. मला आशा आहे कीं, फक्त तुझ्या स्वतःच्याच प्रतिष्ठेकरितां ज्या मनुष्यानें अशा निर्लज्जपणानें आपला संबंध तोडून टाकिला, त्या मनुष्याबद्दलचे सर्व विचार दूर कर. त्याच्या बद्दलचे विचाराला तुझें मनांत थाराच देऊं नको. नाहीं, माझें बोलणें एकदा ऐकून घे. नक्की समज कीं, असला हानीकारक प्रसंग पाहून मला तुझी फारच दया येतें, तरी सुकुलोत्पन्न युवतीनें आपली प्रतिष्ठा आणि पवित्र कीर्ति वाढविण्याकरितां काय केलें पाहिजे, त्याची तुला आठवण करून देणें हा माझा धर्म आहे. विश्वास ठेवण्यालायक तुला एक गोष्ट सांगतो. आतां जरी हल्लीं तुला झालेली जखम लवकर भरणार नाहीं तरी शेवटीं तुझें मनाला समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. तुझें भविष्य फारच तेजोमय दिसतें. इरावती ! साऱ्या हिंदुस्थानांतील दरएक स्त्रीला जी वस्तू मिळविण्याची इच्छा आहे ती हल्लीं तुझें स्वाधीन होण्यासारखी आहे. राजपुत्र सेलीम तुझ्याशीं लग्न करण्यास तयार आहे. ह्या बाबतींत प्रथम मला संशय होता; परंतु, प्रसंगानुसार त्यानें सर्व कांहीं मजपाशीं कबूल केलें. राजपुत्र सेलीमचें तुझ्यावर निष्कपट प्रेम आहे; आणि तुझें पाणीग्रहण करण्याची तो मागणी करीत आहे.

इरावती—मला माहीत आहे.

सल्हाण—तें तुला माहीत आहे ? आणि तें कशारीतीनें ?

इरावती—राजपुत्रानें स्वतः मला सांगितलें आणि तेंही आजच.

सल्हाण—आणि तूं त्याला काय उत्तर दिलेंस ?

इरावती—संतोष देणारी अशी त्याची मागणी मी नाकबूल केली.

सल्हाण ( रागावून )—काय ? नाकबूल केली, तुझें डोकें तर फिरलें नाहींना ?

इरावती—मला वाटतें कीं, तसें नाहीं. परंतु, सिद्धरामाबरोबर मी वचनबद्ध झालें आहे.

सल्हाण--बरें, पण त्याचा ह्याठिकाणीं काय संबंध आहे ? पाहिजे त्याला पसंत करण्याला तूं अद्याप मोकळी आहेस. तूं कांहीं त्याची लग्नाची बायको नाहींस.

इरावती--तसें तर नाहीं, तरी पण "तुझ्या वांचून अन्य पुरुषाला मी कधींहीं आपलें प्रेम देणार नाहीं" असें मी सिद्धरामाला वचन दिलें आहे, आणि त्या वचनांतून त्यानें माझी मुक्तता केली नाहीं.

सल्हाण- तें पाहिजे तें असो, असली वचनें अलीकडे वाटेल तितकी दिली जातात. त्यानें तर वचनभंग केला आहे, आणि विश्वासघातही केला आहे आणि त्यामुळें दिलेल्या वचनांतून तूं मुक्त झाली आहेस.

इरावती- ज्यांना पाश्चिमात्य शिक्षण मिळालें असेल ते समजतील. तुमच्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्याला माझे विचार मला प्रतिबंध करीत आहेत, माझे असले विचार तुमचें नुकसान करणारे असले तरी प्रिय बाबा, त्याचा दोष तुमचें शिरावर आहे. कारण, तुमचेकडून मला तशाचप्रकारचें शिक्षण मिळालें आहे. तुमच्या समक्ष कोणतीही गोष्ट छपविण्याची माझी इच्छा नाहीं. मी स्पष्ट सांगतें कीं इतकें झालें असतांही सिद्धरामावरील माझें प्रेम यत्किंचितही कमी झालें नाहीं. त्याला सोडून अन्य पुरुषावर मी कधींही प्राणांतीं देखील प्रेम करणार नाहीं.

सल्हाण—पुरे ! पुरे ! प्रिति आणि प्रेमाच्या गोष्टीची कांहीं जरूर नाहीं. सेलिमचें तुझ्यावर प्रेम आहे आणि त्याच्यावर मिळविलेल्या सत्तेचा तूं उपयोग करूं शकशील इतकेंच पुरे आहे. जुन्याकाळच्या आणि अतिशयोक्तीच्या विचारतरंगावर आस्था ठेवणें तुला लायक नाहीं. अशा पुरुषाबद्दल मूर्खपणाची इच्छा बाळगण्यानें, तुला लाभ होण्याची जी ही चांगली संधी आली आहे ती साधण्याचें कामीं तुझ्या हातून मोठी चूक होत आहे. विचार केल्यावांचून असल्या मताला धरून बसण्यानें केवढ्या मोठ्या फायद्याला तूं आंचवणार आहेस त्याचा विचार कर. साऱ्या दुनियेंत ज्याची बरोबरी होणार नाहीं असें राज्य तुला देण्यांत येत आहे आणि तूं त्याचा तिरस्कार करतेस ? आणि तो कशाकरितां ! तर एका स्वप्नवत् वस्तूकरितां ! !

इरावती ( सल्हाण रागावलेला पाहून, शांतपणानें )- कदाचित् माझी

चूक असेल. बाबा तुमचे गोष्टीपासून माझे मनाची खात्री होत नाहीं. मी ती सर्व हकीकत ऐकिली आहे आणि तीही जास्त स्पष्टपणें आणि जास्त आवेशानें सेलीमच्या स्वतःच्या तोंडून निघालेली. परंतु माझें मनांत झालेल्या निश्चयापासून मी कधींही ढळणार नाहीं हें नक्की समजा.

सल्हाण ( फार रागावून )-- तर मग तुझ्या बापाच्या इच्छेआड येण्याचा तुझा निश्चयच झाला आहे नाहीं बरें ? पण ह्यावरून मला वाटतें कीं प्रीतीच्या नियमावर तुझी अस्था आहे ह्मणून तूं म्हणतेस आणि ज्याप्रमाणें वर्तन करण्याचें ढोंग दाखवितेस त्याच नियमाविरुद्ध तुझें वर्तन आहे. हे नियम साफ सांगतात कीं आपले बापाचे आज्ञेनुसार वर्तन करणें हें मुलांचें मुख्य कर्तव्य आहे.

इरावती—बेशक ! परंतु, त्याहून जास्त महत्वाची बाबत अमलांत आणण्याचें कामीं जर विरोध येत असेल तर त्या कर्तव्यानुसार वर्तन होऊं शकत नाहीं. तुमच्या मर्जीप्रमाणें मी वागूं शकत नाहीं, आणि माझेकडून तुमच्या आज्ञेचें उल्लंघन होतें त्याबद्दल मला फारच वाईट वाटतें. बाबा ! परंतु, काय करूं इलाज नाहीं. ह्या बाबतींत मी तुमच्या आज्ञेप्रमाणें वागणारही नाहीं आणि तसेंच, वागूं शकतही नाहीं.

सल्हाण– काय, तुला माहीत नाहीं कीं आपल्या मुलीवर बापाचा हक्क आहे आणि जरूर पडल्यास आपल्या आज्ञेप्रमाणें तो तिला वर्तन करण्यास लावील.

इरावती– तें मला चांगलें माहीत आहे. तसेंच जबरदस्तीनें ह्या ठिकाणीं कांहीं होणार नाहीं. हेंही मला माहीत आहे. सेलीमबरोबर जुलमानें माझें लग्न केलेंत तर त्याच्या मनांत माझ्याबद्दल वाईट विचार येतील, आणि त्याच्यावर माझी सत्ता चालणार नाहीं. ही गोष्ट त्याला स्वतःलाही माहीत आहे. आणि जबरदस्ती करणें त्यालाही योग्य वाटत नाहीं. त्याप्रमाणें त्याचा विचार असल्यास तुम्हास मध्यस्ती टाकण्याचें कांहीं कारण नाहीं. अकबर बादशहाचें मुलाची मर्जी असल्यास माझ्या तसेंच तुमच्या इच्छेला सहज वश करण्याचें सामर्थ्य त्याचें अंगीं आहे.

हें ऐकून सल्हाणानें कपाळावर हात मारून घेतले आणि अधीरतेनें

ओंठ चावले. जिला तो हावेळपावेतों अतिनम्र आणि आज्ञांकित मुलगी समजत होता, तिनें त्याला सर्वप्रकारें हरविलें. ह्या हट्टी मुलीमुळें त्याच्या सर्व मोठमोठ्या उमेदी आणि युक्त्या रद्द झाल्या. राज्यांत बाद्शहाचें खालोखालची पदवी मिळण्याची त्याला आशा होती. आपल्या मुलीच्या वशील्यानें आग्र्यात मुख्य वजीराचे गादीवर बसून खुद्द राजावर देखील आपण सत्ता चालवीत आहों असें तरंग त्याच्या मनांत येत होतें. अनेक प्रजाजनांवर तसेंच सर्व मांडलिक राजांवर अंमल चालविणारा स्वतःच आहे असें तो समजत होता. परंतु, वरील बेबनावामुळें त्यानें जमीनीवर हात टेकिले.

सल्हाण ( क्रूरमुद्रा करून रागानें )—ठीक आहे; माझी बुद्धि तुला काय सांगते त्याचा तूं विचार करीत नाहींस. जबरदस्तीचें तुला भय नाहीं. परंतु, तुला ज्याचें भय वाटेल अशी वस्तू आहे. बापाचा शाप असा तसा नाहीं समजलीस !

इरावती—माझ्यावर जे दुःखाचे पर्वत कोसळले आहेत ते द्विगुणित होवोत. परंतु, त्या सर्वांबद्दल क्षणभर देखील संकोच न बाळगितां धैर्यानें सर्व कांहीं सहन करण्याचा मी यत्न करीन. विधिलिखित लेख कधींही मिथ्या होत नाहींत.

सल्हाण—तूं फार हिंमतवान् आहेस, अथवा तसें करण्याचा यत्न करतेस. परंतु, ज्याच्यावर तुझें अद्याप प्रेम आहे असें तूं ह्मणतेस; त्याचें तुझ्या हट्टीपणामुळें नुकसान होणार नाहीं ? किंवा ना ह्मणण्याचें वैर राजपुत्र त्याच्यावर घेणार नाहीं ? अशी तुझी खात्री आहे काय ?

सल्हाणाचा हा शेवटचा घाव नेमका लागला असावा असें दिसलें. वरील भाषण ऐकून तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. निराश आणि खिन्न हृदय होऊन परमेश्वराची करुणा भाकित असावी अशा रीतीनें हात वर केले आणि बाजूच्या बिछान्यावर बेशुद्ध होऊन पडली. तिचें तोंड उतरून गेलें. ती निरमाल्यवत् दिसूं लागली. द्वेष व्यक्त करणाऱ्या हास्य वदनानें सल्हाण तिच्याकडे पहात उभा राहिला. शेवटीं त्याचा जय झाला आणि अजिंक्य मानलेली जी अबला तिचा जोर कमी झाला असें त्याला वाटलें.

परंतु त्या योग्याभिमानी युवतीनें पुन्हां आपलें डोकें वर केलें. सल्हाणाकडे एकाग्रदृष्टीनें पाहिलें, आणि प्रथम थांबत थांबत परंतु, नंतर दृढतेनें बोलली; बाबा, तुह्मीं जी गोष्ट सांगितली ती खरोखर क्रूर फारच भय उत्पन्न करणारी आहे. परंतु, तुह्मी सांगतां त्याप्रमाणें किंवा तुमच्या समजुतीप्रमाणें माझें अनुमान होत नाहीं. खऱ्या भावार्थानें तुह्मींही धमकी देत असला तरी देखील माझ्या शिरावर जें पवित्र कर्तव्य आहे त्याचा अशा धमकावणीनें मी त्याग करणार नाहीं. जर सिद्धराम आपल्या जवळ उभा असतां आणि मला होना करितांना किंवा भयापासून त्याचें संरक्षण करण्याकरितां मी आपला वचनभंग करतांना पाहील तर बेशक तो माझा धिःकार करील. तसेंच वाजवीरीतीनें मला आपल्यापासून दूर करील. त्याच्याकरितां मी माझा स्वतःचा बळी देईन; कारण हा देह त्याचाच आहे. परंतु, माझी अब्रू आणि प्रतिष्ठा कीं, ज्यांचाही तोच मालक आहे त्यांना मी बळी देणार नाहीं. त्याचा मृत्यू तो माझाच मृत्यू समजा. जें नशिबी असेल तें आह्मीं दूर करूं शकणार नाहीं. निरपराधी मनुष्यावर कोणीही वैर धरोत. परंतु, सेलीमला किंवा तुह्माला त्यापासून कांहींच फायदा होणार नाहीं. इतकेंच होईल कीं, तुह्मीं तुमच्या मुलीला मुकाल आणि तुमची बहीण आपल्या मुलाला मुकेल. आठवण ठेवा कीं अशानें तुमचे कोणतेंही कार्य साधणार नाहीं. किंवा तुमच्या स्वार्थाची कोणत्याहीप्रकारें वृद्धि होणार नाहीं. असो ! मला तुमचा मान ठेविला पाहिजे आणि ज्या गोष्टीपासून तो रहात नाहीं त्या गोष्टी जरूर बंद केल्या पाहिजेत. बाबा, मी तुमची मुलगी आहे. एका कुलीन आणि जुन्या वंशांत जन्म घेतला आहे. त्याचा विचार करा आणि तेवढ्याचमुळें ज्याठिकाणीं कर्तव्यकर्म आणि अब्रू, तसेंच ज्यापुरुषावर माझें प्रेम जडलें आहे त्याचा संबंध येईल, त्याठिकाणीं योग्य विचार केलाच पाहिजे.

क्षणभर सल्हाण इरावतीकडे पहात गुपचीप उभा राहिला आणि इरावतीही त्याचे समोर गर्वानें आणि बेपर्वाईनें उभी राहिली.

आतां परस्परांची स्थिति बदलली. हा वेळ पावेतों जी मुलगी आज्ञांकित होती ती हुकूम करणारी झाली, आणि गर्विष्ठ बापाला तिनें आधीन

केले. एकहीं शब्द बोलल्यावांचून सल्हाणानें पाठ फिरविली. आपल्या अप्रसंन शाम वदनावर निष्फलता आणि रागाचीं चिन्हें व्यक्त करीत तो तेथून निघून गेला.

# खंड १२ वें.

## कपटव्यूह आणि ईश्वरी ऐक्य.

हमेशाच्या रिवाजाप्रमाणें नदीकिनाऱ्याकडे आलेल्या आग्रा-शहराच्या एका लहान बाजारांत संध्याकाळचें वेळीं मनुष्यांची एकच गर्दी भरली होती. कांहीं कांहीं ठिकाणीं मोकळ्या चौथऱ्यावर शिळोप्याच्या गोष्टी झोंकीत किंवा बुद्धिबळाचे वगैरे खेळ खेळत चैनी मंडळी बसली होती. मैदानांत लहान मुलें इकडून तिकडे धांवत होतीं. यमुनेच्या घाटावर वृद्धब्राह्मण सायंसंध्या करीत होत. दारू पिऊन छाकटे झालेले सशस्त्र शिपाई जातानां नजरेस पडत होते. जनसमूहापासून दूर, अफीणी लोक तरंगांत मग्न होऊन एकांतांत आराम घेत होते. आणि कांहीं खटपटी मंडळी जरूरीच्या कामांत गुंतली असावी अशा रीतीनें इकडून तिकडे फिरत होती. ह्यांतून एकानें आपल्या सोबत्यास म्हटलें " अरे अल्लीं ! अकबर आणि त्याच्या कारभारी मंडळींची स्थिती जास्त जास्त बिघडत चालली आहे. अल्लाह ! निंदक सभा सकाळ संध्याकाळ भरत

आहेत. गेल्या रात्रीं मध्यान्हीचे सुमारास राजमहाला जवळून मी चाललों होतों त्याठिकाणीं माझ्या पहाण्यांत काय आलें ? खिडक्यांतून दिवाण-खान्यांत सर्वत्र लखलखाट दिसला. अनेक झुमरें प्रज्वलीत केली होतीं. परंतु ते कशाकरितां ? त्याठिकाणीं मोठी मेजवानी होती कीं काय ? नाहीं. सर्वत्र शून्यकार भासत होतें. केव्हां केव्हां गंभीर अवाजांत भजन ऐकूं येत होतें. माझ्या ऐकण्याप्रमाणें अकबरनें स्वतः कांहीं भजनें रचिलीं आहेत आणि तें पाहिजे तितकें कर्णमधूर असले तरी त्यांत मोठ्या पैगंबराची बंदगी नसल्यामुळें आपल्या धर्माशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं."

अल्ली— बरें, ह्यावरून काय अनुमान होतें.

"त्याचा खरा भावार्थ काय आहे तें मी बरोबर सांगूं शकत नाहीं. परंतु, जो नवीन धर्म इस्लामी धर्माऐवजीं स्थापन करण्याची अकबर बाद-शहाची इच्छा आहे आणि ज्याची तो आपल्या सलाहकारांना समजूत देत असतो त्या धर्मासंबंधी कांहीं काम असेल आणि तेवढ्याचकरितां त्याठिकाणीं दीपोत्सव करण्यांत आला होता आणि गायन चाललें होतें ह्यांत संशय नाहीं. अकबराचा हा नवीन धर्म अग्नि आणि सूर्याची पूजा करण्याचे सुचवितो आणि त्याचीं मूळतत्वें पारशी आणि येथील नास्तीक लोकांच्या शास्त्रांतून कोणी अशुभ वेळीं शोधून काढिलीं असावीं असें वाटतें ? "

अल्ली—हा धर्म कसा काय आहे. ह्या धर्माच्या गोष्टी मी दोन चार वेळा ऐकिल्या खऱ्या. परंतु, तें काय आहे तें मी बरोबर समजलों नाहीं.

युसफ—तसेंच मलाहीं पूर्ण माहीत नाहीं. परंतु, दरएक धार्मिक मनुष्य आणि मुख्यत्वें करून अब्दुलकादिर जो मोठा विद्वान आहे आणि ज्याला अकबर स्वतः चांगला मान देतो तो देखील ह्या धर्माविरुद्ध आहे. ह्यावरून नक्की होतें कीं तो धर्म फारच खराब आहे. परंतु, ह्याहू-नही एक फारच वाईट गोष्ट माझ्या अनुभवाला आली आहे. कांहीं दिवसांपूर्वीं कोणी पाहील अशा भितीनें लपत लपत एका मनुष्याला राजमहालांतून बाहेर निघतांना पाहिलें. त्या मनुष्याला तुह्मीं ओळ-खीत तर असालच. त्याला पहातांक्षणीं तुमच्या अंगावर शहारे आल्या-

वांचून राहणार नाहींत. ज्याला योगिराज गोरख ह्मणतात तो तो होता. आणि ज्या गोष्टी हळूं हळूं चालल्या होत्या त्याहूनही हळूं तो आपल्या जोडीदाराचे कानांत बोलला, ‘ त्या मनुष्याला मी कोणाबरोबर समजतो तें तुह्मास माहीत आहे काय ? तो स्वतः जरी सैतान नसला तरी बेशक सैतानाचा एक मदतगार आहे. आणि अशा मनुष्याशीं अकबर संबंध ठेवितो. ’

इतकें बोलून युसफ मप राहिला. परंतु, थोड्या वेळानें नदींकडून येणाऱ्या एका मनुष्याकडे बोट करून तो एकाएकीं बोलला ‘ अल्लाह आपलें रक्षण करो ! हा तो स्वतःच येत आहे. यमुना नदीचें पाणीं त्याला असेंच ओढून नेईल तरी बरें ! ’

आणि खरोखर दुर्गेचा पुजारी त्यांचे नजरेस पडला. गोष्टी सांगत असलेल्या एका इराणी आणि हिंदूच्या टोळीकडे तो गेला.

ह्या इराण्यापैकीं एक बोलला, “ फैजी आणि अबुलफजल, त्यांच्याहून मोठ्या पुरुषाचें तर नांव मीं घेत नाहीं. त्यांनीं आमच्या पवित्र धर्माची जी उघड उघड रीतीनें निंदा मांडिली आहे ती आमच्यानें जास्तवेळ सहन होत नाहीं व होणारही नाहीं. जरी तुमचा धर्म निराळा आहे तरी जो धर्म तुह्मांस पवित्र मानिला पाहिजे त्याचा नाश होत आहे. तो निर्मूल होऊं पहात आहे तरी तुह्मीं स्वस्थ कसें बसला त्याचें कारण मला समजत नाहीं. ”

एक हिंदु ह्मणाला, “ परंतु ही गोष्ट अद्याप इतक्या थराला काहीं गेली नाहीं. इतकें तर उघड आहे कीं, बादशहाची तसेंच त्याच्या कांहीं मनुष्यांची तुमचें कुराणावर फारशी आस्था नाहीं आणि आमचे धर्मासंबंधीं कदाचित् तसेंच असेल परंतु, हावेळपावेतों धर्माचा नाश होण्याच्या गोष्टी माझ्या ऐकण्यांत आल्या नाहींत. आमच्या देवळांना कोणी बोट लाविलें नाहीं, आमच्या धर्मक्रियेंत कोणी हात घालीत नाहीं. परंतु, आमचे पूर्वींचे मुसलमान तर आह्मांवर जुलूम करण्याचें व आह्मास दुःख देण्याचेंच शिकले होते.

‘ तुह्मी पण त्याच गुणाचे आहांत, तुह्मी काफर— ’

‘ चल ! चल ! भल्या गृहस्था कांहीं भांडण करण्याची जरूर नाहीं. दुसरे

कांहीं काम आहे कीं नाहीं.' एकजण मध्यें पडून बोलला, 'असा कलह करण्यानें आपलें काम होणार नाहीं.' इतकें बोलून रागावलेल्या मुसलमानास शांत केलें.

'बरें ठीक आहे तसें होऊं द्या?' त्यानें उत्तर दिलें आणि नंतर हिंदुकडे पाठ फिरवून आपल्या मित्रांबरोबर पुढें चालला.

त्यावेळेस गोरख त्यांचे गोष्टींत मिसळला आणि ह्मणाला, 'तुह्मी येथें होता हें एक बरें झालें. मुबारक, असें भांडणें मोठें भयावह आहे. बहुतेक हिंदु बादशहाकडचे आहेत. जरी कांहीं वेळपर्यंत ते आपल्या पक्षांत येणार नाहींत तरी शेवटीं ते आपणांस येऊन मिळतील. बरें पण हावेळपर्यंत तुह्मी कशी काय व्यवस्था केली?

मुबारक म्हणाला, 'आपल्या बहुतेक मनसबदारांनीं आपला पक्ष स्वीकारिला आहे. आणि त्यांना सहज इशारत मिळतांक्षणीं उघड रीतीनें ते आपणांस येऊन मिळतील. जे सैन्याबरोबर जातील ते ऐन प्रसंगीं उलटतील; तसेंच जे आग्र्यांत राहतील तेही त्याचप्रमाणें करतील. त्यांच्या हाताखालची मनुष्यें त्यांच्याप्रमाणेंच वागतील हें उघड आहे.'

त्या गोष्टी चालल्या असतां त्यांच्यांत दोन मनुष्यें येऊन मिसळली. त्यांनीं एकमेकांना सलाम केला, त्यावरून ते त्यांच्यापैकींच असावे असें वाटलें. ह्या वेळेस ज्या गोष्टी चालल्या होत्या त्या फारच आतुरतेनें आणि चित्त देऊन ह्या दोघांनीं ऐकिल्या. परंतु, हलक्या आवाजानें गोरखानें जें त्याचें उत्तर दिलें तें जास्त आतुरतेनें ते ऐकूं लागले.

"हल्लीं शेवटच्या थोड्या दिवसांच्या हकीकतीवरून आपल्या व्यवस्थेंत थोडा फेरफार करण्यांत आला आहे. अकबर थेट उत्तरेस जाऊन पोहोंचेंपर्यंत आपलें काम तहकूब ठेवणें रास्त नाहीं. कारण सैन्याचा थोडा भाग त्याला सोडून गेला तरी त्याला जय मिळण्याचा संभव आहे. काश्मीर देशांत तो विजयी जाहल्याचें ऐकून इकडे सर्वांना धास्ती वाटेल आणि आपल्याच्यानें येथें कांहीं होणार नाहीं. ह्मणून ह्मणतो कीं, आपलें काम त्वरेनें केलें पाहिजे. सेलीम गादीवर बसला, त्याच्या नांवाची द्वाही फिरली आणि किल्ल्याचा त्यानें चांगला बंदोबस्त केला

अशी खबर अकबराला मिळाली असतां तो थोड्या दिवसांत आग्र्यांत परत येऊं शकणार नाहीं. इतक्या दूर तो गेल्यावर आपली युक्ती अमलांत आणिली पाहिजे. अशानें त्याच्या सैन्यांत नाराज झालेले लोक त्याच्या समोर झाल्यावांचून राहणार नाहींत. मुबारक, तुझी सर्वांना वेळेवर सावध राहण्याची खबर द्या. आपलें काम लवकर साधण्याचा विचार आहे, करितां तयारीनें असा म्हणून त्यांना सूचना द्या. ”

ह्याप्रमाणें कांहीं दुसऱ्या गोष्टी झाल्यावर कपटव्यूहांत सामिल असलेले लोक निराळे पडले आणि आपापल्या रस्त्यानें चालते झाले. परंतु, जे दोघे मागाहून आले होते ते तेथेंच उभे राहिले.

पहिला—ही फारच महत्वाची बातमी मिळाली आहे.

दुसरा—बेशक तशी आहे खरी, आणि मी चुकत नसेन तर माझ्या समजुतीप्रमाणें ह्या बातमीपासून अकबराचें मोठेंच काम साधेल. कशी दिलगिरीची गोष्ट आहे कीं, अबुलफजलला ही बातमी आपण आतांच जाऊन सांगूं शकत नाहीं. परंतु, मध्यरात्रींपर्यंत आपणांस थांबलें पाहिजे. त्यापूर्वीं त्याचे महालांत जाणें धास्तीचें आहे. ह्यावेळेस तो बादशहाजवळ असेल असें मला वाटतें. त्यामुळें महालांत भेटणारही नाहीं.

पहिला ह्मणाला, ‘ मला वाटतें ह्यावेळेस आपण निराळे पडणें योग्य होईल. मध्यरात्रीं आपण वजीराचें घरीं भेटूं. ’ असें म्हणून आणि आपल्या जोडीदाराला सलाम करून एक शहराकडे गेला, आणि दुसरा नदीचे काठाकाठानें गेला.

बादशहाच्या खानगी दिवाणखान्यांत चाललेली क्रिया अपवित्र आहे, अकबरानें सैतानाशीं संबंध केला आहे, असें युसफ आणि त्याच्या जोडीदाराचें अनुमान होतें. परंतु, आजच्या रात्रीचे हकीकतीवरून एकाद्या पोक्त विचार करणाऱ्या मुसलमानाला त्यांत कांहीं विचित्र वाटलें नसतें. त्या ठिकाणीं चाललेल्या गोष्टी बरोबर समजून त्याचा सहज भावार्थ त्यानें ध्यानांत घेतला असतां तर त्याच्या अंगीं व्यापलेला धर्मांधपणा त्याला अयोग्य वाटल्यावांचून राहिला नसता.

फैजी, अबुलफजल आणि कुल्लुक जो नुकताच उत्तरेकडून आला होता तो असे तिघे अकबराजवळ बसले होते.

अकबर ( आपल्या प्रधानास )– तुमच्या गुप्त दूतांकडून दुसरी कांहीं खबर मिळाली आहे का ?

अबुलफजल– गेल्या रात्रीं कांहीं खबर मिळाली नाहीं. परंतु, आज मध्यरात्रीं त्यांची येण्याची वाट आहे. मला वाटतें ते कांहीं बातमी घेऊन येतील खरें.

अकबर– असल्या मनुष्यांशीं आपणांस प्रसंग पडला आहे ? अहा ! असले उपाय योजण्याला ते लोक आपणांस कां जरूर पाडतात ?

अबुलफजल– ही तर आपली हल्लींची राज्यपद्धती जी बदलूं शकण्यासारखी नाहीं, तिचा अनिवार्य परिणाम आहे. ज्यावेळेस सर्व राज्यसत्ता एकाच पुरुषाच्या हातीं आहे आणि ज्यांना त्याची राज्यव्यवस्था पसंत नाहीं, अशा लोकांच्या फिर्यादी निराधार आहेत असे तो समजतो, त्यावेळेस वाजवी रीतीनें ह्मणा किंवा गैर रीतीनें म्हणा, त्या नाखुष झालेल्या लोकांना दाद मिळविण्याला दुसरें साधन राहत नाहीं. आपला मतलब साधण्याचे उद्देशानें लोभी–तसेंच श्रीमंत होण्याची इच्छा बाळगणारीं मनुष्यें त्यांना सहाय्य होतात आणि त्यांना पुढें करून अंतस्थरीतीनें त्यांना उत्तेजन देतात.

अकबर—परंतु, माझ्या रयतेची फिर्याद ऐकण्याला मी कधींही ना पाडीत नाहीं आणि त्या फिर्यादी वाजवी असल्यावर त्यांना योग्य न्याय देतों.

अबुलफजल–होय, परंतु, तें नक्की कोण ठरवितो ? बादशहा आणि त्याचे सलाहगारच ?

अकबर—परंतु, त्यावांचून आपण दुसरें काय करूं शकणार ? आपणांस माहीत आहे कीं, दुनीयेच्या दुसऱ्या भागांत कित्येक राज्यें तसेंच त्यांची प्रजा आहे कीं ज्याठिकाणीं निराळ्याच प्रकारची राज्यव्यवस्था आहे; परंतु, त्या लोकांची स्थिती आपल्या लोकांच्या स्थितीहून अगदींच भिन्न प्रकारची आहे. आपल्या लोकांचें वर्तन आणि रीतरिवाज पहातां कांहीं संभावित असले तरी आपल्या अमलाखालीं कित्येक राज्यें आणि निरनिराळ्या जातींचें प्रजाजन असल्या कारणानें त्यांचे हातीं राज्यकारभारांतील कांहीं महत्वाचा अधिकार सोंपविण्याचें कसें बनेल ?

अबुलफजल– ते वाजवी आहे आणि जास्त फेरफार करणेंही मला योग्य वाटत नाहीं. हल्लींच्या राज्यव्यवस्थेबद्दल मी ह्मणतों तो इतक्याचकरितां कीं जारत वाईट स्थिती दूर होण्याकरितां योग्य उपाय आपणांस योजिले पाहिजेत. गुप्त दूतांची योजना करण्याचें काम कांहीं लोकांच्या समजुतीनें तिरस्करणीय असलें तरी ह्या कामाकरितां ज्या दोघांना मी पसंत केलें आहे, तें चांगलें अब्रुदार लोकांत सन्माननीय, आपणांकरितां मनापासून मेहनत करणारे आणि आपल्या कल्याणाची इच्छा बाळगणारे असे आहेत. जरी त्यांना चांगला पगार देण्यांत येतो तरी ती कांहीं महत्वाची गोष्ट नाहीं. ते आपणांशीं निमकहलाल राहतील अशी माझी खातरी आहे. सल्हाणाच्या कपटाची बातमी तसेंच गोरख योग्याच्या गुप्त मसलतीची खबर त्यांनींच आणिली.

फैजी—हो, हो, जो तत्ववेत्ता योगशास्त्राची रहस्यें बादशहाला समजावीत होता तोच ना ? परंतु, मला वाटतें, बादशहाला त्यापासून कांहीं विशेष फायदा झाला नसावा.

आपल्यांत अतीशय चाणाक्यपणा असून असल्या एका लुच्चा ठगाच्या भुलथापीला, भुलल्याबद्दल अकबरास जरा वाईट वाटलें. परंतु, इतक्यांत कुल्लुक मध्येंच बोललें ' माझा जुना शिष्य सिद्धराम यानें त्याच्या बद्दल कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत, त्यावरून पहातां त्याच्याशीं फारच सावधगिरीनें वर्तन ठेविलें पाहिजे. परंतु, पूर्वींची योगविद्या जी अगदींच विसरून जाण्यांत आली आहे, त्यासंबंधीं त्याला थोडेंबहूत ज्ञान असावें असें वाटतें.'

अकबर ( आनंदानें )– आपले मित्र कुल्लुक जे ब्राह्मणांच्या सर्व विद्येंत प्रवीण आहेत ते देखील ह्या योगविद्येला कांहीं अगदींच निरुपयोगीं समजत नाहींत.

फैजी– आपले विद्वान् मित्र कीं ज्यांचेकडून आपणांस पुष्कळ उपयोगीं ज्ञान प्राप्त झालें आहे. त्यांच्या सांगण्यावरून मीही कबूल करितों कीं, त्या विद्येंत कांहीं आगत्याचें बाबतीचा समावेश असावा. परंतु, क्षमा करा; कुल्लुकशास्त्री, विचारलें पाहिजे कीं, असल्या प्राचीन काळच्या विद्येंतून तुम्ही काय मिळविण्याची आशा बाळगितां ? माझ्या समजुतीप्रमाणें असंभवित सायुज्य

मुक्तीची आशा दाखविणारें तें एक गूढ रहस्य आहे. असल्या मंत्रातंत्रानें किंवा या चमत्कारिक जादुविद्येनें मुक्ती प्राप्त होते काय ?

कुल्लुक—पातंजल शास्त्रांत जें मत प्रदर्शित केलें आहे, त्याच्या विरुद्ध मी इतकाही जात नाहीं. जरी माझें ह्मणणें असें नाहीं कीं, त्यांतच सर्व सत्याचा समावेश आहे. योगशास्त्राप्रमाणें आत्मा परमात्म्याचें एकाग्र होणें आणि अनित्य पदार्थाचें नित्य होणें हें कांहीं मूर्खपणाचें मत नाहीं. तरी एकत्र होण्यानें किंवा लीनतेनें मनुष्य प्राण्यांच्या मनांतील गुप्त भेदांचें निराकरण होतें आणि त्यामुळें अनित्य पदार्थाचें एकाएकीं नित्यपदार्थांत रूपांतर होतें; असें जें प्रदर्शित केलें आहे, त्यावरून पुष्कळ संशय उत्पन्न होतात. परंतु, आयुष्यांतील हा गुप्त भेद आपणांस कोण समजावून देणार ?

फैजी—निःसंदेह ते कोणीहीं समजवूं शकणार नाहीं आणि हल्लीं तर तसा कोणीही नाहीं. भविष्यांत एकादा ज्ञानी पुरुष कशा रीतीनें त्याचा खुलासा करूं शकेल, त्याचीही अटकळ आपण करूं शकत नाहीं. परंतु, प्राचीन काळच्या तसेंच अर्वाचीनकाळच्या सूज्ञमनुष्यांनीं ग्रहण केलेलें तसेंच त्यांच्यांतील बहुतेकांनीं कमजास्त प्रमाणानें निराकरण केलेलें दृढ मत कीं, “ सृष्टींत अनादि आणि अनंत एक नित्य जीव आहे; ज्याच्यायोगानें वस्तुमात्रांचा एकमेकांशीं निकटसंबंध झाला आहे आणि ज्याचा मुख्य नियम संवर्धन आहे ” अशा या दृढमताचा अंगिकार करून हल्लीं आपल्याला संतोष मानिला पाहिजे. आपण स्वतः मनुष्यें काय आहोत ? आपल्या आजूबाजूला जें कांहीं आहे त्याचपैकीं आपणही आहोंत. ते—सार्वजनिक चैतन्याचें ( परमात्म्याचें ) प्रकाशमय रूप आहे. ज्यांत दरेकाला आपआपल्या टोळींत राहून आपापल्या शक्तीप्रमाणें सामान्य संवर्धनांत भाग घेण्याकरितां निर्माण केला आहे. जसजसें जास्त उंच प्रतीचे आणि सार्वजनिक हेतू प्राप्त करण्याचे—स्पष्ट विचार आपण करूं, तसतसें स्वार्थ साधण्याची क्षुद्र बुद्धी दूर होत जाईल आणि आपल्या जातीबांधवांचें, आपल्या संसारमंडळाचें आणि आपल्या राजाचें चांगलें करण्याची निःस्वार्थ बुद्धी वाढत जाईल.

अकबर—फारच उत्तम रीतीनें तुह्मीं हा विषय समजावून दिला. बरें पण फैजी ! हें सर्व खरें असलें तरी काय, तेवढ्यातच तुह्मांस संतोष

वाटतो काय ? कांहीं दुसरीच वस्तु, कांहीं जास्त आणि मूल्यवान् वस्तु मिळविण्याची तुह्मास इच्छा होत नाहीं काय ?

फैजी ( हंसून )–ठीक, माझें ह्मणणें तुह्मास खरें वाटत असल्यास तुम्हास त्यापासून कांहीं फायदा झालाच पाहिजे असें कांहीं नाहीं. जर हें सर्व खरें आहे तर तें तुह्मांस कबूल केलें पाहिजे. मग तें तुह्मांस संतोषकारक वाटो किंवा न वाटो; तरी जी गोष्ट आपण खरी समजतों त्याबद्दल आपलें मनांत भक्ति उत्पन्न होते आणि तेवढ्याचमुळें माझें मत मला अमूल्य वाटतें, आणि ह्याहून तुह्मीं जास्त आशा ती काय बाळगितां ?

अबुलफजल—तुमचें ह्मणणें वाजवी आहे. माझ्या स्वतःच्या बाबतींत तसेंच आपल्या सर्वांच्या बाबतींत तुमचें ह्मणणें रास्त आहे. परंतु, आशिक्षित आणि अज्ञान लोकांना ह्या सर्व गोष्टी समजणार नाहींत. रोजच्या अनुभवाहून कांहींतरी जास्त चांगल्या वस्तूच्या आशेनें ते प्रयत्न करितात आणि तेवढ्याचकरितां हे गूढविचार साधारण लोकांना देखील समजतील, अशारीतीनें व्यवस्थित केले जाणार नाहींत कीं काय ?

अकबर—कितीएक दिवसांपासून मी विचार करीत होतों तीच बाबत फैजीनें पुढें आणिली आहे. फैजीनें दर्शविलेल्या ह्या मताबद्दल नवीन चिन्ह किंवा रूप शोधून काढणें शक्य नसल्यास पूर्वींच्या लोकांचे विचार आपण ग्रहण करूं शकणार नाहीं कीं काय ?

फैजी—तुमच्या ह्मणण्याचा भावार्थ मीं समजलों. ज्या नवीन मताचा उपदेश करण्याची बादशहाची इच्छा आहे, आणि ज्याची माहिती त्यानें कित्येक मित्रांना दिली आहे; त्याच मतासंबंधीं त्यांचें ह्मणणें आहे, कां असेंच ना ?

अकबर—तुमचा अंदाज खरा आहे. ही बाबत जास्त खुलासेवार सांगण्याची संधी आलेली पाहून मला फार आनंद होत आहे. फैजी आणि कुत्लुक, तुमचे कडून पुष्कळ बाबतींचें स्पष्टीकरण मला मिळालें आहे. करितां ऐका:– बुद्धीला अनुकूल पडेल असे धर्ममत ज्यांत दर्शविलें जाईल, तत्वशास्त्री तसेंच कमती समजुतीचे लोकांनाही ज्यापासून संतोष होईल, अशा एकाद्या धर्ममताचें मी कित्येक दिवसांपासून संशोधन करीत

होतों. शेवटीं पूर्वीच्या इराणी लोकांच्या आणि विशेषेंकरून कुल्लुक, तुमच्या प्राचीन तत्ववेत्त्यांच्या मूर्तिबद्दल मला माहिती मिळाली; त्यावरून मी जें शोधीत होतों तें मला मिळालें. तुह्मास प्रत्यक्ष दिसणाऱ्या मूर्ति सूर्य आणि अग्नि त्याबद्दल माझें ह्मणणें आहे. तेज आणि उष्णता यांच्या आश्चर्यजनक प्रत्यक्ष स्वरूपाचें मनन करणें कदाचित् प्रथम व्यर्थ आणि निरोपयोगीं वाटेल. परंतु, विचाराअंतीं समजेल कीं, त्यांत उच्च प्रतीच्या सत्याचा समावेश झाला आहे, आणि कदाचित् ह्यापुढील युगांत जास्त ज्ञान प्राप्त होईल आणि त्या योगें तें सत्य सर्वांत श्रेष्ठ पदवी मिळवील. पूर्वीचे लोक त्यांना देव समजून त्यांची पूजा आणि प्रार्थना करीत होते; तसेंच जीवनाचें मुख्य तत्त्व आणि अनंतरूपी सर्वव्यापक शक्तीची उत्कृष्ठ मूर्ति आहे असें मानीत होते. जर तेज आणि उष्णतेवांचून कोणताही पदार्थ जीवन धारण करूं शकत नाहीं, तर तें शरीर आत्मा आणि चैतन्य देणारें नाहीं कीं काय ? आतां हें नवीन मत अथवा तुमची मर्जी असल्यास असें ह्मणा कीं, प्राचीन युगांतील लोकांच्या मनांतून शोधून काढिलेलें मत लोकांत प्रसिद्ध करावें. हल्लीं जीं धर्माची अनेक पाखंड मतें चालू आहेत, त्यांच्या ऐवजीं आपलें मत स्वीकारण्याची त्यांची इच्छा आहे किंवा नाहीं त्याचा अंदाज पहावा ह्या मताला जरूर कांहीं नांव तर दिलेंच पाहिजे. जरी नांवावरून सर्व भावार्थ निघूं शकत नाहीं तरी " तै हिद्–इ–इलाही " (ह्मणजे परमेश्वराची ऐक्यता ) हें नांव अयोग्य होणार नाहीं. सकाळसंध्याकाळ योग्य भजन आणि उपासना ह्याखेरीजकरून दुसऱ्या कोणत्याही प्रकारची उघड पूजा किंवा उपासना ह्या मतांत ठेविली नाहीं यासंबंधीं आपण पूर्वींहि बरीच चर्चा केलेली आहे; तरी तुमचा अभिप्राय काय आहे तें मला आतां उघड मोकळ्या मनानें सांगा.

अबुलफजल किंवा फैजी हें ह्मणणें एकदम कबूल करण्याला खुशी दिसलें नाहींत. शेवटीं कुल्लुकानें आपले विचार दर्शविले.

कुल्लुक—बुद्धिमान् बादशहा, तुमच्या प्रश्नाचें उत्तर आह्मी एकदम देऊं शकत नाहीं, त्याबद्दल क्षमा करा. तुह्मी जी महत्वाची बाबत आह्मांस सांगितली, त्याबद्दल थोडावेळ विचार केला पाहिजे. तुह्मी दर्शविलेल्या

बाबतींत मनाला लालचविण्यासारखें पुष्कळ आहे. तसेंच माझ्या मताप्रमाणें त्यांत जोखीमही पुष्कळ आहे. तुमच्या मतांत दर्शविलेल्या सूर्ती— ज्यांची माहिती तुम्हास आमचें तत्वशास्त्रांतून मिळाली आहे, त्याची गंभीरता आणि प्रौढता मी कबूल करतों. परंतु, त्यांत कांहीं भय नाहीं काय ? ही ईश्वरसूचक चिन्हें लोकांत दाखल झाल्यावर थोड्या वेळानें त्याचा मूळ अर्थ नाहींसा होईल, आणि वरपंकी होणाऱ्या धर्मभक्तींत त्याची गणना होईल; हेंच मत कांहीं लोकांत प्रथम चालू होतें. परंतु, त्याचा शेवट परिणाम काय झाला ? हल्लींच्या काळींच नाहीं परंतु पूर्वींच्या काळीं सुद्धां भक्तिविषयाबद्दल शंका उत्पन्न झाल्या होत्या. हल्लींप्रमाणें पूर्वींही धार्मिक मनुष्यें होतीं. जें चैतन्य देतें, जें शक्ति देतें, ज्याच्या आज्ञेनुसार सर्व दैवतें वागतात, ज्याच्या छायेंत अमरत्व तसेंच मृत्यु हीं आहेत; ह्या सर्वांत परमेश्वर कोणता कीं ज्याची आपण भक्ति केली पाहिजे ? प्राचीनकाळीं सूर्य आणि अग्नी, जीव आणि शक्तिरूप चिन्हें समजण्यांत मनुष्यांचें मनाचा संतोष झाला नव्हता. तरी सूर्य आणि अग्नीच्या प्राचीन काळीं झालेल्या पूजेहून ' तै हिद्-इ-इलाही ' चा भविष्यांत जास्त चांगला सत्कार होईल काय ?

अकबर—फैजी, तुमचा काय अभिप्राय आहे ?

फैजी—माझे मित्रानें जें कांहीं सांगितलें त्याहून जास्त सांगण्याचें कांहीं बाकी राहिलें नाहीं. पूर्वींच्या काळच्या ह्याच शंका होत्या. वेदांत एकेठिकाणीं लिहिलें आहे कीं—

को आध्धा वेद क इह प्रवोचत्कुत आजाता कुत इयं विसृष्टिः ।
अर्वाग्देवा अस्य विसर्जने नाथा को वेदयत आबभूव ॥
इयं विसृष्टिर्यत आबभूव यदिवा दधे यदिवान ।
यो अस्था ध्यक्षः परमे व्योमन्त्सो अंगवेद यदिवा न वेद ॥

ऋग्वेद *

---

* गुप्त गोष्ट कोणास माहीत आहे, ती गोष्ट येथें कोणी उघड केली आहे ? ही नानाविध सृष्टि कोठून उत्पन्न झाली ? देव स्वतः तर मागाहून ( नंतर ) आस्तित्वांत आले होते. ही मोठी सृष्टि कोठून उत्पन्न झाली, हे कोणास माहीत आहे ? ही सर्व मोठी सृष्टी

" सुधारकांचा त्यांच्या समकालीन पुरुषांकडून जो प्रतिरोध आणि तिरस्कार झाला आहे, त्याची आपण हल्लीं पर्वा न केली तर अकबरसारखा पुरुष त्याचें भय बाळगणार नाहीं. परंतु, एक भीतीसारखी बाबत आहे. ज्याच्याबद्दल कुल्लुकानें सांगितलेंच आहे आणि जी अशी तशी समजून मनांतून काढून टाकण्यासारखी नाहीं. एकदा नांव दिल्यानंतर तें अल्लाहचें असो किंवा दुसरें कांहीं असो, अज्ञानजन त्याला अमुक पदार्थाची संज्ञा असें समजतील. अमर आत्म्याहून निराळ्याच एकाद्या रूपाची प्रतिमा समजतील अशी धास्ती आहे. असें झालें असतां तुमचें मत ' परमेश्वराची ऐक्यता ' हें एकीकडेच राहील. मग तुह्मी नवीन दाखल केलें तें काय आणि तुह्मास त्यापासून फायदा तो काय मिळाला ? "

अबुलफजल——पण फैजी, लोक जास्त शहाणे आणि विचारी होण्याला तुह्मी कोणता रस्ता दाखवितां ? बादशहाच्या इच्छेप्रमाणें विचाराची सुधारणा तुह्मी कशी करूं शकाल ?

फैजी——चीनदेशांतील मोठे तत्ववेत्ते आणि सर्व मोठमोठे सुधारक कोणताच धर्म बाळगीत नाहींत. लोकांस सुशिक्षित करण्याची त्यांनीं सुरवात केली आहे आणि आपण तर ही बाबत—बहुतेक अंशीं विसरूनच गेलों आहोंत. सर्वांत लोकांस शिक्षण देणें हीच मुख्य बाबत आहे. खरोखर त्यांतच संपूर्ण रीतीनें मिश्र उपायांचा समावेश आहे. गोष्ट खरी आहे कीं, त्याचा परिणाम एकदम दृष्टोत्पत्तीस येणार नाहीं. जीं मनुष्यें मोठमोठीं कामें हातीं घेतात तीं फलीभूत झालेली पहाण्याला क्वचितच जगतात. परंतु, तें शेवटीं फलीभूत झाल्यावांचून रहात नाहीं. ईश्वर प्रकाशनेचें किंवा दुसरें कोणतेंहीं साधारण नवीन मत तुह्मी लोकांत प्रदर्शित कराल तें थोडावेळ कदाचित् चालेल; परंतु, शेवटीं अधम स्थितीला तें नक्की पोहोंचेल.

अकबर—तुह्मी जें कांहीं आतां सांगितलें तें सत्य आहे. ह्या सर्व बाबतींचा

---

ज्यांतून उत्पन्न झाली, त्याच्या स्वतःच्या इच्छेनें हें उत्पन्न झालें आहे किंवा त्याचा ह्यांत कांहीं उपयोग झाला नाहीं ? सर्वांत उंच स्वर्गांत जो सर्वोत्कृष्ट ज्ञाता आहे त्याला ही गोष्ट माहीत आहे किंवा कदाचित् त्यालाही हें कांहीं माहीत नाहीं ?

मी पूर्ण विचार करून तिकडे लक्ष देईन. आपलें नवीनमत लोकांत दाखल करण्यांत पुष्कळ अडचणी असल्या तरी माझा हा प्रियविषय मी एकाएकी सोडणार नाहीं. ह्या विषयाची आपण पुन्हां एकदां चर्चा करूं. आज आतां पुष्कळ झालें. राज्यासंबंधीं कांहीं कामें अद्याप मला पहावयाचीं आहेत. तुह्मी मोकळ्या मनानें केलेल्या प्रतिरोधाबद्दल तसेंच खुलाशाबद्दल तुमचे सर्वांचे मी उपकार समजतों.

बादशहाची रजा घेऊन आपल्या मित्राबरोबर दोघा गुप्त दूतांची हकीकत ऐकण्याकरतां अबुलफजल आपल्या महालीं गेला.

# खंड १३ वें.

## खून.

मनास आनंदांत तल्लीन करणाऱ्या एका सकाळीं कांहीं महत्वाचे कामा करितां, सिद्धराम आपल्या दोन स्वारासहित फत्तेपुरास जाण्यास निघाला होता, सूर्य पूर्ण प्रकाशित ज्राहला होता; परंतु, त्याचीं किरणें फारच सौम्य होतीं. वृक्षावर अगणित रंगीबेरंगी पक्षी मधुर गायन करीत होते. सर्व सृष्टी हिरवीगार आणि चित्ताल्हादक दिसत होती. रस्त्यानें जाणारे शेतकरी आजूबाजूचें सृष्टीसौंदर्य पाहून तल्लीन झाले असावे कीं काय ह्मणून उतावळीनें न चालतां सावकाश चालले होते.

प्राणीमात्र अशारीतीनें उल्हासीत होते, त्यावेळीं सिद्धराम जो एक वेळेस मोठा रसिक होता, त्याचें ह्या सृष्टीसौंदर्याकडे कांहींच लक्ष नव्हतें. शोकाग्रस्त आणि विचारमग्न झालेला तो पुढें चालला होता आणि त्याचे स्वार त्याचे मागें चालले होते. आग्रा शहरांत प्रथम आल्यावर पर्विज आणि दुसऱ्या मित्रांबरोबर तो मौजमस्करी करीत असे. कोशाध्यक्षाच्या कुलीनकन्येसंबंधीं गोष्टी पर्विजच्या तोंडून ऐकत असे. परंतु, त्यावेळचा सिद्धराम कांहीं निराळ्याच प्रकारचा मनुष्य होता. मोठ्या खुबीनें घोड्यावर बसून फिरतांना पाहून हा सर्व दुनिया जिंकेल कीं काय, असें कुल्लुकला वाटे. परंतु, त्यावेळच्या सिद्धरामांत आणि आतांच्या सिद्धरामांत महदांतर होतें. इरावतीचे अधरोष्ठ चुंबन त्याला स्वर्गसुखतुल्य वाटत होतें. रझियेच्या मोहक अलिंगनाची इच्छा होण्यापूर्वीं त्याचें अंतःकरण शुद्ध होतें. परंतु, त्यावेळच्या सिद्धरामांत हल्लीं कितीतरी फेरफार दिसत आहे. यावेळीं तो तऱ्हतऱ्हेच्या विचारानें संशयीत झाल्यामुळें शोकमय होऊन आपल्याशींच कांहीं बडबडत आहे.

रझियेची खरोखरच माझ्यावर अस्था असेल काय? किंवा माझ्याहूनही ज्यास्त प्रेम करण्यास योग्य अशा आपल्या पतीशीं जसें तिचें वर्तन आहे तसेंच माझ्याशींही असेल? सेलीम खरोखर राजखटपटीच्याच कामांकरितां आला असेल किंवा तिची भेट घेण्यांत त्याचा दुसरा कांहीं हेतू असेल? कपटव्यूहांत मी दिवसांदिवस जास्त फसत चाललों आहे. माझ्या स्वदेश संरक्षणाचा कांहींच संबंध नसून त्यांचा दुसराच कांहीं हेतू आहे. मला कितीएक वेळां फसविल्याबद्दल रझिया कबूल करिते; तरी आतांही ती खरेंच बोलत असेल ह्याला पुरावा काय! असा मी कसा फंदांत सांपडलों आहे, कसलीं अधम कृत्यें करण्याकरितां मी त्यांना साधनभूत झालों आहे!!

ह्याप्रमाणें अनेक तर्क वितर्क त्याच मनांत चालले असतां त्याच्या एका स्वाराच्या ओरडण्यानें तो विचारांतून जागृत झाला, आणि भाल्यानें ज्या दिशेकडे त्या स्वारानें दाखविलें तिकडे पाहतां थोड्या अंतरावर कित्येक घोडेस्वारांच्या एका टोळीचें युद्ध चाललेलें त्यानें पाहिलें.

घोड्याला टांच मारून सिद्धराम म्हणाला, ‘ लवकर चला ’ भरधाव घोडा फेकीत तो त्याठिकाणीं जाऊन पोहोंचला. तेथील मनुष्यें पाहून त्याला

फारच आश्चर्य वाटलें, त्याच्या छातींत धस्स झालें. त्या ठिकाणीं त्यानें अबुलफजलला पाहिलें, तसेंच राजपुत्र सेलीम बरोबर ज्या राजाला त्यानें पाहिलें होतें तो राजा नरसिंह आपल्या तरवारीनें अबुलफजलला ठार करण्याचा प्रयत्न करितांना पाहिलें. राजाचीं मनुष्यें या नवीन येणाऱ्याला पाहून त्यांच्यातील कांहीं मनुष्यें त्याच्याशीं लढण्याला सरसावली. त्यांच्यापैकीं पुढाऱ्याला सिद्धरामानें असा कांहीं सफाईदार व जोरानें भाला मारिला कीं घोड्यासहीत त्याला गतप्राण करून जमीनीवर पाडिलें, आणि तरवार बाहेर काढून एका घावानें दुसऱ्या स्वाराचें कंबरेंतून दोन तुकडे केलें. तिसरा मनुष्य तरवार पट्टा वापरण्याचे कामांत चांगला प्रवीण असल्यामुळें दोघांचीं झटापटी चालली सिद्धरामाचे दोघे स्वारही तितक्यांत येऊन पोहोंचलें. त्याचे प्रतीपक्षीही त्यांच्याशीं लढूं लागले. सिद्धरामानें संधी साधून आपल्या शत्रूला सफाईदार वार करून जमिनीवर पाडिलें आणि नवीन येणाऱ्यांशीं लढण्यास तयार झाला. परंतु तितक्यांत परत फिरण्याचें रणसिंग वाजलें आणि त्यांनीं एकदम घोडे परत फिरविले; परंतु ज्याक्षणीं सिद्धराम आपल्या प्रतिस्पर्ध्याला मारून दुसऱ्याच्या येण्याची वाट पहात होता त्याचक्षणीं अबुलफजलला घोड्यावरून खालीं पडतांना पाहिलें आणि नरसिंघानें आपल्या लोकांना इषारत करून ते सर्व त्या मैदानांतून परत फिरलें. ह्या खून करणाऱ्यांच्या मागें जाण्याचा प्रथम सिद्धरामाला आवेश आला परंतु, विचारांअंतीं त्याला वाटलें कीं, आपल्या दोन स्वारापैकीं एक तर जखमी झाला आहे, बाकी राहिलेला एक व आपण असें दोघे मिळून त्यांच्याशीं सामना करण्यांत अर्थ नाहीं तसेंच वजिराचे चौघेही नोकर मरून पडले असल्यामुळें अशा प्रसंगीं त्याला अवश्य मदत केलीच पाहिजे.

घोड्यावरून उडी टाकून व त्याची लगाम चाकराकडे देऊन जखमी झालेल्या सरदाराजवळ सिद्धराम जाऊन बसला आणि त्याचे अंगांतील वस्त्रें सैल करून छातींत लागलेल्या भयंकर जखमेंतून वाहणारें रक्त बंद करण्याचा प्रयत्न केला. कांहीं वेळानें अबुलफजळनें डोळे उघडले, त्यानें आपणांस ओळखिलें असें पाहून सिद्धरामास आनंद झाला. परंतु हा आनंद फारच थोडा वेळ राहिला.

'माझ्या शूर सिद्धरामा! तुमची मदत फारच उशिरा येऊन पोहोंचली.' तो हळूं शब्दानें बोलला. 'बादशहाशीं तसेंच त्याचे राज्याशीं असलेला माझा रिणानुबंध संपला. मी तुह्मास हुकूम करितों कीं, माझा खून करविणार कोण आहे त्याचा कांहीं जरी मागमूस तुह्मास लागला तरी त्याचें नांव अकबर पासून गुप्त ठेवा.'

सिद्धराम– मला तर स्पष्ट वाटतें कीं नरसिंघ तर भाडोत्री काम करणारा आहे. खरा खून करणारा तर– इतकें ह्मणून नांव सागतांना तो थांबला.

अबुलफजल– हें कृत्य सेलीमचें आहे; त्याचे बाबतींत सावध रहाण्याची मला कित्येक दिवसांपासून सूचना मिळाली होती.

अंतकाळच्या वेदनेनें हा महापुरुष सिद्धरामाचें हातावर पडला. परंतु थोड्यावेळानें शुद्धीवर आला. जरी त्याचा आवाज मुष्कीलीनें समजण्यासारखा होता, तरी आपला मित्र बादशाह कीं, ज्यांची नोकरी त्यानें सारें आयुष्यभर मोठ्या आणि निमकहलालपणानें बजाविली होती त्या मित्राला एक शेवटचा निरोप पाठविण्याची त्याच्या अंगांत शक्ति आली. 'अकबरला सांगा कीं धर्म तत्वासंबंधीं जी आपण चर्चा केली आहे आणि ज्या बाबतींत आपण गेल्या रात्रीं वादविवाद केला होता, ती तत्वें सत्य आहेत अशा पूर्ण खात्रीनें आणि दृढ विश्वासानें मी देह सोडतों. सूर्याची तेजोमय कीर्ति मी जास्त वेळ पहाणार नाहीं आणि जरी मला वाटतें कीं, त्याचा प्रकाश अद्याप माझ्यांत आहे तरी तोही लवकरच नाहींसा होईल. मी कांहीं शोक करीत नाहीं. जरी माझी इच्छा होती, तितकीं नाहीं तरी थोड्या बहुत अंशानें माझ्या हातुन माझ्या देशबांधवाचें कल्याण झालें आहे असें मी समजतों; आणि तेवढ्याचमुळें मी संतोषानें प्रभूला शरण जातों. माझ्या तरूण मित्रा तूंही एखादे दिवशीं असेंच ह्मणूं शकशील. अशा रीतीनें आयुष्य क्रमण्याचा यत्न कर आणि आतां अल्लाहो! अल्ला!!' सिद्धरामाचा हात आपल्या हातांत दाबून फारच हलक्या आवाजानें वजीर हें सर्व बोलला. पहातां पहातां त्यानें मान टाकिली. आणि आपल्या हातांवर एक निर्जिव प्रेत आहे असें सिद्धरामाला लौकरच समजलें.

अबुलफजलचा खून झाला त्याचवेळेस, तेथून पुष्कळ लांब एक दुसरा खेळ चालला होता. तो वजीराच्या करुणाजनक मृत्यूहून कितीएक बाबतींत निराळ्याच प्रकारचा होता तरी कांहीं अंशी तसाच होता. थोड्या दिवसापासून हिमालयपर्वतांत आणि मुख्यत्वेंकरून बद्रिनाथाच्या आसपासच्या प्रदेशांत बरेंच प्रखर ऊन पडत होतें. मनाला विश्रांती आणि आनंद देणाऱ्या संध्याकाळच्या वेळेस आकाशांत काळें ढग येत होतें आणि तृषित पृथ्वीवर पाऊस पडेल अशी चिन्हे दिसत होती. परंतु, दुष्ट वृत्रासुर त्यांना ओढून दूर नेत होता. दुसऱ्या दिवशीं सूर्याच्या प्रखर तापानें सर्व वनस्पती वाळून जात होत्या. शेवटीं स्वर्गीय राजा इंद्र जागृत होऊन युद्ध करण्यास तयार झाला. संध्याकाळीं ढग चढून आले आणि फिरून त्यांना विस्कारून टाकण्याला त्या राक्षसानें यत्न केला. इंद्रानें आपली विद्युत्शक्ती जोरानें टाकिली. तिच्या गर्जनेनें दशदिशा दणाणून गेल्या. वृत्र जखमी झाला; परंतु, तो एकाएकीं युद्धांतून दूर झाला नाहीं. ह्या झटापटींत कोमेजलेल्या सृष्टीवर कांहीं कांहीं ठिकाणीं थोडी मेघवृष्टी झाली; परंतु, इंद्रानें युद्ध सुरूं केलें. पर्वत, शिखरें आणि दऱ्या विजेच्या चमकण्यानें तेजोमय दिसूं लागल्या. मोठमोठे वृक्ष तुटून पडले आणि डोंगरावरून मोठमोठाले धोंडे गडबडून खालीं आले. त्यानंतर पुष्कळ पाऊस पडला. नदी नाले भरपूर वाहूं लागले. शेवटीं हें भयंकर कृत्य बंद झालें. पाऊस थांबला विजेचें चमकणें कमी होत चाललें आणि पाण्याच्या घों, घों, आवाजाशिवाय दुसरें कांहीं ऐकण्यांत येत नव्हतें.

ह्यावेळेस अरण्यवासी गुरुपाद सुगंधमय ताजी हवा खाण्याच्या उद्देशानें पर्णकुटींतून बाहेर आला. ज्या ओट्यावर गुलाब आणि जाई पुष्कळ उगवली होती तेथें जाऊन बसला. पावसामुळें सृष्टीं रमणीय आणि शांत दिसत होती तें पाहून गुरुपादाला फारच आनंद वाटला. मेघ आणि वृत्राला मारणाऱ्या इंद्रासंबंधी प्राचीन वीररस काव्य—जें नुकतें घडून आलें होतें—त्याचा तो विचार करीत बसला होता. नंतर गंभीर आणि चित्ताला व्यग्र करणारे विचार एकाएकीं त्याचे मनांत उद्भवले. काश्मीर आणि आग्र्यांत चाललेल्या खटपटीची खबर कुल्लुक नुकतांच घेऊन

आला होता, त्यामुळें त्याच्या अतिप्रिय देशाच्या भविष्य स्थितीबद्दल त्याला चिंता वाटूं लागली ' तर मग ' तो आपल्याशींच ह्मणूं लागला ' मला ज्या गोष्टीबद्दल धास्ती होती; माझा स्वतःचा देशनिकाल करून घेण्यानें जी धास्ती दूर होण्याची मला आशा होती, तोच प्रसंग शेवटीं येणार कीं काय ? एक परकीय राजा, आमचा कमनशीब देश ताब्यांत घेण्याचें तयारींत आहे. आमच्याच नाशकारक कुसंपामुळें त्याचा मार्ग सुलभ झाला आहे. त्याच्या विचाराप्रमाणें त्याचें करणें योग्य आहे. एका शेजारच्या राज्यांत चाललेल्या अंदाधुंधीमुळें जर त्याचे राज्यास अक्षय त्रास होत आहे तर त्याचा त्याला बंदोबस्त केला पाहिजे आणि त्या राज्याची स्वतंत्रता राहून त्या ठिकाणीं बंदोबस्त होत नसल्यास तें राज्य आपलें ताब्यांत घेतलें पाहिजे. परंतु, ह्या बाबतींत दुसरा कांहींच उपाय राहिला नाहीं काय ? नाहीं ! नाहीं ! कुल्लुकचें ह्मणणें आहे कीं, मी तिकडे परत जावें आणि कदाचित् अकबरच्या मदतीनें माझ्या निर्बळ भावाच्या हातून राज्यसूत्र मी घ्यावें. नाहीं, तो उपाय कांहीं कामाचा नाहीं. माझें परत जाणें हा एक उपाय आहे असें समजलें तरी तो फक्त थोडे दिवस चालणारा उपाय होईल. हें राज्य चालविण्याकरितां तरूण आणि सशक्त मनुष्याची जरूर आहे. मी तर अगदीं वृद्ध झालों आहें. मी तर कांहीं जास्त दिवस जगणार नाहीं. मी फारच थकलों आहें. आराम घ्यावा अशीच माझी इच्छा आहे. अमर ब्रह्मजांतून आपणांस थोड्या मुदतीकरितां देह प्राप्त झाला आणि ज्यांत आपला परत समावेश होणार आहे त्या ब्रह्मस्वरूपीं लीन होण्याला माझा जीव आतुर झाला आहे. इतकें बोलून गवताच्या नरम बिछान्यावर त्यानें अंग टाकिलें आणि हळूं हळूं डोळे मिटले. इतक्यांत वीज चमकली, असपासचा सर्व प्रदेश क्षणभर प्रकाशित झाला, त्यामुळें तो जागृत जाहला आणि पूर्वीचे विचार परत त्याचे मनांत उद्भवले.

विधीनें निर्माण केल्याप्रमाणें जें होणें असेल तें होईल. ह्या आपसांतील कलहाचा शेवट काय होईल तर अशानें प्रजा निर्धन होऊन देशाची पायमल्ली होईल. परंतु, तोच देश एकाद्या शहाण्या आणि प्रामाणिक राजकर्त्याच्या हातीं गेल्यास तेथील उद्योग आणि व्यापार परत वाढतील

आणि तो देश पूर्वीच्या आबाध स्थितीला पोहोंचेल. आपल्या प्रजेला सुखीं कसें ठेवावें हें अकबराला चांगलें माहीत आहे. पूर्वीं जें त्यांचें विरुद्ध होतें तेंच हल्लीं त्याची कीर्ति गात आहेत. परंतु, कितीएक शतकापासून जो देश स्वतंत्रता भोगीत आहे आणि ज्याबद्दल तो गर्व वाहत आहे ती स्वतंत्रता, नाहींशी झालेली पाहून सर्व देश दिलगीर झाल्यावांचून राहणारा नाहीं. ईश्वरा ! माझ्या देशाची अशी स्थिति झालेली माझ्या पाहण्यांत न येवो.

त्या वृद्धाची निद्राभंग होण्यासारखें त्याठिकाणीं कांहींच नव्हतें. सर्वत्र शांतता पसरली होती. परंतु, एक लहान जंतु गुण गुण आवाज करीत त्याचे गालाला स्पर्श करीत असावा असें त्याला वाटलें. त्यानंतर त्याठिकाणीं दुसरें कोणी असावें असा त्याला भास झाला. त्यानें उठून आजूबाजूला पाहिलें; परंतु, कांहीं एक नजरेस आलें नाहीं. शेवटीं तो वृद्ध निजला; परंतु, त्याला कांहीं गाढ झोंप लागली नव्हती. जरा खडबडलें कीं तो जागा होत असे. एकाकीं एक हात त्यानें आपल्या मानेवर ठेविला. त्याठिकाणीं त्याचे हाताला एक दोरी लागली. ती धरून दुसरे हातानें तो आजूबाजूला चाचपून पाहूं लागला तों एक थंड स्निग्ध पदार्थाचा त्याला स्पर्श झाला. पण तो हातच होता अशी खात्री झाली आणि गळ्यांतून चटकन् दोरी काढून टाकून त्या हाताला धरण्याकरितां तो पुढें सरसावला; परंतु व्यर्थ. त्याच्या हातीं तो हात लागला नाहीं. एक क्षणानें त्या शांत रात्रीं एक शोकजनक तीक्ष्ण आरोळी आणि नंतर गुर गुर आवाज ऐकूं आला. गुरुपादनें आपल्या जवळ दोन लालभडक प्रकाशित गोळे पाहिले. इतक्यांत वीज चमकली त्या प्रकाशांत त्यानें आपल्या हर नांवाच्या सिंहास पाहिले. जमीनीवर पडलेल्या एका मनुष्याचे शरीरांत त्याचा जोरदार पंजा घुसला होता.

आरोळी ऐकून गुरुपादचा नोकर मशाल घेऊन एकदम घरांतून धांवत आला. मशालीच्या प्रकाशांत पहातां गुरुपादाची खात्री झाली कीं त्याला झोंपेंत जो भास झाला तो खरा होता. काय झालें तें तो लागलाच समजला. जमिनीवर पडलेल्या मनुष्यानें गुरुपादाला गळफास घालून मारण्याचा यत्न केला होता. ऐन प्रसंगीं दोरीचा स्पर्श समजण्यांत आला.

तो ठग पळून जात होता; परंतु, सिंहाचें मनांत कांहीं प्रेरणाबुद्धि उत्पन्न होऊन त्या ठगास धरले.

" मागें सर ! हर ! " एकदम पुढें जाऊन आणि सिंहाची मान धरून गुरुपाद ह्मणाला " मीं सांगतों कीं मागें सर ! "

प्रथम तो प्राणी हालला नाहीं. परंतु, नंतर सावकाश आणि मर्जी उपरांत आपल्या धन्याचा हुकूम ऐकून पंजा काढून घेतला, गुरगुरत थोडा दूर सरला, आणि गुरुपादाच्या पाया पडला.

सिंहाच्या पंजाच्या एका घावानें पडलेल्या मनुष्याला गुरुपादानें आपल्या नोकराचे मदतीनें बसविले आणि त्याच्यांत जीव आहे असें पाहून बिछान्यावर नेऊन निजविले.

बारकाईनें पाहून गुरुपद ह्मणाला " ह्या मनुष्याला मी ओळखितों. माझ्या चालत्याकाळांत मी त्याच्यावर पुष्कळ उपकार केले आहेत. तसेंच ह्याला पुष्कळ फायदाही करून दिला आहे. असला निमकहरामीपणा करण्याला ह्याला काय करण पडलें असावे ? "

हे शब्द ऐकून त्या जखमी जाहलेल्या मनुष्यानें वर पाहिलें. त्या वृद्धाकडे एकसारखा पहात राहिला, आणि नंतर आश्चर्यानें ह्मणाला " कोण, नंदिगुप्त ! ! !

गुरुपाद--जीव घेण्याला तुला कोणी सांगितले.

ठग--आहो ! माझें राजेसाहेब शपथपूर्वक मी सांगतो कीं आपण कोण हें मला माहीत नव्हते. आपण मरून कित्येक वर्षें झालीं असें मी समजत होतों. मला असें माहीत असते तर दुर्गादेवीची आज्ञा अमलांत आणण्याची माझ्या अंगांत शक्ती आणि हिंमत आलीच नसती. तुमचा मृत्यु होणें तिला पसंत नव्हते. तुमच्याबद्दल माझा जीव घेण्याकरितां तिनें सिंहाला पाठविले. देवीचें नांव अमर राहो !

अतीशय श्रमित होऊन तो जास्त बोलूं शकला नाहीं. चाकराच्या मदतीनें त्याची जखम नीट धुवून त्यावर पाटा बांधिला आणि त्याला पाणी पिण्यास दिलें. थोडावेळ त्याला आराम वाटला; तेव्हां गुरुपादनें विचारिलें " असलें कर्म करण्याचें तुला कां सुचलें, आणि मी

कोण आहें हें तुला माहीत नव्हतें तर दुर्गादेवीला माझा जीव घेण्याची इच्छा आहे असें तुला कोणी सांगितलें ? ”

ठग—गोरख योगीनें.

गुरुपाद—तोच हरामखोर ! तर मग दुसरी कांहीं हकीकतहीं गुप्त असेल. तूं तर आतां ठग बनलास. तूं असा आडमार्गाला चढलेला पाहून मला फार वाईट वाटतें. भवानीनें पसंत केलेल्या बळींत माझेंच नांव दिलें कीं काय ?

त्या जखमी मनुष्याला वेदना होत होत्या परंतु, त्याच्या चेहऱ्यावरून तसें कांहींच दिसत नव्हतें. तरी त्या वेदनेनें तो कांहीं वेळ उत्तर देऊं शकला नाहीं. शेवटीं थांबत थांबत परंतु, दृढतेनें त्यानें उत्तर दिलें. “ सल्हाणाचा मेहुणा काश्मीरचा मुख्य प्रधानही निवडून काढिला आहे. त्याचा प्राण घेण्याचें काम माझा भाऊ ज्याला तुम्हीं चांगलें ओळखिता त्यावर सोंपविलें आहे. तो निष्फळ जाहल्यास तें काम मी करणार होतो. ”

गुरुपाद—आणि तुझा भाऊ काश्मीरला जाण्यास निघाला काय ?

ठग– येथून थोड्या दूर आम्हीं दोघे निराळे पडलो आणि तो उत्तरेकडे आपल्या कामाकरितां गेला.

‘ पायींच गेला काय ? ’

‘ होय. ’

‘ मुख्य प्रधान आणि माझ्याबद्दल जे हुकूम देण्यांत आले ते दुसरे कोणास माहित आहेत काय ? ’

‘ आम्हीं आमचें काम साधण्यांत निष्फळ झालों असें समजल्याबर मग तें काम दुसऱ्यावर सोंपण्यांत येतें. ’

ह्या वेळेस गुरुपादनें आपल्या चाकरास इशारत केली आणि ते दोघे एकेबाजूस जाऊन बोलूं लागले. ‘ जा एकदम घोडा तयार कर; तुला आतांचें आतांच मुसाफरीला निघाले पाहिजे. ’

त्या जखमी मनुष्याचा शोकजनक आवाज ऐकून गुरुपाद परत त्याचे-जवळ गेला.

ठग— माझे राजेसाहेब, फारच थोडा वेळ मी आतां जगेन. आपले

माझ्यावर अनंत उपकार आहेत. त्यांत एक जास्त भर पडूं द्या. माझी एक विनंती आहे ती ही कीं, माझ्या अपराधाची मला क्षमा करा.

गुरुपाद— अभागी मनुष्या, मी तुला क्षमा करतों. मला माहीत आहे कीं ह्यांत तुझा स्वतःचा कांहीं अपराध नाहीं; परंतु, दुसऱ्याच्या सांगण्यावरून तूं हें काम करण्यास तयार झालास.

'आतां मी शांतपणानें देह सोडीन. दुर्गादेवीनें तुमच्याबद्दल माझा बळी घेऊन चमत्कार दाखविला आहे. तुमच्यावर तसेंच माझ्यावर तिची पूर्णकृपा आहे. अशा खात्रीनें तसेंच सुखाच्या पूर्वानुभवानें अमरपदाला पोहोंचेन. पवित्र ऐक्यतां ! पवित्र दुर्गे ! ' परत शक्ती आली असावी अशा मोठ्या अवाजानें हात लांब करून तो बोलला ' मीं येतों ! मला तुझ्या कीर्तिमय मंदिरांत दाखल कर ! ' हे शब्द बोलतां बोलतां तो स्तब्ध झाला; आणि संहार करणाऱ्या देवीच्या त्या निमकहलालचाकरानें अक्षयीं करतां नेत्र मिटले.

अस्थीर प्रकाशांत तें निर्जिव शरीर, तें शुष्क असून काळ्यारंगाचें तसेंच शिवमतानुसार कपाळावर लाल पांढरे पट्टे ओढलेले होते ते फारच भयंकर दिसूं लागले. त्या प्रेताकडे कांहीं वेळ गुरुपाद पहात राहिला. नंतर मनांत बडबडला ' धर्माच्या धर्मांधपणांत मनुष्य काय करणार नाहीं ? चांगला शांत मनुष्य गुन्हेगार, खुनी आणि वेडा बनतो. पाहिजे तें असो परंतु, हा मनुष्य दया करण्यालायक नाही. परंतु, गोरख सारखा ढोंगी, निर्लज्ज हरामखोर ! जें आपलें अति दुष्ट कर्म असल्या भोळ्या मनुष्यांकडून करून घेतो त्याचें काय करावे ? त्याचा संहारच केला पाहिजे. एकादा धर्मपंथ केव्हां आणि कशारीतीनें हानीकारक होईल ते सांगवत नाहीं ' ह्या सुमारास त्याचा चाकर परत आला; त्यामुळें त्याचे विचार-बंद पडले. चाकरास तो म्हणाला ' ह्या मनुष्याला घेऊन जाण्याचें कामीं मला मदत कर. हा मेला आहे तरी 'हरनें' ह्याला फाडून खावें अशी माझी इच्छा नाहीं. बाकी हर त्याला सोडणार नाहीं. आपलें काम संपल्यावर तूं जा. आपणास जी बातमी मिळाली आहे त्या बाबतींत सावध राहण्याचें सांगण्याकरितां तूं काश्मीरांत जा. ह्या मनुष्याच्या भावाला तूं चांगला ओळखितोस. त्याला शोधून काढण्याचा प्रयत्न कर. तो आपलें काम

करतांना अटकेल. तसेंच आपल्या सोबत्यांना कांहीं गोष्ट सांगूं शकणार नाहीं, अशी व्यवस्था कर. तुला साधल्यास गोरखाचाही पत्ता लाव. तो हातीं लागल्यास त्याला क्षणभरही जिवंत ठेऊं नको. दुसऱ्या करितां तो जो फांस तयार करतो, त्याच्या लायक तो स्वतःच आहे.'

त्या चाकरानें थांबत थांबत विचारिलें, 'पण स्वामी, अशा जंगलांत मी तुह्मांस येथें एकटे सोडून कसा जाऊं ? तुमच्या जागेची आतां बाहेर खबर आहे; आणि त्यामुळें तुमचा जीव घेण्याचा फिरून यत्न करण्यांत येईल, तरी ज्यावेळेस माझा कांहीं उपयोग होण्यासारखा आहे, अशावेळेस मी तुह्मांस सोडून कसा जाऊं.'

गुरुपादानें हंसून उत्तर दिलें "माझ्या जिवाच्या सहचरा ! माझ्याबद्दल चिंता करण्याची कांहीं जरूर नाहीं. तुला जें काम सोंपण्यांत आलें आहे, तें लवकर झाल्यास जो लाभ होण्याची आशा आहे त्याचप्रमाणानें पहातां माझें जीवित कांहींच हिशेबांत नाहीं. तूं माझा चौकीदार असतांना मी जितका सुखरूप आहे, तितकाच जों पावेतों 'हर' जीवंत आहे तों पावेतों मी सुखरूप आहे. 'हर' कसा बहादूर आणि हुशार चौकीदार आहे तें तर तूं पाहिलेंच आहेस. आपल्या आजूबाजूला असले दुसरे लुटारू ठग न आल्यास ते नशीबदार समज. हर असल्या लोकांना आतां ओळखूं लागला आहे. तरी चोरून लपूनही तो आतां त्यांना इकडे येऊं देणार नाहीं. तुझा घोडा तयार आहेना ?'

'होय स्वामी !'

'तर मग लौकर जा. परंतु प्रथम मला जरा येथें ह्या कामांत मदत कर आणि मग जा.'

# खंड १४ वें.

## शेवटच्या भेटी.

अबुलफजलच्या मृत्यूची बातमी ऐकून बादशहाला अतिशय शोक झाला. हा वेळपावेतों त्याला ज्या ज्या वस्तु सहाय करणाऱ्या होत्या, त्या त्या वस्तु एकदम त्याला सोडून चालल्या असें वाटलें. जो बादशहा मोठा समर्थ, कसाही प्रसंग आला तरी हिंमत न सोडणारा, युद्धांत सदासर्वदां विजयी होणारा, त्याला आपली शक्ती कमी झाली असावी असें वाटलें. नरसिंघाला पकडून आणण्याचा हुकूम काढण्यांत आला; परंतु, तो हातीं येणें अशक्य होतें. कारण तो पळून गेला होता. सेलीम गादीवर बसला ह्मणजे त्यानें त्याच्यावर केलेल्या उपकाराबद्दल चांगलें बक्षिस मिळण्याची वाट पहात दूर देशांत एक निर्भय ठिकाणीं जाऊन तो लपून बसला. अकबर सारखा विलक्षण पुरुष पाहिजे तसा दिलगिरीचा प्रसंग आला तरी निराश होऊन बसून राहण्याचा संभव नव्हता. कित्येक दिवस तो महालांतुन बाहेर पडला नाहीं. फैजी आणि कित्येक विश्वासू मित्रांखेरीज दुसरें कोणांस्ही त्याला भेटण्याची मोकळीक नव्हती. परंतु, दिवसगत होत चालले तसतसें कामानिमित्य दुसरेही लोक येऊन भेटूं लागले. त्याप्रमाणें एकदां अकेविया आला होता. आग्रा सोडून जाण्यापूर्वीं बादशहाची समक्ष भेट घेण्याची त्याची इच्छा होती.

अकबर—पूज्य पाद्रीसाहेब, तुह्मीं आह्मास सोडून जातां काय ?

अकेविया—आतां मी जास्त दिवस राहूं शकत नाहीं. आमच्या

मुख्य धर्मगुरूनें मला गोव्यांत परत जाण्याची आज्ञा केली आहे. परंतु, येथें आम्हास जो मान मिळाला, तसेंच आमच्यावर जे उपकार झाले त्याबद्दल आभार प्रदर्शित केल्याखेरीज जाणें मला योग्य वाटलें नाहीं. आपणांस अशा शोकजनक स्थितींत तसदी देण्यास माझें मन कचरत होतें. अबुलफजल एक योग्य पुरुष दिलदार मित्र, तसेंच निमकहलाल चाकर होता. त्याच्या सारख्या पुरुषाचा मृत्यु मोठा शोक-जनक तर खराच, थोडावेळ थांबून तो ह्मणाला ‘ जास्त स्वच्छ आत्म्या-सहीत तसेंच संभवीत होते त्याहून जास्त सुखी आशेसहीत त्यानें देह सोडिला असेल काय ? ’

अकबर ( शांत स्वरानें )– अबुलफजल ! अबुलफजल ! ! मी जास्त सांगत नाहीं; परंतु, तुमचे लोक ज्याला स्वच्छ आत्मा ह्मणतात आणि ज्या स्थितींत माझीही मरण्याची इच्छा आहे तशाच स्थितींत तो मृत्यूला शरण झाला.

अकबर कांहीं जास्त वेळ बोलेल असें अकेवियाला वाटलें होतें; परंतु, तो पुढें कांहींच बोलला नाहीं. तसेंच त्याच्या बोलण्यावरून स्पष्ट दिसलें कीं, जास्त विचारपूस करणें शहाणपणाचें होणार नाहीं.

अकबर– थोड्या दिवसानें तुह्मी परत तर याल ना ?

अकेविया– त्या बाबतींत मला जो कांहीं हुकूम मिळेल तो खरा. माझ्या स्वतःच्या बाबतींत मला फार दिलगिरी वाटते कीं, माझें उपदेशक-पद येथें निष्फळ झालें.

अकबर—निष्फळ कां बरें ? तुमचे येथें पुरतें संरक्षण झालें नाहीं, किंवा तुमचें आदरातिथ्य जाहलें नाहीं ? तुमचे मर्जीप्रमाणें उपदेश कर-ण्याची, तसेंच तुमच्यानें बनेल त्यास तुमचे धर्मांत घेण्याची, तुह्मास मोकळीक देण्यांत आली नव्हती काय ? हें सर्व निरर्थकच झाले- ना ? येथें कांहीं वर्षांपूर्वीं, पूर्वींचे बादशहाचे अमलांत तुमच्या धर्मपंथाचा उप-देश करणारांस फांशीची शिक्षा देण्यांत येत होती; त्या ठिकाणीं आतां तुह्मांस उपदेश करण्याची सर्व प्रकारें मोकळीक देण्यांत आली आहे.

अकेविया––उदारवंत ! असले महत्वाचें जे हक्क आह्मांस येथें देण्यांत आले आहेत ते आह्मी जर कसें तरी आहेत असें समजलों तर खरोखर

आमच्या अंगीं कृतघ्नपणाचा दोष येईल. तरी माझ्या भेटीचा मुख्य हेतू पाहतां तो निष्फळ झाला आहे. कशी मोठी उमेद बाळगून आह्मी आग्र्यास आलों तें तर तुम्हास माहीतच आहे. आमच्या धर्मपुस्तकाचे तसेंच आमच्या धर्मक्रियेच्या बाबतींत तुह्मी भाविकपणा दाखविला त्यावरून आह्मांस आशा उत्पन्न झाली कीं तुमच्या उमद्या अंतःकरणांत तसेंच बहुअनुभवी मनांत शेवटीं सत्याचा प्रकाश पडेलच पडेल. अकबर बादशहा ख्रिस्ती धर्माचा सर्वोत्कृष्ट जरी नाहीं तरी एक नामांकित शिष्य होईल अशी आमची संपूर्ण आशा होती. परंतु, आतां आह्मांस वाटतें कीं, आमची ती आशा सर्व व्यर्थ आहे आणि तेवढ्याचंच करितां आह्मी ह्मणतों कीं, आमच्या भेटीचा मुख्य हेतू निष्फळ झाला. आमचें हें ह्मणणें बाजवीच आहेना ? कदाचित् असें असेल कीं, आमच्या उपदेशांत कांहीं बाबती अशा कठीण असतील कीं त्या तुमचे तत्त्ववेत्यांना समजल्या नसतील; परंतु, ज्यास्त अवलोकनानें तसेंच शोधाअंतीं त्या अगदीं स्पष्ट होतील. ख्रिस्तीधर्मापासून पश्चिमेकडील प्रदेशांत अनेक फायदे झाले आहेत. आणि येथेंही तसेंच फायदे होवोत.

अकबर—निरनिराळ्या मतासंबंधीं जे प्रश्न उपस्थित जाहले आहेत ते विचारपूर्वक आह्मी एकेबाजूला ठेविलें आहेत. कारण, त्यांत आपण कधींही एकमत होणार नाहीं, तसेंच त्या बाबतींत तक्रार करण्याचीही मला ह्याक्षणीं रुची नाहीं. तुमच्या धर्माच्या अनेक फायद्याबद्दल तुह्मीं ह्मणतां तरी ऐकाः– तुमच्या ख्रिस्ती धर्माच्या मतांपासून दुनियेंत अनेक फायदे झाले आहेत. हें मी खुशीनें योग्य समजतों, इतकेंच नाहीं परंतु, आपल्या स्वदेशबांधवांत परस्पर प्रीति तसेंच आत्मभोगाचीं तत्वें लागू केल्याबद्दल कदाचित् जास्त लाभकारक असेल; परंतु, आह्मी तुह्मांस सांगितलेंच आहे कीं, असलीं धर्मतत्वें फक्त तुमचेंच धर्ममत शिकवीत नाहीं. त्याहून-नही ज्यास्त दुसऱ्या अनेक धर्मांत आहेत. तुमच्या धर्मापासून कित्तीएक लाभ तसेंच गैरलाभही झाले आहेत. साऱ्या दुनियेंत न पाहण्यांत येईल अशी दुसऱ्यांना आपआपला धर्म पाळूं देण्यांत तुम्ही गैरमर्जी दाखविली नाहीं काय ? तुमच्या देशबांधवांवर जुलूम करण्याकरितां तुम्हीं–तुम्हीं धर्मोपदेशकांनीं पश्चिम देशांत आपलें महात्म्य फारच वाढविलें नाहीं काय ? तुमच्या धर्ममताच्या विरुद्ध विचाराच्या हजारों आणि लाखो लोकांना तुह्मी

क्रूरपणानें फांशी दिलें नाहीं काय ? इतके असतानांही तुह्मी त्यापासून फायदे आहेत ह्मणून ह्मणतां ? असें असल्यास चांगलें करण्याचें तुमचे विचार विचित्र प्रकारचे ? तसेंच देशबांधवांवर प्रीति करण्याचे मार्ग आश्चर्य-जनक आहेत ह्मणावयाचे. मला सांगाल काय ? अक्केवियाकडे बारीक दृष्टीनें पहात अकबर ह्मणाला ' तुमचा हुकूम ऐकणाऱ्या राजापैकीं एखा-द्याची मी ख्रिस्ती प्रजा असतों, तर मला तुह्मी हल्लीं इतका मान देतां त्याबद्दल त्यावेळेस माझा तुह्मी कशा रीतीनें सत्कार केला असतां ? तुह्मी मला कैदेंत टाकिलें नसतें काय ? आणि इतकेंही करून तुमचे धर्मावर अस्थान ठेवण्याचें माझें दृढ मत कायम राहिलें असतें, तर मला जिवंत जाळण्याकरितां, किंवा फांशी चढविण्याकरितां, एखादे न्यायाधिशाकडून शिक्षा देवविली नसतीत काय ? '

हें ऐकून तो धर्मोपदेशक घाबरला. अकबरच्या तोंडून असले उद्गार निघतील असें त्याला वाटलें नव्हतें. त्यानें उत्तर काय द्यावें. खरोखर ज्या स्थितीची अकबरानें कल्पना केली त्याच स्थितींत तो असतां तर शंभर हिश्शानें त्याची तीच अवस्था झाली असती. हें कांहीं ना ह्मणण्या सारखें नव्हतेंच.

अक्केविया ( भयभीत होऊन )––तसें तर खरोखरच नाहीं. हिंदु-स्थानचा समर्थ बादशहा आमच्या एखादे राजाची प्रजा असेल असें अनु-मान कसें होईल ?

अकबर––खरोखरच माझें नशीबच समजलें पाहिजे कीं, तसें नाहीं परंतु, तुमच्या उत्तरावरून उघड होतें कीं माझी ही कल्पना कांहीं निरर्थक नाहीं. आता एक दुसरा प्रश्नः–हल्लीं मी हिंदुस्थानचा बादशहा आहे अशा स्थितींत तुह्मी माझ्याबद्दल काय विचार केला आहे ? तुमचे राजे लोक जे तुमच्या हुकूमाधीन रहातात; त्याचप्रमाणें मलाही तुमचाच बनवू पाहतां काय ? तुमच्या धर्मोपदेशकांचा जुलूम चालूं ठेवण्याचें कामीं माझाही त्याच-प्रमाणें उपयोग करण्याची तुमची इच्छा आहे काय ? मी आपला धर्म सोडून तुमचा धर्म स्विकारावा अशी स्वाभाविक रीतीनें तुमची फारच इच्छा असेल. परंतु, माझें शेवटचें सांगणें आहे कीं, तुह्मी तसें कधींही मनांत आणूं नका. तुमच्या इव्हेंजलीस्टांना मी पसंत केलें आणि खाजगी-

रीतीनें त्याचा स्वीकार केला तरी मी धर्मभ्रष्ट होणार नाहीं. एकादा राजा स्वधर्म सोडून भ्रष्ट धर्मानें वागल्यास साऱ्या राज्यांत कसा नाशकारक परिणाम होईल तें मला पूर्ण माहिती आहे. त्यामुळें तुमच्या हल्लींच्या खिस्ती धर्माशीं माझें कांहीं देणें घेणें नाहीं. पाद्रीसाहेब ! हे तुह्मी पूर्ण समजून रहा.

अकेविया—तर मग आह्मांस इतकेंच करावयाचे राहिले कीं आमच्या प्रभु येशूखिस्ताची तुमचे बाबतींत प्रार्थना करावी आणि आमच्या निर्बल प्रयत्नानें जें काम साधलें नाहीं तें काम त्यानें स्वतः कांहीं चमत्कारानें पार पाडावें. आमची खात्री आहे कीं, ही प्रार्थना व्यर्थ जाणार नाहीं. हे समर्थ बादशहा ! आपण विचार करा कीं, पृथ्वीवरील मोठमोठे मी मी ह्मणणारे त्याच्यापुढें कांहींच नाहींत. जे त्याच्या समोर होतात त्यांना तो शिक्षा करितो. शेवटीं तोच फक्त जय मिळवील आणि येशूखिस्त तसेंच त्याचा पवित्र धर्म दुनियेचा अंत येईपर्यंत चिरंजीव राहील.

अकबर— असें बोलणें कदाचित् तुमचें काम असेल; परंतु, माझें काम तर माझ्या प्रजेची स्वतंत्रता आणि हक्क संभाळण्याचें, तसेंच ज्याप्रमाणें मुल्ला आणि दुसऱ्या धर्माच्या धर्मगुरूपासून त्याचप्रमाणें तुमचेपासून त्यांचें संरक्षण करण्याचें आहे. तुमच्या मर्जीस वाटल्यास येथें रहा; मर्जीस वाटल्यास जा. रहाल तर मला फायदा नाहीं; जाल तर तोटा नाहीं. तुह्मांस ठीक वाटल्यास देवळें बांधा, उपदेश करा, मुसलमानांस त्यांच्या मशीदींत आणि हिंदूस त्यांच्या देवळांत जसे हक्क मिळतात तसेंच तुह्मांसही मिळतील. तरी तुह्मांस मला एक सूचना केली पाहिजे. मलबार किनाऱ्यावर ज्याप्रमाणें अलीकडे चालले आहे, त्याप्रमाणें तुमच्या धर्मभ्रष्ट किंवा दुसऱ्या लोकांवर ज्याक्षणीं तुह्मीं जुलूम करण्याचा यत्न करितां असें समजेल त्याचक्षणीं तुह्मास धरून फटके मारिले जातील. देशनिकाल करण्यांत येईल आणि फिरून कधींही माझ्या राज्यांत पाय ठेवूं देणार नाहीं.

लोएल्लोच्या शिष्याला हे शब्द ऐकून फारच राग आला; परंतु, त्यानें आपला राग आवरून धरिला. बादशहाचे तो काय करणार ! त्याला त्यानें काय उत्तर द्यावें ? प्रथमपासून सर्वप्रकारची स्वतंत्रता देणाऱ्या ह्या बाद-

शहाच्या वर्तणुकीबद्दल त्याची कांहींच फिर्याद नव्हती. अकबरासारख्या समर्थ राजकर्त्यापुढें तो काय बोलणार. स्वधर्म संरक्षणार्थ प्राणोत्सर्ग करण्यांत त्याला कांहीं बिल्ला मिळण्यासारखें नव्हतें. त्याच्या सारख्या लाचार धर्मगुरूनें अपमानकारक उत्तर दिलें असतें, तर ह्या सद्गुणसंपन्न बादशहानें त्याचें कांहींच केलें नसतें. त्याला तसेंच त्याच्या सोबत्यांना आदरपूर्वक सुरतेस पाठवून तेथून जहाजांत बसवून गोव्यास रवाना केलें असतें. किंवा तितकीही तसदी न घेतां हंसून सांगितलें असतें कीं, त्यांच्याकरितां जो रस्ता मोकळा ठेविला आहे तो त्यांना दाखवा.

अक्केविया घाबरून विचारांत पडला. इतक्यांत अकबर परत आपल्या हमेशच्या रिवाजाप्रमाणें बोलिला. ‘ पूज्य पाद्रीसाहेब, जी तक्रार तुह्मी स्वतःच उपस्थित केली, त्यांत माझी स्वतःची सत्ता कायम ठेवण्याकरितां मला फारच सक्त शब्द वापरावे लागले. आणि त्याबद्दल मला फारच वाईट वाटतें ! तुह्मी येथून रागावून जावें अशी माझी इच्छा नाहीं. तुमचेकडून तसेंच तुमच्या पुस्तकांतून मला पुष्कळ ज्ञान प्राप्त झालें आहे. त्याबद्दल मला फार संतोष वाटतो. मी तुमच्या मर्जीप्रमाणें वागूं शकत नाहीं, तरी त्याबद्दल मला फारच वाईट वाटतें. कित्येक बाबतींत आपले विचार सारखें नाहींत, तरी मी तुम्हांस कमी सन्माननीय समजत नाहीं. आह्मास सोडून जाण्याची तुमची इच्छा आहे. तुमची खुशी. परंतु, मित्रभावानें आपण एकमेकांपासून निराळे पडूं. तुमच्या धर्मस्थापन करणाऱ्यानें शांततेचें राज्य स्थापन करण्याचा तसेंच आपसांत प्रेम उत्पन्न करण्याचा यत्न केला होता, तरी त्याप्रमाणें करणें मला दुरुस्त वाटतें. ’

शेवटीं खिन्नांतःकरणानें तो पाद्री बोलला “ प्रतापी बादशहा, आपण नाखूष होण्यासारखे आह्मीं कांहीं बोललों असल्यास किंवा आपल्या राज्यांत आह्मावर झालेल्या अनंत उपकाराबद्दल आमची कृतघ्नता दिसली असेल तर त्याबद्दल आह्मास क्षमा करा. जरी आमचा धर्म आपण निरुपयोगीं समजत असला तरी आह्मी हमेशा आपल्याबद्दल प्रभू येशूख्रिस्ताची प्रार्थना करूं. ”

इतकें बोलून त्यानें पूज्यभावानें आपलें मस्तक नमविलें आणि लाग-लाच तो धर्मोपदेशक तेथून बाहेर पडला.

अकबराची रजा घेऊन परत जातांना राजवाड्यांतील एका रस्त्यांत, ज्याठिकाणीं फक्त एकच दिवा जळत होता, त्या ठिकाणीं एका समोरून येणाऱ्या मनुष्याला त्याचा धक्का लागला. त्यानें लागलीच माफी मागितली; परंतु, तो येणारा शिव्या देऊं लागला. ‘ मरोत हें चांडाळ ख्रिस्ती कुतरे ’ असें तो बडबडला. तो पाद्री कांहीं एक बोलल्या चालल्या वांचून चालतां झाला. हा येणारा गृहस्थ अब्दुलकादिर होता. तो बादशहाच्या भेटीला जात होता. त्याला पाहतांच अकबर ह्मणाला, ‘ तुमच्याशीं गोष्टी बोलणें मला फार आवडतें. अबुलफजलचा मृत्यु झाला त्या दिवसा-पासून मी माझ्या मित्रांना क्वचित्च भेटत असतों. आज सकाळीं तुह्मी भेटीला येणार असें ऐकून मला फार आनंद झाला. ’

अब्दुलकादिर ( बाहेरून मानपूर्वक परंतु रागांत )— जहापनाह, मी तुमची शेवटची भेट घेण्याकरितां आलों आहे. माझा येथून जाण्याचा समय अगदींच जवळ आला आहे.

अकबर– माझे प्रिय मित्र ! तुम्हींही एकाएकीं आम्हांस सोडून कां चालला ?

अब्दुलकादिर– येथें राहून दिवसेंदिवस मला जें निंदास्पद वाटतें आणि ज्यामुळें मला अतिशय खेद होतो, त्या गोष्टी पहाण्याची माझी खुशी नाहीं. आजूबाजूला चाललेले कपटव्यूह माझ्यानें पाहवत नाहींत. ज्यांत मी येथें राहिलों असतां माझ्या मर्जी उपरांत सामील व्हावें लागेल त्या कपटव्यूहांत मिसळण्याची माझी खुशी नसल्यानें आतां माझें मन उडून गेलें आहे. अकबरबादशहा ! तुमचें राज्याचा अंत आतां जवळ येत चालला आहे. सावध राहण्याचे वेळेस मी तुम्हांस सुचना दिलीच होती. आतां तर कदाचित् ती वेळ गेली. नक्की ठराव काय झाला आहे तें मला माहीत नाहीं. तसेंच त्याची चौकशी करण्याचीही माझी इच्छा नाहीं. आपल्या पवित्र धर्माचा तुह्मीं अविचारानें जो कांहीं ( अपराध ) तिरस्कार चालविला आहे आणि त्यामुळें जो अवरोध उत्पन्न झाला आहे तो माझे समजुतीप्रमाणें फारच बलवान् आहे. तुमचा पुत्र सेलीम याच्या अतिलोभी-

पणाचा विचार करा ! कित्येक लोभी मंडळींनीं मोठमोठ्या पदव्या आणि नेमणुकी मिळविण्याकरितां सेलीमला आडमार्गाला चढविला आहे, हें तुम्हांस माहीतच आहे. हल्लींची स्थिती तुमच्या अस्तित्वाला भयावह आहे. ( ही त्याची भविष्यवाणी ऐकून बादशहाला हसूं आलें. ' परंतु, तिकडे कांहींच लक्ष न देतां त्यानें आपलें बोलणें चालू ठेविलें. ' येथील स्थितीची पुष्कळ दूरपावेतों बातमी पोहोंचली आहे. पवित्र कुराणाचा तुह्मी तिरस्कार चालविला आहे आणि त्याला पायाखालीं तुडविलें आहे. मोठ्या पैगंबराची निंदा चालविली आहे. नास्तिक अग्निपूजकापासून शिकलेलें ईश्वरी निंदक आचरण चालविलें आहे. उघड रीतीनें दरबारांत आणि गुप्त रीतीनें खाजगींत आमचे हाडवैरी यहुदी आणि ख्रिस्त्यांच्या तुह्मीं भेटी घेतां. त्यांना नजराणे देतां. अशाच एका मनुष्याला तुमचे महालांतून जातांना मी आतांच पाहिलें. हिंदुधर्माचे मंत्रतंत्र करणारे जादुगार, तसेंच सैतानानें स्वतः पाठविले असावे अशा लोकांचा तुह्मीं सत्कार करीत असतां. खरोखर जलालुद्दीन महंमद हें नांव तुम्हांस चांगलें शोभतें ! जलालुद्दीन म्हणजे धर्माची सत्कीर्ति असें तुमचें नांव एकादे अशुभ वेळीं ठेवण्यांत आलें असावें. ज्या नांवाचें अशा निर्लज्य-रीतीनें तुह्मी सार्थक केलें आहे. तुम्हीं जशी काय सर्व बाबतींत पूर्णतांच मिळविली आहे असें तुम्हांस वाटतें. त्या अबुलफजल, आपल्या खऱ्या धर्माच्या मुख्य शत्रूच्या नांवाला प्रमाणाबाहेर मान देऊन त्याला सर्वांत श्रेष्ठ पदवी दिली आहे. ज्याचा भाऊ फैजी जो अल्लाहता न मानणारा त्याची सोबत धरली आहे. त्यानें तुम्हास अन्यायाचे मार्गाला चढविलें आहे, आणि आपल्या पवित्र धर्माचा त्याग करविला आहे. असल्या अयोग्य मनुष्याला तुम्ही उघड उघड मान देतां आणि त्याचे गुणानुवाद गातां ! जर अबुलफजलच्या अनुभवावरून तुम्हीं सावध झाले नसाल तर वेळेवर त्याच्या मृत्यूचा दाखला घेऊन सावध व्हा. तो मेला त्यावेळची सर्व हकीगत तुम्हांस समजलीच असेल. परंतु, मी खात्रीनें सांगतों कीं, खरी बातमी तुह्मांस समजली नाहीं. माझ्यावर पाहिजे तो प्रसंग येवो; मी ती गोष्ट उघड सांगतों. अबुलफजलची मरणकाळची हकीकत तुमच्यावांचून सर्वांस माहीत आहे. ती ऐकून तुमचें आंगावर दरारून काटा उभा

राहील. जों पावेतों त्याला वाचा होती तोंपर्यंत त्यानें अल्लाहाची निंदा केली. त्यानंतर तो कुत्र्याप्रमाणें भुंकूं लागला, मोठमोठ्यानें ओरडूं लागला जी हमेशची शिक्षा त्याला होणार होती, त्याच्या सुरवातीच्या वेदना त्याला होऊं लागल्या असाव्या, अशा रीतीनें त्याच्या अवयवांचा घाट बदलला आणि त्याच्या ओठांचा रंग फिकट पडला.

अकबर ( एकदम रागानें )—हें नक्की असत्य आहे ! बेशरमपणाचें भाषण हावेळपर्यंत ऐकलें ! तुमच्यासारखा धर्मांध मनुष्य विचारशक्ती एकिकडे ठेऊन उत्तम धर्म धारण करणाऱ्या सद्गृहस्थाच्या सद्वर्तनाला नाहक बट्टा लावण्याचा यत्न करीत आहे; खरोखर ही शरमेसारखी, धिक्कारण्यालायक आणि नीचप्रकारची निंदा आहे. अबुलफजलनें कशा स्थितींत देह सोडला, त्याचे अंतकालचे काय शब्द होते, ते एका विश्वासू गृहस्थानें मला सांगितले आहेत. तुमच्या डोक्यांतून निघालेल्या कृति तुमच्या जवळच राहूं द्या ! त्या ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. माझा स्वतःचा अपमान मी धैर्यानें सहन केला ! माझ्याजागीं दुसरा एकादा बादशहा असतां तर त्यानें तुह्मास अशी स्वतंत्रता कधींच दिली नसती. मी दिलेल्या स्वतंत्रतेचा तुह्मी गैरउपयोग केला आहे तो माझ्यानें सहन होणार नाहीं. माझ्या स्वतःबद्दल तुह्मांस वाटेल तें अनुमान करा ! मला वाटेल तें बोला ! तुमच्या अकबर बादशहाला शिव्या द्या, तें सर्व चालेल ! त्याबद्दल मी तुह्मांस क्षमा करीन. परंतु, माझा अतिप्रिय, कपटानें मारला गेलेल्या मित्राला विनाकारण फजीत करूं नका. असली खोटी निंदा करणाऱ्या बायल्यांची जीभ कापून त्यांना बोलतांना बंद केले पाहिजे.

अब्दुलकादिर— पाहिजे असल्यास माझें शीर घ्या ! तुमच्या करतां मी स्वतःला बळी देण्यास तयार आहें, हे तुम्हांस माहीतच आहे. माझ्या मृत्यूनें जरी तुम्हास कांहीं फायदा होणार नाहीं तरी तुमचा राग शांत होईल. तुम्हीं कबूल करा किंवा नका; मला जें खरें वाटत होतें तें मीं सांगितलें. माझें कर्तव्य मीं केलें. आतां तुम्ही पाहिजे तें करा.

अकबर— बस्स झाले ! तुमची जगण्याची किंवा मरण्याची मला कांहींच पर्वा नाहीं. कांहीं इजा झाल्यावांचून तुह्मीं येथून चालते व्हा. आणि ह्याउप्पर मला भेटण्याची हिंमत धरूं नका.

एकही शब्द बोलल्यावांचून अब्दुलकादिरनें पाठ फिरविली आणि मगरुरींत बेदरकारी चेहऱ्यानें तो दरवाजाकडे चालला. इतक्यांत बादशहानें त्याला नांवानें हाक मारली आणि तो गर्विष्ठ मुसलमान आश्चर्यानें परत फिरला. बादशहा ह्मणाला 'अब्दुलकादिर, अशा रीतीनें आपण एकमेकांस सोडणें बरोबर नाहीं. मी समजतों कीं आपल्या दोघांत मतभेद आहे. मी तुह्मांस विद्वान् आणि समजूतदार समजत होतों इतकेंच नाहीं परंतु, एक बहादूर आणि अब्रुदार गृहस्थ समजत होतो. जे गुण हल्लींच्या काळांत महत्वाचे आहेत, ते तुमच्यांत नाहींत. माझ्या जवळून कोणीही त्यांत मुख्यत्वेंकरून तुह्मीं रागावून जावें अशी माझी इच्छा नाहीं. तुह्मीं खुशाल जा. मी समजतों की तुह्मांस गेल्यावांचून सुटका नाहीं. नशीबीं असेल तें होईल. परंतु तुमच्या मनांत राग ठेऊन जाऊं नका. सलाह शांतींत तसेंच मित्रत्वांत आपण पुष्कळ वर्षं एकठिकाणीं राहिलों त्याचा विचार करा आणि ज्या कारणानें आपणांस एकमेकांस सोडावें लागलें तें कारण विसरून जा.

अकबर बोलूं लागला त्यावेळेस अब्दुलकादिरचा चेहरा बेदरकारी होता परंतु, क्षमा करणाऱ्या बादशहाचे उमदे शब्द ऐकून तो हळूं हळूं नरम पडला. जरी तो एकही शब्द बोलला नाहीं तरी अकबरानें आपला हात लांब केला, तो त्यानें हौसेनें धरला. त्यानें डोकें वांकविलें त्यावेळी त्या हातावर त्याचे डोळ्यांतील अश्रु पडले, आणि शेवटची भेट घेऊन तो तेथून गेला. अकबराला फिरून न भेटणारापैकीं हा होता.

# खंड १५ वें

## मसलत फसली.

सैन्यासहित बादशहा उत्तरेकडे जाण्यास निघाला. आग्र्यापासून तो बराच दूर गेला अशा बातम्या येऊं लागल्या. सैन्यांत सामील होण्याचा हुकूम मिळण्याची सिद्धराम वाट पहात होता. अशा वेळेस वेळ घालविण्याकरितां तो रझिया उर्फ गुलाबदानच्या वारंवार भेटीला जाऊं लागला. एकेदिवशीं संध्याकाळीं तो तिच्या महालाकडे फिरत फिरत गेला. पूर्वीप्रमाणें उत्कंठेनें जाण्याचें त्याचें मन होत नव्हतें. हळूं हळूं तिच्या बाबतींत त्याचें मनांत अविश्वास वाढत चालला होता. गुप्त मसलती समजण्याचे हेतूनेंही तो वारंवार तिची भेट घेऊं लागला. ज्या ज्या गोष्टी समजण्याची त्याची इच्छा होती, त्याखेरीज दुसऱ्या पुष्कळ बाबती आज त्याच्या समजण्यांत येणार आहेत. हें त्याला लेशमात्रही माहीत नव्हतें. रझियेच्या बगिच्याच्या लहान दरवाजाजवळ तो जाऊन पोहोंचला. तें दार हमेशाप्रमाणें बंद नव्हतें. त्याची किल्ली बेपर्वाईनें कुलुपांतच राहिली होती. तें पाहून सिद्धरामास फारच नवल वाटलें. दार उघडें असल्याकारणानें रिवाजाप्रमाणें सूचना दिल्यावांचून तो आंत शिरला आणि दार हळूंच बंद करून बंगल्याकडे चालला. इतक्यांत कांहीं विशेष कारणानें तो आश्चर्यचकित झाला.

आपल्यापासून कांहीं पावलें पुढें एक मनुष्य जातांना त्यानें पाहिला. प्रथम तर त्यानें त्याला ओळखिलें नाहीं. परंतु, लहान लहान वृक्षांच्या बाजूनें

तो जात असतां दिव्याच्या प्रकाशांत त्यानें त्याला ओळखिलें. तो गृहस्थ त्याचा मामा सल्हाण होता. गुलाबदानाला पाहतांक्षणीं सलाम करण्याचें सोडून फारच रागाचे आवेशांत तो ह्मणाला 'आपल्या सर्व युक्त्या बाहेर फुटल्या. कोणी निमकहरामानें सर्व बातम्या बादशहास सांगितल्या. ( गुलाबदान भयभीत होऊन ऐकत होती. ) आपला सर्व प्रपंच समजला. त्याला कशी खबर मिळाली तें मला माहित नाहीं. परंतु, इतकें तर खरें आहे कीं, आपलें सर्व कपट त्याला समजलें. तुला माहीतच आहे कीं, गोरख वेशांतरानें सैन्याबरोबर गेला आहे. त्याच्याकडून मला पक्की खबर मिळाली आहे कीं, अगदीं सुरवातीपासून अकबराला आपल्या कृत्याची खबर आहे इतकेंच नाहीं; परंतु, आपण मागाहून जो फेरफार केला त्याचीही खबर त्याला गुप्त दूतांनीं दिली आहे. अकबर मोठा पक्का निपूण आहे. काश्मीरदेशाकडे सैन्य घेऊन जाण्याची हूल दाखवून आपल्या नेमल्यावेळीं एकाएकीं येऊन आग्र्यावर हल्ला करील. ह्या बाबतींत सेलीमला सावध करण्याची मला सूचना मिळाली आहे. परंतु, तसें करण्यांत मला कांहीं ज़ास्त फायदा वाटत नाहीं. अकबराच्या हांतून सेलीम जरी सुटला तरी तो आपणांस कांहीं सोडणार नाहीं आणि तेवढ्याकरितां आपणांस शेवटच्या उपायाची योजना केल्यावांचून गत्यंतर नाहीं.'

गुलाबदान ( घाबरून )—तो उपाय कोणता ?

सल्हाण—गोरख आणि त्याचे शागीर्द आपणांस मदत करतील. आपणही त्यांना मदत केलीच पाहिजे. अकबर आग्र्यास येऊन पोहोंचण्यापूर्वी त्याचे आयुष्याचा अंत झालाच पाहिजे. ( हे शब्द ऐकून सिद्धराम फारच संतापला. जंबीयावर हात ठेवून पुढें सरसावणार परंतु, परत थांबला. ) ह्यापैकीं सेलीमला कांहींच समजूं देऊं नको. तसेंच हें कृत्य साधल्यावरहीं त्याला त्याबद्दल कांहींच सांगावयाचें नाहीं. आतां त्याला संशय आपलाच येईल, तरी आपणांस लेशमात्रही ती गोष्ट माहीत नाहीं असें आचरण ठेविलें पाहिजे. अशानें आपणाबद्दल त्याचे मनांत हलके विचार येणार नाहींत. गोरखला भेटून सर्व व्यवस्था करण्याकरितां उद्यां मी छावणींत जातों. कारण, त्याला त्या ठिकाणीं निराळे वेषांत कशा रीतीनें ओळखावें हें त्यानें मला सांगितलें आहे. ह्या सुमारास

सेलीमला सूचना देण्याचें काम तुझें. निरनिराळे संशय उत्पन्न होण्याच्या भीतीनें मी स्वतः त्याला भेटत नाहीं. तुझा त्याचा संबंध हल्लीं कसा काय चालला आहे ?

गुलाबदान– बरेंच दिवस झालें तो मला भेटला नाहीं. काय कारणानें तो इतके दिवस झाले माझ्याकडे आला नाहीं तें मलाही माहीत नाहीं. तरी त्याबद्दल मला फारशी काळजी नाहीं. पाहिजे तें होवो मला तो सुलताना दाखल ग्रहण करील हें खास. परंतु ही आशा तो बादशहा होईल त्यावेळीं फलीभूत होणार आहे त्या पूर्वी तर नाहींच.

सल्हाण– आणि ती वेळ येण्याचे दरम्यान तुला सोंपलेल्या माझ्या भाच्याशीं तूं मजा मारीत असशील नाहीं बरें ? तो तरूण आणि शूर आहे. त्याच्या समागमांत तुला आनंद प्राप्त होत असेल.

गुलाबदान– कांहीं वेळ तेंस होतें खरें. परंतु हल्लीं तर त्याचा मला कंटाळा आला आहे. विचार करून पहातां तो आपणांस फारसा उपयोगीं पडेल असें वाटत नाहीं. मान, प्रतिष्ठा, कर्तव्याच्या अनेक मतांबद्दल त्याच्याशीं निरंतर उरसफोड करावी लागते. त्याच्या मार्फतचें आपलें काम साधलें ह्मणजे त्याला मी दादच देत नाहीं. ' गरज सरो आणि वैद्य मरो. ' ह्या म्हणीप्रमाणें केलें पाहिजे आणि तसें करण्याचें मुख्य कारण इतकेंच कीं, सेलीमच्या संबंधीं माझें काम साधण्यांत तो व्यत्यय आणील.

सल्हाण—हें काय आहे ? ओटच्याजवळील बागाचे बाजूला पाहून एकाएकीं चपापला. कारण त्या बाजूला पावलांचा आवाज त्याचें ऐकण्यांत आला.

गुलाबदान—अल्लाह ! अल्लाह ! ! तें तर असंभाव्य आहे. दरवाजा तर बंद केला होता. तुह्मीं स्वतः घाईनें आलांत त्यामुळें तो उघडाच राहिला असावा. असो, त्या दुसऱ्या बाजूंनीं कांहींएक भीती नाहीं; कारण फैजी आजच सकाळीं छावणीकडे गेला आहे. तुह्मी त्याच रस्त्यानें जा. बागेच्या भिंतीजवळ कदाचित् सिद्धराम भेटेल.

सल्हाण—आतां सर्व कांहीं नक्की ठरलेंना ? सेलीम आणि येथें आग्र्यांत जे कोणी दुसरे आहेत, त्या सर्वांना सांभाळण्याचें काम तुझ्या शिरावर आहे

आणि अकबराला मी पाहून घेतों. माझें नशीब चांगलें असल्यास थोड्याच वेळांत आपण आणि त्याची प्रजा त्याचे अमलांतून सुटूं.

इतकें सांगून सल्हाण एका पड्याचे मागें चालता झाला आणि सिद्धरामाला माहीत नसलेल्या रस्त्यानें बाहेर निघून गेला. त्यामुळें सिद्धरामाचें मनांत प्रथम आलें होतें त्याप्रमाणें तो त्याचे मागें जाऊं शकला नाहीं.

अशावेळेस एकदम परत जाऊन बंडखोर राजद्रोही लोकांना इशारा मिळण्यापूर्वीं बादशहाला सूचना देऊन कपटव्यूहाचा भंग करणें हाच उत्तम मार्ग होता; परंतु, रागानें बेफाम होऊन सिद्धराम एका उडीसरसा ओट्यावर गेला आणि विक्राळ वाघिणीप्रमाणें दिसणाऱ्या गुलाबदान समोर उभा राहिला.

सिद्धराम—चांडाळणी, हे दुराचारिणी धिक् ! धिक् ! ! तूंच मला विश्वासघातकी बनविलास. परंतु, नक्की समज कीं, तुझें आणि त्या खुनीचें कपट पार पडणार नाहीं. तुला ज्याचा कंटाळा येत चालला आहे तोच मी तें सर्व मोडून काढितों.

गुलाबदान—असें काय ! ! तर मग तुह्मी आमच्या सर्व गोष्टी ऐकत होता !

तिच्या चेहऱ्यावर तिरस्कार आणि द्वेषाची चिन्हें स्पष्ट व्यक्त होऊं लागलीं आणि त्यामुळें पूर्वीचें सौंदर्याचा कांहींच अंश राहिला नाहीं. तिचा काय उद्देश आहे. त्याचे सिद्धरामाला अनुमान होण्यापूर्वीं एक जंबिया त्याच्या छातींत भोंसकण्याकरितां ती पुढें सरसावली. सहज आणि स्वभाविकबुद्धीनें त्याचा प्रतिबंध करण्याचा सिद्धरामानें यत्न केला, परंतु, त्याचक्षणीं गुलाबदानच्या मागच्या जमीनींतून एक पुरुष वर आला आणि त्यानें त्या खून करणारीचा हात धारिला. त्याला पाहून तिचे हात निर्बल झालें.

गुलाबदाननें एकदम मागें फिरून पाहिलें आणि एक भयंकर किंकाळी मारून ती जमीनीवर मूर्छित होऊन पडली. तिच्या मागें फैजी उभा होता आणि फैजीच्या मागें त्याचे दोघे चाकर नागव्या तरवारी घेऊन उभे होते.

‘ क्षमा करा ! दया करा ! ’ थोड्यावेळानें गुलाबदान शुद्धींत येऊन

विनंती करूं लागली. आपल्या पुढें चाललेला प्रकार पाहून, सिद्धराम चकित झाला.

'माझें नामदार पती क्षमा करा !' असें फिरून ह्मणत, आपलें काळेभोर केंस जमीनीवर रुळतील अशा रीतीनें डोकें खालीं करून गुडघ्यावर सरकत तिनें फैजीकडे जाण्याचा यत्न केला; परंतु, तो मागें सरला.

फैजी (रुद्राप्रमाणें कोपीत होऊन अतिक्रोधावेशांत)––हे चांडाळणी ! दूर सर ! मला शिऊं नको ! नंतर आपल्या चाकराकडे वळून तो ह्मणाला, 'ह्या स्त्रीला बांधा आणि माझ्या मकराच्या किल्ल्यांत घेऊन जा. त्या ठिकाणीं हिच्यावर सक्त बंदोबस्त ठेवा आणि बाहेरच्या लोकांशीं व्यवहार करण्याचा किंचित् देखील यत्न केल्यास ज्या शिक्षेंतून मी तिला आज वांचावितों ती शिक्षा त्याचक्षणीं अंमलांत आणा. तिला किंवा तिच्या एका केंसाला देखील ह्या उपर मी पहाणार नाहीं.' नंतर आपल्या पायाजवळ पडलेल्या स्त्रीकडे वळून आणि तिला जोरानें एक लाथ मारून तो म्हणाला, 'तुला आतां नर्कागाराखेरीज दुसरें स्थल नाहीं. कदाचित् मनांत खोटी आशा बाळगून तूं खुशी होत असशील. परंतु, ती आशा व्यर्थ आहे. तूं असें समजत असशील कीं, जो एके दिवशीं माझ्याहून जास्त समर्थ होईल, अशा पुरुषाचा तुला आश्रय मिळेल; परंतु, ते व्यर्थ आशेचे तरंग आहेत. तुला वाटतें कीं, सेलीम तुला मदत करील आणि तुला कैदेंतून सोडवील; परंतु; ती सर्व आशा व्यर्थ आहे. ज्या गृहस्थाला तूं फसविलें आहेस, त्याच ह्या समोरच्या मनुष्यांशीं तुझा संबंधही आहे ह्या बद्दल साग्र माहिती मला सेलीम यानें सांगितलीं कीं, ज्याला तुझेबद्दल कांहींच पूर्ण माहिती नाहीं.'

ह्याप्रमाणें तो बोलत होता त्यावेळेस गुलाबदान डोकें वर करून आणि ध्यान देऊन ऐकत होती परंतु, त्याचे शेवटचे शब्द ऐकून बेशुद्ध होऊन जमीनीवर पडली.

'तुह्मी तुमचें काम करा' असें फैजीनें आपल्या चाकरांस सांगितलें. लागलेंच गुलाबदान–रझियेला तेथून घेऊन गेले. म्यानांतून तरवार काढून तो सिद्धरामाजवळ जाऊन त्याला निरखूं लागला.

सिद्धराम—मी माझें जीवित तुझांस अर्पण केलें आहे. माझी आपल्या हातून मृत्यू होण्याखेरीज दुसरी कांहीं इच्छा नाहीं.

फैजी ( विचार करून तसेंच म्यानांत हळूंच तरवार घालून )—मी तें समजतों. परंतु, तुझ्या इच्छेप्रमाणें करण्याला मी खुशी नाहीं. ह्याच-ठिकाणीं दुसरा कोणी असतां तर निराळाच विचार केला असतां. मुसलमानानें तुझें डोकें उडविलें असतें. हिंदूनें गळा दाबून तुझा जीव घेतला असतां आणि फिरंग्यानें तुला द्वंद्वयुद्ध करण्यास पाचारण केलें असतें, परंतु, मी ह्यापैकीं एकही मार्ग पसंत करीत नाहीं. तुला जिवंत जाऊं देतों, करितां येथून कांहींएक इजा झाल्यावांचून जा. तूं जें अती दुष्ट कृत्य केलें आहेस; तें, तसेंच श्रेष्ठ कुलांत जन्म घेऊन खऱ्या मैत्रीचा जो बदला दिला आहेस त्याची सदोदित आठवण ठेवून कालक्रमण कर. तूं पाहिजे तशी ख्याती मिळविलीस, तूं पाहिजे ती पदवी मिळविलीस तरी ही गोष्ट कधींही विसरणार नाहींस. पाहिजे तसा मान आणि प्रतिष्ठा तुला मिळाली तरी यौवनावस्थेंत तूं एका मित्रांशीं कशारीतीचें वर्तन केलेंस, त्याची आठवण होऊन अब्रूदार गृहस्थापुढें लाजून खालीं पाहशील. इतकीच शिक्षा मी तुला करीत आहें. बस, आतां जा. ( इतकें बोलून फैजीनें खूण केली. त्याला मान देऊन लज्जेनें खालीं पहात सिद्धराम परत फिरला आणि बागेंतील जे दार अद्याप उघडेंच होतें, त्या मार्गानें बाहेर निघाला. )

मागें पुढें न पाहतां सिद्धराम चालूं लागला. रात्र बरींच झाली होती. यमुनेच्या काठानें तो चालला असतां एके ठिकाणीं कांहीं चैनी मंडळी मद्यपीत व सोंगट्या खेळीत बसली होती. त्यांच्यांत जाऊन मिसळण्याची त्याची इच्छा झाली. परंतु, ह्याक्षणीं एक विचार मनांत आल्यानें दुसरे सर्व विचार पार नाहींसे झाले. बादशहाला ठार मारण्याचे जे विचार ठरले होते त्याची त्याला आठवण झाली. 'फैजीनें ह्या सर्व गोष्टी ऐकिल्या असतील काय ? बादशहाला तो ह्या बाबतींत सावध करील काय ?' परंतु मनांत ह्या नवीन उत्पन्न झालेल्या प्रश्नांचीं उत्तरें तो देऊं शकला नाहीं. ज्या ठिकाणीं बादशहाचें सैन्य होतें तेथें जाण्याच्या तयारीस तो लागला.

दुसऱ्या अधिकाऱ्यावर सर्व काम सोंपवून फारच सावधगिरीनें वागण्याची त्याला ताकीद दिली. प्रसंग फारच धोक्याचा आहे. राज्यांतील बहुतेक मुसलमान उठले आहेत; तरी कशा रीतीचें वर्तन ठेविलें पाहिजे त्याचीही त्याला सूचना केली. नंतर लागलाच आपल्या मुक्कामावर जाऊन घोड्यावर जीन टाकून त्याला तयार करण्याचा वत्सला हुकूम केला. जो घोडा त्याला फैजीनें नजर केला होता. त्याच्यावर अशा प्रसंगाचे वेळेस त्यानें स्वारी केली. वत्स घोडा घेऊन बाहेर आल्यावर सिद्धरामानें त्याला सांगितलें; ‘ माझ्या मागोमाग छावणींत येण्याला तयार हो. माझ्यापासून तूं कांहीं अंतरावर रहा, एक तासाच्या आंत नीघ आणि जरूर पडल्यास जो निरोप सांगेन तो पोंहचीव. ’ नंतर बादशहा विरुद्ध चाललेल्या खटपटी संबंधीं कांहीं जरूरी पुरती हकीकत त्याला सांगितली. तसेंच आपण छावणींत नजरेस न पडल्यास एकदम अकबराला जाऊन भेटण्यास सांगितलें. नंतर घोड्याला टांच मारून तेथून झपाट्यानें चालतां झाला.

सिद्धराम फारच जलदीनें मुसाफरी करीत होता. त्यानें रस्त्यांत स्वतःही विश्रांती घेतली नाहीं, तसेंच घोड्यालाही विश्रांती दिली नाहीं. त्यामुळें तो थोड्याच अवकाशांत छावणी जवळ जाऊन पोहोंचला. छावणींत मोठी गडबड चालली होती. सर्व शिपाई बिगुल फुंकण्यांत येईल केव्हां कीं, लागलेच तयार होतील अशा स्थितींत होते. तरी तंबू मारून आपापल्या कामांत गुंतले होते. दिवस थोडा वर आला होता. अशा वेळेस सिद्धराम छावणींत जाऊन पोहोंचला. बादशहाला भेटण्याची त्यानें इच्छा दर्शविली. त्याचें नांव जाऊन सांगताच अकबरानें त्याला रूबरू बोलाविलें.

‘ तुह्मी येथें कशाला आला ? ’ अकबरानें रागावून कठोर स्वरानें विचारलें. आग्र्यांत तुमचें सैन्य सोडून बाहेर जाण्याची तुह्मास कोणी रजा दिली ? ह्याचें संतोषकारक उत्तर न दिल्यास तुह्मास फार जड जाईल.

सिद्धराम ( खालीं मान घालून नम्रतेनें )—नेक नामदार खुदावंत बादशहा ! ह्याहून दुसरें जास्त अधम प्रकारचें उत्तर मला देण्याचें नसतें तर मी मला फार सुखी आहे असें समजलों असतो. परंतु, आपल्या विरुद्ध सर्वांत मोठा अपराध करणाऱ्या एकाद्या शिपायाप्रमाणें

मी राजद्रोहीपणाचा अती नीच अपराध केला आहे. असें, स्वतः सांगण्याकरितां आलों आहे.

बादशहा ( स्थीर मनानें विचार करून )— त्याच बाबतीचा मला संशय आला होता आणि तेवढ्यांचकरितां तुमचें ठाणें न उठविण्याचा मी तुह्मांस हुकूम दिला होता. आतां तुह्मी स्वतःच तुमचे राजद्रोहाबद्दल माझी खात्री करण्याकरितां आलें आहांत; बरें ठीक ! पुढें बोला.

मोकळ्यामनानें सिद्धराम सर्व हकीकत जशी बनली होती त्याचप्रमाणें थोडक्यांत परंतु, कोणतीही बाबत गुप्त ठेविल्यावांचून सांगू लागला. ' गुलाबदानचें सांगण्यावरून आपला मित्र आणि हितकर्त्याशीं कसा कपटानें वागलों, बादशहाशीं कशारीतीनें विश्वासघातकी झालों; वगैरे सर्व हकीकत त्यानें इत्थंभूत सांगितली. ' ह्या सर्व गोष्टी चालल्या होत्या त्यावेळेस अकबर हळू हळू इकडून तिकडे फिरत होता. त्याची मनाची स्थिती त्याच्या चेहऱ्यावरून लेशमात्रही व्यक्त होत नव्हती. परंतु सिद्धराम बोलतांना थांबल्याबरोबर त्याच्या समोर उभा राहून तो फारच रागानें ह्मणाला, ' तूं जो गुन्हा केला आहेस त्याबद्दल खरोखर तुला तोफेच्या तोंडींच दिला पाहिजे. '

' निःसंदेह ! त्याच शिक्षेला मी लायक आहें. आपल्या हांतून मला योग्य शासन व्हावें अशाच हेतूनें मी हाजर झालों आहे. '

' तुझें राजद्रोहाचें काळें कर्म उघडकीस आलें असें तुला समजलें असून पळून जाऊन तूं आपला बचाव कां करून घेतला नाहींस. '

' दरेक अपराधाची शिक्षा झालीच पाहिजे, आणि तसें होणार नाहीं तोंपर्यंत माझ्या स्वतःचे मनानें तिरस्कार पावलेलो तसेंच दुसऱ्यानींही केलेला तिरस्कार असा मी दुनियेंत काय तोंड घेऊन फिरूं. '

' परंतु एकदम तुझा असा निश्चय कां झाला ? त्याचें कांहीं तरी कारण असलें पाहिजे. मला वाटतें तूं अद्याप सर्व हकीकत सांगितली नाहींस. तुझी गोष्ट अद्याप अपूर्ण असली पाहिजे. '

" आपलें ह्मणणें खरें आहे. परंतु, जों पावेतों मला शिक्षा ठरविण्यांत आली नव्हती तोंपर्यंत बाकीची गोष्ट मी सांगूं शकत नव्हतों. आतां ती सांगण्याला कांहीं हरकत नाहीं. माझ्या मर्जीउपरांत त्या स्त्रीनें जी

माझ्यावर सत्ता मिळविली होती, तिचा एकदम भंग झाला. माझ्या डोक्यावर टाकलेला पडदा एकदम दूर झाला. मी कोण आहें ? मी काय गुन्हा केला आहे ? आणि मी कशा शिक्षेला पात्र आहें हें मला शेवटीं समजलें. नंतर गेल्यारात्रीं गुलाबदानला भेटण्याकरितां गेलों होतो, त्यावेळेस लपून ऐकिलेली सर्व हकीकत सविस्तर वर्णन करून सांगितली. ”

सिद्धराम ह्याप्रमाणें सर्व हकीकत सांगत होता; परंतु, बादशहाचे चेहऱ्यावर त्यापासून कांहीं फेरफार झालेला दिसत नव्हता. तो शांतपणानें सर्व गोष्टी ऐकत होता. शेवटीं तो ह्मणाला, ‘ तुला जी शिक्षा ठरविली आहे ती तुझ्या ह्या शेवटच्या बातमीवरून तुला वाटलें असेल कीं, ती कमी होईल आणि तेवढ्याच कारणानें तूं ती मला प्रथम सांगितली नाहींस, असें वाटतें. मला तसेंच माझ्या राज्याला तुझ्याकडून मिळालेली बातमी पुष्कळ लाभकारक आहे. मी ठरविलेली शिक्षा फिरणार नाहीं असें तूं समजत असशील तरीही ती तुझी चूक आहे. एकादा मनुष्य अमुक गुन्ह्याबद्दल मरणाचे शिक्षेस पात्र आहे, असें ह्मणण्याचा अर्थ त्याला क्षमा होणारच नाहीं असा कांहीं नाहीं. तुझी बाबत तशीच आहे. सिद्धराम ! माझ्याशीं तसेंच तुझ्या मित्राशीं तूं फारच अधमपणाचें वर्तन केलें आहेस. तूं स्वत: अपराधी नाहींस. अनिवार मोहजालांत तूं सांपडलास. त्यांतून बाहेर निघणें फारच बिकट आहे हें मी पूर्ण जाणून आहे. प्रतिष्ठेसंबंधीं तुझे विचार नाश पावले नाहींत. तूं तुझ्या स्वप्नांतून जागृत होताक्षणीं, तुझे विचारही सजीव झाले. तुझा अपराध कांहीं लहानसहान नाहीं; तरी न सुधरण्यासारखे, कीं ज्यांना जिवंतही न ठेविले पाहिजे त्यापैकीं तूं नाहींस असें माझें मत आहे. तुझ्या ह्यापुढील कृत्यानें मागच्या दुष्कृत्याचा विसर पडेल, अशी तुझ्या आजच्या वर्तनावरून माझी खात्री होत आहे. ह्या उपरांत तूं कधींही कपट करणार नाहींस; इतक्यांच करितां तुला मी जिवंत ठेवीत आहें आणि तुझ्या अधिकारावर तुला कायम राहूं देत आहे. तरी दुसऱ्यावेळेस फसणार नाहींस असें वर्तन ठेव. ’

कांहींवेळ सिद्धराम उत्तर देऊं शकला नाहीं; परंतु, बादशहापुढें गुडघ्यावर पडून त्याच्या आंगरख्याचें कोरीला मानपूर्वक स्पर्श केला.

बादशहानें शेवटीं सिद्धरामास उभे राहण्याची खूण केली. त्या वेळेस

तो ह्मणाला; ' मी आपले उपकार समजतों. माझें जीवित ज्याची मी कांहींच किंमत समजत नाहीं ते वांचल्याबद्दल मी आभारी आहें; असें समजूं नका. परंतु, माझ्या अधम कृत्त्यांचा कोणत्याहीप्रकारें बदला देण्याची संधी देण्यांत येत आहे, त्याबद्दल मी फारच उकार झाले असें समजत आहें. आतां माझ्यावर एक दुसरा अनुग्रह करण्याबद्दल माझी विनंती आहे. ती ही कीं, उत्तरेकडील बंडखोरांशीं युद्ध करण्याकरितां मला जाण्याची रजा मिळावी.

बादशहा—तुझी ही विनंती पण मी कबूल करितों. परंतु, त्यापूर्वी तुला एक दुसरें जरूरीचें काम सांगतों. माझे अती विश्वासु कांहीं अंगरक्षक मी तुझ्या स्वाधीन करितों. त्यांना घेऊन सल्हाणाचा शोध करून एकदम त्याला धर आणि गोरखला न समजेल अशा गुप्त रीतीनें त्याला माझेजवळ घेऊन ये.

वरील बादशहाचें आज्ञेप्रमाणें, कांहीं अंगरक्षक बरोबर घेऊन, बादशहानें अंदाज केला होता, त्याहूनही लौकर सल्हाणाला दोघा स्वारांसह कैद केले. सल्हाणानें कांहीं वेळपर्यंत आपलें रक्षण केलें. शेवटीं त्याचें कांहींच चाललें नाहीं. ज्या भाच्याचा तो फारच तिरस्कार करीत होता त्यानेंच त्याला चतुर्भुज केलें. रस्त्यानें येणारे जाणारे लोकांनीं त्याला ओळखूं नये ह्मणून त्याच्या तोंडावर बुरखा टाकिला आणि त्याला बादशहाच्या छावणींत घेऊन गेले.

बादशहाच्या तंबूत नेऊन त्याचे बंद सोडिले आणि अकबर व सिद्धरामापुढें त्याला एकट्यालाच उभे केले.

' सल्हाण, तुमचें कपट तसेंच तुमची शेवटची व्यवस्था मला समजली. ह्या तुमच्या भाच्यानें मला सर्व हकीकत सांगितली. तुझ्या इष्ट देवतेचें स्मरण कर. फांशी देणारे तुझी वाट पहात आहेत ! '

सिद्धरामाकडे रागानें तसेंच तिरस्कारानें भिंवया वर चढवून पहात सल्हाण बादशहाच्या पायां पडला. ' मला ह्यावेळेस जिवंत ठेवा, तुमच्या मर्जीस येईल ती मला शिक्षा करा, परंतु हे सद्धर्मपालक महाराज, माझा जीव घेऊं नका. मी सर्व कबूल करतों. मला जें कांहीं माहीत आहे तें सर्व सांगतों. '

बादशहा ( तिरस्कारानें )— सल्हाण, तूं राजद्रोही आणि हरामखोर आहेस हें मला माहीत होतें; परंतु, तूं बायल्या आहेस हें तर मला आतांच समजलें. एकच बातमी खेरीज तूं जें कांहीं सांगणार तें सर्व मला माहीत आहे आणि तें हें कीं गोरख कोठें आहे आणि तो कशा रीतीनें हातीं लागेल ?

सल्हाण— मी तें सर्व सांगूं शकण्याखारखें आहे. ( वाचण्याचा आतां संभव आहे असें पाहून मनांत खुष होऊन ) तो कोठें आहे आणि कसा सांपडेल तें मी बरोबर सांगितलें तर—

" तुझ्या नांवाला काळिमा लागेल अशारीतीनें तुला मोकळा सोडितों, परंतु, जर तुझी बातमी खोटी ठरली तर नक्की समज कीं, तुझें शीर धडावेगळे करण्याला तरवार तयारच आहे. "

गोरखाला त्याच्या गुप्त वेशांतून ओळखून कसा धरावा त्याची सविस्तर हकीकत ह्या वेळेस सल्हाणानें मोठ्या उत्सुकतेनें सांगितली.

बादशहा ( सिद्धरामाकडे वळून )—ह्या मनुष्यावर सक्त बंदोबस्त ठेवा. आणि तुझी आपली मनुष्यें घेऊन गोरखच्या शोधाला जा आणि तो हातीं लागतांक्षणीं त्याला फांशी द्या. कांहीं विलंब केल्यावांचून हुकूम आमलांत आणा. दुर्गेच्या पुजाऱ्याचा शोध करण्याकरतां ते एकदम निघाले आणि थोड्याच वेळांत तो त्यांच्या हातीं लागला.

गोरख ( सिद्धरामास ओळखून हंसून )—ओहो ! माझ्या तरुण मित्रा ! तुझ्या हिताकरतां मी इतकी काळजी वाहत असतांना तूं त्याचा अशारीतीनें बदला द्यावास काय ? अस्तु, जें होईल ते खरें; परंतु, माझ्यावर एक उपकार कर. त्यांत तुला कांहीं कठीण नाहीं. मला फसविणार कोण आहे तें सांग. सल्हाण खेरीज दुसरा कोणी नसेल हें माझें अनुमान खरें आहेना ?

सिद्धराम—तुमचें अनुमान खरें आहे. ( आपल्या मनुष्याकडे वळून ) ह्या मनुष्याला छावणी बाहेर घेऊन चला आणि बादशहानें ठरविलेली शिक्षा अमलांत आणा.

गोरख—ती शिक्षा काय आहे.

सिद्धराम—फांशीचा दोर.

गोरख—फार उत्तम आहे; त्या विद्येंत तर मी प्रवीण आहे.

गोरखला बांधण्याची कांहीं जरूर दिसली नाहीं. कारण पळून जाण्याचा त्यानें यत्न केला नाहीं. कांहींवेळ सिद्धरामानें त्याच्याकडे वळून पाहिलें नव्हतें. त्याचे चौकीदार त्याच्या चळवळीवर फारसे बारकाईनें लक्ष देत नव्हतें. परंतु, छावणी सोडून पुढें गेल्यावर आपल्या स्वारांना कांहीं हुकूम देण्याकरतां सिद्धरामानें मागें वळून पाहिलें. गोरखच्या हातांत एका झाडाचें लांब पान होतें. तें त्यानें रस्त्यानें उचलून घेतलें होतें, किंवा आपल्या जवळचें काढिलें असावें, कांहीं असो परंतु. तो त्यावर कांहीं लिहीत होता. नंतर त्यानें तें हवेंत वर धरून पंख्याप्रमाणें हलविलें.

‘ चला आतां. तुमचे हे हातचलाखीचे चाळे राहूं द्या. त्यापासून आतां कांहीं फायदा होणार नाहीं. तें पान फेंकून द्या. तुमचें मंत्र तंत्र आह्मी पुष्कळ पाहिलें. ’

गोरखनें त्याचें ह्मणणें मान्य केलें. हंसून हवेंत दुसऱ्या दोन खुणा करून तें पान जमिनीवर टाकिलें. नंतर ते सर्व पुढें चालले. कांहीं वेळानें त्या पुजाऱ्याचें निर्जीव शरीर एका झाडाचे डाहळीला लोंबूं लागलें.

ह्याच सुमारास दोन मनुष्यें जे एकाद्या सरदाराचे नोकर असावेत असें वाटत होते ते गोरख धरला गेला आणि त्याला शिपाई शिक्षेच्या जागीं घेऊन चालले असें पाहून त्यांच्या मागें मागें गुप्त रीतीनें चालले. गोरखनें ज्या ठिकाणीं पान फेंकून दिलें त्या ठिकाणीं तेथून शिपाई वगैरे पुढें गेल्यावर ते दोघे पाहूं लागले आणि ते शोधीत होते ती वस्तू त्यांना लवकरच सांपडली. एका वाळलेल्या पानावर कांहीं आणीदार हत्यारानें थोडे शब्द घाईघाईनें लिहिले होते. त्या दोघांनीं ते वांचून पैकीं एकानें सांभाळून आपल्या कपड्यांत लपविलें आणि घाईघाईनें छावणींत परत गेले.

गोरखच्या मरणाची बातमी ऐकून बादशहानें सल्हाणास जिवंत ठेवण्याचा हुकूम केला आणि बंदोबस्तांत ठेवण्याकरितां शिपायांच्या स्वाधीन केला. त्याचे काय करावें हें युद्ध संपल्यावर नक्की ठरविण्याचें होतें. सल्हाणास वाटत होतें कीं, अकबर गादीवर आहे तोंपर्यंत

आपणांस एकाद्या किल्ल्यांत कैदी होऊन रहावें लागेल. परंतु, सेलीम गादीवर येतांक्षणीं खात्रीनें मुक्त करील आणि त्यावेळेस सिद्धरामावर वैर घेण्यास संधी मिळेल.

त्याच्या जवळ कोणीही जाऊं शकणार नाहीं असा कांहीं बंदोबस्त ठेवण्यांत आला नव्हता. एकेदिवशीं संध्याकाळीं असें झालें कीं, एक सुशोभित पोशाक केलेला चाकर सल्हाणाचें हातांत एक वाळलेलें पान ठेऊन गेला. तें काय असेल ? तेथून पळून जाण्याचा मार्ग दाखविणारे, त्याचा एकादा मित्र—कदाचित् गुलाबदान कडील गुप्त निरोप होता कीं काय ? नाहीं. त्यांत तसें कांहीं नव्हतें. परंतु सल्हाणाच्या मृत्यूचें तें आमंत्रण होतें. त्या घाईघाईनें लिहिलेल्या पानावर लिहिलें होतें कीं— बाद-शहानें मला शिक्षा केली. माझ्या मरणानें तुझें काम साधणार नाहीं. तूं मला फसविलें आहेस; तेवढ्याकरितां दुर्गादेवीनें तुला शेवटचा बळी पसंत केला आहे.

हें वांचून सल्हाणाला फारच त्रास झाला. त्याचीं सर्व गात्रें निर्बल झालीं. त्याच्या हांतून तें पान जमीनीवर पडलें. त्या थोड्या शब्दांचा अर्थ तो चांगला समजत होता. त्याला माहीत होतें कीं, त्याचे बाबतींत ठरविलेली शिक्षा फिरूं शकणार नाहीं. दुर्गेच्या पुजाऱ्याचा शेंवटचा हुकूम अमलांत आल्यावांचून राहणार नाहीं. त्याचे लाखो शिपाई मारले गेले तरी त्याच्या सांगण्याप्राणें तें केल्यावांचून राहणार नाहींत. तर मग त्याला सुटण्याची कांहींच आशा नव्हती काय ? खरोखर तो सुटेल असें बिलकुल नव्हतें. आग्रा शहरांत किंवा एकादे किल्ल्यांत तो असतां तर कसें चांगलें झालें असतें. कारण, त्या उघड्या मैदानांत त्याच्या जवळ येणें स्वल्प होतें. सैन्य फारच हळूं हळूं चाललें आहे असें त्याला वाटलें. त्याचा जीव घेण्याकरितां दुर्गेचे भक्त फिरत आहेत असें त्यानें आपल्या रक्षक शिपा-यांस सांगून त्यांना ज्यास्त सावध राहण्याची सूचना केली; परंतु, हें ऐकून ते हंसले आणि आपसांत ह्मणूं लागले कीं, ' असें झाल्यानें कांहीं जग ओस पडणार नाहीं ' तें त्यानें ऐकिलें. रात्रीं निजण्याचे जागीं दिवा ठेवण्याची त्यानें विनंती केली. तें ऐकून त्याच्या भित्रेपणाची त्यांनीं

फारच टीका केली. ह्यावेळेपासून एक क्षणही त्याचें मन शांत राहिलें नाहीं. सैन्य कूच करीत असतां कांहीं काळी आकृती त्याच्यावर लक्ष ठेवून त्याचे मागें मागें येत असावी असा त्याला भास होई. विश्रांति घेण्याकरितां सैन्यानें तळ दिला ह्मणजे त्याठिकाणीं तो फारच सावध राही. जंगलांत तसेंच आजूबाजूचें झाडावर तो लक्ष देऊन पाही. जरा कांहीं खडबडलें कीं अंधारांत आजूबाजूला हात फिरवून पाही. सारी रात्र जागून काढण्याचा यत्न करी. एकादेवेळेस जरा डुलकी लागल्यास मोठ्यानें ओरडून श्वासोच्छ्वास घेवदत नाहीं असें वाटून मानेवर हात फिरवी. आपल्या गळयांत कोणी फांस घालीत आहे असा त्याला वारं-वार भास होऊन मानेवर हात फिरवी. पुढें पुढें तर सदोदित मानेवर हात ठेवण्याची त्याला संवय पडली. आपल्या हातानें कांहीं तरी करून मरावे ह्मणजे ह्या त्रासांतून सुटूं असें वाटलें. परंतु, तसें करण्यास त्याची हिंमत होईना. अलाहाबादास कदाचित् सुखरूप पोहोंचूं अशी त्याला फार आशा होती. परंतु, सैन्य हळूं हळूं चालूं लागलें. शेवटीं जें काम करण्याची सल्हाणाला हिंमत होत नव्हती तें काम दुर्गेच्या भक्तांनीं केलें. आणि त्याला दुःखांतून सोडविलें. त्याच्या राहण्याच्या तंबूत एकेदिवशीं सकाळीं त्याच्या रक्षक शिपायांनीं त्याचें स्थूल शरीर प्राणरहित पाहिलें.

# खंड १६ वें.

## सेलीम.

अकबर आणि त्याच्या सलाहकारांनीं अनुमान केलें होतें त्याप्रमाणें आणि मुख्यत्वेंकरून सिद्धरामाकडून बातमी मिळाली होती त्याप्रमाणें आग्राशहरांत बनाव बनूं लागले. सेलीमला बादशाही सैन्याच्या चळवळीची बातमी गोरख-कडून मिळण्याचें बंद झालें. तसेंच गुलाबदानकडनही कांहींएक बातमी मिळेना. अकबराचें सैन्य परत येत आहे अशा बातम्या येऊं लागल्या; परंतु, अकबराच्या पक्षांतील लोकांनीं खोटी कंडी पिकविली आहे असें राजद्रोही लोक समजूं लागले.

सांकेतिक दिवशीं सेलीमनें राजमहाल ताब्यांत घेतला आणि आपल्या नांवाची द्वाही फिरविली. कितीएक मुख्य अधिकाऱ्यांना चाकरीवरून दूर केले आणि त्यांच्या जागीं नवीन मनुष्यें नेमिलीं. साऱ्या शहरांत लोक फारच विस्मित झाले, तसेंच घाबरूनहीं गेले. धनवान लोकांनीं घराचीं दारें बंद केलीं. व्यापाऱ्यांनीं दुकानें बंद केलीं. आग्रा शहर जें विस्तीर्ण आणि गजबजलेलें होतें तें शून्यकार आणि उजाड वाटूं लागलें. अकबर येऊन पोहोंचतो तेवढ्या अवकाशांत सेलीम किल्ल्याचा बंदोबस्त करून बापाशीं समर करण्यास तयार होईल अशी भिती वाटूं लागली. परंतु राजपुत्र किल्ल्यांत दाखल होण्यास गेला, त्यावेळीं किल्लेदारानें त्याला किल्ल्यांत दाखल करण्याची साफ ना पाडिली. दरवाजे बंद केले आणि शहरावर तोफेचा मारा चालू-

विण्याची धमकी दिली. तो किल्लेदार अकबराचा निमकहलाल नोकर होता. ह्मणूनच बादशहाशीं केलेल्या संकेतांप्रमाणें त्यानें सेलीमचा पक्ष घेतला नाहीं. प्रयासावांचून किल्ला आपल्या हातीं येईल असें सेलीमला वाटलें होतें. परंतु एकाएकीं त्याची आशा भंग झाल्यामुळें तो घाबरला. ह्यावेळेस सैन्य परत येण्याच्या बातम्या त्याला खऱ्या वाटल्या. सैन्य एक दिवसांत आग्र्यास येईल असें ऐकून त्याची त्रेधा उडाली. इकडे आड तिकडे विहीर अशी त्याची स्थिती झाली. बंडखोर लोकांनीं त्याला सोडिलें. एकदम पळून जाण्यानें आपलें रक्षण होईल असें त्याला वाटलें. परंतु, आतां वेळ राहिला नाहीं. आग्रा शहराबाहेर बादशाही सैन्य येऊन धडकलें. शहराचे सर्व मार्ग त्यांनीं अडविलें. थोड्या मनुष्यांनिशीं तो शहर सोडून जाण्याचा यत्न करीत होता; परंतु सैन्याच्या एका तुकडीच्या तो हातीं लागला. जरी त्याला योग्य मान देण्यांत आला तरी एकादे कैद्याप्रमाणें त्याला राजमहालांत नेण्यात आलें. थोडें दिवसांत बादशहा परत आग्र्यांत येऊन पोहोंचला. त्यानें सेलीमला समक्ष येण्यास बोलावणें पाठवलें. ह्या वेळेस अकबर सेलीमचा बादशहा, बाप तसेंच न्यायाधीशही होता. सेलीम जरी शूर होता तरी आपण अपराधी आहों असें समजून त्याचें अंगांत धैर्य राहिलें नाहीं. त्याला माहीत होतें कीं, अकबर दयाळू स्वभावाचा आहे. तरी आपल्या राज्याच्या कल्याणाकरितां प्रसंगी फारच कडक शिक्षा करितो. परंतु जेव्हां बादशहा समक्ष तो एकटाच गेला त्यावेळचा प्रकार पाहून तो फारच विस्मित झाला. बादशहा एका कोचावर आडवा पडला होता. त्यानें एका हातावर आपलें डोकें ठेविलें होतें. दुसरा हात बाजूला लोंबत होता. हें पाहून सेलीमच्या मनांत उत्पन्न झालेली भीति दूर झाली. राजद्रोही राजपुत्र दिवाणखान्यांत दाखल झाला तरी अकबर कोचावर तसाच पडून होता.

आपल्या समोर बंड केल्यामुळें लज्जेनें म्लानवदन झालेल्या आपल्या मुलाकडे पाहून अकबर ह्मणाला, ‘ सेलीम, तुला भेटण्याचें मी फारवेळ मुलतबी ठेविलें. ह्या भेटीची मला धास्ती होती, आणि असली भेट न होईल तर बरें अशी माझी इच्छा होती. परंतु, अल्लाची मर्जी !’ क्षणभर स्तब्ध राहून नंतर कोंचावर बसून व हात वर करून मानसिकव्यथेच्या आवेशांत तो

ह्मणाला, " माझे मुला ! कम्बख्तमुला ! माझें कसें कमनशीब कीं, ह्मातारपणीं मला असें पाहण्याचा प्रसंग आला. प्रपंची मित्रांत आणि क्षणिक लोभांत तूं कसा फसलास. तूं मला किती प्रिय होतास, तुझ्या साहजीक इच्छा पूर्ण करण्याकरितां मी किती धनदौलत बक्षीस केली तें सर्व तुला माहीतच आहे. मला मूल नव्हतें त्यावेळेस एक मुलगा व्हावा ह्मणून मी अल्लाची प्रार्थना करीत असे. आणि माझी ती प्रार्थना केल्याबद्दल ज्या ठिकाणीं अल्लाची फार फार बंदगी करीत होतो, त्याठिकाणीं फत्तेपूरसिक्री बांधून मोठा उत्सव केला. हे निमकहराम ! पितृद्रोही ! तुला तें सर्व माहीतच आहे. कारण, मी तसेंच तुझ्या आईनें तुला पुष्कळ वेळां तें सांगितलें आहे. तूं अशीं कृत्यें करशील आणि माझ्याशीं असा वागशील हें मला माहीत असतें तर मी इतक्या आतुरतेनें अल्लाची बंदगी केलीच नसती; आणि ती बंदगी त्यानें कबूल केली त्यावेळेस मला जो आनंद झाला होता तो झालाच नसतां. अहा ! तुझ्या स्वतःवर तूं एकवेळ थोडा अंकुश ठेऊ शकत नव्हतास काय ? तसेंच गादीवर बसण्याकरितां तुझ्या बापाचा मृत्यू होईपर्यंत तुझ्यानें धीर धरवत नव्हता काय ? मी तुझ्यावर सदोदीत प्रेम करीत होतों आणि ज्याचेंयोगें तुला अगणित फायदे झाले होते त्या प्रीतीचा थोडाबहूत तरी मोबदला देणें तुझ्या हातीं नव्हतें काय ? जर तूं तुझ्या मनांवर अंकुश ठेवण्यास अशक्त आहेस तर इतक्या कोट्यावधी मनुष्यांवर अंकुश ठेवण्यास कसा शक्तिमान होशील ? "

क्षणभर त्याचा बाप बोलतांना बंद राहिला. त्या वेळेस काय उत्तर द्यावें तें सेलीमला सुचलें नाहीं. स्वतःची चूक असूनही अशाप्रकारचा सन्मान मिळेल अशी त्याला आशा नव्हती. दिलगीर होऊन प्रेमानें ओतप्रोत असे बादशहाच्या तोंडचे शब्द ऐकून त्याची छाती भरून आली; कारण, सेलीम जरी वाईट होता तरी कठीण मनाचा नव्हता; परंतु अस्थीर मनाचा आणि भोळा होता.

' परंतु नाहीं ' बादशहापुढें बोलूं लागला ' असें करण्याची माझी मर्जी नव्हती. अथवा तुझ्यानें तसें झालेही नसते. कोणत्याही बाबतींत तुझी मनोवृत्ती स्वाधीन ठेवण्याची तुझ्यांत शक्तीच नाहीं. तरी ह्या

बाबतींत तूं तसें कसें करूं शकशील. ' दारू पिण्याचें तूं सोडून दिलें हें पाहून मी फार खुषी झालों. परंतु ती सुधारणा फारच थोडावेळ राहिली होती ! माझ्या जागीं प्रजेवर राज्य करण्याची तुझी इच्छा आहे. परंतु तूं तुझी स्वतःची मनोवृत्ती स्वाधीन ठेऊं शकत नाहींस. तुझ्या स्वतःच्याच स्थितीचें तुला बरोबर भान असतें तर, तुझा स्वतःचा लाभ कशांत आहे त्याचा विचार केल्यानें तुला खरा मार्ग सांपडला असता. तुला लागलेंच समजलें असतें कीं प्रामाणिकपणानें आपलें कर्तव्य बजाविलें असतां भविष्यांत होणाऱ्या प्रजेचें प्रेम संपादन होऊन त्यांचेकडून मान मिळाला असतां; परंतु त्याहून उलट रीतिनें तसेंच तुझ्या ह्या अपराधमय आचरणानें तूं त्यांच्या तिरस्कारास पात्र झाला आहेस. अशा मूर्खपणाच्या आणि दोषास्पद वर्तनानें तूं तुझा स्वतःचा अपमान करून घेतला आहेस. तुझ्या स्वतःच्या तसेंच माझ्याही नांवाला कलंक लाविला आहेस. कीं ज्याच्या योगें तूं एक अती तुच्छ प्राण्याहूनही तुच्छ मोजला गेला आहेस. कदाचित् तुझें काम सिद्धीस गेलें असतें आणि तूं त्यांचा बादशहा झाला असतास, तरी काय झाले ? स्वार्थानें किंवा भिवून त्यांनीं तुझी आज्ञा मान्य केली असती. परंतु प्रतिष्ठितपणें तुला मान दिला नसता. तुझ्या दुष्ट व लोभी वर्तनाचा मी प्रतिरोध करूं शकलों असतो तर किती चांगलें झालें असतें ! मी यत्न केला, फैजी जो हमेशा तुझ्या कल्याणांत आहे त्याच्या विचारानें मी तुझी वर्तणूक सुधरावी ह्मणून तुला अलाहाबादेस पाठविला होता. परंतु त्या ठिकाणीं तुला सल्हाण भेटला. हा एक लुच्चा राजद्रोही आणि तुला आडमार्गाला नेणाऱ्या टोळींतील सर्वांत जास्त हानीकारक आहे असें मला कधींच वाटलें नव्हतें. तुझ्या दुष्ट साथीदारांच्या फंदांतून वाचविण्याचा माझा यत्न फुकट गेला, आणि तुह्मी तुमचीं कृत्यें करीत गेला. शेंवटीं अकबराशीं प्रपंच करणें व्यर्थ आहे. राज्याची लगाम बादशहाच्या हातीं आहे. असें तुह्मांला समजलें तेव्हां तुह्मी इकडे तिकडे पळूं लागला आणि माझ्या समोर कैद्याप्रमाणें उभे राहण्याचा तुझास प्रसंग आला. तूं मला असें वर्तन करण्यांस लाविलें त्याबद्दल तसेंच जो हा सर्व बनाव बनला त्याबद्दल दोषास पात्र तूंच आहेस. तूं तुझें स्वतःचे पुष्कळ नुकसान करून घेतलें आहेस, आणि तूं समजूं शकणार नाहीं त्याहूनही पुष्कळ जास्त माझें

मनांत खेद उत्पन्न केला आहेस. बापाला, हातांत शस्त्र घेऊन शत्रूप्रमाणें आपल्या मुलासमोर उभे राहण्याचा प्रसंग येतो त्यावेळेस त्याला जें दु:ख होतें तें तुला जातीअनुभवावांचून कधींही समजणार नाहीं. आणि तशी माझी इच्छाही नाहीं.

मोंगल बादशहा बोलतांना थांबला; परंतु, त्याचा शाप अती तीक्ष्ण, हृदयाच्या अती खोल स्थलांतून निघाला होता. असला दु:खदायक अनुभव सेलीमला आल्यावांचून राहिला नाहीं. त्याच्या वृद्धावस्थेंत एक दिवस असा आला कीं, शहाजहान जो त्याचा अतीप्रिय मुलगा होता; त्यानेंच त्याच्या विरुद्ध बंड केलें. इतकेंच नाहीं परंतु, त्याला कित्येकवेळीं हरविलें. त्यावेळेस त्याला आपल्या बापाच्या शब्दांची आठवण झाली. अकबर बोलतांना थांबल्याबरोबर सेलीमची सद्सद्बुद्धी जागृत झाली. त्याला आपले अपराधांचा पूर्ण पश्चात्ताप झाला आणि त्यानें आपल्या बापाचें पाय घट्ट धरिलें.

कांहींवेळ त्याचें मुखाकडे पहात शेवटीं, अकबर ह्मणाला, ‘ उठून बैस, मी सांगतों तें ऐक. माझ्यामर्जीप्रमाणें तुला शिक्षा करण्याची मला पूर्ण सत्ता आहे. त्या बाबतींत तूं कांहीं बांधा काढूं शकत नाहींस. परंतु, हा वेळ पावेतों तुझी जी निर्भत्सना झाली आहे त्याहून जास्त व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. कारण, तसें केलें असतां माझ्या पश्चात् तूं गादीवर बसशील त्या वेळेंस लोकांनीं तुला जो मान दिला पाहिजे तो ते देणार नाहींत. असें झाल्यानें तुझ्या राज्यकारभारांत व्यत्यय येईल. उघड रीतीनें क्षमा करण्यापेक्षां तुझा गादीचा वारसपणाचा हक्क काढून तुझ्या एकाद्या भावाला माझ्या पश्चात् बादशहा होण्याचें ठरविणें मीं पसंत करितों. परंतु, मीं तसें करणार नाहीं. निरुपायास्तव मला तसें करावें लागेल; तरी त्या बाबतीचा सर्व आधार तुझ्यावर आहे. माझ्या राज्याच्या कल्याणाकरितां माझ्या बरोबर काम करण्याची तुझी इच्छा आहे किंवा त्या गोष्टीकडे तुझें लक्षच नाहीं तें मला स्पष्ट आणि मोकळ्यामनानें सांग. पहिली गोष्ट मी तुला जरी मेहनतीचें काम सांगतों तरी तुला चांगला मान मिळेल. दुसरी गोष्ट जर तुझी खुषी असेल, तर माझ्या दरबारांत रहा आणि

राज्यकारभार चालविण्याची विद्या शीक. दोहोंपैकीं तुला काय पसंत आहे तें तुझ्या मर्जीवर मी ठेवितों. '

सेलीम—माझ्या परमपूज्य बाबा, मला वाटतें कीं उदार मनानें तुह्मी ज्या दोन गोष्टी माझ्यापुढें ठेविल्या त्यापैकीं एकालाही मी लायक नाहीं. माझ्या शेवटच्या कृत्याबद्दल गादीचे वारसपणांतून मला बेवारस केलें तरी त्याबद्दल माझी कांहींच फिर्याद नाहीं. परंतु, जर मी पसंत करण्याचेंच तुह्मी ह्मणत असाल तर पहिली गोष्ट मी खुशीनें पसंत करितों. मला पाहिजे तसें कठीण काम सांगा तें मेहनत घेऊन मी करितों. खरोखर माझ्यावर तुह्मी मोठी मेहेरबानी केली आहे. मला योग्य त्याहून जास्त मान दिला आहे. तुह्मी सकाळपासून संध्याकाळपर्यंत राज्याकरितां मेहनत करीत होता; त्यावेळेस मी आळसांत दिवस घालवीत होतो. ह्या दुःखदायक आळसामुळें राजद्रोही लोकांच्या संगतीला लागलो. सत्ता हातीं आल्यावर कीर्तिपद मिळेल, अशा मोठमोठ्या गप्पा खऱ्या वाटून मी फसलों. आतां तर मला पाहिजे तसें हलकें काम सांगा ह्मणजे माझ्या दुष्ट कृत्याचा मी कांहीं तरी बदला देईन.

अकबर—तूं आपल्या स्वतःचें बाबतींत बरोबर अभिप्राय दिला आहेस. आपले गुणदोष समजून खऱ्या मार्गाला लागण्याची ही सुरवात आहे. मी कबूल करितों कीं, तूं ऐषारामांत विलासवैभव भोगत होतास त्यावेळीं तुला मीं कांहींच काम सांगितलें नाहीं. त्याबद्दल मी स्वतः दोषमुक्त होत नाहीं. परंतु जे होणार होतें तें झालें. त्याचा पुनरोच्चार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. धनवान् आणि फलद्रुप बंगालदेश माझ्या ताब्यांत आल्याला फार मुदत झाली नाहीं. तेथील लोकांना स्थायीक राज्याचे कांहींच फायदे मिळाले नाहींत. तरी तूं तेथें जा आणि माझ्या राज्याचे निमय अमलांत आणण्याचें कामीं मला मदत कर. माझ्या हाताखाली तरी बहुतेक स्वतंत्र राज्यकर्त्याप्रमाणें तूं राज्य करशील. आणि शेंवटी अशी वेळ येईल कीं तुझ्या ताब्यांतील लोकांची प्रीति संपादन करून तसेंच त्यांचेकडून मान मिळवून सलाहशांतीनें साऱ्या हिंदुस्थानचें बादशाही सिंहासनावर बसशील.

नव्या हिंमतीनें नवीन आयुष्याची सुरवात झाली असावी अशा आवेशांत बादशहाजवळून जाण्यापूर्वी त्याच्या हाताचें मानपूर्वक सेलीमनें

चुंबन केलें. त्यावेळेस त्याचे डोळ्यांत आनंदाश्रु भरून आले. बापलेकांची खऱ्या अंतःकरणानें एकी झाली. याउपर कधींही व्यत्यय येणार नाहीं अशी अकबराला आशा होती. परंतु, ती आशा सफल झाली नाहीं. इतिहासाची पृष्ठें स्पष्ट सांगतात कीं, सेलीमच्या अंगीं मनोनिग्रह नव्हता. तो विलासी, स्वच्छंदी, राज्यलोभी आणि युवतीरमणरंगांत मस्त होता.

जसजसे दिवसगत होत चालले तसतसा आग्रा शहरांत पूर्ववत् आनंद सुरू झाला. परंतु अलाहाबादेंत आणि मुख्यत्वेंकरून इरावतीच्या हृदयांत दुःख वाढत चाललें. कारण तेथील नवीन किल्लेदारानें तिच्या बापाच्या मृत्यूची सविस्तर हकीकत तिला कळविली. तसेंच तिच्या मर्जीस वाटेल तोंपर्यंत किल्ल्यांत राहण्याची तिला विनंती केली. सल्हाणानें काय अपराध केल्याबद्दल त्याला शिक्षा मिळाली होती तें तिला माहीत नव्हतें. जरी त्याच्यावर तिचें फारसें प्रेम नव्हतें तरी ती त्याला सन्माननीय समजत होती. इतक्यांत दुसराच बनाव बनला आणि त्यामुळें तिला फारच दुःख झालें. सल्हाणाच्या मृत्यूची खबर मिळाल्यावर थोड्याच दिवसांनीं ब्रह्मर्षी कुल्लुक तेथें आल्याचे तिला समजले. जोखमीच्या मुसाफरींत त्याचा एक निमकहलाल चाकर मात्र त्याच्या बरोबर होता.

कुल्लुक ( इरावतीला पाहून )—आर्ये, तुला एक निरोप सांगण्याचें मी शिरावर घेतलें आहे. तो निरोप तुझ्या तसेंच माझ्या दोघांच्याही बाबतींत फारच शोककारक आहे. तुझ्या चांगली लक्षांत असेल अशी वस्तू मी तुझ्याकडे घेऊन आलों आहे; असें ह्मणून आपल्या कमरपट्ट्यांतून एक अतिसुंदर रुमाल बाहेर काढिला आणि तो इरावतीच्या हातीं दिला. सज्जाखालून सिद्धरामाला जातांना तिनें शेवटचा पाहिला; त्या वेळेस प्रेमाची खूण ह्मणोन तो तिनें वरून टाकिला होता, तोच हा होता.

इरावती ( शोकविव्हल होऊन )—मी सर्व समजलें ! आतां त्याचें कांहीं राहिलें नाहीं. पण ते—

कुल्लुक—समजलों. त्याला मीं सोडिलें त्यावेळेस तो जिवंत होता. परंतु अनिष्ट असेल अशी मला धास्ती आहे. माझ्या शिष्याला आतां मी जिवंत पाहीन अशी मला आशा नाहीं.

इरावती– परंतु काय झालें तें मला सांगाल काय ? पहा मी अगदीं शांत झालें आहे. तुह्मास जें कांहीं सांगणें असेल तें सांगा स्थिरमनानें ऐकण्यास मी तयार आहें.

नंतर सिद्धरामाच्या शेवटच्या लढाई संबंधी जें कांहीं माहीत होतें तें कुल्लुकनें सविस्तर सांगितलें. बादशहानें त्याची खास विनंति कबूल करून त्याला त्याच्या रजपूत सैन्यासह उत्तरेस बंडखोरांवर पाठविलें. ह्या माहितीच्या पर्वतमय प्रदेशांत पुष्कळ लढाया मारून त्यानें चांगलें यश संपादन केलें. त्याचें चांगलें बहाद्दर शिपायीही घाबरत, अशा प्रसंगीं साहसपणा करून त्यानें यशस्वी व्हावें; परंतु शेवटीं बंडखोरांच्या एका टोळीनें तो पर्वतांतील एका घाटांतून चालला असतां त्याचेमधें पडून त्याच्या मुख्य भागापासून त्याला निराळे पाडिले. बराच वेळ एक भयंकर युद्ध चाललें. त्याच्या तरवारीनें शत्रूकडील पुष्कळ मनुष्यें धारातीर्थीं मरण पावलीं, परंतु त्याच्या सर्व शरीरावर पुष्कळ जखमा झाल्याकारणानें तो घोड्यावरून खालीं पडला. त्याचे पुष्कळ स्वार जखमी होऊन क्षत्रीय धर्माप्रमाणें इंद्राच्या अप्सरांना वरण्याकरितां निघून गेले. वत्स जो त्याला सोडून क्षणभरही दूर झाला नव्हता तो व्यर्थ वैर घेण्याचा यत्न करण्याचे सोडून मुद्दाम घोड्यावरून खालीं पडला. आणि मेल्याचें सोंग घेऊन पडून राहिला. कांहीं वेळानें सिद्ध-रामाचें सैन्य येऊन पोहोंचलें आणि त्यानें शत्रूची दाणादाण उडविली. वत्स परत उभा राहिला आणि आपल्या मालकाला जिवंत पाहून खुषी झाला. एक तात्पुरती डोली तयार करून आणि त्यांत त्याला निजवून एका जवळच्या बौद्धमठांत त्यास नेलें. त्यावेळेस मी त्याच मठांत होतो. त्या भल्या मठवासीं लोकांनीं त्यांच्यानें होईल तितकी मेहनत केली. त्यांच्यातील एक वैद्यकी कामांत प्रवीण होता. त्यानें मला खात्रीनें सांगितलें कीं, सिद्धरामाला बरें करण्यांत आमच्यानें होईल तितकी मेहनत आह्मीं करूं. कांहीं वेळानें सिद्धरामाला शुद्धी आली; मला पाहून त्यानें ओळखिलें. तो ह्मणाला ' पूज्य गुरुवर्य, मी तर आतां तुह्मास सोडून जातों. मला वाटतें कीं मी आतां बरा होणार नाहीं. माझें एक काम ह्यावेळेस करा. ' हें ऐकून सिद्धरामाच्या स्थिती-

बद्दल काय अभिप्राय आहे ते समजावें ह्मणून मी त्या मठवासी वैद्याकडे पाहिलें. त्यानें मान हालवून कांहीं आशा दिसत नाहीं असें सुचविलें. जास्त बोलण्याची मेहनत घेऊं नका ह्मणून सिद्धरामाला सांगितलें. परंतु, त्यानें त्याची कांहीं पर्वा केली नाहीं आणि ह्मणाला, "मला बोलल्यावांचून सुटका नाहीं. कुल्लुक गुरुराज, माझ्या त्या तरवारीला बांधलेला रुमाल सोडून घ्या. तुमच्यानें होईल तितकें लवकर जाऊन तो इरावतीला द्या. तिला माझेकडून सांगा कीं, माझा देह सोडण्याचा समय जवळ आला आहे. ह्या वेळेस तूं मला जितकी प्रिय आहेस, तीतकी कधींही नव्हतीस. तुह्मी आतांच जा. माझे मरणाची वाट पाहूं नका. ही खूण तुमच्या हातानें तिला मिळाली आहे अशा खात्रीनें मला प्राण सोडूं द्या." इतकें ह्मणून त्यानें डोळें मिटलें आणि नंतर कांहींच बोलला नाहीं; परंतु तो रुमाल घेऊन तसेच मठवासी आणि वत्सला नीट संभाळण्याबद्दल सांगून मी लागलाच तेथून निघालों.

इरावती—पूज्य महाशय, आह्मा दोघांबद्दल तुह्मी येवढी काळजी घेऊन जें काम केलें त्याबद्दल मी फारच आभारी आहें. परंतु सिद्धराम त्यावेळीं जिवंत होता कीं नाहीं ? तुह्मी त्याला सोडिले त्यावेळेस त्यानें देह सोडिला नव्हताना ? तर मग आतां काय केलें पाहिजे तें मला समजलें.

कुल्लुक—केलें पाहिजे ! तुह्मी काय करणार ?

इरावती ( शांतपणानें )—तुमच्या बरोबर मी सिद्धरामाजवळ येईन.

कुल्लुक ( आश्चर्यानें )— तुह्मी, 'एक निराश्रित अबला स्त्री' बंडखोर आणि लुटारू लोकांनीं व्यापलेल्या पर्वत आणि जंगलांतून जाण्याचा यत्न करणार काय ?

इरावती— सिद्धरामाचे मर्जीस्तव तुह्मी असल्या भीतीची पर्वा केली नाहीं. तर मी कां ह्मणून करावी ? मी हरकत करणारी होईन असें समजूं नका. मी निर्बल स्त्री नाहीं. पर्वत आणि जंगल मीं पाहिलें आहे. मी येणार नाहीं असें कालत्रयींही होणार नाहीं. ( कुल्लुक ना ह्मणणार होता असें पाहून इरावती पुन्हा बोलूं लागली ) माझा निश्चय फिरविण्याचा व्यर्थ यत्न करूं नका. मला सोडून गेलात तर, एकादा चाकर बरोबर

घेऊन मी मुसाफरी करीन. मी फार घाईनें विचार केला आहे ह्मणून माझा निश्चय ढळेल असें तुह्मांस वाटतें काय ? हल्लीं झालेला प्रकार कधीं तरी होईल असें कित्येक वेळीं वाटलेंच होतें. मी माझी स्वतःची कित्येक वेळां दमयंतीबरोबर तुलना केली होती. तसेंच तिचा दाखला घेऊन त्याप्रमाणें वागण्याचा मीं निश्चय केला आहे. ? दमयंतीच्या आत्मभोगापुढें माझा आत्मभोग काय हिशोबांत आहे ? एकटी जवळ कोणीही नाहीं अशा स्थितींत ती आपल्या कृतघ्न पतीला सर्व वनांत शोधीत भटकत होती. मी तर हो ह्मणत असल्यास तुमच्यासारखे हिंमतवान् पुरुषांबरोबर त्यांच्या भेटीसाठीं जाऊं इच्छिते. जिकडे ते असतील तिकडे मीही त्यांचेकडे जाईन.

कुल्लुक— त्याच्या रक्षणाची सर्वस्वी जोखीम परमेश्वराकडे आहे. माझे हात वृद्धावस्थेमुळें अशक्त झाले असले तरी तरवार वापरण्याची त्यांत पाहिजे तितकी शक्ती आहे. तुमचा निश्चय प्रशंसनीय आहे. त्याबद्दल तुह्मास शाबास आहे. आतां मुसाफरी करण्यास तयार व्हा. मीही फिरून तुमच्या बरोबर मुसाफरी करण्यास तयार आहे.

लागलाच इरावतीनें आपल्या दासीला मुसाफरी करण्याकरितां योग्य ती तयारी करण्याचा हुकूम केला. मुसाफरीचें कारण थोडक्यांत तिला समजावून सांगितलें. निमकहलाल निपूणिका सर्व हकीकत ऐकून फारच घाबरली. आपल्या अतीप्रिय मालकिणीला असलें साहस न करण्याबद्दल सांगूं लागली. परंतु इरावतीनें तिला गप्प राहण्यास सांगितलें.

निपूणिका— तर मला कृपा करून तुमच्याबरोबर येऊं द्या.

इरावती—नाहीं. तसें होणार नाहीं. एक स्त्रीचें रक्षण करणें कुल्लुक आणि त्यांच्या चाकराला पुरें आहे. माझी व्यवस्था जी हल्लीं गुप्त ठेविली पाहिजे त्याबद्दल मीं तुला सांगितलें आहे. त्याचें मुख्य कारण इतकेंच कीं, कदाचित् मी परत न आलें तर मीं कोठें गेलें आहे आणि काश्मीरांत काय करितें त्याची एकाला तरी माहिती असली पाहिजे.

निपूणिका—बरोबर मनुष्यें देण्याचें किल्लेदाराला सांगू नको काय ?

इरावती—नको, थोडी सशस्त्र मनुष्यें बरोबर असली तर दुसऱ्यास संशय आल्यावांचून राहणार नाहीं. किल्लेदाराजवळ हल्लीं आमच्याबरो-

बर पाठविण्याला चांगल्या शूर शिपायांची टोळी नाहीं. आह्मी एकटेच असल्यानें सुखरूप पोहोंचण्याचा जास्त संभव आहे.

कुल्लुकचा घोडा इतका थकला होता कीं, दुसऱ्या दिवसापर्यंत त्याला विश्रांती दिल्यावांचून सुटका नव्हती. हा एक दिवस इरावतीला फारच मोठा आणि कंटाळवाणा वाटला. तिच्या मनांत एकच गोष्ट घोळत होती आणि ती त्याचाच विचार करीत बसली होती. इतक्यांत कांहीं पादलांचा आवाज ऐकून ती दचकली आणि त्रासून कोण आहे ह्मणून पहातें तों, जो मनुष्य भेटण्याचा अगदींच संभव नव्हता त्याला आपल्या समोर पाहिलें. हा मनुष्य राजपुत्र सेलीम होता.

इरावती एकदम ह्मणाली, ‘ तुह्मी इकडे आलांत, बरें या. ’

सेलीम—मी बंगाल्याकडे जाण्यास निघालों आहे. तुमच्यासारख्या सूज्ञ सद्गुणी स्त्रीनें जो मूर्खपणाचा आणि अयोग्य विचार केला आहे त्याचा प्रतिबंध करण्याकरितां सुयोगानें मी येथें येऊन पोहोंचलों आहे. तुमच्यावर पूर्ण प्रेम असल्याकारणानें तुमच्या दासीनें तुमची आज्ञा उल्लंघन केलीं आहे. मला तुह्मांस समजावण्यास सांगितलें आहे आणि मीही त्या बाबतींत तिला वचन दिलें आहे.

‘ मी नम्रपणें विनंती करितें कीं, आपण ह्या बाबतींत कांहींच तसदी घेऊं नका. मी कांहीं आतां लहान नाहीं. माझें बरें वाईट मला समजतें. पाहिजे तसें असलें तरी माझ्यावर उपरीपणा ठेवण्याचें तुमचें काम नाहीं. ’

‘ परंतु, तुमच्या कल्याणाकरितां मी तसें करीन. तसेंच अगदीं मोकळ्या मनानें सांगतों कीं, त्याला दुसरेंहीं एक कारण आहे. मी ज्याचा तिरस्कार करीत आहे असा माझा एक प्रतिपक्षी, जो तुमच्याशींही बेइमान-झाला आहे, त्याच्याचकडे तुह्मी जातां हें माझ्यानें सहन होणार नाहीं. माझा तिरस्कार करून असल्या मनुष्यावर प्रेम दाखवितां हें मला क्षणभरही सहन होणार नाहीं; तेवढ्याचकरितां माझ्या सत्तेचा मी उपयोग करीन आणि तुह्मास मर्जीविरुद्ध येथेंच ठेऊन घेईन. ’

इरावती (अतीशय रागानें)—तुह्मी तसें कराल खरें, परंतु, तुह्मी तसें करणारच नाहीं. असला नामर्दपणाचा उपाय योजण्यांत तुमचा कांहींच फायदा

होणार नाहीं. उलट नुकसान मात्र होईल. माझें मन तुह्मी कधींही वश करूं शकणार नाहीं. मी तुमची झालेली नाहीं आणि होणारही नाहीं. अशानें सिद्धरामाचा मृत्यु क्षणभरही लवकर होणार नाहीं. परंतु, तुमच्या असल्या अधम कृत्यापायीं, तुमचा जो मी अद्याप मान ठेवितें त्याबद्दल तिरस्कार करीन. असें व्हावें अशी तुमची मर्जी आहे काय ? अशानें तुह्मी माझ्या तिरस्कारास पात्र व्हाल इतकेंच नाहीं; परंतु तुह्मी तुमचा स्वतःचाही तिरस्कार कराल. आपल्या मनावर अम्मल न चालवूं शकणाऱ्या एकाद्या निर्बल स्त्रीप्रमाणें तुह्मी आपल्या अविचारी मनोवृत्तीला आधीन होता काय ? किंवा ज्याला आपल्या स्वतःवर कशारीतीनें अंकुश ठेवावा हें माहीत असल्या कारणानें जो दुसऱ्यावर राज्यकरण्यासही लायक आहे असें सिद्ध होतें. त्या जवानमर्दाप्रमाणें वागण्याची तुमची इच्छा आहे ना ? ह्या दोहोंतून तुह्मास वाटेल ती गोष्ट पसंत करा. माझ्यावर मेहेरबानी करा ह्मणून कांहीं माझें सांगणें नाहीं. परंतु, जर तुह्मी तुमच्या स्वतःवर अंकुश ठेवूं शकत नाहीं, तर लाखो आणि कोट्यावधी प्रजाजनांवर कशारीतीनें राज्य कराल ?

हें वाक्य ऐकून सेलीमचें अंतःकरणांत कर्तव्य आणि विषयवासनेचे तसेंच प्रतिष्ठा आणि स्वच्छंदीपणाचें एकमेकांविरुद्ध विचार उत्पन्न झाले. ज्या स्त्रीचें मन हरण करण्याचे व्यर्थ प्रयास केले होते तिला आपल्या हाडवैरी प्रतिपक्षा कडे जाऊं देणें सेलीमला फारच कठीण वाटलें. तसेंच इरावतीचें म्हणणेंही त्याला वाजवी वाटलें. आमच्या सत्तेचा कांहीं फायदा तर होणार नाहींच, परंतु तिच्या मनांत जो आदरभाव आहे तो जाऊन तिरस्कार मात्र उत्पन्न होईल, असेंही त्याला वाटलें. इरावतीचें शेवटचे शब्द त्याला वज्रबाणा-प्रमाणें वाटले. कारण त्याच्या बापानें उदार मनानें बोधरूपी जे शब्द त्याला सांगितलें होते ते आणि इरावतीचे शब्द अक्षरशहः एक होते. ते ऐकून त्याची मनोवृत्ति जागृत झाली. त्याचे अंगावर रोमांच उभे राहिले. परंतु ह्यावेळे पूर्वीं त्यानें कधींही गंभीरपणानें विचार केला नव्हता. दुर्वर्तन सोडून सन्मार्गानें वागण्याचें त्यानें अकबराला वचन दिलें होतें.

सेलीम ( दीर्घश्वास सोडून )—हे भुवन सुंदरी, इरावती ! पूर्वीप्रमाणें आतांही मी तुझ्या इच्छेला शरण आहें. त्यापासून मला पुष्कळ दुःख होतें; परंतु, असो. मी तुझी आज्ञा मान्य करितों. अफसोस ! मी पूर्वी तुला ह्मणालों होतो त्याप्रमाणें तुझी आणि माझी प्रथमच भेट झाली असती तर किती चांगलें झालें असतें ? तूं मला अगदींच निराळा मनुष्य बनविले असतेस. परंतु ती वेळ आतां गेली. अनिवार प्रसंगाला पाठ देण्याचा मी यत्न करितों, तरी तूं जा. जरी तुझा निश्चय मी उद्धटपणाचा समजतों तरी त्यांत खरें धैर्य आणि कुलीनता व्यक्त होत आहे हे मी कबूल करितों. तूं जाऊन पोहोंचेंपर्यंत सिद्धराम जिवंत असणें असंभवनीय नाहीं. माझी खात्री आहे कीं, तुझी परत एक व्हाल आणि तूं दिलेलें वचन खरें करशील. ह्यापासून मला ईर्षा उत्पन्न होईल; परंतु जो तुला अति प्रिय आहे त्याच्यावर किंवा तुझ्यावर वैर घेणार नाहीं. बेवकूब आणि स्वार्थी सेलीमनें आपलें मन वश ठेविलें आहे. हिंदुस्थानचा भावी बादशहा आपल्या इंद्रियांवर अंकुश ठेवीत आहे, असें तुझ्या ऐकण्यांत येईल. कधींकाळीं तुह्मास किंवा सिद्धरामास माझ्या रक्षणाची जरूर पडल्यास मला सूचना द्या आणि मी वचन देतों कीं, कोणत्याही प्रकारची मदत करण्यास मी चुकणार नाहीं. कदाचित् आपली फिरून भेट होणार नाहीं, तरी माझ्यावरचा स्नेहभाव कमी करूं नको. अतिप्रेमामुळें माझ्या हातून अपराध झाला आहे, तरी त्याबद्दल रागावूं नको.

उत्तर ऐकण्यास सेलीम उभा राहिला नाहीं. परंतु मंद पावलें टाकीत तेथून चालतां झाला.

" माझ्या पूज्य बाबा " तो जातां जातां ह्मणाला " कांहीं नाहीं तरी एकवेळ तुमच्या मुलाबद्दल संतोष मानण्याचें तुह्मास कारण मिळालें आहे. "

# खंड १७ वें.

## अनुभवी सलाह.

पर्वतांतील एका बौद्धमठांत सिद्धराम खाटेवर पडला होता. इरावती त्याचेजवळ बसून त्याची शुश्रूषा करीत होती. कितीएक दिवसांची भीतियुक्त मुसाफरी करून शेवटीं ती तेथें जाऊन पोहोंचली. त्यावेळेस सिद्धराम जिवंत होता. तें पाहून तिला फारच आनंद झाला. सिद्धरामास निजविलें होतें तेथें इरावतीस नेण्यांत आलें. वैद्याचें तोंडून त्याच्या प्रकृतीचें मान ऐकून तिला फारच वाईट वाटलें.

इरावती जवळ बसून रात्रंदिवस सिद्धरामाची शुश्रूषा करीत होती. बऱ्याच दिवसांनीं त्याची प्रकृती सुधारत चालली आणि त्याची जगण्याची आशा उत्पन्न झाली. अजारी मनुष्याची शुश्रूषा करणें असल्यास तुह्मांला चांगली विश्रांति घेतली पाहिजे, म्हणून इरावतीस कुल्लुक आणि बौद्ध साधूंनीं सांगितलें. परंतु, तिनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. मठांतील एका लहान देवळांत होणारा घंटानाद ऐकून इरावती केव्हां केव्हां तेथें दर्शनास जाई. ह्या बौद्ध लोकांचें आचरण फारच प्रशंसनीय असें. जरी दुनीयादारीच्या खटपटींत ते मिसळत नव्हते तरी आपला वेळ व्यर्थ घालवीत नव्हते. आजूबाजूचें डोंगरांत फिरून गरीब लोकांस चांगली मदत करीत आणि त्या प्रसंगीं धर्म किंवा जातीसंबंधीं भिन्नभाव ठेवीत नसत.

एके दिवशीं संध्याकाळीं इरावती सिद्धरामाचे बिछान्याजवळ बसली होती, आणि वैद्य समोर बसला होता. त्या वेळेस सिद्धरामानें हळूच डोळे उघडले, आजूबाजूला पाहिलें, इरावतीला ओळखिलें आणि 'इरावती!' इतके शब्द बोलून परत डोळे मिटले. इरावतीला तेथून दुसरीकडे जाण्याची वैद्यानें खूण केली. जरी मर्जीउपरांत ती तेथून गेली, तरी मनांत फारच खुष झाली आणि ती आनंदाची बातमी कुल्लुकला सांगण्याकरितां गेली. दुसरे दिवसापासून सिद्धरामाची प्रकृती सुधारत चालली. हळू हळू त्याच्या अंगांत शक्ती येत चालली. कुल्लुक आणि इरावतीला तो ओळखूं लागला; परंतु, मागच्या गोष्टीचें त्याला कांहींच भान नव्हतें.

एके दिवशीं सिद्धराम इरावतीबरोबर मठाचे जवळपास फिरत होता. इतक्यांत तेथील कांहीं वस्तु पाहून किंवा इरावतीच्या कांहीं शब्दावरून ( दोहोंतून कशानें ते इरावतीला कांहींच समजलें नाहीं. ) त्याला मागील सर्व गोष्टीचें भान आलें. त्याची स्मरणशक्ती जागृत झाली. एकदम तो थांबला, इकडे तिकडे आश्चर्यानें तो पाहूं लागला, तोंडावरून हात फिरविला आणि मान हालवून पुढें चालूं लागला. परत थांबला, आकाशाकडे, उंच पर्वतशिखरांकडे आणि आजूबाजूला जंगलाकडे नजर फेंकली. एकाएकीं त्याचें भान उतरलें आणि घाबरून त्यानें इरावतीकडे पाहिलें. ह्यावेळीं त्याची स्मरणशक्ती पूर्ण जागृत झाली.

'जा, जा!' शेवटीं तो ह्मणाला 'हे कमनशीब युवती! तूं येथें माझ्याबरोबर काय करीत आहेस? मी तुझ्याजवळ आलेलों तुला कसें सहन होतें? मी एक निमकहराम, विश्वासघातकी, महापातकी असा झालों आहे. माझ्यासारख्या भयंकर शापित मनुष्याचा सहवास तूं कां करीत आहेस?'

हे शब्द ऐकून इरावती घाबरली. बोलण्याचा तिनें यत्न केला; परंतु, एकही शब्द तिच्या तोंडून बाहेर निघेना, आणि शोकाग्रस्त होऊन तिनें सिद्धरामाचे पाय घट्ट धरिलें.

सिद्धराम ( घाबरून )–तो शाप. 'फैजीचा शाप कीं तूं जीं कृत्यें केलीं आहेस त्याची मरेपर्यंत आठवण ठेव. तुझ्या मनांतील मनोरथ सफल झालें तरी अब्रूदार मनुष्यापुढें लाजून तुला खालीं पहावें लागेल.' तरी

तुझ्या सारखी पवित्र आणि निर्दोष कुलीन कुमारिका कीं, जिला मी माझ्या कुलीन मित्राप्रमाणेंच अती अधर्मरीतीनें दगा दिला आहे. तुझ्या पुढें उभे राहण्याची कशी हिंमत करूं ? मी सांगतों कीं तूं जा, माझ्या-पासून दूर रहा. माझ्यांत आणि तुझ्यांत अंतर पाडणार एक पुरुष आहे आणि तो फैजी आहे. मला केलेली शिक्षा तो ऐकवीत होता, त्या वेळेप्रमाणेंच धमकी देत असावा असा तो याक्षणीं प्रत्यक्ष उभा आहे असें मी पाहतों.

इरावतीनें वर पाहिलें. तिच्याकडे पाहण्याची सिद्धरामाची हिंमत होत नसावी, अशा रीतीनें त्यानें हातानें आपलें तोंड झांकिलें. इरावती ह्मणाली, " चला, चला आपण आंत जाऊं. तुह्मांस वातप्रकोप झाला आहे आणि त्यामुळें तुमचे मनांत खोटच्या कल्पना येऊन तुह्मास त्रास होत आहे. चला आतां. "

सिद्धराम ( आवेशानें )--कल्पना ! हे कल्याणी ! माझी अशी इच्छा आहे कीं, त्या कल्पना होवोत ! परंतु तें तसें नाहीं. मी परत शुद्धींत आलों आहे. माझ्यांत शक्तीही आली आहे, त्या बरोबर सर्व वस्तूंचें स्मरणही झालें आहे. तें स्मरण जरी त्रासदायक तरी खरें आहे. फैजीच्या शब्दाचा खरा भावार्थ हा वेळपावेतों मला समजला नव्हता. त्याचें मला इतकें कांहीं वाटतही नव्हते. बादशहा-पुढें तसेंच माझ्या शिपाई लोकांपुढें मी लाजून खालीं पाहिलें, परंतु हल्लीं इतकें मला कधींच वाईट वाटलें नव्हते. आंत राहून मी मरण्याचा व्यर्थ यत्न केला. इरावती, तुला माहीत नाहीं काय कीं, तूं कोणासमोर उभी आहेस ? माझे शेवटचे अपराध तुला माहीत नाहींत कीं काय ?

इरावती– मला माहीत आहे. जरी फैजीची आणि तुमची काय बोला-चाली झाली ती मला माहीत नाहीं, तरी जे शब्द तुह्मी उच्चारिलें त्यावरून जरूर तेवढें मला समजलें.

सिद्धराम– इतकें असून तूं माझ्याशीं बोलत आहेस ? हें सुचिस्मिते ! तूं माझ्यापासून दूर होत नाहींस काय ? तूं माझ्या शेवटच्या प्रसंगांत माझी सेवा करण्यास आली आहेस काय ?

इरावती– सिद्धराम, मी तुह्मांस वचन दिलें नाहीं कीं काय ? आणि

तें वचन तुम्हीं स्वतः मला परत दिलें नाहीं तोंपर्यंत तें पाळण्याला मी बांधली गेलें नाहीं काय ? परंतु शेवटच्या वेळेसही तुम्ही माझ्याबद्दलच विचार करीत होता; असें सुचविणारी खूण कुलगुरुराजबरोबर पाठविली नाहीं काय ? आणि मला असें वाटतें कीं, फक्त लग्नाच्या पवित्र गाठी खेरीज करून सर्वप्रकारें आपण एकमेकांशीं बांधलें गेलों आहोंत.

सिद्धराम– तुला दिलेल्या वचनांतून आतां मी तुला मुक्त करीत आहें. गोष्ट खरी आहे कीं, अतीं दुःखकारक अज्ञानरूपीं मोहजाल माझ्या पुढून दूर झाले आहे. मला परत शुद्धी आली आहे. ह्यापूर्वीं कधींही न अनुभवलेली अशी प्रीति तुझे बाबतींत परत माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे. तूं एकवचनी आणि इमानदार राहून सर्व कर्तव्यकर्में बजावशील खरी; परंतु माझें बाबतींत आतां तुझ्या मनांत प्रेम कायम राहणार नाहीं.

इरावती– हमेशा तुमच्यावर माझें जितकें प्रेम होतें, तितकेंच आणि तसेंच प्रेम हल्लींही तुमच्यावर आहे. हे खरोखर खात्रीनें समजा.

सिद्धराम– प्रतिष्ठा आाणि अब्रूस्तव तूं तुझ्या मनाला समजाविण्याचा यत्न करीत आहेस कीं, माझ्यावर तुझें पाहिजे तितकें प्रेम आहे. परंतु, तसें असण्याचा संभव नाहीं. एक दिवस असा येईल कीं, तूं तुझ्या स्वतःच्या मनाला ओळखिलें नाहींस त्याबद्दल तुला पश्चात्ताप होईल. जो सन्माननीय नाहीं त्याच्यावर प्रेमही बसणार नाहीं. स्त्रीला पुरुष सन्माननीय असलाच पाहिजे. जर पुरुष स्त्रीहून निर्बल किंवा मंदबुद्धी असेल तर ते दंपत्य कधींही सुखी होणार नाहीं. तेवढ्याच करितां तूं जा आणि मला अगदींच विसर. माझे नांवाचीही आठवण करूं नको; कारण, माझी तितकी योग्यता नाहीं.

इरावती— हे मानद ! मला तुम्ही दूर करितां कीं काय ?

सिद्धराम— तुला दूर करण्याची किंवा तुला दिलेल्या वचनांतून मुक्त करण्याची मला सत्ता नाहीं. तुला आराम व्हावा येवढ्याचकरितां, तसेंच ह्याउपर माझा, तुझ्या खुशीनें तूं त्याग करशील त्यावेळेस जो दोष तुझ्या शिरावर येईल, त्यापासून तुला दूर ठेवण्याकरितांच मी ह्याप्रमाणें करीत आहें.

इरावती ( फारच नम्रतेनें आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून )—

तुह्मी ह्मणतां त्याबाबतींत मी तक्रार करीत नाहीं. हक्क म्हणून तुमच्या-जवळ कांहीं वस्तु मागण्याची माझी इच्छा नाहीं. माझ्या मनांत जी कांहीं इच्छा आहे ती फक्त तुह्मी ऐकावी अशी माझी विनंती आहे. भविष्यांतील हे कंथ ! मी तुमच्याजवळ वचन मागत नाहीं. त्या बाबतींत मी तुह्मांस अगदीं स्वतंत्र ठेवितें. जरी थोड्या दिवसांकरितां असले तरी हल्लीं मला तुमचेजवळ राहूं द्या. तुमचेपासून हल्लीं तर मी दूर होऊं शकत नाही.

सिद्धराम—हल्लींही नाहीं, तसेंच कधींही नाहीं. होय नाहीं, आणि नाहीं नाहीं; तसेंच अवश्यकताही नाहीं. तूं मला प्रथमची आणि शेवटची सोडून जा, तसेंच मला विसर.

इतकें बोलून, इरावती जी त्याचे बाजूला चालत होती, तिला धक्का मारिला आणि जी स्त्री ह्या क्षणांपूर्वी सिद्धरामास अतीप्रिय वाटत होती, तिला फिरून न पाहण्याचे हेतूनें तेथून जाऊं लागला.

इरावती परत उठून उभी राहिली आणि शोकविव्हल झाली असतां दृढतेनें ह्मणाली, ' बेशक, तसें होऊं द्या. कदाचित् तुमचें ह्मणणें योग्य असेल. माझ्या प्रीतीला तुह्मी स्वतःच अयोग्य ह्मणून घेतां. एकदां तुह्मी मला वचन दिलें असून तुह्मीच वचनभंग करीत आहांत. परंतु, मी ती गोष्ट विसरून तुह्मास क्षमा केली. कारण मला समजलें कीं, अनिवार मोहजालांत तुह्मी फसला होता. परंतु, हल्लीं तर जिनें कांहींच अपराध किंवा असत्याचरण केलें नाहीं, अशा दक्षा आणि अनुव्रता विवाहितेचा त्याग करणें योग्य समजतां, आणि तोही तिच्या अपराधास्तव नाहीं; परंतु, एक वेळीं निर्बल मनाचें होऊन मोहजालांत फसला होता, त्यांतून निघण्यास शक्तिमान् नव्हता आणि त्यामुळें तुमचा गर्व चालत नाहीं ह्मणून, तुह्मीं माझा त्याग करितां, तरी खुशाल तुह्मी मला सोडून जा. तुमच्यावांचून माझें जिवीत व्यर्थ आहे. मर्जीउपरांत कोणीही स्त्री दुसऱ्याचें प्रेम संपादन करूं शकत नाहीं. तो पुरुष तिच्यावर खऱ्या अंतःकरणानें प्रेम करीत असला तरी काय झालें ? हल्लीं एक मित्राशीं केलेल्या अपराधाचें स्मरणांत, एक स्त्री जिच्यावर तुमचें प्रेम होतें; परंतु, तुमच्याच अपस्वार्थी गर्वीष्ठपणामुळें तिला तुह्मी दूर करून जिच्या

जन्माचें मातेरें करितां तिचेंही स्मरण मिळवा.' ह्याप्रमाणें तीव्र शोकानें पीडित आणि क्रोधानें प्रदीप्त होऊन ती बोलली.

सिद्धराम हें ऐकून थांबला. त्यानें तेथून जावें किंवा उभे रहावें, उभे राहण्याची त्याची मर्जी खरी; परंतु, प्रतिष्ठेबद्दल मनांत विचार येऊन तो तसें करूं शकला नाहीं. ह्या बाबतीचें निराकरण कोण करील ? कपाळावर हात मारून सिद्धराम म्हणाला, 'तूं ह्मणतेस त्यांत सत्य आहे खरें, परंतु, मी जें वाजवी समजतों त्याचा विचार केला असतां त्यांत विरोध येतो; तरी एक दुसराच मनुष्य जो आपणा दोघांहून फारच शहाणा आहे, तो आपल्या दोघांच्या तक्रारीचा निकाल करील.'

इरावती—सर्वगुणसंपन्न कुल्लुक जवळ न्याय करण्याची तुमची इच्छा आहे काय ?

सिद्धराम— नाहीं, त्यांचे जवळ नाहीं. त्यांचे विचार फारच उमद्या प्रतीचे आहेत; त्याबद्दल माझी खात्री आहे. आपण सुखी होऊं असाच तें यत्न करतील, हे मला पूर्ण माहीत आहे. तेवढ्याच करितां तुझें म्हणणें योग्य आहे असा ते न्याय करितील. ह्यावेळीं त्यांचे न्यायांत पक्षपात होईल. माझी दुसऱ्याच एका मनुष्याला विचारण्याची इच्छा आहे. परंतु, त्याबद्दल तूं मला कांहींएक विचारूं नको. आपल्या तक्रारीचा खरा न्याय तोच करील अशी मला पूर्ण खात्री आहे. तरी हे सुमध्यमे इरावती, मला आतां लवकर जाऊं दे. कदाचित् थोड्या वेळांत मी परत येईन किंवा येणारही नाहीं. परत आलों तर तुझ्याशीं एकनिष्ठेनें वागेन; नाहींतर मी तुला फिरून कधींही भेटणार नाहीं. मी तुला सर्व बंधनांतून मुक्त केलें आहे. त्याबद्दल कांहीं संशय घेण्याची जरूर नाहीं. हा वेळपर्यंत माझें बाबतींत जसें धैर्य धारण केलें; तसाच थोडा वेळ धीर धर. ईश्वरी इच्छेनें सर्व कांहीं चांगलेंच होईल.

इरावती कांहीं उत्तर देणार इतक्यांत सिद्धराम आपल्या चाकराला पाहण्याकरितां चालता झाला. चाकराला भेटून मुसाफरी करितां घोडा तयार करण्याचें त्याला सांगितलें. तो कोठें जात आहे हें इरावतीस कांहीं समजलें नाहीं.

विस्मित होऊन इरावती शोक करीत कुल्लुककडे गेली आणि त्यास

सर्व हकीकत सांगितली. सिद्धरामास त्याचे मर्जीप्रमाणें वागूं देणें ह्यावेळेस कुल्लुकला योग्य वाटलें; तो लवकरच परत येईल असा इरावतीस त्यानें धीर दिला. ह्या सुमारास मठांत फारच उत्तम बरदास्त राहिली, त्याबद्दल मुख्य मठवासीला हाक मारून त्याला चांगलें इनाम देऊन, सिद्धरामानें त्याची रजा घेतली. ताबडतोब घोड्यावर स्वार होऊन तसेंच चाकरास बरोबर घेऊन तेथून चालता झाला.

सूर्यास्ताचे सुमारास सिद्धराम आणि वत्स फिरून एकदां गुरुपादच्या पर्णकुटीजवळ येऊन पोहोंचले. गुरुपादचा नोकर पर्णकुटीबाहेर उभा होता त्यानें सिद्धरामास ओळखिलें आणि सन्मानपूर्वक आपल्या स्वामीकडे घेऊन गेला.

त्या वृद्धतपस्व्यानें आपल्या तरूण मित्राचें मोठ्या खुषीनें आदरातिथ्य केलें. परंतु, सिद्धरामाचें चेहऱ्यावर पूर्वीची आनंद आणि आवेशाची चिन्हें कांहींच दिसत नव्हतीं. तो फिकट आणि दिलगीर दिसत होता. पूर्वीचा उत्साह अगदींच नाहींसा झाला होता. गुरुपादच्या तीक्ष्ण दृष्टीनें लागलेंच अनुमान केलें कीं, मनुष्याचे मनावर जबरदस्त असर करणारी जी आत्मनिंदा तिच्यामुळेंच हा फेरफार झाला आहे.

'अती पूज्य' प्रथम विनयानें अभिवंदन करून सिद्धराम ह्मणाला, अथवा असें ह्मणूं या कीं, कृपाळू महाराज—'

'नाहीं, तसें नाहीं;' त्या तपस्व्यानें त्याला बोलतांना थांबविलें. 'मला गुरुपाद नांवानेंच हाका मार. कारण, मी त्याहून कांहीं निराळ्या स्थितींत नाहीं.'

सिद्धराम—तुमचें म्हणणें मला शिरसावंद्य आहे. मला तुम्ही विसरला नाहीं हें पाहून मी फार खुष झालों आहे. प्रथम आपल्या भेटीला आलों होतों त्या वेळेस दिलेल्या वचनाची आठवण असेलच.

गुरुपाद—तुझ्या आयुष्याच्या व्यवहारांत खऱ्या मित्राच्या मसलतीची जरूर पडल्यास माझ्याजवळ ये, म्हणून मी वचन दिलें आहे. ह्यावेळेस तशाच कांहीं कारणानें तूं आला आहेस हें मी समजलों. तुझ्या चेहऱ्यावरून तुझ्या येण्याचें कारण फारच दुःखदायक असलें पाहिजे.

सिद्धराम—तुमचें म्हणणें खरें आहे. सर्व हकीकत ऐकून तुम्हांस

आश्चर्य वाटेल. माझें मानसिक दु:ख माझ्या चेहऱ्यावरून पूर्ण व्यक्त होत नाहीं.

गुरुपाद--चल ! आपण पर्णकुटीच्या तिकडच्या बाजूला जाऊन बसूं, आणि जी जी हकीकत घडली असेल ती सर्व मला शांतपणें सांग.

सिद्धरामानें त्याप्रमाणें कबूल केलें. तपस्व्याच्या आग्रहास्तव थोडा फराळ करून, प्राप्त यौवनाकृशांगी इरावतीला मठांत सोडून आला तोपर्यंतची सर्व हकीकत सविस्तरपणें तो सांगूं लागला.

गुरुपाद ही सर्व हकीकत पूर्ण लक्ष देऊन ऐकत होते. ती सर्व हकीकत संपल्यावर ते कांहींवेळ विचार करीत स्तब्ध राहिले. परंतु, शेवटीं सिद्धरामास म्हणाले, " खरोखर तूं आपल्या स्वतःच्या शिरावर एक मोठा बोजा ओढून घेतला आहेस, तरी तो एकाद्या मनुष्याला सहन न होण्यासारखा कांहीं नाहीं. गुलाबदानच्या मोहांत तूं फसलास तें जरी क्षमा करण्यासारखे असले तरी त्यांतून तुझा बचाव होण्यासारखा नाहीं. ती कोण आहे हें तुला समजलें असून तूं तिचा त्याग केला नाहींस. हा मित्र फैजीचा महान अपराध केला आहेस. कीं, ज्याबद्दल तुला कधींही क्षमा मिळूं शकत नाहीं. बादशहाशीं तूं कृतघ्न झालास हा कांहीं अंशी तुझ्या चुकीचा परिणाम होता. परंतु, त्याच्या चाकरीत राहून त्याच्याशीं कपट करणें हा महान अपराध आहे. तुझें आचरण मी सौम्य रीतीनें नाहीं परंतु, सक्त रीतीनें तपाशीत आहे. तुला वाटत असेल कीं, बादशहाजवळ जाऊन अपराध कबूल केल्यानें तूं दोषमुक्त झालास; परंतु, ती तुझी समजूत चुकीची आहे. तुझ्याप्रमाणेंच कितीएकांची समजूत असते कीं, पश्चाताप करणें हा सद्गुण आहे. प्रायश्चित् आणि आत्मसंयमनानें पाप निवारण होतें. परंतु, ज्या मंडळींत राहून जीं कांहीं उपयोगीं कृत्यें तुझ्या हातून व्हावयाचीं तीं तुझ्या ह्या अनुतापानें बंद पडून जी कांहीं हानी होईल ती कांहीं सामान्य नाहीं. रणसंग्रामांत तुझ्या पतित जीविताचा अंत होण्याचा तूं यत्न केलास, त्यापासून तुला काय फायदा झाला असतां ? प्रतिष्ठितपणें मृत्यू येत नाहीं तेव्हां वनांत एकांतवासांत राहून तपश्चर्येंत बाकीचें आयुष्य घालविण्याचा विचार आहे. परंतु, तो कां म्हणून ? असें केल्यानें तुझें स्वतःचें किंवा दुसऱ्याचें काय

काम सरेल? आणि मग इरावती, तुझी वधु, तिच्या बाबबींत कसें काय ? तिला तूं सोडूं इच्छितोस त्याचें कारण, ती निमकहराम झाली नाहीं ह्मणून, कीं तुझ्या स्वतःच्या दुराचरणाबद्दल तुला तिच्या समोर लाज वाटते ह्मणून. अशानें तुला स्वतःला शिक्षा करण्याचे सोडून विनाकारण तिला शिक्षा करीत आहेस, आणि त्याला तूं कर्तव्य आणि सद्गुण ह्मणतोस काय ? नाहीं ! माझे मित्रा अशानें तुझें अपराध द्विगुणीत होतील. माझें सांगणें तुला आश्चर्यकारक वाटेल. इरावतीचें ह्मणणें योग्य आहे. ज्या स्त्रीला तुझी सर्व छिद्रें माहित असून जीचें आचरण अगदीं दोषास्पद नाहीं, तिला जर तूं पत्निप्रेमानें स्वीकारीत नाहींस तर हा तुझा केवढा गर्विष्ठपणा बरें ? तुझी पूर्वींची अधमकृत्यें ज्याला माहीत आहेत किंवा तुझ्या गुप्त गोष्टी ज्याला माहीत आहेत, त्याच्या नजरेस पडण्याची किंवा त्याच्यापुढें जाण्याची जर तुझी छाती होत नाहीं तर मी विचारतों कीं, हेंच तुझे सद्गुण आणि हीच तुझी हिंमत की काय ? खरें पहातां हा तुझा नामर्दपणा नाहीं कीं काय ? ’

सिद्धराम– परंतु, फैजीचे शेवटचे शब्द–

गुरुपाद– ह्या बाबतींत तूं शंका घेशील हें मला प्रथम पासून वाटतच होतें, आणि ती विचार करण्यासारखी बाबत आहे, त्याबद्दल मी नाहीं म्हणत नाहीं. फैजीनें तुला शाप दिला हें स्वाभावीकच आहे. योगानुसार एकादे अशुभसमयीं मनुष्याचे हातून लज्जास्पद वर्तन झालें तर त्या कलंकाबद्दल जन्मभर शोकाग्रस्त राहण्याची जरूर नाहीं. कारण, कांहीं कालानें त्या लोकांची परत प्रीति संपादन केली जाते. तरी तूं मजकडून जी सलाह घेण्यास आला आहेस आणि मीही खुशीनें देत आहे ती ध्यान देऊन ऐक— ‘ तुझें आचरण कसें अधम आणि दोषास्पद होतें त्याचें तुला पूर्ण भान आलें आहे; त्यामुळें तूं बादशहापुढें, इरावतीपुढें, तसेंच माझ्यापुढें दोष स्वीकारलेस. तूं स्वतःला अपराधी समजतोस; ज्या प्रकारच्या अपराधामुळें तूं आडमार्गाला चढलास, तशाप्रकारचे अथवा दुसरे अपराध तुझ्या हातून पुनरपि न घडलें पाहिजेत. शेवटीं अशा स्थितीला पोहोंचले पाहिजे कीं, कर्तव्य किंवा प्रतिज्ञेविरूद्ध वर्तन होण्याचा कांहींच संभव राहिला न पाहिजे. लोभ विष-

यापासून दूर राहण्याचा जर तूं यत्न करीत असशील तर तें तुझ्या हातून होणार नाहीं. प्रथम तूं आपल्या गर्वाला वश कर आणि आयुष्याची सुरुवात कर. इरावतीला अर्धांगना कर आणि तिला तूं लायक आहेस असें दाखीव. बादशहाजवळ जा आणि तुझ्या देशाची कोणत्याहीप्रकारें सेवा घडेल असें काम सोपण्याबद्दल त्याची विनंती कर. तुझी विनंती तो खुषीनें कबूल करील अशी माझी खात्री आहे. फैजीला भेटावें अशी तुझी इच्छा नाहीं; अस्तु. दोन मनुष्यांना पृथक ठेवण्याला भरतखंड पाहिजे तेवढा विशाल आहे. आग्र्यांत राहून जी देशसेवा घडेल तीच काश्मीर किंवा अन्यस्थलीं राहूनही घडेल; तरी ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून चांगलें मनन कर आणि काय निश्चय होत आहे तो मला सांग.—' नाहीं, नाहीं मला एकदम उत्तर देऊं नको ' सिद्धराम त्याचक्षणीं उत्तर देत आहे असें पाहून गुरुपाद म्हणाले ' मला वाटतें तुला विश्रांती घेतली पाहिजे, तरी जा, विश्रांती घे, आणि मीं सांगितलें तें सर्व मनन कर. माझ्या विचाराप्रमाणें वागण्यास कांहीं हरकती सारखें वाटत असल्यास मला उद्या सांग ' इतकें सांगून आणि स्नेहयुक्त डोकें हालवून तो राजतपस्वी सिद्धरामाला विचार करण्याकरितां एकटाच सोडून आपण दुसऱ्या खोलींत निघून गेला.

दुसरे दिवशीं गुरुपादाची रजा घेऊन जाण्याकरितां सिद्धराम तयार झाला होता. ही भेट कदाचित् शेवटचीच होती. बराच वेळ दोघे गंभीरपणें गोष्टी सांगत उभे होते. शेवटीं आपल्या घोड्यावर स्वार होण्याकरितां सिद्धराम वळला. त्यावेळेस आपल्या सलाहकाररूपी गुरूचा हात अती आनंदानें दाबून आणि सद्गदित कंठानें तो म्हणाला ' तुह्मी पुनरुत्साह येण्यासारखी मसलत मला दिली आहे, त्याबद्दल हे गुरुपाद, हे सत्यदर्शी तपस्वी, मी तुमचा मोठा उपकार समजतों. तुमच्याचमुळें मला एक नवीन जीवीत प्राप्त झालें आहे. हा वेळपर्यंत ज्या रीतीचें माझें वर्तन होतें त्याहून अगदींच निराळ्या प्रकारें मीं वागेन. पश्चात्ताप कशाला ह्मणतात तें तुह्मी मला समजून सांगितलें. तुह्मी एका अयोग्य मनुष्याला चांगली सलाह दिली आहे. पुन्हां असा कधींही प्रसंग न येवो, हींच ईश्वराजवळ माझी विनंति आहे.

असें ह्मणून अती नम्रतेनें गुरुपादच्या पाया पडून आणि त्यांची आज्ञा घेऊन तो तेथून निघाला. दोघांच्याही नेत्रांतून आनंदाश्रु निघाले. जोंपर्यंत गुरुपाद आपल्या पर्णकुटीच्या द्वारांत उभे राहिलेले दिसत होते, तोंपर्यंत सिद्धराम मागें वळून त्यांचेकडे वारंवार पहात होता. जेव्हां ते दिसेनासे झाले तेव्हां तो निराश झाला. परंतु, नवीन उत्साह आलेला आपल्या वत्स नांवाच्या चाकराबरोबर घोडा दवडींत ज्या ठिकाणीं त्याची भावी अर्धांगी इरावती व गुरु कुल्लुक होते त्याठिकाणीं लवकर पोहोंचण्याच्या हेतूनें निघाला. वाटेंतून जातांना त्याचें मनांत तरतऱ्हेचें विचार घोळत होते, असें त्याचे चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. आपण इरावतीचा केलेला अव्हेर व तिची आपल्यावरील निःसीम प्रीति, आणि गुरुपाद यांचे आज्ञेप्रमाणें इरावतीशीं आपलें कायमचें होणारें नातें वगैरे विचार त्याचें मनांत घोळत होते. इतक्यांत 'ज्या ठिकाणीं त्याची भावी अर्धांगी इरावती व गुरुकुल्लुक' सिद्धरामाची मार्गप्रतिक्षा करीत बसले होते, त्या मठांत सिद्धराम आपल्या वत्स नांवाच्या चाकरासह येऊन पोहोंचला. नंतर त्यानें गुरुपाद यांचे भेटींतील सर्व हकीकत कुल्लुकगुरु यांना सांगितली. गुरुपाद व गुरुकुल्लुक याचे आज्ञेप्रमाणें सिद्धरामानें साध्वी इरावतीचें पाणिग्रहण केलें.

# उपसंहार.

सिकंदरा नांवाच्या गांवाजवळ एक भव्य इमारत आहे. प्रत्येक मुसाफर तिची भव्यशोभा पाहून आश्चर्यचकित होतो. मोंगल वंशांतील शेवटच्या स्मरणचिन्हापैकीं ती एक आहे. आंत जाण्याला, अनेक मिनारे असलेल्या एका भिंतींत लाल आरसपानाचा मोठा दरवाजा आहे. तेथून पुढें कांहीं अंतरापर्यंत घनदाट वृक्ष आहेत. त्याचे पलीकडे एक उंच आणि विशाल जागेवर सुशोभित राजमंदीर आहे. दुरून दिसणाऱ्या सौंदर्यावरूनच नाहीं; परंतु, त्या इमारतीचे दरवाजे, मिनारे, लहानमोठे घुमट, तसेंच सज्जे पाहून फारच सानंदाश्चर्य वाटतें; आणि स्मारक चिन्हाहूनही अगणित राजमहाल आणि ऐषआरामाच्या वैभवभुवनाप्रमाणें त्याचा देखावा दिसतो. परंतु जिवंत मनुष्याच्या निवासस्थानाकरितां बांधलेलें राजमंदीर नसून हें जग सोडून गेलेल्या कीर्तिवंत महापुरुषाचें स्मरण राहण्याकरितां ते बांधिलें आहे--आणि तो ह्या दुनियेंत अचलकीर्ति संपादन करून गेलेला *अकबर बादशहा होय.

---

*अकबर बादशहा सन १६०५ च्या आक्टोबर महिन्यांत मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ६५ वर्षांचें होतें. त्याचे मागून त्याचा मुलगा सेलीम, जहांगीर असें नांव धारण करून गादीवर बसला. त्याचे सांगण्यावरून अकबरला विषप्रयोग करण्यांत आला होता, असा कित्येकांस संशय आहे. आग्राशहरापासून चार मैलावर शिकंदराबाद येथें त्याला-पुरण्यांत आलें. त्याचे समाधीवर एक मोठी सुशोभित इमारत आहे. ही इमारत बांधण्याचें काम अकबरानें स्वतःच सुरू केलें होतें. मि० फरग्यूसन त्यासंबंधीं लिहितो कीं:--हिंदुस्थानांत अकबराच्या वेळेपूर्वीं किंवा नंतर ज्या दुसऱ्या समाधी बांधल्या गेल्या आहेत त्याहून अगदींच निराळ्या प्रकारची ही समाधी आहे. ही इमारत हिंदू अथवा बौद्धशिल्पशास्त्रानुसार बांधिली आहे. एका विशाल बागेंत ही इमारत आहे. आंत

मागें वर्णन केलेली हकीकत घडल्यानंतर कांहीं वर्षांनें ( सिंकदराबाद येथील भव्य इमारतीचे सभोंवार असलेल्या ) बागेंत एक दंपत्य उभें होतें. त्यांत एक उत्तम पोषाक केलेला भव्य पुरुष होता. त्याचा एक हात तरवारीचे मुठीवर होता आणि दुसरा हात जवळ उभी असलेल्या सुंदर आणि तरुलतेप्रमाणें भासणाऱ्या सजीव पुतळीच्या कमरेभोंवती होता. हे दोघे इरावती आणि सिद्धराम होते. भव्य इमारतीमधील या समाधीसमोर विस्मयांत गर्क होऊन ते दोघे चित्रवत् उभे होते. ज्या सत्पुरुषाबद्दल ते मानपूर्वक गोष्टी सांगत असत त्याची ह्यावेळेस त्यांना आठवण झाली.

ह्या थोड्या वर्षांचे मुदतींत पुष्कळ फेरफार झाले होते. अकबर बादशहा शांतींस्थानांत निवास करीत होता. त्याचा मुलगा सेलीम राज्य करीत होता. त्यानें आपल्या बापाच्या मरणसमयींच्या इच्छेप्रमाणें, जी तरवार अकबर सदोदित जवळ बाळगीत असें, तीच तरवार आपल्या

---

जाण्याला एक मोठा आणि सुंदर दरवाजा आहे. बागेच्या मध्यभागीं एका उंच चौथऱ्यावर पिरामिडच्या आकाराचा एक सुंदर रोजा आहे. खालच्या भुईमजल्याचे माप दरेक बाजूनें ३२० फूट आहे. खेरीज प्रत्येक कोंपऱ्यावरील मिनारे निराळे. हा मजला३० फूट उंच आहे. त्याच्या दरएक बाजूला दहा दहा मोठमोठ्या कमानी आहेत. मध्यभागीं एक सर्वांत मोठा दरवाजा आहे. ह्याहूनही जास्त सुशोभित दुसरा मजला आहे. त्याचें माप प्रत्येक बाजूनें १८६ फूट आहे आणि चौदा फूट नऊ इंच उंच आहे. त्यावर एक तिसरा आणि चौथा मजला आहे. सर्व काम लाल जैयपुरी धोंड्याचें आहे. शेवटच्या मजल्यावर एक सफेत आरसपानी घुमट आहे. त्याचें वरचें बाजूचे काम सुंदर आरसपानी जाळीदार केलें आहे. आंत एक कबरस्थानचा धोंडा आहे. अरबस्थानी सुंदर कोंरीव कामाचा तो एक नमुना आहे. अकबर बादशहाचें शव भुईमजल्यावर एक अगदीं साध्या धोंड्याखालीं आहे. फ० इं० आरकिटेक्चर पान ५८३.

हिंदुस्थानचें गव्हरनर जनरल अर्ल ऑफ नॉर्थब्रूक सिकंदराबाद येथें गेले होते. त्यावेळेस तेथें त्यांनीं अकबराच्या समाधीप्रीत्यर्थ एक सुंदर मौल्यवान चादर बक्षीस केली.

कमरेस बांधिली होती. * जहांगीर नांव धारण करून तो ह्यावेळेस सर्व हिंदुस्थानचें राज्य करीत होता. अकबराची तो अगदींच बरोबरी करूं शकणार नाहीं, असें प्रथम अनुमान करण्यांत आलें होतें. परंतु त्याचें राज्यशकट कांहीं इतकें वाईट ह्मणण्यासारखें निवडलें नाहीं. आणि त्याच्या नंतर गादीवर येणारे § शहाजहान आणि ‡ औरंगजेब यांनीं एकेवेळीं अती समर्थ अशा चक्रवर्ती राज्याची इतकी कांहीं दुर्दशा केली कीं, तें इंग्लिशच्या हातीं फारच लौकर व सहज गेलें.

सेलीमनें आपल्या वाईट संवयीं कांहीं अगदींच सोडिल्या नव्हत्या. सिद्धरामानें त्याला ज्या स्थितींत पाहिलें होतें तशाच स्थितींत परंतु, व्यसनांत जरा कमी होता. तरी तो अगदींच सुधारणार नाहीं अशातला

---

* सेलीमनें जहांगीर उपपद धारण करून सन १६०५ तें १६२७ पर्यंत राज्य केलें. त्याची आई रजपूत कन्या होती. तो निर्दय, लोभी आणि विषयांध होता. अती क्रूर रीतीनें त्यानें आपला पुत्र खुशरू याचें बंड शमविलें. सन १६०८ सालीं क्यापटन विलियमहॉकिन्स सुरतेस उतरला. तेथून तो आग्राशहरीं आला. सेलीमकडून त्याला चांगला मान मिळाला. परंतु दोन वर्षानंतर व्यापारासंबंधीं कितीएक हक्क त्याला मिळाले नाहींत; ह्मणून सन १६११ त तो परत गेला. जहांगीरची बेगम नूरजहान इचे त्याच्यावर बरेंच वरचस्व होतें. परंतु, जहांगीरपासून तिला कांहींच मूल झालें नाहीं. त्याला चार मुलगे होते. वडील खुशरू यानें बंड केल्यामुळें त्यास कैद केले होते. दुसरा पर्विज हा दारूबाज होता. तिसरा खुरुम, शाहाजहान नांव धारण करून गादीवर बसला. चौथा शहरियार सर्वांत लहान होता. सन १६१५ त इंग्लंडचा राजा पहिला जेम्स यानें सरटॉमस रो यास जहांगीरचे दरबारीं वकील ह्मणून पाठविलें. सन १६१८ पर्यंत तो तेथेंच होता. सन १६२७ च्या आक्टोबर महिन्याच्या १२ व्या तारखेस जहांगीर मरण पावला आणि त्यानंतर शाहाजहान गादीवर बसला.

§ शाहाजहाननें सन १६२८ ते १६५८ पर्यंत राज्य केलें.

‡ औरंगजेब यानें सन १६५८ ते १७०७ पर्यंत राज्य केलें.

दारूबाज नव्हता. इरावतीला दिलेलें वचन त्यानें पाळिलें. तिच्या बाबतींत तो दिलगीर झाला होता, तरी चतुर आणि लावण्यवती नूरजहान इच्याशीं लग्न करून तो सुखी झाला होता. *नूरजहानचे त्याच्यावर बरेंच वरचस्व होतें. आणि त्यामुळें बराच फायदाही झाला.

काश्मीर देशाला शेवटीं पराधीन व्हावें लागलें. सेलीमचें कपटाचा भंग झाल्यावर अकबर बादशहा काश्मीर देशांत गेला. तो देश ताब्यांत घेण्याला त्याला कांहींच प्रयास पडले नाहींत. तेथील निर्बल राजा मरण पावला. राज्यपदाला अयोग्य अशा त्याच्या मुलांना देशनिकाल केले. सिद्धरामाचे बापाला तेथील प्रतिनिधी नेमिले, आणि सिद्धरामासही एक चांगली जागा मिळाली, तसेंच बापाचे पश्चात् प्रतिनिधींची जागा सिद्धरामासच मिळावी असें ठरविण्यांत आलें.

कुल्लुक पूर्वींप्रमाणेंच निमकहलाल राहून सलाह देत होते. स्थाईक राज्याच्या सुख आणि शांतीचीं फळें चाखण्याला काश्मीर येथील प्रजाजनांस जास्त वेळ वाट पहावी लागली नाहीं.

बाद्रिनाथ येथील तपस्वी आपला देश मोंगल बादशहाचे हातीं गेलेला ऐकून ज्यास्त दिवस जगला नाहीं. एकदां कुल्लुक त्यांना भेटण्याकरितां गेले. त्यावेळीं फक्त चाकरालाच त्यांनीं पाहिलें. त्याचा स्वामी एकाएकीं अजारी होऊन थोड्या दिवसांत स्वर्गवासीं झाला होता. ' हर ' स्वामीच्या समाधीवर निजून रहात असे. अन्नपाण्याचा त्यानें त्याग केला होता, आणि थोड्याच दिवसांत आपल्या स्वामीच्या समाधीवर त्यानें देह सोडिला.

पर्विजला सिद्धरामाच्या गुलाबदान बरोबर झालेल्या भानगडीची कांहींच माहिती नव्हती. सिद्धरामास वेळोवेळीं त्याचेकडून पत्रें येत होतीं. कोशाध्यक्ष तोडरमलच्या मुलीशीं लग्न करून तो सुखी झाला होता, आणि राज्यांत जरी त्याला मोठ्या अधिकाराची जागा मिळाली होती. तरी आपल्या प्रियकाका अबुलफजलच्या विद्या आणि चातुर्यासंबंधीं लेखांचा संग्रह करण्यांत गुंतला होता.

* नूरजहान मुळेंच दारु पिण्याचें कामीं जहांगीर जास्त नियमित झाला होता.

अब्दुलकादिर लोकव्यवहारांतून दूर राहिला होता; आणि मागाहून तो जरी जास्त शाहाणा झाला तरी आपल्या धर्मसंबंधीं जशाचातसाच धर्मांध होता. अनेकप्रकारें आशाभंग झाल्याकारणानें त्यानें *तवारीक लिहिण्यास सुरवात केली. त्यांत अकबर संबंधी त्यानें सक्त लिहिलें असून अबुलफजल आणि फैजी कीं जे त्याला कधींही वाईट वाटण्यासारखे वागले नव्हते. त्यांनाही पुष्कळ शिव्याशाप दिले होते.

अक्केविया फिरून आग्रा शहरांत आलाच नाहीं. परंतु त्याचें काम चालूं ठेवण्याकरितां दुसरे आले होते. आणि त्याच्या इतकेंच यशस्वी झाले होते. जरी तीन शतकें होऊन गेलीं तरी हिंदुस्थानांत परधर्म स्वीकार होणें, हे पाश्चिमात्य उत्साही लोकांस अद्याप स्वप्नवत् वाटत आहे.

निमकहलाल वत्स यानें बोलकी परंतु चांगल्या स्वभावाची सैरंध्री निपूणिकेशीं लग्न केलें किंवा नाहीं हें इतिहासकार दर्शवीत नाहीं; परंतु त्यांनीं आपल्या मालक मालकिणी प्रमाणेंच केलें असेल असें ज्यास्त संभवनीय आहे. सिद्धराम आणि इरावतीच्या सुखांत कांहीं उणीव पडली नाहीं. जरी मागच्या गोष्टींचें स्मरण होऊन सिद्धरामाचें मनास वाईट वाटत असें तरी हळूं हळूं त्याला त्या गोष्टीचें विस्मरण होत चाललें. सिद्धराम आणि इरावतीचें लग्न झाल्यावर थोड्याच मुदतीचे आंत त्यांस पुत्रप्राप्ति झाली. इरावतीवर सिद्धरामाचें जितकें प्रेम होतें; त्याहून ज्यास्त त्या मुलावर होतें.

एकेदिवशीं संध्याकाळीं अकबराच्या समाधीजवळ सिद्धराम बराच वेळ विचार करीत उभा होता. इरावतीही जवळ होतीच. इतक्यांत त्याच्याकडे येणाऱ्या कोणा मनुष्याची पावलें ऐकून ज्या दिशेकडून तो आवाज आला तिकडे त्यानें पाहिलें. त्या येणाऱ्या गृहस्थाला ओळखून तो दचकून मागें सरला; आणि कंपीत तसेंच दुःखीत हृदयानें जे शब्द त्याचे तोंडून निघाले ते ऐकून इरावती समजली कीं, एक दुःखदायक समागम ह्यावेळेस घडला आहे. सिद्धरामाचें तोंडून ' अरे फैजी ' असे शब्द निघाले होते.

---

* तबारिखी बेदाउनी ह्या नांवानें हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

त्या दंपत्याजवळून जो पुरुष चालला होता तो एकाएकी थांबला. ज्यानें त्याची अप्रतिष्ठा केली होती त्याला पूर्णपणें ओळखून तो जरा रागावला; परंतु, तत्क्षणीं आपले विचार बदलून तो पुढें चालला. हें पाहून सिद्धराम लवकर परतला; परंतु, ज्याची सद्वृत्ती सदा ऊर्ध्वगामी होती असा कर्तव्यकुशल, सत्यस्वरूपी महापुरुष फैजी ह्मणाला, ' थांब, उभा रहा, आणि मी सांगतों तें ऐक. जो बादशहा आपल्या शत्रूंना शिक्षा करण्यापेक्षां दया करण्यांत ज्यास्त आनंद मानीत होता. तिरस्कार ही काय वस्तू आहे हें ज्याला माहीत नव्हतें; त्या बादशहाच्या समाधी-जवळ मला कांहींएक राग न दर्शविला पाहिजे. त्याचा उमदा दाखला घेऊन त्याप्रमाणें वागण्याचा तसेंच माझ्याशीं तूं जी वाईट वर्तणूक केली होतीस त्याबद्दल क्षमा करण्याचा मी कित्येकवेळीं यत्न केला होता; परंतु, तसा योग आलाच नाहीं. सुदैवानें आज ह्या पवित्र जागीं आपण भेटलों तरी माझ्या स्थितींत अकबर स्वत: असतां तर त्यानें जें काम केलें असतें तेंच करण्याची हल्लीं माझ्यांत शक्ती आली आहे. मी तुला क्षमा करतों. प्रिय मित्र ! सिद्धराम ! ! '

हें ऐकून सिद्धरामाची छाती भरून आली आणि खाली मान करून तो आपल्या कुलीन शत्रूसमोर उभा राहिला. तसेंच आपल्या मनांतील अनिवार वेग वश करणाऱ्या त्या गृहस्थाकडे पहात सानंदाश्चर्यानें इरावती उभी राहिली.

फैजी—वर पहा ! तुझ्या पूर्वींच्या मित्रापासून दूर राहण्याची आतां कांहीं जरूरी नाहीं. रागांत मी जे शब्द तुला बोललों ते जरी गैरवाजवी नव्हते, तरी तुझ्या सारख्या वृत्तीच्या मनुष्याला बेशक भयंकर आणि कडक शिक्षा होती. त्याचा परिणाम तुझ्यावर कसा झाला, तूं कशी आत्मघातककृत्यें करण्यास तयार झालास, तें सर्व मला कुल्लुककडून समजलें. त्यानें माझी खात्री केली कीं, त्यांत प्रथम तुझा अपराध नव्हता. अज्ञानपणांत तुझ्या हातून तसें घडलें. त्या स्त्रीचा प्रभाव आणि आकर्षण-शक्तीचा मला पूर्ण अनुभव आहे; परंतु, आतां तिची कांहीं धास्ती नाहीं. आपल्या दुष्ट आयुष्याचा अंत तिनें कैदेंत आपण होऊनच आणिला. परंतु, आतां त्या गोष्टी जाऊं दे. तुझी पतिव्रता, यशस्विनी, महाभागा आणि

कुलीन अर्धांगना कीं, जी मला वंदनीय आहे, तिच्या समक्ष गतगोष्टींची आठवण करणें योग्य नाहीं. आपल्या शेंवटच्या भेटीनंतर तुझ्या बाबतींत मी जी हकीकत ऐकिली त्यावरून एका प्रतिष्ठित गृहस्थाप्रमाणें मान आणि मैत्रीला तूं लायक झाला आहेस. तरी आपण पूर्वीप्रमाणें एकमेकांस आलिंगन देऊन आनंदित होऊं.

हे शब्द ऐकून सिद्धरामाच्या मनाची अशी कांहीं चमत्कारिक स्थिती झाली कीं, तो आपला हातही पुढें करूं शकला नाहीं. किंवा भेटूंही शकला नाहीं. असें पाहून इरावतीनें फैजीचे हातांत सिद्धरामाचा हात दिला आणि ह्मणाली " आपल्या औदार्याबद्दल, अमीरउलउमराव ! ! मी खऱ्या अंतःकरणानें आपले उपकार समजतें. आमचें लग्न झाल्यानें सुखप्राप्ती झाली तरी त्यांत जो कलंक राहिला होता तो आज आपल्या शब्दानें दूर झाला आहे. ज्या शापरूपीं भारानें माझे पतिराज हा वेळपर्यंत उदास आणि बेचैन राहत होते त्यांतून आपल्या कृपाळू स्वभावामुळें शेवटीं ते मुक्त झाले आहेत. "

शेवटीं सिद्धराम ह्मणाला ' मी शब्द आठवतों; परंतु ह्याक्षणीं माझ्या मनाची जी कांहीं स्थिती झाली आहे ती व्यक्त करण्याला मला शब्दच सांपडत नाहीं. एकदां एका सत्पुरुषाचे उपदेशानें माझें शांतवन होऊन माझ्यांत शक्ती आली असें मी समजत होतों आणि माझ्या आयुष्याची नवी सुरवात झाली असें मात्र वाटलें होतें. परंतु नवा जन्म तर खरोखर आतांच झाला आहे. तुमची मैत्री मी हमेशा अती मौल्यवान् समजत होतो आणि जरी माझ्या हातून झालेल्या निर्लज्यपणाच्या अपराधामुळें मी ती मैत्री घालविली. आत्मनिंदेस पात्र झालों आणि मला झालेली शिक्षा मी फारच कडक समजूं लागलों; तरी ह्या अशा उदार अंतःकरणानें तुह्मी मला फिरून मित्र ह्मणून कबूल करण्याची इच्छा दर्शवितां हें मला एक अमूल्य बक्षीस देतां असें मीं समजतों. '

फैजी ( प्रसन्न होऊन अनुकंपित स्वरानें )—आपली ही अकस्मित भेट फारच थोडा वेळ चालेल आणि तीही शेंवटचीच होईल असा पूर्ण संभव आहे. मीं चाकरी सोडिली हें तर तुला माहीत आहे. सेलीम अथवा गर्विष्ठपणामुळें जें नांव त्याला ज्यास्त पसंत आहे त्याप्रमाणें

जहांगीरचे माझ्या भावाच्या बाबतींत कधींही चांगले विचार नव्हते, खेरीज कितीएक कारणानें त्याच्या हाताखालीं चाकरी करणें मला पसंत नाहीं. आग्रा शहरांत मी एकांतवासांत राहत आहें; परंतु, हल्लीं इराणचा राजा शहाअब्बास यानें मला आपल्या राजधानींत बोलाविलें आहे. तेथें विद्येसंबंधीं नवीन शोधाचें कामांत गुंतेन. हें * आमंत्रण मीं कबूल केलें आहें. उदईक इस्पहान येथें जाण्यास मी निघणार आहे. कदाचित् मी तेथेंच राहीन. परंतु, माझा अकबर मित्र जो मला माझें प्राणाहून जास्त होता त्याच्या शांतिस्थलाची शेंवटची भेट घेतल्यावांचून हा देश सोडणें मला ठीक वाटलें नाहीं. ज्याचा खरा परिचय फारच थोड्यांस झाला होता, ज्याचें महत्व सर्वांस आनंदमय वाटत होतें, त्याचा गाढ परिचय तुझांला नसल्या कारणानें त्याची खरी माहिती मिळण्यास संधी मिळाली नाहीं, तरी तूं त्याला मान देत होतास, आणि सत्पुरुषाप्रमाणें समजत होतास, असें तूं आपल्या वर्तनावरून सिद्ध केलें आहेस.

सिद्धराम ( सद्गदीत होऊन )– गोष्ट खरी आहे. जरी संपूर्ण रीतीनें त्याचे गुणअवगुण मीं समजूं शकलों नाहीं, तरी त्याचे बाबतींत माझ्या मनांत अतिप्रेम आणि पूज्यभाव उत्पन्न झाला होता. एक महात्मा जो थोडे दिवसांपूर्वीं हें जग सोडून गेला; ज्याचा मी फारच आभारी आहें आणि ज्याचें नांव मला अति प्रिय आहे त्याला मी फारच ओळखीत होतों; तरी दोघांही राजकर्त्यांत मोठा कोण असा मला प्रश्न विचारण्यांत आला तर आतां माझी खात्री झाली आहे त्यावरून असेंच सांगेन कीं, तो एकांतवासी तत्वज्ञानी, ज्यानें संसारिक आनंद आणि मोठेपणाचा त्याग केला होता त्याच्याहून गादीवर बसलेला तत्वज्ञानी जो हानीकारक पक्ष आणि बंडाच्या वेळेस एकसारखें वर्तन, न्यायीपणा, समदर्शीपणा, तसेंच मनाची आस्थिरता कशी सांभाळावी हें चांगलें समजत होता तोच अकबरबादशहा जास्त सन्माननीय होय.

* हें आमंत्रण ऐतिहासिक नाहीं. गोष्टीच्या प्रयोजनास्तव फैजीचें आयुष्य लांबविलें आहे. खरें पहातां त्याचा भाऊ जो अबुलफजल त्याचा खून होण्याचें पूर्वींच तो मरण पावला होता.

फैजी दुःखित अंतःकारणानें ह्मणाला ‘ पूर्वेकडील तसेंच पश्चिमेकडील ह्यापुढें होणारी सर्व नवीन प्रजाही असेंच ह्मणेल. सेलीम उर्फ जहांगीर यास त्याच्या खुशामतखोर लोकांनीं समर्थ हा किताब दिला आहे; परंतु तो कांहीं योग्य मोजला जाणार नाहीं. खरा समर्थ तर त्यालाच ह्मणावें कीं, ज्याला स्वतःवर अंकुश कसा ठेवावा आणि दुसऱ्यावर अमल कसा चालवावा हें चांगलें माहीत आहे, तसेंच आपल्या जातीबांधवांचे कल्याणाकरतां कसे कसे प्रसंग सोसले पाहिजे आणि काय मेहनत घेतली पाहिजे हें पूर्णपणें माहीत आहे; आणि ह्याच बाबतींत ह्या अखंड विश्रांती घेणाऱ्या महात्म्यानें आपलें महत्व दर्शविलें होतें. दुसरे अनेक राजे आहेत आणि ह्या उपरांत होतील; कीं, ज्यांचीं नांवें इतिहासांत अकबर बादशहाचें नांवाहून जास्त मशहूर होतील; तसेंच त्याहून वेळेस जास्त कीर्ति मिळवितील; परंतु, महात्मापद भोगण्याचें बाबतींत अती उत्तम आणि महत्वाचा अर्थ घेऊन मनुष्यप्राण्याच्या कर्तव्यकर्माचा विचार केल्यास अकबर बादशहाची बरोबरी करणारा बादशहा क्वचितच सांपडेल. ’ परंतु आतां, सिद्धराम आणि इरावतीचा हात धरून फैजी ह्मणाला “ शेवटचा सलाम. प्रिय मित्रांनो ! तुह्मां दोघांस शेवटचा सलाम. येथून मी फार दूर जाणार आहें. केव्हां केव्हां माझी आठवण करीत जा. आतां तुह्मांस तसें करण्यांत कांहीं त्रास होणार नाहीं; तसेंच जो बोजा सहन करण्याचे कित्येक वेळीं मला कठीण वाटत होते, तो ह्या भेटी झाल्याकारणानें माझ्या मनावरून सुदैवानें दूर झाला आहे. ”

फैजी तेथून गेल्यावर कांहीं वेळपर्यंत सिद्धराम आणि इरावती त्या बगीच्यांत विचारांत गुंग होऊन इकडेतिकडे फिरले; आणि शेवटीं महात्म्या बादशहाच्या समाधीला वंदन करून आल्या रस्त्यानें मंद मंद पावलें टाकीत परतले.

सिद्धराम घराकडे जात असतां म्हणाला, ‘ जो पुरुष आतांच गेला तो तर बहुतकरून परत भेटणार नाहीं. अकबर, अबुलफजल व फैजी ह्यांचे सारख्या महात्म्याचे जिवीताचा शेवट होतो त्यावेळेस ते मृत्यु पावले असें मोजले जात नाहीं. जी सदांसर्वकाळ आठवण राहण्यासा-

रखीं कृत्यें ते मागें ठेऊन जातात, त्यामुळें ते चिरंजीव आहेत. त्या महापुरुषासंबंधीं विचार त्यांचे पश्चात जन्मास येणाऱ्या मनुष्यांचें अंगीं हिंमत आणितात, आणि हेंच खरोखर पाहतां अमरत्व–चिरंजीवित्व नाहीं काय ? ’

समाप्त.

# पोंच.

हें पुस्तक छापण्याचें पूर्वी ज्या संस्थानीकांनीं व सद्गृहस्थांनीं, माझ्या विनंतीस मान देऊन, पुस्तकाचे किंमतीपेक्षां जास्त सहाय्य केले; त्यांचीं व आगाऊ आश्रयदात्यांची नांवें:—

श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड, रु. २००; श्रीमंत रामराव आबासाहेब डफळे जतसरकार, ५०; श्रीमंत महाराज कृष्णशहा राजेसाहेब, २५; श्रीमंत सरकार माधवरावपंत अमात्य, २५; श्रीमंत सरकार आबासाहेब पंतप्रतिनिधी, २५; राव. विष्णुपंत फडके फर्स्टक्लास सबजज्ज १०; सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, ५; व्ही. जे. कीर्तीकर, ५; सौ. माणकबाई कोठारे, ५; श्रीमंत वा. ब. सोमण, ५; प्रो. राममूर्ती इंडियन सँडो, ५; धर्मसी व नरोत्तमदास मुरार्जी, ५; बळवंत गोविंद बेडेकर, ५; रा. ब. कृ. वि. शारंगपाणी जज्ज बडोदे, ५; श्रीमंत शं. गं. पटवर्धन, ५; ब. के. महाराज, २; के. ग. देशपांडे ब्यॅरिस्टर, २; गं. बा. रेळे हा. प्लीडर, २; दिक्षित सालिसीटर, २; ना. दाजीसाहेब खरे, २; गं. ना. मोघे, २; रा. ब. भार्गवराव गाडगीळ, २; रा. ब. चिं. वि. वैद्य, २; डब्ल्यू. जी. दांडेकर, २; स. गो. गद्रे, २; राव. रा. त्रिं. चिपळूणकर, २; दा. म. लिंगडे, २; के. जी. गावडे, २; शाहाजादेसाहेब, २; गं. बा. देशपांडे वकील, २; राव. आर. जी. भडभडे सबजज्ज, २; रामराव बल्लारी वकील, २; ए. के. कट्टी वकील, २; राव. ल. पां. कुळकर्णी, २; दादासाहेब हेबळीकर, २; बी. आर. आपटे रे. फौजदार, २; गोपाळराव सुळे, २; शंकराव आपटे वकील, २; एक रुपाया दिलेलेः—एल्. गोळे हा. प्लीडर; गो. गाडगीळ ब्यॅरिस्टर; कृ. पां. फडके; डी. पी. बनकर; एच् व्ही. लेले; के. एच्. केळकर; एस्. बी. आपटे; बी. एस् पंडित; जे. के. परुळकर; सी. बी. लिमये; सी. ए. रेळे; व्ही. एन्. वेलणकर; एल्. एच्. छत्रे; के. टी. जोशी; एस्. जी. फाळके; स. धों. आळतेकर वकील; डॉ. डी. के. काळे; राव. पंडित सरन्यायाधीश; धों. बा. सराफ; जी. आर. ओक वकील; ग. ल. वेलंगी; डॉ. मो. ना. पेठे; स. बा. भाटे वकील; एस्. जी. कुडचीमठ; डॉ. वि. कुळकर्णी; एस्. जे. तेलंग वकील; एन्. व्ही. गुणाजी वकील; एस्. बी. नगरकर वकील; के. जी. आजरेकर वकील; आर. एस्. केळकर वकील; द. परुळकर जमादार; आर.

व्ही. गिंडे; बेळवी वकील; शा. कालकुंद्री; गो. व्यं. याळगी; जी. आर. अनलावर; आर. ए. कोकटनूर; एन्. बी. लिमये वकील; व्ही. व्ही. जोशी वकील; एस्. एच्. शहाणे वकील; जी. बी. काळे डे. अ.; एस्. एस् मुजुमदार; करीगौडा मुद्दीगौडा; के. एस्. पाटील; जी. आर. काळे; ये. श्री. फाटक; एस्. एस्. कमलापूरकर; जोशी प्रिन्सिपाल; आर. के. आलूर; एस्. आर. मोडक; डॉ. एस्. आर. गोरे; एन्. बी. कोल्हटकर; आर. व्ही. दिवाकर; बी. जी. कोचिंगआर्क; डी. एन्. देवस्थळे पो. स. इन्स्पेक्टर; व्ही. जी. पाठक फौजदार; व्ही. एस्. जोशी वकील; एस्. व्ही. कौजलगी वकील; जी. बी. पेठे वकील; आजरेकर वकील विजापूर; सिदुकाका पटवर्धन; डॉ. मेजर. सी. आर. बखले; एच्. के. गोखले डे.; डी. एस्. सप्रे स. जज्ज; जी. जी. हवालदारवकील; एन्. एस्. थिटे वकील; ने. ज. लायब्ररी बिजापूर; आर. एस्. कोडियाल; एल्. एन्. हुइलगोळकर; ए. के. बक्षी; एच्. व्ही. काणे स. जज्ज; एन्. व्ही. कोल्हटकर; एल्. व्ही. नाईक वकील; एन्. व्ही. गोखले फ. डे. इं.; बी. जी. दिवेकर;—सी. एन्. मुजुमदार; एच्. बी. तळवलकर वकील; डॉ. जी. बी. खेर; जी. आर. पिंपळखरे; व्ही. आर. जोशी; डॉ. एस्. जी. जोग; आर. एम्. आपटे वकील; आर. एन् गोखले वकील; व्ही. आर. नातू वकील; व्ही. एस्. नरगुंदकर वकील; एम्. बी. मराठे वकील; हणमंतरावदेशपांडे; वि. हेरलेकर वकील; जी. के. कुंबळे; रामचंद्रपुट्टो, पो. अ.; टी. के. पित्रे वकील; के. बी. अंकलगी वकील; एस्. जी. जोगळेकर; आर. के. केमभावीवकील; रा. खोतवकील; रा. अष्टेकरवकील.

श्रीमंत सरकार भाऊसाहेब जमखिंडीकर यांनीं अकबर पुस्तक छापून झाल्यावर ( द्रव्यद्वारा ) चांगली मदत करूं असें आश्वासन दिलें आहे. तसेंच, श्रीमंत आण्णासाहेब कुरुंदवाडकर आणि श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनींही आश्वासन दिलें आहे. शिवाय श्रीमंत पेडणेकर विस्कोंद साहेब, श्रीमंत विष्णुबाब धेपे व श्रीमंत दादासाहेब वैद्य यांचेकडून योग्य मदत होईल अशी आशा आहे.

वरील आश्रयदात्यांकडून प्रकाशकांस निरनिराळीं पुस्तकें छापण्याकरितां असाच वारंवार आश्रय मिळेल अशी उमेद आहे.

प्रकाशक.

गो. वि. आपटे.